डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद
अंतर्गत
विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली प्रायोजित

बृहत संशोधन प्रकल्प
Major Research Project

विषय
मराठवाड्यातील मराठी नाट्यलेखन आणि नाट्य चळवळीचा अभ्यास

Subject
MARATHWADYATIL MARATHI NATYALEKHAN AANI NATYA CHALVALICHA ABHYAS

A Thesis for
A Major Research Project in Marathi
Submitted to
University Grants Commission, New Delhi

By
Prof. Dr. Dasoo Hariharrao Vaidya
Professor, Department of Marathi,
Dr. Babasaheb Ambedkar Marathwada
University, Aurangabad

Sept. 2022

स्वगत...

मराठवाडा ही जशी संतांची भूमी आहे तशीच ती नाटककार आणि कलावंतांचीही भूमी आहे. निजामी राजवटीतील भाषिक-साहित्यिक-सांस्कृतिक गळचेपीमुळे मराठवाड्यामध्ये साहित्यलेखनासाठी पोषक वातावरण नव्हते. स्वातंत्र्योत्तर काळामध्ये मात्र मराठवाड्यातील रंगभूमीने आपला अनुशेष भरून काढत वेगळेपण सिद्ध केले आहे. मध्ययुगीन काळात विविध संत मंडळींच्या वाङ्मयनिर्मितीमुळे मराठवाडा साहित्यिक-सांस्कृतिकदृष्ट्या जेवढा अग्रेसर होता तेवढाच आज नाटक आणि एकूण साहित्य लेखनात अग्रेसर आहे.

नाट्यलेखनाच्या दृष्टीने मराठी रंगभूमीच्या तुलनेत मराठवाडा हा प्रदेश ऐंशी वर्षे पिछाडीवर असला तरी आज मराठी रंगभूमीवर मराठवाड्यातील नाटक आघाडीवर आहे. मराठी रंगभूमीला आशयसंपन्न करणाऱ्या दलित रंगभूमीची बीजभूमी मराठवाडा आहे. सातासमुद्रापार 'वऱ्हाड...' चे हजारो प्रयोग करत गिनिज बुक ऑफ वल्ड रेकॉर्डमध्ये सन्मान मिळवणारे लक्ष्मणराव देशपांडेही मराठवाड्याचे आहेत. आशय-विषयातील वेगळेपणामुळे एकूण मराठी रंगभूमी समृद्ध करणारे अजित दळवी, प्रशांत दळवी, दत्ता भगत, राजकुमार तांगडे हेही मराठवाड्याचेच नाटककार आहेत.

मराठवाड्यातील असंख्य रंगकर्मींनी मराठी रंगभूमीवर गौरवास्पद कामगिरी केली आहे-करत आहेत. डॉ. कमलाकर सोनटक्के, प्रा. वामन केंद्रे, प्रा. रुस्तुम अचलखांब, नंदु माधव, प्रा. दिलीप घारे, प्रा. यशवंत देशमुख, मकरंद अनासपुरे, मंगेश देसाई, संजय सुगावकर, अरविंद जगताप असे मराठी रंगभूमी-चित्रपट गाजवणारे रंगकर्मी ही या मराठवाड्याच्या नाट्य चळवळीची देण आहे. मराठवाड्याचे हे नाट्यसंचित सूत्रबद्ध पद्धतीने लिखित स्वरूपात यावे यासाठी 'मराठवाड्यातील मराठी नाट्यलेखन आणि नाट्य चळवळीचा अभ्यास' हा प्रकल्प प्रपंच केला आहे.

'मराठवाड्यातील मराठी नाट्यलेखन आणि नाट्य चळवळीचा अभ्यास' या संशोधनासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने मान्यता दिली, त्याबद्दल यु.जी.सी.चे मनःपूर्वक आभार मानतो. राजकुमार तांगडे आणि रावबा गजमल या तरुण रंगकर्मींनी प्रकल्पासाठी मुलाखत देऊन सहकार्य केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे ग्रंथपाल श्री धर्मराज वीर, सहाय्यक कुलसचिव श्री संजय कवडे व वित्त विभागाचे श्री ईश्वर पैठणे यांनीही मौलिक सहकार्य केले. त्याचबरोबर संशोधन सहाय्यक श्री रामेश्वर वाकणकर आणि प्रकल्पाची अक्षरजुळणी करणारे श्री समाधान खलसे या सर्वांच्या साहाय्याने हा प्रकल्प पुर्णत्वास गेला आहे. या सर्वांचे मनःपूर्वक आभार मानतो.

प्रा. डॉ. दासू वैद्य

अनुक्रमणिका

प्रकरण	प्रकरणाचे नाव	पृष्ठ.क्र.
प्रकरण पहिले	मराठवाड्यातील मध्ययुगीन व आधुनिक मराठी साहित्य	१-७३
प्रकरण दुसरे	मराठवाड्यातील नाट्य चळवळ	७४-११२
प्रकरण तिसरे	मराठवाड्यातील मराठी नाट्यलेखनाचे स्वरूप	११३-१७०
प्रकरण चौथे	मराठवाड्यातील रंगभूमीची वैशिष्ट्ये व वेगळेपण	१७१-१९५
प्रकरण पाचवे	समारोप व निष्कर्ष	१९६-२०८
परिशिष्टे :	परिशिष्ट - अ (मुलाखत)	२०९-२१९
	परिशिष्ट - ब (संदर्भग्रंथ सूची)	२२०-२२४
	परिशिष्ट - क (छायाचित्रे)	२२५-२२७

प्रकरण पहिले

मराठवाड्यातील मध्ययुगीन व आधुनिक मराठी साहित्य

- प्रस्तावना

१.१ मराठवाड्यातील मध्ययुगीन साहित्य

१.१.१ नाथ संप्रदाय

१.१.२ मराठवाड्यातील महानुभावीय वाङ्मय

१.१.३ मराठवाड्यातील वारकरी संप्रदायाचे वाङ्मय

१.१.४ मध्ययुगीन मराठवाड्यातील इतर महत्त्वाचे कवी

१.१.५ पंडिती काव्य

१.२ मराठवाड्यातील आधुनिक मराठी साहित्य

१.२.१ मराठवाड्यातील कथालेखन

१.२.२ मराठवाड्यातील कादंबरीलेखन

१.२.३ मराठवाड्यातील कविता

१.२.४ मराठवाड्यातील आत्मचरित्रलेखन

१.२.५ मराठवाड्यातील दलित व भटक्या-विमुक्तांची स्वकथने

१.२.६ मराठवाड्यातील ललित गद्य

१.२.७ मराठवाड्यातील अनुवादीत साहित्य

१.२.८ मराठवाड्यातील वैचारिक साहित्य

१.२.९ मराठवाड्यातील साहित्य समीक्षा आणि संशोधन

१.२.१० मराठवाड्यातील नाट्यलेखन

- समारोप

प्रस्तावना :

कोणताही प्रदेश हा त्याच्या वेगळ्या भौगोलिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक किंवा भाषिक भिन्नतेतून अस्तित्वात येतो. मराठवाडा हा प्रदेशही याला अपवाद नाही. भौगोलिकदृष्ट्या पर्वतरांगामुळे लाभलेले वेगळे व्यक्तिमत्व, वैभवशाली इतिहास, अजिंठा, वेरूळ लेण्यातून आविष्कृत झालेली समृद्ध कलात्मकता, नाथ, दत्त, महानुभाव, वारकरी, समर्थ, सुफी, वीरशैव, नागेश अशा विविध आध्यात्मिक-वाङ्‌मयीन-सांस्कृतिक चळवळींना सामावून घेण्याची क्षमता, तेलगु, कन्नड, ऊर्दू, इंग्रजी आणि मराठी यांच्या संमेलनातून बोलली जाणारी वैशिष्ट्यपूर्ण भाषा या सर्वांमुळे मराठवाड्याचे स्वतंत्र व्यक्तिमत्व तयार झाले आहे. किंबहुना व्यक्तित्वाच्या वरील अंगोपांगांनीच त्याचे वेगळेपण सिद्ध केले आहे.

'मराठवाडा' या शब्दाच्या उत्पत्तीसंदर्भात अनेक मत-मतांतरे आहेत. सातवाहनाच्या राजवटीपूर्वी भारतीय नकाशावर मराठवाड्याचे स्थान असल्याचे पुरावे आढळत नाहीत. सातवाहनांनी विविध जानपदात विखुरलेल्या प्रदेशांना संघटित केल्यानंतर मराठवाडा म्हणून आज अस्तित्वात असलेला प्रदेश भारताच्या नकाशावर दिसू लागला. सातवाहन राजवटीनंतर वाकाटक, राष्ट्रकुट, चालुक्य, यादव, खिलजी, तुघलक, बहामनी, आदिलशाही, कुतुबशाही, निजामशाही अशा विविध राजवटींनी मराठवाड्यावर सत्ता गाजवली. राजवटींच्या उलथापालथीमध्ये मराठवाड्याच्या भौगोलिक सीमांमध्येही सातत्याने बदल झाले. १७२४ पासून मराठवाड्यात हैद्राबादच्या निजामाचा अंमल सुरू झाला. १८७० मध्ये निजामाचा दिवाण सर सालारजंग याने हैद्राबाद राज्याची प्रशासकीय पुनर्रचना केली. मराठी भाषा बोलणाऱ्यांचा एक वेगळा विभाग सालारजंगने केला त्यालाच 'मराठवाडा' असे नाव दिले असे म्हटले जाते. तथापि इ.स. १५७० ते १६४० या काळातील इतिहास 'तारिखे फेरिश्ता' या नावाने प्रसिद्ध असून त्याच्या पहिल्या खंडात मराठवाड्याचा उल्लेख 'मरहटवाडी' असा केला आहे. त्याचबरोबर टिपू सुलतानाच्या (१७५३ ते १७९९) पत्रांमध्येही मराठवाड्याचा 'मरहटवाडी' असा उल्लेख आढळतो. त्यामुळे मराठवाडा हा शब्द निजामी राजवटीपूर्वीही अस्तित्वात होता असे अनंत भालेराव यांनी त्यांच्या 'हैद्राबाद स्वातंत्र्यसंग्राम आणि मराठवाडा' या ग्रंथात नमूद केले आहे.

१३१२ पर्यंत म्हणजे यादवांच्या राजवटीपर्यंत मराठवाडा हा सर्वांगाणे संपन्न प्रदेश होता. मराठवाडा हा भाषिक, सांस्कृतिक, साहित्यिक चळवळीचे केंद्र होता. आद्य महाराष्ट्र म्हणून मराठवाड्याचा उल्लेख केला जात असे. १३१२ पासून १९४८ पर्यंत म्हणजे जवळपास साडेसहाशे वर्षे मराठवाड्यावर वेगवेगळ्या परकीय मुस्लिमांनी सत्ता गाजवली. भारत देशातल्या कोणत्याही प्रदेशाची झाली नसेल तेवढी होरपळ मराठवाड्यातील जनतेची या काळात झाली. भारत स्वतंत्र्य झाल्यानंतरही एक वर्ष, एक महिना आणि दोन दिवस उशीराने म्हणजेच १७ सप्टेंबर १९४८ रोजी मराठवाड्यास स्वातंत्र्य मिळाले. आज मराठवाडा हा महाराष्ट्राचा प्रादेशिक विभाग असून औरंगाबाद, नांदेड, उस्मानाबाद, परभणी, बीड, जालना, लातूर व हिंगोली या आठ जिल्ह्यांचा मराठवाड्यात अंतर्भाव होतो.

हैद्राबाद मुक्तिसंग्रामाच्या निमित्ताने मराठवाडा साडेसहाशे वर्षांच्या परकीय सत्तांच्या जाचातून मुक्त झाला. संत एकनाथ महाराजानंतर खंडीत झालेली मराठवाड्यातील साहित्यधारा स्वातंत्र्यानंतर पुन्हा प्रवाहीत झाली. वर्षानुवर्षे पडीत पडलेले शेत नांगरटीनंतर नव्या जोमाने पिकते असे म्हणतात. मराठवाड्याच्या संदर्भात हे विधान तंतोतंत खरे ठरले. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर मराठवाड्यातील साहित्यिक परंपरा गतिमान झाल्या. मध्यवर्ती प्रवाहातील लेखकांचे लेखन सुरू असतानाच दलित साहित्य चळवळीमार्फत वेगळ्या जाणिवेचे साहित्यलेखन साठोत्तर कालखंडात सुरू झाले. किंबहुना दलित साहित्य चळवळ आणि ग्रामीण साहित्य चळवळीचे केंद्र मराठवाडा हेच होते. कथा, कविता, कादंबरी, चरित्र-आत्मचरित्र अशा विविध वाङ्मयप्रकारात मराठवाड्यातील लेखक महत्त्वपूर्ण लेखन करत होते. मराठवाड्यातील नाटक व रंगभूमीही याला अपवाद नाही.

जागतिक रंगभूमीची सुरूवात धार्मिक विधी आणि लोककलांतून झालेली आहे. सोंगे, दशावतारी खेळ, गोंधळ, कळसूत्री बाहुल्यांचे खेळ, पोवाडा, भारूड, कीर्तन अशा अनेक लोककलांच्या प्रभावातून मराठी रंगभूमीचा उदय झाला आहे. मराठवाडा या प्रदेशातही भारुड, गोंधळ, कीर्तनाची मोठी परंपरा आहे. ज्ञानेश्वरीच्या नवव्या अध्यायातील प्रास्ताविकात कळसूत्री बाहुल्यांच्या खेळाचे उल्लेख आढळतात. संत एकनाथांनी रचलेल्या भारुडांमध्ये ठिकठिकाणी नाट्यात्मकता आढळते. परंतु या कलाप्रकारांना नाटक संबोधता येणार नाही. फार तर 'नाटक' या वाङ्मयप्रकाराच्या काही वैशिष्ट्यांचा अंतर्भाव या कला प्रकारात आहे, असे म्हणता येईल.

मराठवाडा या प्रदेशाला एक वर्ष उशीरा स्वातंत्र्य मिळाले. निजामी राजवटीत मराठी भाषिक कलावंताची घूसमट होत असे. अशा परिस्थितीतही अनेकांनी नाट्यलेखन केले. मराठवाड्यातील पहिले नाटक म्हणून भगवंत तोडेवाले यांनी १९१९ साली लिहिलेल्या 'संगीत चुडाला' या नाटकाचा उल्लेख केला जातो. त्यानंतर आजपर्यंत शेकडो नाटके मराठवाड्यात लिहिली गेली व सादर झाली. श्रीपाद बेंडे (बेबी), दिवाकर कृष्ण केळकर (गंगालहरी), शंकरलाल पूरवार (देवदासी), त्र्यंबक महाजन (झुलते मनोरे), म. भि. चिटणीस (युगयात्रा), रा. रं. बोराडे (आमदार सौभाग्यवती, विहीर), लक्ष्मणराव देशपांडे (वऱ्हाड निघालय लंडनला), दत्ता भगत (वाटा पळवाटा), अजित दळवी (डॉक्टर! तुम्हीसुद्धा...), प्रशांत दळवी (चारचौघी, चाहूल), कुमार देशमुख (स्मारक), प्रकाश त्रिभुवन (थांबा रामराज्य येतंय!), रुस्तुम आचलखांब, सुर्यकांत सराफ, धनंजय सरदेशपांडे, धनंजय चिंचोलीकर, किरण पोत्रेकर, राजकुमार तांगडे (शिवाजी अंडरग्राउंड इन भिमनगर मोहल्ला) इत्यादी नाटककारांनी मराठवाड्यातील रंगभूमीला महत्त्वाचे योगदान दिले आहे.

मराठवाड्यातील धार्मिक सण-उत्सवाच्या निमित्ताने दशावतार खेळ, लळित, कीर्तन होत असे. नंतरच्या काळात धार्मिक उत्सवाच्या निमित्ताने नाटके सादर करण्याची परंपरा सुरू झाली. खेड्यापासून ते शहरापर्यंत अशी नाटके सादर करणाऱ्या शेकडो नाट्यसंस्था उदयास आल्या. यामध्ये श्रीराम संगीत मंडळी (सोयगाव, जि. औरंगाबाद, १९०५), अरुणोदय नाटक मंडळी (सेवली, ता. जालना, १९४०), ललित कला विकास मंडळ (औरंगाबाद, १९३३), नागझिरा नाट्यसंपदा (तुळजापूर, जि. उस्मानाबाद, १९६७), दासोपंत नाट्य मंडळ (आंबाजोगाई, जि. बीड, १९८१), कला मंडळ (सेलू, जि. परभणी), रंगमळा (जांब समर्थ, जि. जालना), नाट्यदर्शन, पारिजात इ. नाट्य संस्थानी भरीव कामगिरी केली. नंतरच्या काळात महाविद्यालयीन स्नेह संमेलन, राज्य नाट्यस्पर्धांच्या निमित्ताने विविध नाट्य संस्थांनी नाटकाचे केलेले प्रयोग रंगभूमीच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण आहेत.

भारतीय रंगभूमीवर आज मराठी रंगभूमीचे मोठे नाव आहे. यामध्ये मराठवाड्यातील नाट्य चळवळ आणि नाट्यलेखनाचा मोठा वाटा आहे. मराठी रंगभूमीवर महत्त्वाचा ठसा उमटवणाऱ्या दलित रंगभूमीची सुरुवात 'युगयात्रा' या नाटकाच्या निमित्ताने मराठवाड्यात झाली, विद्यापीठ स्तरावर नाट्यशास्त्र विषय प्रथमच सुरु करणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ हे

मराठवाड्यातच आहे. मराठवाड्यातील अनेक नाटककारांची नाटके जागतिक स्तरावर पोहोचली, बालरंगभूमी, हौशी रंगभूमी, व्यावसायिक रंगभूमी, ग्रामीण-दलित रंगभूमी अशा सर्व प्रवाहांतून मराठवाड्यात नाट्यलेखन होत आहे. आज मराठी चित्रपटसृष्टीच्या केंद्रस्थानी मराठवाड्यातील वामन केंद्रे, अजित दळवी, नंदू माधव, चंद्रकांत कुलकर्णी, प्रशांत दळवी, प्रतीक्षा लोणकर, मकरंद अनासपुरे, मंगेश देसाई, अरविंद जगताप, राजकुमार तांगडे, केतकी सराफ, शार्दुल सराफ इत्यादी नाटककार, रंगकर्मी आहेत. या सर्व बाबींसाठी मराठवाड्यातील नाट्य चळवळीचे, नाटककारांचे आणि कलावंताचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. हे योगदान अधोरेखित होण्याच्या दृष्टीने 'मराठवाड्यातील नाट्यलेखन आणि नाट्य चळवळीचा अभ्यास' होणे आवश्यक आहे. प्रस्तुत संशोधन कार्य पाच प्रमुख प्रकरणात विभागलेले आहे.

१. मराठवाड्यातील मध्ययुगीन व आधुनिक मराठी साहित्य

२. मराठवाड्यातील नाट्य चळवळ

३. मराठवाड्यातील मराठी नाट्यलेखनाचे स्वरुप

४. मराठवाड्यातील रंगभूमीची वैशिष्ट्ये व वेगळेपण

५. समारोप व निष्कर्ष

१.१ मराठवाड्यातील मध्ययुगीन मराठी साहित्य :

मध्ययुगीन कालखंडात मराठवाडा वाङ्मयीनदृष्ट्या समृद्ध होता. सतराव्या शतकापासून विसाव्या शतकापर्यंत मराठवाड्यामध्ये फारशी वाङ्मयनिर्मिती झाली नसली तरीही तेराव्या शतकापासून संत एकनाथांपर्यंत मराठवाड्यात साहित्याची समृद्ध अशी परंपरा निर्माण झाली आहे. किंबहुना आरंभापासून सोळाव्या शतकापर्यंत एकूण मराठी साहित्यनिर्मितीचे केंद्र मराठवाडा हेच होते. आधुनिक कालखंडात साहित्यनिर्मितीतील मराठवाड्यांच्या योगदानापेक्षा मध्ययुगीन कालखंडात मराठी साहित्यात मराठवाड्याचे मोलाचे योगदान आहे. "ज्ञानेश्वरांपासून सुरू होणाऱ्या वारकरी वाङ्मयाचे मूळ मराठवाड्यातच आहे. संत नामदेव, संत जनाबाई, संत एकनाथ, संत गोरा कुंभार ही सहज निर्देशिता येतील अशी नावे. भास्करभट्ट बोरीकर, वामन पंडीत, दासोपंत अशीही काही नावे सांगता येतील... मराठीतील आद्यकवी मुकुंदराज हे तर अंबाजोगाईचे. एकंदरीत काय

की मध्ययुगीन साहित्यनिर्मितीत मराठवाड्याचा खूप मोठा वाटा आहे."[१] सोळाव्या शतकापर्यंत महाराष्ट्रात सांस्कृतिक साहित्यिक केंद्र मराठवाडा हेच होते.

मध्ययुगीन कालखंडामध्ये वेगवेगळ्या संप्रदायांच्या, पंथाच्या द्वारे मराठवाड्यामध्ये साहित्यनिर्मिती झाली. किंबहुना मराठी साहित्य संस्कृतीच्या मूळ परंपरेलाच मराठवाड्यात सुरूवात झाली असे म्हणावे लागेल. "मराठवाड्यात नाथ, महानुभाव, वारकरी, गाणपत्य, वीरशैव, सुफी, आनंद, दत्त, रामदासी, केवल्याद्वैतवादी अशा विविध परंपरा, विचारधारा व संप्रदाय नांदले... मराठवाड्यातच विविध पंथ, उपासकांचा समन्वय झालेला दिसतो. या समन्वयातून समाज बांधल्या गेला. मराठवाड्याने या पंरपरांचा वसा आणि वारसा जपला, जोपासला. म्हणूनच मराठी वाङ्मय व संस्कृतीच्या मूळ परंपरेचा उगम मराठवाड्यातच शोधावा लागतो."[२] एकूणच मराठवाडा हा पुर्वीपासूनच विविध विचारधारांना सामावून घेणारा प्रदेश आहे. मराठवाड्यातील या विविध संप्रदायात, पंथात मध्ययुगीन कालखंडात झालेल्या साहित्य निर्मितीचा विचार पुढील घटकांच्या आधारे करता येईल.

१.१.१ नाथ संप्रदाय :

नाथ संप्रदाय संपूर्ण भारतव्यापी संप्रदाय आहे. हा एक शैव पंथ आहे. आदिनाथ म्हणजेच शिवापासूनच या पंथाची गुरूपंरपरा सुरू होते. साहित्य निर्मितीपेक्षा नाथ पंथियांनी पंथाच्या प्रचार-प्रसारावर अधिक लक्ष केंद्रित केल्यामुळे नाथ पंथियांमध्ये मूलभूत ग्रंथरचना आढळत नाही. तथापि नाथ संप्रदायाशी संबंधित असणाऱ्या ज्ञानेश्वर, मुकुंदराज, एकनाथ अशा संत मंडळींनी तसेच नाथ संप्रदायाशी संबंधित महानुभाव संप्रदायातील अनेक लेखकांनी महत्त्वपूर्ण साहित्य निर्मिती केली आहे. महानुभाव आणि वारकरी पंथाचे मूळ नाथ पंथात आहे, असे म्हटले जाते. "महाराष्ट्रात ज्ञानदेवांनी प्रवर्तित केलेल्या वारकरी संप्रदायाच्या धारेचा मूलस्त्रोत नाथ पंथ हाच आहे... ज्ञानदेवांनी व त्यांच्या भावडांनी नाथ पंथाला वारकरी पंथाकडे वळवले."[३] नाथ संप्रदायातील मंडळींनी प्रत्यक्षात मूलभूत साहित्य निर्मिती केली नाही. परंतु मध्ययुगीन कालखंडातील अनेक लेखकांच्या लिखाणाची प्रेरणा नाथ संप्रदाय आहे हे नाकारता येत नाही.

१.१.२ मराठवाड्यातील महानुभावीय वाङ्मय :

महाराष्ट्रामध्ये तेराव्या शतकाच्या अखेरीस महानुभाव पंथाचा उदय झाला. सर्वज्ञ श्री चक्रधरांनी महानुभाव पंथाची स्थापना केली व पुढे नागदेवाचार्य यांनी या पंथाच्या विकासामध्ये मोलाचे योगदान दिले. महाराष्ट्र, गुजरात, पंजाबसह उत्तर भारतातील अनेक राज्यांमध्ये महानुभाव संप्रदाय विस्तारलेला आहे. महात्मा पंथ, अच्यूत पंथ, जयकृष्णी पंथ आणि परमार्ग अशा विविध नावाने महानुभाव पंथ ओळखला जातो. द्वैती तत्त्वज्ञानाच्या काटेकोरपणामुळे महानुभाव संप्रदाय वारकरी संप्रदायाएवढा लोकप्रिय झाला नसला तरी मराठी साहित्यामध्ये मौलिक भर घालून मध्ययुगीन मराठी साहित्याचे दालन समृद्ध करण्यात महानुभाव पंथीय साहित्यिकांचे महत्त्वाचे योगदान आहे. मराठवाड्यामध्ये देवगिरीचे राजे रामदेवराय यांच्या काळात महानुभाव वाङ्मयाला बहर आला होता. मराठवाड्यातील महानुभावीय लेखकांच्या वाङ्मयाचे स्वरूप पुढीलप्रमाणे आहे.

१.१.२.१ महाकवी नरेंद्र :

महाकवी नरेंद्र यांचे महानुभावीय वाङ्मयातील स्थान हे अनन्यसाधारण आहे. रूक्मिणी स्वयंवर, अन्वयस्थळ आणि स्मृतिस्थळ असे तीन ग्रंथ नरेंद्र कवींनी लिहिले आहेत. महानुभाव संप्रदायात महत्त्वपूर्ण मानल्या गेलेल्या सात ग्रंथापैकी रूक्मिणी स्वयंवर हा ग्रंथ नरेंद्र कवीने लिहिला आहे. सर्व काव्य गुणांनी परिपूर्ण असे हे एक महाकाव्यच आहे.

१.१.२.२ भास्करभट्ट बोरीकर :

महानुभाव पंथाचे तिसरे आचार्य भास्करभट्ट बोरीकर हे मराठवाड्यातील परभणी जिल्ह्यातील आहेत. शिशुपालवध, एकादशस्कंध अर्थात उद्धवगीता, नरविलाप स्तोत्र, मराठी पुजावसर, संस्कृत पुजावसर, मूर्तिवर्णन स्तोत्र, जयाष्टक, विरहाष्टक व धियाष्टक इत्यादी ग्रंथरचना भास्करभट्ट बोरीकरांनी केली. यापैकी शिशुपालवध व एकादशस्कंध या काव्य ग्रंथांना महानुभावीय वाङ्मयात महत्त्वपूर्ण स्थान असून साती ग्रंथांमध्ये या दोन ग्रंथांचा समावेश केला जातो. महाकाव्याच्या धर्तीवरील या दोन्ही ग्रंथामध्ये काव्यगुणांची पखरण झालेली आढळते.

१.१.२.३ आद्य कवयित्री महदंबा :

महादंबा ही मराठवाड्याच्या जालना जिल्ह्यातील कवयित्री आहेत. आपल्या बुद्धीचातुर्याच्या बळावर तीने महानुभाव संप्रदायामध्ये स्वतंत्र स्थान निर्माण केले होते. धवळे (पूर्वाध), धवळे

(उत्तरार्ध) व मातृकी रूक्मिणीसैंवर इत्यादी काव्यग्रंथ महदंबेने लिहिले आहेत. धवळे हे मराठी भाषेत स्त्रीने लिहिलेले पहिले काव्य मानले जाते. त्यामुळे महदंबा ही मराठीतील पहिली कवयित्री ठरते. सर्व काव्यगुणांनी युक्त धवळे मधून महदंबेने आपले लेखनसामर्थ्य सिद्ध केले आहे. "वाचकांना मोहून टाकणाऱ्या साध्या गोड भाषेचे स्त्रीसुलभ मार्दव धवळ्यांना लाभले आहे. लोकगीताचे सारे विशेष स्वाभाविकपणे यात आले आहेत. वाङ्मयीन स्वरूपातील या काव्याला लौकिकाचे लोभस रूप प्राप्त झाले आहे. तत्कालीन विवाहातील पद्धतीचे अनेक सामाजिक संदर्भ, चालीरिती आविष्कृत होतात. धवळ्यातील कथाविषय परिचयाचा असला तरी महदंबेने आपल्या शैलीने ही अभिव्यक्ती केली आहे."[४] वरील लेखनाबरोबर गर्भकांड, ओव्या आणि काही स्फुट पद्यरचनाही महदंबेने केली आहे.

नरेंद्र, भास्करभट्ट बोरीकर, महदंबा यांच्याशिवाय मराठवाड्यातील इतर अनेक लेखकांनी महानुभावीय साहित्य समृद्ध केले आहे. खळोव्यास (सह्याद्रीवर्णन), विश्वनाथव्यास (ज्ञानप्रबोध), महेश्वर पंडीत (ऋद्धिपूर माहात्म्य), आनेराज (सुभाषित अंताक्षरी, दृष्टांतलक्षण, दृष्टांत व्याख्या), नाईक बाई (अप्राप्तिपर पदे), नागाईसा (सूत्र मालिका, उद्धरणपट, शय्यापालन) इत्यादी ग्रंथकारांनी महानुभावीय व पर्यायाने मराठी साहित्याचे दालन समृद्ध केले आहे.

१.१.३ मराठवाड्यातील वारकरी संप्रदायाचे वाङ्मय :

तेराव्या शतकात उदयास आलेला वारकरी संप्रदाय हा प्रामुख्याने महाराष्ट्र आणि कर्नाटकमध्ये प्रचलित असणारा संप्रदाय आहे. "विठ्ठल या दैवताची भक्ती करणाऱ्या; ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ, तुकाराम इ. संत आणि पंढरपूर, आळंदी, पैठण, देहू इ. क्षेत्रे यांना पुज्य मानणाऱ्या; गीता, भागवत, ज्ञानदेवी, एकनाथी भागवत, नामदेव, तुकाराम वगैरे संताच्या गाथा इ. ग्रंथातील तत्त्वज्ञान प्रमाण माननाऱ्या; तुळशी माळ धारण, एकादशी व्रत पालन, नित्य हरिपाठ पठण, नामस्मरण आणि मद्यमांसविवर्जन हा आचारधर्म पाळणाऱ्या आणि आषाढी, कार्तिकी, माघ अगर चैत्री यापैकी एखादी शुद्ध एकादशीची पंढरपुराची वारी आणि कार्तिक वद्य एकादशीची आळंदीची वारी दरवर्षी नेमाने करणाऱ्या भक्तांचा पंथ हा वारकरी संप्रदाय म्हणून ओळखला जातो. यास भागवत किंवा वैष्णव पंथही म्हणतात"[५] साध्या व सोप्या तत्त्वज्ञानामुळे हा पंथ

प्रत्येकालाच आपलासा वाटतो. या पंथाचा सर्व व्यवहार हा लोक भाषेत असल्यामुळेच सर्वसामान्य लोकांना वारकरी संप्रदाय जवळचा वाटतो.

वारकरी संप्रदायातील संतांपैकी बहुसंख्य संत मंडळी हे मराठवाड्यातील आहेत. किंबहुना वारकरी संप्रदायाचा पाया मराठवाड्यातच घातला गेला. संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ, संत चोखामेळा, संत सोपानदेव, संत मुक्ताबाई, संत गोरा कुंभार, संत विसोबा खेचर, संत जनाबाई, संत जगमित्र नागा तसेच संत तुकाराम महाराजांच्या शिष्या संत बहिणाबाई इत्यादी महत्त्वपूर्ण वारकरी संत कवी हे मराठवाड्यातील आहेत. वारकरी संप्रदायाचा पाया रचून आपल्या अभंगवाणीतून सर्व सामान्यांपर्यंत या संत कवींनीच वारकरी संप्रदाय पोहचवला आहे. विशेषतः वारकरी संतांनी गोदाकाठ अर्थात मराठवाड्यात तळागाळापर्यंत संप्रदायाचा विचार हा लोकभाषेत पोहोचवला. वारकरी संप्रदायातील संतांपैकी बहुसंख्य आणि महत्त्वपूर्ण लेखन करणारे संत हे मराठवाड्यातील असल्यामुळेच मराठवाड्याला संताची भूमी असे म्हटले जाते.

अभंग, गवळण, ओवी, भारूड, आरती, विरहिणी आशा विविध रचनाबंधांचा आवलंब वारकरी संतांनी आपल्या आविष्कारासाठी केला. विठ्ठलाप्रतीची भक्ती आणि प्रबोधनपरता या दोन्ही बाबींचा मिलाफ वारकरी संतांच्या साहित्यामध्ये आढळतो. वारकरी संप्रदायाला आध्यात्मिक संप्रदाय म्हटले जात असले तरी मध्ययुगीन कालखंडात या संप्रदायाने खऱ्या अर्थाने सामाजिक काम केले आहे. समाजातील अनिष्ठ प्रथांवर आपल्या अभंगांच्या माध्यमातून संतांनी प्रहार केले. जातियता, अस्पृश्यता, उच्चनिचता, भेदाभेद अशा बाबींविरूद्ध संतांनी आवाज उठवला. भक्तिभावाने विठ्ठलाची आराधना करत 'भेदाभेद भ्रम अमंगळ' हे देखील संतांनी ठणकावून सांगितले आहे. अभंगरचनेबरोबर प्रत्यक्ष व्यवहारातही भेदाभेदाला थारा न देता महाराष्ट्रामध्ये मध्ययुगातच संतांनी आध्यात्मिक लोकशाही निर्माण केली.

संतांनी हातळलेल्या रचनाप्रकारांपैकी जवळपास सर्वच संतांनी अभंगरचना केली आहे. कल्पनाविलासापेक्षा अस्सल अनुभूतीचे दर्शन या अभंगांमधून वाचकाला होते. "भक्ती किंवा अध्यात्म हा संतांच्या प्रतीतीचा विषय होता. पण त्याचबरोबर एक सामाजिक आवाहन त्यात अपोआपच होते. ही भक्तीची जाणीव प्रत्येकाने व्यक्तीशः 'ती' घ्यायची वस्तू होती, ती केवळ बौद्धीक भूमिका नव्हती. ही जाणीव अशी अंतर्मुख चिंतनशील आणि त्या परमेश्वराशी एकरूप

होणाऱ्या तळमळीतून निर्माण झालेली होती."[६] एकूणच व्यक्तिपरता आणि प्रबोधनपरता याचा सुयोग्य मेळ संतांच्या अभंगवाणीत आढळतो.

१.१.३.१ संत ज्ञानेश्वर :

संत ज्ञानेश्वर हे तेराव्या शतकातील थोर तत्त्वज्ञ कवी होते. समाजोद्धारासाठी त्यांनी तेराव्या शतकात वारकरी संप्रदायाची स्थापना केली. मराठवाड्यातील पैठण जवळील आपेगाव या ठिकाणी इ.स. १२७५ मध्ये ज्ञानेश्वरांचा जन्म झाला. आपल्या अवघ्या २१ वर्षांच्या आयुष्यामध्ये त्यांनी आपल्या कृतीतून आणि लेखनातून ललामभूत ठरावे असे कार्य केले. ग्रंथनिर्मितीसोबतच मध्ययुगीन महाराष्ट्रातील विविध जातीतील संतांना सोबत घेऊन सर्वांना भागवत धर्माच्या ध्वजाखाली एकत्र आनले. ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, चांगदेव पासष्टी, हरिपाठाचे अभंग इत्यादी ग्रंथरचना केली. ग्रंथरचनेसाठी समाजामध्ये संस्कृत भाषेचे प्राबल्य असताना आध्यात्मिक आणि तत्त्वज्ञानविषयक विचार मराठी भाषेतूनही व्यक्त करता येतात हा विश्वास ज्ञानेश्वरांनी तत्कालीनांना दिला. १२९६ साली ज्ञानेश्वरांनी आळंदी येथे संजिवन समाधी घेतली.

१.१.३.२ संत नामदेव :

संत ज्ञानेश्वर यांचे समकालीन व वारकरी संप्रदायाचे प्रचारक, संतशिरोमणी संत नामदेव महाराजांचा जन्म इ.स. १२७० साली सध्याच्या हिंगोली जिल्ह्यातील नरसी-बामणी (नरसी-नामदेव) या ठिकाणी झाला. वारकरी संप्रदायाचा व संतविचारांचा प्रचार-प्रसार करून वारकरी संप्रदायाला मानाचे स्थान मिळवून देण्याचे अनन्यसाधारण कार्य संत नामदेवांनी केले. "ज्यांच्या चारित्र्याविषयी थोडीफार माहिती उपलब्ध आहे असा पहिला क्रांतिकारी संत कवी म्हणजे संत नामदेव हा होय... गरीब शिंप्याच्या घरी जन्मलेला नामदेव सर्वांचा नेता म्हणून आपल्या काळात एवढे आदराचे स्थान मिळवू शकला याचे कारण म्हणजे त्याने निरनिराळ्या जाती-जमातीतील कृतिशील माणसांचा मोठाच जथा वारकरी चळवळीच्या झेंड्याखाली एकत्र आणला."[७] विविध जातीतील संतांना सोबत घेऊन नामदेवांनी तत्कालीन दांभिक लोकांच्या तावडीतून सामान्यांची सुटका केली.

संत नामदेवांनी वैविध्यपूर्ण अभंगरचना केली. संत नामदेवांची अभंगगाथा (सुमारे २५०० अभंग) प्रसिद्ध आहे. त्याचबरोबर शौरसेनी भाषेत सुमारे १२५ पदरचना त्यांनी केल्या आहेत. यासोबतच आदी, समाधी आणि तीर्थावळी अशा तीन भागात संत ज्ञानेश्वरांचे चरित्रही नामदेवांनी

लिहिले आहे. काही आत्मचरित्रपर अभंगरचना देखील नामदेवांनी केल्या आहेत. आपल्या अभंगातून विठ्ठलाचा महिमा गात असताना 'नाचू कीर्तनाचे रंगी। ज्ञानदीप लावू जगी' असा बोध द्यायलाही नामदेव विसरले नाहीत. संत ज्ञानेश्वरांच्या संजीवन समाधीनंतर संत नामदेवांनी पंजाब, राजस्थानसह उत्तर भारतात वारकरी संप्रदायाचा प्रसार केला. पंजाबमधील शिख बांधवांनीही संत नामदेव याच्या विचारांचा सन्मान केला. शीख धर्माच्या पवित्र अशा गुरू ग्रंथसाहेब या ग्रंथामध्ये संत नामदेवांचे सुमारे बासष्ट अभंग समाविष्ट केलेले आहेत. पंजाबमधील शिख बांधव त्यांना 'नामदेव बाबा' संबोधतात. ३ जुलै १३५० रोजी पंढरपूर येथे संत नामदेव यांनी संजीवन समाधी घेतली.

१.१.३.३ संत एकनाथ :

संत एकनाथ महाराजांचा जन्म १५२८ मध्ये दक्षिण काशी म्हणून ओळख असलेल्या पैठण या ठिकाणी झाला. तेराव्या शतकात संत ज्ञानेश्वरांनी पाया रचलेल्या आणि संत नामदेवांनी विस्तार केलेला वारकरी संप्रदाय सोळाव्या शतकात मोडकळीस आलेला असताना संत एकनाथ हे वारकरी संप्रदायाचे खांब झाले. "ज्ञानेश्वर आणि नामदेव यांच्यापेक्षा नाथांच्या काळातील परिस्थिती अधिकच बिकट झाली. ज्ञानदेवकालीन, महाराष्ट्राची समृद्धी व वैभव आता लोप पावले होते... मुसलमानी आक्रमणाने आपली बंधने महाराष्ट्राभोवती आवळून महाराष्ट्रीय संस्कृती आणि मराठी भाषा यांची गळचेपी सुरू केली होती... पैठण तर कर्मकांडाचे माहेर घर बनले होते. ब्रह्मतेज आणि क्षात्रतेज पूर्णपणे लोपले. अशा भ्रष्ट वातावरणातील अज्ञानी, अविवेकी, ढोंगी प्रवृत्तींच्या लोकांचे जवळून निरिक्षण करून त्यांची विदारक चित्रे नाथांनी आपल्या साहित्यात रेखाटली."[८] संतत्व आणि कवित्व यांचा सुयोग्य मेळ राखत तत्कालीन समाजाचे दर्शन आपल्या लेखनातून संत एकनाथांनी घडवले.

संत एकनाथांची रचना ही वैविध्यपूर्ण व समकालीन समाजातील सर्व स्तरांना सामावून घेणारी आहे. त्यांनी समाजातील विद्वान व पंडीत जनांसाठी चतु:श्लोकी भागवत व एकनाथी भागवत हे ग्रंथ लिहिले. चतु:श्लोकी भागवत व एकनाथी भागवत हे टीका ग्रंथ असून त्यामध्ये अनुक्रमे १०३६ व १८८०० ओव्यांचा समावेश आहे. रूक्मिणीस्वयंवर व भावार्थ रामायण या ग्रंथांची रचना एकनाथांनी मध्यम वर्गीयांसाठी केली. तसेच समाजातील सामान्य जनतेसाठी एकनाथांनी भारूडांची रचना केली. प्रौढ ग्रंथांबरोबरच हस्तामलक, स्वात्मसुख, शुकाष्टक,

आनंदलहरी, गीतासार, चिरंजीवपद, गीतामहिमा अशी काही स्फुट प्रकरणेही एकनाथांनी लिहिली आहेत. याशिवाय कीर्तनासाठी म्हणून नामदेव, गोराबा कुंभार, सावता माळी, संत चोखामेळा इत्यादी संतांची चरित्रे, काही आख्याने, काही पदे व गौळणी देखील एकनाथांनी लिहिल्या आहेत.

सोळाव्या शतकात सैरभैर झालेल्या मराठी जनांमध्ये आपल्या लेखणीच्या माध्यमातून समन्वय साधण्याचा प्रयत्न संत एकनाथांनी केला. "नाथांनी समाजातील चाललेला अत्याचार, समाजातील कर्मठपणा, जातीभेद समस्यांचा अभ्यास केलेला होता. त्यांचे निरीक्षणही सूक्ष्म होते. समाजातील प्रत्येक घटकाचा ते आपण स्वतः आहोत असे समजून त्यांच्या समस्यांशी समरस होऊन त्या समस्यांचा विचार करून त्या कशा सोडविल्या जातील याचा अभ्यास करीत. भागवत धर्माच्या आधारे या समस्या सोडविण्याचा त्यांनी प्रयत्न केला."[९] एकूणच संत एकनाथ हे समाजसन्मुख असणारे संत होते. ते सर्वसमावेशक वृत्तीचे संत होते. समाजातील टोकाच्या अनेक गोष्टींचा मिलाफ किंवा समन्वय त्यांनी घडवून आणला. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातच तो गुण होता. "दत्त आणि वारकरी संप्रदाय, प्रपंच आणि परमार्थ, काव्य आणि तत्त्वज्ञान, संस्कृत आणि प्राकृत, पंडितश्रेष्ठ आणि जनसामान्य अशा दोन ध्रुवांचा समन्वय नाथांनी आपल्या जीवनात आणि कवितेत घातला त्यामुळे 'समन्वयकार एकनाथ' अशा शब्दांतच नाथांचे वर्णन करणे उचित ठरेल."[१०]

वारकरी संप्रदायातील नामदेव, ज्ञानदेव, एकनाथ यांच्या शिवाय मराठवाड्यामध्ये अनेक महत्त्वाच्या संतांनी साहित्यलेखन केले आहे. संत निवृत्तीनाथ यांनी निवृत्तिसार, निवृत्तिदेवी, निवृत्तेश्वरी, उद्धवटीका, समाधिबोध, परमप्रकाश इत्यादी ग्रंथांसह पावणेचारशे अभंगांची रचना केली आहे. संत ज्ञानेश्वरांचे धाकटे बंधू संत सोपानदेव हे परखड आणि प्रेमळ अशा दोन्ही प्रकाराच्या रचनासाठी प्रसिद्ध आहेत. त्यांनी एकूण साठ अभंग लिहिले आहेत. संत मुक्ताबाई यांनी बेचाळीस अभंग लिहिल्याची नोंद आहे. स्पष्टवक्तेपणा, निर्भिडपणा, समाजसन्मुखता ही मुक्ताबाईंच्या अभंगलेखनाची महत्त्वाची वैशिष्ट्ये असून 'ताटीचे अभंग' मधून त्याचा प्रत्यय येतो. संत गोरोबा काका कुंभार हे संत संप्रदायातील सर्वात ज्येष्ठ संत असून त्यांनी वीस अभंग लिहिले आहेत. तर विसोबा खेचर यांनी षटस्थल या ग्रंथबरोबर दोन अभंगांची रचना केली आहे.

संत नामदेव यांच्या कुटुंबातील जवळपास सर्वांनीच अभंगरचना केली आहे. संत नामदेवांच्या आई गोणाई यांनी तीन कोटी अभंग लिहिले असे म्हटले जाते. याशिवाय संत

नामदेवांच्या पत्नी, बहीण, सून, मुलगी यांच्या नावावरही काही अभंग रचना केल्याची नोंद आहे. वारकरी संप्रदायामध्ये राहून बंडखोर लेखनासाठी प्रसिद्ध असणाऱ्या संत जनाबाई यांनी विपूल लेखन केले आहे. थालीपाक आख्यान, हरिश्चंद्राख्यान, प्रल्हाद चरित्र, कृष्णजन्म, बालक्रिडा, द्रौपदीस्वयंवरासह ३५० अभंगांची रचना संत जनाबाई यांनी केली आहे. स्त्री म्हणून वाट्याला आलेले दु:ख, कौटुंबिक आयुष्यात आलेला पोरकेपणा, समाजजीवनातील कडवट अनुभव आणि विठ्ठल माहात्म्य अशा संमिश्र भावनेची अभंगरचना संत जनाबाई यांची आहे. संत नामदेवांसारख्या थोर संतांचा सहवास लाभल्यामुळे संत जनाबाईचे लेखन खऱ्या अर्थाने समोर आले. संत नामदेव हेच खऱ्या अर्थाने आपल्या लेखनाची प्रेरणा आहेत असा संत जनाबाईंचा भाव होता. म्हणूनच 'नामयाची जनी' या नाममुद्रेने संत जनाबाईंनी अभंगलेखन केले.

संत तुकाराम महाराजांच्या अभंगरचनेचा तत्कालीन जनतेवर प्रभाव पडला होता. त्यांच्यासारखे लिहिण्याचा किंवा तुकोबांचे शिष्यत्व स्वीकारण्याचा प्रत्येकालाच मोह वाटत होता. यापैकी संत बहिणाबाई या संत तुकाराम महाराजांच्या शिष्या आहेत. 'देवगाव माझे माहेर साजणी, वेरूळ तेथोनि पूर्वभागी' असा स्वतःच्या जन्माचा दाखला त्यांनी आत्मचरित्राच्या सुरूवातीसच दिला आहे. औरंगाबाद जिल्ह्यातील देवगाव रंगारीच्या संत बहिणाबाई यांनी आयुष्यभर अनेक हाल अपेष्टांचा सामना केला. बालपनीच प्रौढ पुरूषाशी झालेला विवाह, सासरी होणारा छळ यामुळे सांसारिक जीवनाचा त्याग करून बहिणाबाईंनी संत तुकाराम महाराजांचे शिष्यत्व स्वीकारले. त्यानंतर त्यांनी आपले आयुष्य अभंगरचनेत व विठ्ठलाच्या सेवेत घालविले. संत बहिणाबाईंनी एकूण चारशे अभंग लिहिले आहेत. त्यांच्या एकूण अभंगरचनेमध्ये वैविध्यपूर्णता असून व्यामिश्र स्वरूपाची जाणीव व्यक्त होते. कधी स्त्रियांची पराधीनता, त्यांची असहायता त्या आत्मिय जाणिवेने व्यक्त करतात. आपल्या अभंगरचनेत कारूण्यपूर्णता आणतात. तर कधी प्रसन्न, प्रांजळ, प्रासादिक रचना करतात. एकूणच संत बहिणाबाईंची अभंगरचना ही स्वानुभावाची अभिव्यक्ती आहे.

वारकरी संप्रदायाची परंपरा विशद करणारा 'संतकृपा झाली। इमारत फळा आली' हा संत बहिबाईंचा अजरामर अभंग होय. 'एवढा एकच अभंग लिहूनही त्यांची किर्ती अमर व्हावी इतके त्याचे मोल आहे.' अशा शब्दांत शं. गो. तुळपुळे यांनी या अभंगाचा गौरव केला आहे. एकूणच आत्मचरित्र वाटावेत असे स्वानुभूतीचे अभंग लिहून संत बहिणाबाई यांनी वारकरी संप्रदायात

स्वत:चे वेगळेपण सिद्ध केले आहे. याशिवाय परळी येथील जगमित्र नागा, पैठण येथील संत वत्सल इत्यादी संत मंडळींनी आपल्या अभंगरचनेतून वारकरी संप्रदाय समृद्ध केला आहे. संत शेख महंमद हे वारकरी संप्रदायातील महत्त्वाचे संत आहेत. श्रीगोंदा (नगर जिल्हा) येथे त्यांची कारकीर्द घडली असली तरी त्यांचे मूळ मराठवाड्याच्या बीड जिल्ह्यातील आहे. आपल्या अभंगातून महंमद यांनी सातत्याने हिंदू-मुस्लीम ऐक्याचा जयघोष केला आहे. 'शेख महंमद अविंद्य। त्याचे हृदयी गोविंद।' या ओळी याचीच साक्ष देतात. योगसंग्राम हा महत्त्वपूर्ण ग्रंथ शेख महंमद यांनी लिहिला.

एकूणच वारकरी संप्रदाय आणि या संप्रदायाचे साहित्य आजही समाजाला मार्गदर्शक वाटते. प्रपंच आणि परमार्थ, संतत्व आणि कवित्वाची उत्तम सांगड या संप्रदायाने घातली. अध्यात्म, ज्ञान, मनोरंजन आणि प्रबोधन या सर्व गोष्टी एकाच वेळी वारकरी संप्रदायाने सांगितल्या. वेगवेगळ्या जाती-धर्मातील मंडळींना आपल्यात जोडत असतानाच भेदाभेद, जातियता, अस्पृश्यता, वर्णव्यवस्थेला मूठमाती देण्याचे कार्य वारकरी संप्रदायाने केले. एकोणिसाव्या शतकात महाराष्ट्रात सामाजिक सुधारणा चळवळ अधिक गतिमान झाली असे म्हटले जाते. या गतिमान सामाजिक सुधारणा चळवळीची मुहूर्तमेढ वारकरी संप्रदायाने तेराव्या शतकात रोवली होती असे म्हटल्यास वावगे ठरू नये.

१.१.४ मध्ययुगीन मराठवाड्यातील इतर महत्त्वाचे कवी :

मराठवाड्यामध्ये महानुभाव व वारकरी परंपरेशी संबंध नसणारे परंतु मध्ययुगीन कालखंडामध्ये महत्त्वपूर्ण लेखन करणाऱ्या कवींचे प्रमाणदेखील लक्षणीय आहे. आद्यकवी मुकुंदराज, दासोपंत इत्यादी महत्त्वाच्या कवींचा यात समावेश होतो.

१.१.४.१ आद्यकवी मुकुंदराज :

बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई येथील मुकुंदराज यांनी विवेकसिंधू या काव्यग्रंथाच्या माध्यमातून मराठी साहित्याची मुहूर्तमेढ रोवली. शके ११९० मध्ये विवेकसिंधू या ग्रंथाचे लेखन मुकुंदराज यांनी केले. यापूर्वी मराठी भाषेत एकही ग्रंथ लिहिल्याचे पुरावे आढळत नाहीत. त्यामुळे विवेकसिंधू हा मराठी भाषेतील आद्य ग्रंथ ठरतो. तसेच विवेकसिंधू हा काव्यग्रंथ असल्यामुळे मुकुंदराज हे मराठीतील आद्यकवी ठरतात. उपनिषदातील तत्त्वज्ञान विवेकसिंधूच्याद्वारे कवीने मांडले आहे. 'भाषा हो का मऱ्हाटी। परि उपनिषदाचीच रहाटी।।' अशी कबुली स्वतः मुकुंदराज

देतात. "आतापर्यंत वेदांत आणि अध्यात्मासंबंधीचे सर्व ज्ञान केवळ संस्कृतातच सांगण्याची प्रथा होती. त्यामुळे पंडीतांशिवाय किंवा मोजक्या संस्कृत तज्ज्ञांशिवाय इतरांना त्याचा स्पर्शही होणे अशक्यच. अज्ञानी माणसे अध्यात्मापासूनच वंचित होती. अशा साऱ्यांसाठी हा तत्त्वज्ञानाचा ग्रंथ मुकुंदराजांनी मराठीत आणला."[११] विवेकसिंधूच्या शेवटी आपण हा ग्रंथ सामान्यजनांसाठी लिहिला हे सांगताना स्वतः मुकुंदराज म्हणतात-

'जेया नाही शास्त्रीप्रतीती। नेणती तर्कमुद्रेची स्थिती।
तेया लागी मऱ्हाटीय युक्ति। केली ग्रंथरचना।।'

विवेकसिंधूबरोबरच मुकुंदराज यांनी परमामृत, पवनविजय इत्यादी ग्रंथ लिहिले. परमामृत या ग्रंथात विवेकसिंधूमधील विषयच सारांशरूपाने आला आहे. 'विवेकसिंधूचा अन्वय सारांश। येथ कथियेला', असे कवी स्वतः म्हणतात. तर पवनविजय या ग्रंथात देखील विवेकसिंधूतीलच विषयाचे विवेचन शिवपार्वती संवादरूपाने केले आहे.

१.१.४.२ दासोपंत उर्फ दासो दिगंबर :

अंबाजोगाई (जिल्हा बीड) येथील दासोपंत उर्फ दासो दिगंबर हे एकनाथ पंचकातील महत्त्वाचे कवी असून त्यांनी विपूल प्रमाणात ग्रंथरचना केली आहे. दासोपंत यांना रोज ढबू पैशाची शाई लागत असे, असे म्हणतात. यावरूनच त्यांचा व्यासंग लक्षात येतो. गीतार्णव, ग्रंथराज, गीतार्थ बोधचंद्रिका, पदार्णव, दत्तात्रेय माहात्म्य, वाक्यवृत्ती, ग्रंथसंग्रह, दत्तमाहात्म्य, अवधूतराज व पंचीकरण इत्यादी ग्रंथरचना दासोपंत यांनी केली आहे. त्यांच्या एकूण ग्रंथांपैकी पंचीकरण हा ग्रंथ कागदावर न लिहिता ४० फूट लांब कापडावर लिहिला आहे. त्यालाच दासोपंताची पासोडी असे म्हणतात. कापडावर लिहिलेला पंचीकरण हा एकमेव ग्रंथ आहे, असे अभ्यासकांचे मत आहे. एकूणच दासोपंत यांनी मौलिक आणि विपूल रचना केली असून भक्ती आणि नीतीचा संदेश या रचनांमधून देण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. दत्त संप्रदायाशी दासोपंतांचा जवळचा संबंध असल्यामुळे त्यांच्या ग्रंथरचनेचे वाङ्मयीन मोल तर महत्त्वाचे आहेच पण आध्यात्मिक मोलही महत्त्वाचे आहे.

दासोपंतांप्रमाणेच जनी जनार्दन व विठा रेणुकानंद हे देखील नाथपंचकातील व मराठवाड्यातील महत्त्वाचे कवी आहेत. विठा रेणुकानंद यांनी सात पदाची रचना केल्याची नोंद आढळते. आध्यात्मिकता हा विठा रेणुकानंद यांच्या पदांचा स्थायिभाव आहे. जनी जनार्दन हे

मराठवाड्याच्या बीड जिल्ह्यातील आहेत. जनी जनार्दन यांनी सीता स्वयंवर, निर्विकल्प, महावाक्य विवरण या ग्रंथांबरोबरच हिंदी, व संस्कृत भाषेत काही पदरचना केल्या आहेत. एकूणच वारकरी किंवा इतर संत मंडळींचे कार्य हे आध्यात्मिक व प्रबोधनात्मक स्वरूपाचे होते. "मराठी संतांचे धोरण हे प्राय: समन्वयशीलतेचे होते. त्यांनी आपल्या तत्त्वनिरूपाणात अध्यात्मनिष्ठा व मानवतावाद, निर्गुणोपासना व सगुणभक्ती, कर्मसिद्धांत व करूणा, अभेदभक्ती व भेदमूलक वर्णधर्म, शास्त्रवचन, गुरूबोध व आत्मप्रतीती इत्यादी गोष्टींचा समन्वय साधला. त्यांची दृष्टी मुख्यत: विधायक होती."[१२] संत वाङ्मयाची सामाजिक फलश्रुती शोधताना गं. बा. सरदार यांनी केलेले हे विवेचन यथार्थ वाटते.

१.१.४.३ समर्थ रामदास :

समर्थ रामदास हे सतराव्या शतकातील महत्त्वाचे संत असून मराठवाड्याच्या जालना जिल्ह्यातील जांब या गावी १६०८ साली त्यांचा जन्म झाला. नारायण सूर्याजी ठोसर हे संत रामदासांचे पूर्ण नाव असून मराठवाड्याच्या बाहेर त्यांचे कार्यक्षेत्र आहे. संत रामदास यांच्या काळात धार्मिक-राजकीय क्षेत्रातील परिस्थिती असाह्य झाली होती. या परिस्थितीवर उपाय म्हणून रामोपासनेच्या बळावर वैदिक धर्माचे पुनरूज्जीवन करण्यासाठी संत रामदासांनी रामदासी संप्रदाय सुरू केला. यालाच समर्थ संप्रदाय किंवा दास संप्रदाय असेही म्हणतात. या संप्रदायाचे १८०० मठ स्थापन करून वाङ्मयलेखनाबरोबर आध्यात्मिकतेचीही जोपासना समर्थांनी केली.

संत रामदासांनी विपूल प्रमाणात ग्रंथलेखन केले असून ग्रंथ आणि स्फूट काव्ये अशा दोन विभागात त्यांच्या लेखनाची विभागणी केली जाते. दासबोध, करूणाष्टके, एकविस समासी, जुनाट पुरूष, जनस्वभाव गोसावी, लघुरामायण, चौदा ओविशते, आनंदवन भुवन, रामायणाचे सुंदरकांड आणि युद्धकांड, रामेश्वरदायिनी, मनाचे श्लोक, मानसपूजा, भिमरूपी स्तोत्र इत्यादी ग्रंथ रचना संत रामदासांनी केली आहे. उपदेशपरता हा समर्थांच्या लेखनाचा स्थायिभाव असून धर्मभक्ती व राष्ट्रभक्ती त्यांच्या लेखनाच्या केंद्रस्थानी आहे. विवेकनिष्ठ वर्तन असावे, व्यवहाराचातुर्य अंगी असावे, प्रपंच नेटका करावा, सज्जनांच्या सहवासात राहावे असे सद्विचार त्यांनी आपल्या लेखनात मांडले आहेत. संत एकनाथांच्या लेखनाचा स्पष्ट प्रभाव त्यांच्यावर आहे हे जाणवते. संत रामदास हे पैठण येथे संत एकनाथांच्या समाधी दर्शनास गेल्याचे पुरावे उपलब्ध आहेत. शिवाय संत

एकनाथांच्या भावार्थ रामायण आणि समर्थांच्या रामायणातील वर्णनात मोठे साम्य आढळते. एका अर्थाने "संत एकनाथांनी लावलेले प्रवृत्तीचे रोपटे त्यास प्रयत्नवादाचे खतपाणी घालून रामदासांनी वाढविले व त्याचे कर्मयोगाच्या प्रचंड वृक्षात रूपांतर केले."[१३] असेच म्हणावे लागेल.

१.१.५ पंडिती काव्य :

मध्ययुगीन साहित्यलेखनातील पंडिती काव्य हा महत्त्वाचा प्रवाह आहे. मुक्तेश्वर, वामन पंडीत, रघुनाथ पंडीत, सामराज, श्रीधर, नागेश, विठ्ठल, मोरोपंत आदी पंडीत कवींच्या संस्कृतप्रचुर आख्यानपर रचनेस पंडिती काव्य म्हणतात. शृंगारिकता, डौलदार भाषा, तंत्रप्रधानता, विद्वजडता, व्युत्पन्नता, अलंकारप्रचुरता इत्यादी वैशिष्ट्यांनी पंडिती काव्य नटलेले आहे. एकूणच अभिजात संस्कृत कवितेचे सर्वच गुणविशेष पंडिती साहित्यात आढळतात. त्यामुळे पंडिती साहित्य म्हणजे अभिजात संस्कृत काव्याचे पुनरूज्जीवन आहे, असे म्हटले जाते. मराठवाड्याच्या संदर्भात विचार करताना मुक्तेश्वर, वामन पंडीत, हरी वामन, विठ्ठल बीडकर, कृष्ण दयार्णव इत्यादी कविंच्या रचना महत्त्वाच्या ठरतात.

१.१.५.१ कलाकवी मुक्तेश्वर :

मुक्तेश्वर यांच्या जन्मतारखेविषयी आणि जन्मस्थळाविषयी स्पष्ट पुरावे आढळत नसले तरी ते संत एकनाथ महाराजांचे नातू असून पैठण येथे ते वास्तव्यास असल्याचे दाखले त्यांच्याच साहित्यात आढळतात. अध्यात्म आणि भक्तीभोवती फिरणारी मराठी कविता मुक्तेश्वरांनी सर्वरसपरिपूर्ण केली. अभिजात भाषाशैली, अलंकारिकता, शृंगारिकता, संस्कृतप्रचुरता, ओजस्विता अशी पंडिती साहित्याची सर्वच वैशिष्ट्ये मुक्तेश्वरांच्या काव्यात आढळतात. श्लोकबद्ध रामायण, महाभारताची आदी, सभा, वन, विराट आणि सौप्तिक ही पाच पर्वे, हरिश्चंद्राख्यान, शतमुखरावणवधाख्यान, मूर्खाची लक्षणे, भगवद्‌गीता, शुकरंभासंवाद, एकनाथचरित्र, उत्तराकांड रामायण शिवाय काही दत्त भक्तीपर पदे व आरत्यांचे लेखन मुक्तेश्वरांनी केले आहे. पंडिती काव्याबरोबर त्यांच्या एकूण लेखनावर संत एकनाथांचे स्पष्ट संस्कार दिसून येतात. यासंदर्भात वा.ब. पटवर्धन म्हणतात, "Poetry was in his blood, for he the grandson of Eknath, being the son of latters daughter, The mahabharat of Mukteshwar is indeed a mine of poetic beauties"[१४] एकूणच मुक्तेश्वरांच्या

कवितेचे स्वरूप पाहाता त्यांनी शुद्ध काव्यरचना केली असेच दिसते. त्यांच्या वाङ्‌मयातील एकूण वैशिष्ट्यांमुळेच मुक्तेश्वरांना पंडिती कवी म्हणण्यापेक्षा कलाकवी म्हटले पाहिजे असे रा. श्री. जोग यांना वाटते.

१.१.५.२ वामन पंडीत

वामन पंडीत यांच्या जन्मासंदर्भात सुस्पष्ट असे पुरावे आढळत नसले तरी सोळाव्या शतकाच्या अखेरीस विजापूर येथे त्यांचा जन्म झाला असे वि. ल. भावे यांनी त्यांच्या महाराष्ट्र सारस्वत खंड २ या ग्रंथात नमूद केले आहे. नंतर भिक्षावृत्तीवर उदरनिर्वाह करत ते अनेक ठिकाणी गेले. मराठवाड्यातील नांदेडमध्ये त्यांचा अनेक वर्ष मुक्काम होता असे म्हटले जाते. वामन पंडीत यांनी विपूल साहित्यसंपदा लिहिली असून आख्यानपर, भाषांतरित व वेदांतविषयक अशा तीन विभागात त्यांच्या लेखनाचे विभाजन केले जाते. निगमसार, समश्लोकी टीका, यथार्थ दीपिका, अनुभूतीलेश, सिद्धांतविजय, कर्मतत्त्व इत्यादी ग्रंथ त्यांनी लिहिले आहेत. कृष्णजन्म, बालक्रिडा, वनसुधा, वेणुसुधा, मतिकाभक्षण, भामाविलास, राधाविलास, राधाभंजन, शुकरंभासंवाद, गजेंद्रमोक्ष, वामनचरित्र अशी काही आख्यानेही वामन पंडीत यांनी लिहिली आहेत.

पंडिती काव्याची सर्वच वैशिष्ट्ये वामन पंडितांच्या काव्यात आढळतात. विविधता, विदग्धता, विपुलता, अद्‌भुतता, मोहकता, मनोवेधकता, मार्मिकता, शृंगारिकता, यमकप्रियता यांबरोबरच बहारदार वर्णने त्यांच्या साहित्यात आढळतात. गोपिकानंद श्रीमुकुंदाच्या क्रिडेचे वामनाने केलेल्या वर्णनाचे विश्लेषण करताना वि.ल. भावे म्हणतात, "या रासोत्सवात कवी जनांच्या मनोविलासाचे, तरुणींच्या अतुरतेचे आणि स्त्रियांना स्वाभाविक अशा मत्सरी स्वभावाचे वर्णन यथास्थित पाहण्यास सापडेल. या वर्णनात योजिलेले शब्द असे कोमल व मधूर आहेत की, ते वाचीत असताना मन प्रसन्न होते. आणि इतके असून या काव्यात बिभत्सपणा आला नाही. हे सबंध वर्णन. वाचीत असता मन अर्थाबरोबर धावू लागते. आणि ते वाचून झाल्यावर आपण क्षणभर तरी या ठिकाणी जाऊन तो देखावा डोळाभर पहावा असे वाचकांच्या मनात येते."[१५] एकूणच आपल्या रचनाकौशल्यामुळे, विविध वृत्तांच्या उपयोजनामुळे व भाषाप्रभुत्वामुळे 'सुश्लोक वामनाचा' अशा शब्दात वामनाचा गौरव केला जातो.

मुक्तेश्वर, वामन पंडित यांच्याशिवाय मराठवाड्यातील अनेक कवींनी पंडिती परंपरेत लेखन केले आहे. वामन पंडीत यांचा मुलगा हरी वामन यांनी भीष्मयुद्ध, भीष्मशरपंजर, भीष्मभक्ती भाग्य, जयद्रतवध, विराटपर्व इत्यादी ग्रंथ लिहिले आहेत. रूक्मिणीस्वयंवर, पांचालीस्तवन, सीता स्वयंवर, रसमंजिरी, द्रौपदीवस्त्र हरण, बिल्हणचरित्र, विद्वजीवन इत्यादी काव्यरचना विठ्ठल बीडकर यांच्या नावावर आहेत. मूळ कऱ्हाडचे असणारे परंतु अंबाजोगाईस वास्तव्यास असणारे कृष्णदयार्णव यांनी हरिवरदा, तन्मयानंदबोध, विचार चंद्रिका व गीतासार हे ग्रंथ लिहिले आहेत. याशिवाय नरहर मोरेश्वर (उद्योगपर्व, भीष्मपर्व, द्रोणपर्व, कर्णपर्व) उद्धव चिदघन (अनुभवशतक, शुकरंभासंवाद, बहिरापिसा, मृत्यूंजय, गोरा कुंभार) राजाराम प्रासादी (भक्तमंजिरी) इत्यादी कवींनी पंडिती वळणाचे लेखन केले आहे.

मराठवाड्यातील मध्ययुगीन साहित्यासंदर्भात एकत्रित विचार करताना महानुभाव, वारकरी, समर्थ इत्यादी संप्रदायात व पंडिती परंपरेत संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ, कवी नरेंद्र, भास्करभट्ट बोरीकर, महदंबा, दासोपंत, संत रामदास, मुक्तेश्वर, वामन पंडित याशिवाय इतर अनेक कवींनी महत्त्वपूर्ण लेखन केले आहे. वीरशैव संप्रदाय, सूफी संप्रदाय या प्रवाहातूनही मध्ययुगीन मराठवाड्यात लेखन झाले आहे. वीरशैव संत लक्ष्मण महाराज (सदगुरू पलसिद्धाचे चरित्र, श्रीसिद्धस्तोत्र, श्रीगुरू स्तोत्र, मन्मथ बोधामृत, अनुभवानंद, स्वयंप्रकाश, ज्ञानबोध, गुरूगीता, मंत्रगाथा), सुफी संत हुसेन अंबरखान (अंबर हुसैनी टीका), सुफी संत शहामुनी (सिद्धांतबोध) इत्यादी संत मंडळींनी मध्ययुगीन कालखंडात काव्यलेखन केले आहे.

एकूण मराठी साहित्यात मध्ययुगीन कालखंडाचा विचार केल्यास गोदाकाठी म्हणजेच मराठवाड्यातच मूलभूत साहित्य निर्मिती झाली आहे. मराठी साहित्यातील अगदी सुरूवातीचे ग्रंथ मराठवाड्यातील साहित्यिकांनी लिहिले. भाषिक, वाङ्मयीन आणि सांस्कृतीकदृष्ट्या महाराष्ट्रात मराठवाडा अधिक संपन्न होता. देवगिरीच्या यादवांचे भाषिक व साहित्यप्रेमही याला काही अंशी कारणीभूत होते. संत एकनाथ यांच्यानंतर मात्र साहित्य-संस्कृतीवरची मराठवाड्याची पकड ढिली झाली. याची कारणमीमांसा करताना प्रसिद्ध साहित्यिक नागनाथ कोत्तापल्ले म्हणतात, "देवगिरीची सत्ता जसजसी संपुष्टात येत गेली तसतसे साहित्य निर्मितीचे प्रमाण हळूहळू कमी होत गेले... एकनाथांच्या काळापर्यंत देवगिरीची किंवा एतद्देशियांची सत्ता संपूर्णतः जाऊन उत्तरेकडून आलेल्या

मुस्लिमांची सत्ता इथे स्थिर झालेली दिसते... याचवेळी पश्चिम महाराष्ट्रात स्वतंत्र स्वकीय सत्तेचा उदय झाला आणि क्रमाने साहित्यिक-सांस्कृतिक निर्मितीचे केंद्र पुण्याकडे सरकत गेले."[१६] सोळाव्या शतकानंतर साहित्य-संस्कृतीचे केंद्र पुण्याकडे सरकले असले तरी सोळव्या शतकापर्यंत मराठवाडा हेच साहित्यिक-सांस्कृतिक केंद्र होते हे निर्विवाद सत्य आहे.

१.२ मराठवाड्यातील आधुनिक मराठी साहित्य :

१८१८ मध्ये महाराष्ट्रात ब्रिटिश राजवट सुरू झाली. ब्रिटिशांच्या आगमनानंतर मराठी भाषेमध्ये आधुनिक साहित्य लेखनास सुरूवात झाली. मराठी भाषिक प्रदेश असूनदेखील मराठवाड्यामध्ये मात्र आधुनिकतेचा मागमूसही नव्हता. कारण यावेळी मराठवाड्यात निजामांची राजवट होती. निजामी राजवट ही प्रतिगामी होती. या राजवटीमध्ये मराठवाड्यातील जनतेची भाषिक, साहित्यिक, सांस्कृतिक, धार्मिक, शैक्षणिक, राजकीय अशा सर्वच अंगाने कोंडी झाली होती. अशा परिस्थितीमध्ये १९०५ मध्ये मनमाड काचीगुडा रेल्वे सुरू झाली. या रेल्वे प्रवासाच्या निमित्ताने मराठवाड्यातील लेखकांचा ब्रिटिशांची राजवट, त्यांचे साहित्य व संस्कृतीबरोबरच मराठवाड्याबाहेरील मराठी साहित्यिकांशी संपर्क आला. या संपर्कानंतर मराठवाड्यामध्ये आधुनिक साहित्यलेखनाला सुरूवात झाली.

बी. रघुनाथ, वा. रा. कांत, दिवाकर कृष्ण केळकर, भगवंत तोडेवाले इत्यादी लेखकांनी मराठवाड्यामध्ये आधुनिक साहित्यलेखनाला आरंभ केला. स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये खेडोपाडी शिक्षणाचा प्रचार-प्रसार झाला. परिणामी साठोत्तरी कालखंडामध्ये दलित, ग्रामीण या साहित्यप्रवाहाचा उदय झाला. खेड्यापाड्यातील शेतकरी-शेतमजूर, पीडित, शोषित समाजघटकातील लेखक या वाङ्मयीन प्रवाहातून उदयास आले. नवीन आशय-विषय साठोत्तरी काळातील साहित्यातून अभिव्यक्त झाला. कथा, कविता, कादंबरी, नाटक, दलित स्वकथने अशा सर्वच वाङ्मयप्रकारांमध्ये आधुनिक कालखंडामध्ये संख्यात्मक व गुणात्मकदृष्ट्या लक्षणीय वाढ झाली. मराठवाड्यातील एकूण आधुनिक मराठी साहित्यामुळे मराठी साहित्याची परंपरा समृद्ध झाली.

१.२.१ मराठवाड्यातील कथालेखन :

कथा हा वाङ्मयप्रकार मराठवाड्यातील लेखकांनी सक्षमपणे हाताळलेला आहे. सुमारे १०० वर्षांचा इतिहास मराठवाड्यातील लिखित कथालेखनाला आहे. त्यापूर्वीही लोककथांच्या निमित्ताने मराठवाड्यामध्ये सर्वत्र कथा आढळत असल्या तरी रुढार्थाने १९२० नंतरच मराठवाड्यात कथा लेखनाला आरंभ झाला, असे म्हटले जाते. एकूण १०० वर्षात जे कथालेखन मराठवाड्यातील लेखकांनी केले आहे त्याची प्रत्येक समीक्षकाने किंवा अभ्यासकाने आपापल्या परीने मांडणी केली आहे. १९६० पूर्वीची मराठवाड्यातील कथा, मराठावाड्यातील सोठोत्तरी कथा, मराठवाड्यातील नव्वदोत्तरी कथा असे कालखंड काही अभ्यासकांनी मांडले आहेत. तर अनेक अभ्यासकांनी प्रवाहानुसार मराठवाड्यातील मध्यवर्ती कथा, मराठवाड्यातील ग्रामीण कथा, मराठवाड्यातील दलित कथा अशी विभागणी केली आहे. प्रस्तुत प्रकल्पात मराठवाड्यातील कथालेखनाचा कालक्रमाने आढावा घेतला आहे.

१.२.१.१ दिवाकर कृष्ण केळकर :

मराठवाड्यातील कथालेखनाचा इतिहास लिहिताना दिवाकर कृष्ण यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागते. १९२२ नंतर त्यांच्या कथालेखनाला आरंभ झाला. समाधी व सहा गोष्टी, रूपगर्विता आणि सहा गोष्टी व महाराणी आणि इतर गोष्टी हे तीन कथासंग्रह दिवाकर कृष्ण यांनी लिहिले. पाल्हाळामध्ये अडकलेल्या तत्कालीन मराठी कथेला दिवाकर कृष्ण यांनी लघू रूप दिले. लघुकथेच्या अव्वल कालखंडातील ते एक महत्त्वपूर्ण कथालेखक आहेत. त्यामुळेच 'नव्या मराठी लघुकथेचे यशस्वी प्रवर्तक' अशा शब्दात वि.स. खांडेकर यांनी त्यांचा गौरव केला आहे. "नाजूक हातांनी रंगविलेली व्यक्तिचित्रे, त्यांच्या भावनांचा कोमल हाताने केलेला आविष्कार आणि त्यासाठी निर्माण केलेले करुणरम्य काव्यात्म वातावरण हे दिवाकर कृष्णाच्या कथांचे विशेष आहेत."[१७]

स्वातंत्र्यपूर्व कालखंडात कथालेखन करणारे ग्रामीण-नागर जीवनाचा परिणाम असणारे आणि हैद्राबाद मुक्तिसंग्रामाची पार्श्वभूमी कथालेखनाला असणारे बी. रघुनाथ, न. शे. पोहनेरकर, वि.शं. पारगावकर व चंद्रकांत भालेराव हे महत्त्वाचे कथाकार आहेत.

१.२.१.२ बी. रघुनाथ :

कविता, कादंबरी, ललित गद्याशिवाय कथा हा वाङ्मयप्रकारही बी. रघुनाथ यांनी समर्थपणे हाताळला. साकी, फकिराचा कांबळी, छागल, आकाश आणि काळी राधा हे त्यांचे पाच कथासंग्रह आहेत. आपल्या भोवतालच्या जीवनाचे उघडे-नागडे दर्शन त्यांच्या कथांतून घडते. त्यांच्या काळात किस्सेवजा कथांना खरपूस मागणी होती. ग्रामीण भागाची टिंगल-टवाळी करणाऱ्या कथा त्यांनी तत्कालीन नियतकालिकांना पुरवल्या असत्या, तर ते त्यांच्या उपजीविकेचे साधन झाले असते. परंतु त्यांनी आपल्या अनुभूतीशी कधीही प्रतारणा केली नाही. सामाजिक बांधिलकीच्या भूमिकेतून त्यांनी लेखन केले. त्यामुळेच त्यांचे व्यक्तिगत जीवन आणि कथात्मक जीवन यामध्ये बेमालूम साम्य आढळते. आपल्या कथालेखनाविषयी बी. रघुनाथ म्हणतात, "माझ्या कथा कोणत्या आणि मी आजवर अनुभवलेलं जीवन कोणतं हे मला सांगता येणार नाही."[१८] आपल्या अनुभूतीशी असणारी निष्ठाच त्यांच्या विधानातून व्यक्त होते.

बी. रघुनाथ यांच्या कथांतील नायक-नायिकाही त्यांच्या भोवतालच्या जीवनातील आणि रंजल्या-गांजल्या समाजातील आहेत. बांधकामावरचे गवंडी, सामान्य दर्जाचे शिपाई, झाडुवाल्या आणि देहविक्रय करणाऱ्या स्त्रिया त्यांच्या कथेतून वावरतात. किंबहुना स्त्रियांचे दुःख हाच त्यांच्या कथांचा स्थायिभाव आहे. बेगम सकीना, काळी राधा, खाटकाची गाय इत्यादी कथांमधून स्त्रियांवर होणारे लैंगिक अत्याचार आणि त्यांचा होणारा भावनिक कोंडमारा बी. रघुनाथांनी समर्थपणे मांडला आहे. त्यांच्या अनेक स्त्रीप्रधान कथा मनोविश्लेषणाच्या पातळीवर जातात आणि थेट १९४५ नंतरच्या नवकथेशी आपले नाते सांगतात. त्यामुळेच बी. रघुनाथांना नवकथेची पायवाट निर्माण करण्याचे कर्तृत्व बहाल करताना नवकथाकार अरविंद गोखले म्हणतात, "हळवा ध्येयवाद आणि फसवा बोधवाद कथेतून काढून कथा अंतर्मुख, काव्यात्म, एकसंघ व उत्स्फुर्त अशी लिहिली जाऊ लागली. अशा प्रकारचे कथालेखन वामन चोरघडे, कुसुमावती देशपांडे आणि बी. रघुनाथ आदी लेखक करू लागले. येऊ घातलेल्या नव्या कथेचा अंदाज या लेखकांच्या कथांवरून करू शकतो."[१९] नवकथेची पायवाट निर्माण करण्याचे काम बी. रघुनाथांनी केले, असे जरी अरविंद गोखले म्हणत असले तरी बी. रघुनाथांनी केवळ पायवाट निर्माण केली नसून ते

नवकथाकारांपैकीच एक समर्थ कथाकार होते. तत्कालीन कथालेखनाच्या केंद्रापासून दूर असल्यामुळे नवकथाकार म्हणून त्यांची चर्चा झाली नाही, असे म्हणणेच सयुक्तिक ठरते.

बी. रघुनाथांचे एकूण लेखनच समाजसन्मुख व बांधिलकी जोपासणारे आहे. समाजातील प्रत्येक घटनेकडे ते दूरस्थपणे पाहतात आणि तटस्थपणे त्या घटनेला ते कलात्मक रूप देतात. निजामी राजवटीच्या झोतभट्टीत तत्कालीन मराठी समाज होरपळत असतानाही बी. रघुनाथांनी द्वेषभावनेतून आपल्या लेखनीची तोफ कधी मुस्लिमांवर रोखली नाही. तथापि, जुलमी राजवटीवर लेखनास्त्र चालवायलाही ते घाबरले नाहीत. सर्वांगीण प्रतिकूल परिस्थिती असताना आपले अस्तित्व पणाला लावून बी. रघुनाथांनी वाङ्मयसेवेच्या माध्यमातून देशसेवाच केली. त्यामुळे त्यांना नुसते साहित्यिक म्हणण्यापेक्षा 'लढवय्ये साहित्यिक' म्हणणे सयुक्तिक ठरेल. तत्कालीन वाङ्मयीन वातावरण रंजनवादी असतानाही बी. रघुनाथ यांनी अनुभूतीशी एकरूप होऊन वास्तववादी लेखन केले. यातच त्यांच्या लेखनाचे वेगळेपण सामावलेले आहे.

'विरलेल्या गारा' या कथासंग्रहात न. शे. पोहणेरकर यांनी निजामी राजवटीबरोबर ग्रामीण-नागर मराठवाड्याचे चित्रण केले आहे. तर पंचरंगी स्वप्न, केळफूल, मरवा, चंद्र आणि चिमणी, राणी व आविष्कार इत्यादी कथासंग्रहातून वि. शं. पारगावकर यांनी मराठवाड्यातील जनजीवनाचे चित्रण केले आहे. १९४५ च्या काळात लेखण करत असल्यामुळे मराठी नवकथेचा मोठा प्रभाव पारगावकर यांच्या कथांवर जाणवतो. निजामी राजवटीच्या जोखडाखाली पिचलेल्या मराठवाड्यातील समाज चंद्रकांत भालेराव यांनी अत्यंत समर्थपणे मांडला आहे. झमेला, वाहाटूळ व निचरा हे तीन कथासंग्रह भालेराव यांनी लिहिले आहेत.

तु. शं. कुलकर्णी हे मराठवाड्यातील एक समर्थ कथाकार आहेत. तृष्णाची वेदना, ग्रीष्मरेषा व अखेरच्या वळणावर हे कथासंग्रह त्यांनी लिहिले आहेत. "तु. शं. कुलकर्णी यांच्या कथा व्यक्तिचित्रणात्मक असल्या तरी आशयसंपन्न आहेत. नागर आणि ग्रामीण जीवनाचे सूक्ष्म अवलोकन त्यासंबंधीचे चिंतन, त्यांची अनुभूती याचे सामर्थ्य त्यांच्या कथेत आहे. अतृप्त, असामान्य माणसाच्या मनातील आंदोलने साकारताना त्यांच्या कथेतील माणसे प्रामाणिकता आणि सद्वर्तनाचा तोला ढळू देत नाहीत."[२०] असे प्रल्हाद लुलेकर म्हणतात.

१९६० नंतर मराठी साहित्यामध्ये ग्रामीण, दलित, स्त्रिवादी, आदिवासी असे विविध साहित्य प्रवाह उदयास आले. आपण वाचत असलेल्या साहित्यातून आपल्या जीवनाचे चित्रण कुठेही येत नाही; आपल्या भोवतालचे, वास्तवाचे चित्रण साहित्यातून आले पाहिजे असे या सर्वच प्रवाहातील लेखकांना वाटत होते. रा. रं. बोराडे, वासुदेव मुलाटे, नागनाथ कोत्तापल्ले, भास्कर चंदनशिव अशा अनेक साहित्यिकांनी ग्रामीण जीवन आविष्कृत करणारे कथालेखन केले.

१.२.१.३ रा. रं. बोराडे :

तब्बल साठ वर्षांपासून कथालेखन करणारे रा. रं. बोराडे हे मराठवाड्यातील एक महत्त्वाचे कथाकार आहेत. कथा, कादंबरी, नाटक, समीक्षात्मक व वैचारिक अशा बहुविध प्रकारात त्यांनी लेखन केले आहे. कादंबरी वाङ्मयामध्ये बोराडे यांनी विशेष योगदान दिले असले तरीही कथा वाङ्मयापासून त्यांच्या लेखनाला सुरूवात झालेली आहे. पेरणी, ताळमेळ, वरात, नाती गोती, बोळवण, बोळवण, फजितवाडा, माळरान, राखण, गोंधळ, खोळंबा इत्यादी कथासंग्रह त्यांचे प्रकाशित आहेत. "ग्रामीण शेतकरी, त्यांच्या समस्या आणि त्यांची नातीगोती यातील ताणतणाव, दुःखवेदना याचे चित्रण बोराडे यांच्या कथांतून प्रकर्षाने येताना दिसते"[२१] शेतकरी जीवनासोबतच स्त्रीजीवनही बोराडे यांनी ताकदीने रेखाटले आहे. स्त्रियांचे भावविश्व अत्यंत एकरूप होऊन ते मांडतात. स्त्री जीवनाचे अनेक दुखरे पदर त्यांनी आपल्या कथांमधून मांडले आहेत. स्त्रियांच्या जीवनासोबतच ग्रामीजीवनातील राजकारण, काळाच्या ओघात होत जाणारा मूल्यऱ्हास, गावातील बेरकी आणि प्रामाणिक माणसं या माणसांचे बदलत जाणारे स्वभाव रा. रं. बोराडेंनी अत्यंत बारकाईने टिपले आहेत.

गंभीर कथाबरोबर विनोदी कथालेखनही रा. रं. बोराडे यांनी केले आहे. १९५७ च्या आसपास जेव्हा बोराडेंनी कथालेखनाला सुरूवात केली तो काळच विनोदी कथांनी अधिक भारावलेला होता. प्रवृत्ती गंभीर असतानाही वाङ्मयीन अभिरूची जोपासण्याच्या प्रयत्नातून रा. रं. बोराडे यांनी विनोदी कथालेखन सुरूवातीच्या काळात केले आहे.

१.२.१.४ भास्कर चंदनशिव :

१९६० नंतर ग्रामीण साहित्य चळवळीचा उदय झाला. ग्रामीण साहित्य चळवळीच्या उदयानंतर खेड्यापाड्यातून अनेक साहित्यिक लिहिते झाले. ग्रामीण साहित्य चळवळीतील एक

महत्त्वाचे कथाकार म्हणजे भास्कर चंदनशिव होय. केवळ मराठवाड्यातीलच नव्हे तर एकूण भारतीय कथालेखनात महत्त्वाचे ठरावे असे कथालेखन भास्कर चंदनशिव यांनी केले आहे. "ग्रामीण जीवनाचा विस्तृत पट कवेत घेणारी कथा भास्कर चंदनशिव लिहितात. त्यांच्या कथांमधून खऱ्या अर्थाने शोषिक, पीडित, कष्टकरी, शेतकरी जीवनाचे वास्तव दर्शन घडते. एक विशिष्ट विचारधारा आणि प्रतिमांची सहजसुंदर भाषा ही चंदनशिव यांच्या कथेची वैशिष्ट्ये सांगितली जात असली तरी त्यांची कथा 'प्रतिमांच्याच प्रदेशात' अडकून पडत नाही हेही महत्त्वाचे आहे."[२२] अशयाभिव्यक्तीचे अद्वैत हे त्याच्या कथेचे मूलभूत वैशिष्ट्ये आहे.

जांभुळडव्ह, मरणकळा, अंगारमाती, नवी वारुळं, बिरडं असे मोजकेच कथासंग्रह चंदनशिव यांनी लिहिले असले तरी समग्र जीवनाचे सारच ते आपल्या कथातून मांडत जातात. गावातील शेतकरी-शेतमजूरांचे दुःख, स्त्रियांचे नानाविध प्रश्न व त्यांचे दुःख, गावातील राजकारण व राजकारणात पिळला जाणारा सामान्य नागरिक असे अनेक विषय त्यांनी आपल्या कथांतून हाताळले आहेत. शेतकरी जीवनाबरोबर दलित जीवनही चंदनशिव यांच्या कथेतून तेवढ्याच ताकदीने येते. त्यामुळेच चंदनशिव यांची कथा ही दलित-ग्रामीण सिमारेषा पुसट करणारी आहे असे म्हटले जाते. चंदनशिव यांच्या या पाचही कथासंग्रहांनी केवळ मराठवाड्यातीलच नव्हे तर एकूण मराठी कथा लेखन समृद्ध केले असे म्हणावे लागेल. ग्रामीण कथेला विद्रोह शिकविणारे चंदनशिव हे खऱ्या अर्थाने विद्रोही कथाकार ठरतात. विद्रोही कथांबरोबर मानवी मनाचे कंगोरे उलगडणाऱ्या मनोविश्लेषणात्मक कथाही त्यांनी लिहिल्या आहेत.

एकूणच चंदनशिव यांच्या सशक्त कथा लेखनामुळे मराठी कथावाङ्मयाची पंरपरा अधिक प्रगल्भ झाली. चंदनशिव यांची कथा गावकुसातील आणि गावकुसाबाहेरील समग्र जीवन कवेत घेते. सत्यजीत रे यांच्या चित्रपटात जी ताकद आहे ती ताकद चंदनशिव यांच्या कथेत जाणवते. "ग्रामजीवनाची नेमकी नस सत्यजीत रे आपल्या चित्रचौकटीत पकडतात तितक्याच कलात्मक ताकदीने चंदनशिव ग्रामवास्तवाचे तुकडे आपल्या कथेत मांडतात... समाजवास्तवाची जाण आणि श्रेष्ठ दर्जाचा कलात्मक आनंद या दोन्ही गोष्टी चंदनशिव यांची कथा एकाच वेळी साध्य करते. भास्कर चंदनशिव यांच्या कथेचा समग्र पट डोळयांसमोर आणला तर लक्षात येईल की गेल्या पन्नास वर्षातला एक गाव जिवंत होऊन आपल्या समोर उभा राहिलेला आहे. जणू एका गावाची ही

महागाथाच आहे."[२३] अशा शब्दात इंद्रजित भालेराव यांनी चंदनशिव यांच्या कथालेखनाचा गौरव केला आहे.

१.२.१.५ नागनाथ कोत्तापल्ले :

ग्रामीण साहित्य चळवळीतील एक महत्त्वाचे कवी, कथाकार, कादंबरीकार, समीक्षक म्हणजे नागनाथ कोत्तापल्ले होय. काफिला, रक्त आणि पाऊस, कर्फ्यू आणि इतर कथा, पापुद्रे, संदर्भ, राजधानी हे नागनाथ कोत्तापल्ले यांचे कथासंग्रह प्रकाशित आहेत. अत्यंत गांभिर्याने आणि भूमिका घेऊन लेखन करणारे कथाकार म्हणजे कोत्तापल्ले होय. वास्तवाला उजागर करणाऱ्या त्यांच्या प्रत्येक कथेतून सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, धार्मिक गुंतागुंत मांडण्याचा प्रयत्न असतो. समाजजीवनातील वास्तवाचे विद्रूप दर्शन घडवत, विविध प्रवृत्तीचे बुरखे फाडत समाजातील वास्तवावर आणि व्यंगावर परखड मत प्रदर्शन करणारी त्यांची कथा आहे. "नागनाथ कोत्तापल्ले यांचे कथालेखन बदलत्या ग्रामीण वास्तवाला गवसणी घालाणाऱ्या कथालेखकात घेण्यात आलेले असले तरी ग्रामीण जीवनाव्यतिरिक्त कितीतरी विषय त्यांनी त्यांच्या कथेतून हाताळले आहेत. म्हणजे त्यांची कथा ही केवळ ग्रामीण पांढरपेशियांचेच सुख-दुःख सांगणारी नाही तर त्यात थेट पांढरपेशी वर्गापासून दलितांचे सुख-दुःख व त्यांचे वास्तव चित्रित करणारी कथा आहे."[२४] ग्रामीण दलित या सिमारेषा पूसट करणारे कथालेखन कोत्तापल्ले यांचे आहे.

१.२.१.६ वासुदेव मुलाटे :

वासुदेव मुलाटे हे ग्रामीण साहित्य चळवळीतील महत्त्वाचे लेखक आहेत. कथा, कादंबरी, समीक्षा या वाङ्मयप्रकारात त्यांनी महत्वपूर्ण योगदान दिले आहे. वाङ्मयसेवे सोबतच ग्रामीण साहित्य चळवळीत सक्रिय सहभाग नोंदवत मुलाटे यांनी अनेक नव लेखकांना प्रेरणा देऊन त्यांना प्रवाहात आणले आहे. व्यथाफूल, अबॉर्शन आणि इतर कथा, काळोखवेणा, अंधाररंग या कथासंग्रहांबरोबर झाड आणि समंध हा दीर्घ कथांचा संग्रह मुलाटे यांनी लिहिला आहे. ग्रामीण आणि नागर जीवनाचे प्रतिबिंब मुलाटे यांच्या लेखनात उमटते. भ्रष्ट व्यवस्थेमुळे शेतकऱ्यांचे-सर्वसामान्यांचे होणारे हाल व जीवनाची फरफट त्यांच्या अनेक कथांमधून व्यक्त होते. एकूणच मुलाटे यांनी वास्तववादी समाजचित्रण करून ग्रामीण कथेची परंपरा समृद्ध केली आहे.

१.२.१.७ आसाराम लोमटे :

आसाराम लोमटे हे एकूण मराठी कथा समृद्ध करणारे मराठवाड्यातील कथाकार आहेत. भास्कर चंदनशिव यांच्यानंतर मराठवाड्यातून समर्थपणे कथालेखन करणारे कथाकार म्हणून आसाराम लोमटे यांचा उल्लेख होतो. इडापिडा टळो व आलोक हे आसाराम लोमटे यांचे दोन कथासंग्रह प्रकाशित आहेत. त्यांच्या आलोक या कथासंग्रहाला मानाचा असा साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त झाला आहे. गाव खेड्याचे वास्तव चित्रण आसाराम लोमटे यांच्या कथांतून येते. ज्येष्ठ विचारवंत भा. ल. भोळे म्हणतात, "तुम्हाला ग्रामीण जीवनाचा अस्सल अनुभव आहे आणि त्याला कथात्म रंगरूप देऊन तमाम तपशीलांसह वाचकांसमोर उभे करण्याची निवेदनशैलीही लाभली आहे. गतकाळाचे गौरवीकरण करत गळा काढण्यात तुमची कथा रमत नाही. 'आज आणि आत्ता' ला साक्षात भिडते ही गोष्ट मला महत्त्वाची वाटते. ग्रामीण कथा लिहिण्याच्या नावाखाली किस्सेबाज किंवा वखवखलेली कथानकच मोठ्या प्रमाणात देण्याची परंपरा तुमच्या कथेत स्पष्टपणे नाकारली आहे."[२५] मराठीतील प्रयोगशील कथाकार म्हणून लोमटे यांचे कथालेखन महत्त्वाचे आहे.

एकूणच बदलत जाणाऱ्या ग्रामजीवनाचा आलेख आसाराम लोमटे यांनी आपल्या कथालेखनातून उभा केला आहे. आलोक हा आसाराम लोमटे यांचा ग्रामजीवनातील वास्तवाला थेटपणे भिडणारा कथासंग्रह आहे. "आलोक या कथासंग्रहातले नव्या वास्तवाचे चित्रण, निसर्ग पाऊसपाण्याचे वर्णन, खेड्यापाड्यापर्यंत पोहोचलेले वेडेवाकडे, भ्रष्ट, बेमुर्वत राजकारण आणि ग्रामीण बोली-शैलीचा नवा, अचूक साज याचे अभिनव रसायण वाचकाला गुंग करून टाकते... लोमटे यांची शैली अचूक अभिनव... ग्रामीण कथाकार ठोकळ, यादव आणि व्यंकटेश माडगूळकर, चारुता सागर यांना पार मागे टाकणारी... अस्सल प्रादेशिक आणि बोलीभाषेचे रंगरूप घेऊन मातीतली मुळ शोधणारी, उघड करणारी... नव्या वास्तवाचे नव्या शैलीतील नवी बोलीभाषा वापरून मनाचे ठाव घेणारे चित्रण आसाराम सारखे तरुण लेखक करीत आहेत. त्याचा हेवा वाटतो. आणि त्यांना सलामही करावासा वाटतो."[२६] वास्तववादी समाजचित्रण, चिंतनशीलता, अनुभवसंपन्नता आणि अस्सल ग्रामीण बोली यांनी आसाराम लोमटे यांची कथा नटलेली आहे.

ग्रामीण प्रवाहामध्येच लेखन करणाऱ्या महत्त्वाच्या कथाकारांमध्ये मुकुंद कृष्णा गायकवाड (तिरकट), बंकट पाटील (चकवा, फास), किसन चोपडे (तपासणी), दीनानाथ फुलवाडकर (वॉन्टेड), नरेंद्र मारवाडे (वीण), ना. धों. महानोर (गावाकडच्या गोष्टी), लक्ष्मीकांत तांबोळी (तवंग), लक्ष्मीकांत देशमुख (कथांजली, अंतरीच्या गूढगर्भी, उदक), दादा गोरे (कोसळ, पौरुष, कोसळ आणि इतर कथा, अंगठा), सुरेश जाधव (माती), भिमराव वाघचौरे (मरणावळ), उत्तम बावस्कर (बुजगावणे, इस्कोट, टंचाई), शिवाजी मरगीळ (जुलूम), सरदार जाधव (माणसं आणि कणसं), भास्कर बडे (पांढर, चिकाळा), सोपान हाळमकर (सपान), गणेश घांडगे (झळाय), गणेश आवटे (कागूद, डीळ), श्रीराम गुंदेकर (उचल, लगाम), जगदीश कदम (मुक्कामाला फुटले पाय, मुडदे, आखर), शंकर देशमुख (जोगवा), सुरेंद्र पाटील (तुंबण), शिवाजी मुंढे (पेरणी), नागनाथ पाटील (रानभूल), भारत काळे (दीक्षा), उमेश मोहिते (वळख, जागरण), शेषराव मोहिते (बरा हाय घरचा गोठा), विजय जावळे (रितंगाव, मिरगीपेर, खांदेमळणी), राम निकम (चांदयेल), प्रभाकर हरकळ (उलघाल, भूमिया), गेणू शिंदे (चक्रव्यूह) इत्यादी कथाकारांनी आपल्या कथालेखनातून ग्रामजीवनाचा वेध घेतला आहे.

शेतकरी-शेतमजूरांचे प्रश्न, ग्रामजीवनातील दारिद्र्य, लहरी निसर्ग, खेड्यातील राजकारण व या स्वार्थी राजकारणातून निर्माण झालेले प्रश्न, मूल्यांचा झालेला ऱ्हास, गावातील धनदांडग्याची दादागिरी, त्यातून सामान्यांची होणारी पिळवणूक, शेतातील पिक पाणी व गुरंढोरं असा एकूण गावगाडाच या कथाकारांनी ग्रामीण बोलीतील शब्दसौंदर्यासह आपल्या कथांमधून व्यक्त केला आहे.

ग्रामीण आणि नागर अशा संमिश्र जीवनाचे चित्रण करणारी कथा भालचंद्र देशपांडे, भारत सासणे, महावीर जोंधळे, बाबा भांड यांनी लिहिली. भालचंद्र देशपांडे यांचे आकळ, जन्मपूर्व, वृत्तांत, जन्म सत्र असे कथासंग्रह प्रसिद्ध झाले आहेत. मानवी जीवनातील सूक्ष्म छटा देशपांडे यांनी आपल्या कथांमधून मांडल्या आहेत. महावीर जोंधळे यांच्या कथांमधून राजकीय जीवनातील विरोधाभासाचे प्रभावी चित्रण येते. तळभोवरा, झुंबर, नाल नसलेल्या घोड्याचा मालक, मूरलँड, निरंग जांभूळ इत्यादी कथासंग्रह महावीर जांधळे यांनी लिहिले आहेत. कादंबरीकार म्हणून प्रसिद्ध

असलेले बाबा भांड यांनी कायापालट, पारंब्या, जागर, दंतकथा इत्यादी कथासंग्रहातून समकालीन जीवनाचा वेध घेतला आहे.

भारत सासणे हे गंभीर वृत्तीचे कथाकार आहेत. मराठवाड्यातीलच नव्हे तर मराठी कथा वाङ्मयात भारत सासणे यांची कथा महत्त्वाची ठरते. जॉन आणि अंजिर पक्षी, लाल फुलाचे झाड, चिरदाह, आयुष्याची छोटी गोष्ट, शुभवर्तमान इत्यादी कथासंग्रह त्यांचे प्रसिद्ध आहेत. "मानवी मनातील अनाकलनीय धाग्यांना शब्दाच्या चिमटीत पकडण्याचा प्रयत्न त्यांनी आपल्या कथांमधून केलेला आहे. नियती आणि निसर्ग यांच्या धूसर रेषा त्यांच्या कथांना 'स्व'त्व प्राप्त करून देतात. जी.ए. नंतर मराठीतील एक बिन्नीचा कथालेखक म्हणून सासणे आपली मुद्रा उमटवून आहेत."[२७] मराठवाड्यातील कथालेखनाच्या परंपरेत भारत सासणे यांच्या कथेने आपले वेगळेपण सिद्ध केले आहे.

ग्रामीण कथालेखनाएवढे मराठवाड्यातील दलित कथालेखन विपूल प्रमाणात लिहिले गेले नसले तरी मोजकेच पण दर्जेदार दलित कथालेखन मराठवाड्यातील लेखकांनी केले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेतून १९६० नंतर मराठी वाङ्मयात जो दलित साहित्य प्रवाह अवतीर्ण झाला त्यामुळे एकूण मराठी साहित्यालाच एक वेगळे वळण मिळाले. मराठवाड्यातील कथाकरांचे मराठीतील दलित कथा समृद्ध करण्यास मोलाचे योगदान आहे. गंगाधर पानतावणे यांनी 'अस्मितादर्श'मध्ये नव्या दमाच्या कथाकारांना प्राधान्य दिल्यामुळे दलित कथा ही अधिक प्रभावी ठरली. योगिराज वाघमारे (उद्रेक, बेगड, विद्रोह), सुखराम हिवराळे (पहाट, विश्वगंगेच्या काठी), अविनाश डोळस (महासंगर), रविचंद्र हडसणकर (दावण, मरणकळा), एकनाथ सोनवणे (खद्रावळ, भंगलेल्या दिशा), शरणकुमार लिंबाळे (हरिजन, रथयात्रा), किशोर घोरपडे (धग, घुसमटणी), ज्ञा. रा. पंडीत (वादळवाटा, बारव, दानत), जयराम खुणे (आगडोंब), विलास सिंदगीकर (गारपीट, भूकबळी, उतरंड), उत्तम अंभोरे (कथा बुद्ध जगाच्या), बलभीम तरकसे (वारसा), यादव गायकवाड (अस्वस्थ किनारा), बाबुराव गायकवाड (बाज), सतीश म्हस्के (हंबरडा), प्रकाश मोगले, विजय वाकडे, दीपक त्रिभूवन, मिलिंद व्हटकर, विलास ढवळे, अनंत ढवळे इत्यादी कथाकारांनी आपल्या कथांमधून दलित जाणिवा आविष्कृत केल्या आहेत. गावकुसाबाहेरील समाजाचे प्रश्न, गावगाड्यात होणारी दलितांची होरपळ, अस्पृश्यता, जातियतेचे

पदोपदी मिळणारे चटके दलित कथाकारांनी बोलीभाषेसह आपल्या कथेतून मांडले आहेत. वेदनेसोबतच विद्रोह आणि परंपरांना नकारही तेवढ्याच ताकदीने दलित कथेतून व्यक्त होतो.

मध्यवर्ती, ग्रामीण, दलित कथालेखनाप्रमाणेच मराठवाड्यातील स्त्रियांचे कथालेखनही उल्लेखनीय आहे. अनुराधा वैद्य, रेखा बैजल, मथु सावंत, ललिता गादगे, छाया महाजन अशा कथालेखिकांनी मराठवाड्यातील कथा समृद्ध केली आहे. अनुराधा वैद्य यांनी गंभीर आणि विनोदी अशा दोन्ही प्रकारचे कथालेखन केले आहे. उत्तररात्र, जोगवा, अस्तित्वरेषा, पंख, गुंफण, भूमिका अशा कथासंग्रहातून त्यांनी स्त्रियांच्या जीवनातील विविध प्रश्नांबरोबर निजामी राजवटीतील मराठवाड्याचे प्रभावी चित्रण केले आहे. रेखा बैजल या विज्ञानवादी व स्त्रिवादी कथाकार आहेत. मानस, अदिम, स्वप्नरथ, क्लोन, किडनॅपिंग इत्यादी कथासंग्रह त्यांनी लिहिले आहेत. स्पर्श, वळणावर आणि ओढ हे छाया महाजन यांचे कथासंग्रह प्रसिद्ध आहेत. स्वतंत्र विचार करणारी स्त्री छाया महाजन यांनी आपल्या लेखनातून सर्व सामर्थ्यासह उभी केली आहे.

मथु सावंत, ललिता गादगे व सुनंदा गोरे यांच्या कथांमधून प्रामुख्याने ग्रामीण जीवनाचा आविष्कार झाला आहे. पाण्यातील पायवाट, तिची वाटच वेगळी आणि पाणबळी या कथासंग्रहातून सावंत यांनी खेड्यातील राजकारण आणि राजकारणातील स्त्रिचे स्थान यावर गांभिर्यपूर्ण विचारमंथन केले आहे. तर आयुष्याच्या काठाकाठाणे, दु:ख आणि अश्रू या कथासंग्रहातून ललिता गादगे यांनी स्त्रियांच्या वाट्याला आलेले दु:ख आणि पारंपरिक समाजात स्त्रिची होणारी घूसमट व्यक्त केले आहे. उन्हातलं चांदणं, कोरांटीची फुलं या कथासंग्रहातून सुनंदा गोरे यांनी स्त्रिसूलभ जाणिवा व्यक्त केल्या आहेत. यांशिवाय वृंदा दिवाण (रंगाकित, लक्ष्मण रेषा), सुनेत्रा ओक (आय कन्फेस), सरोज देशपांडे (या अशा सांजवेळी), शैला लोहिया (स्वरांत), पुष्पा देशमुख (सारीपाट), मंगला अवलगावकर (गुज अंतरिचे), इंदुमती जोंधळे (भाषणमीमांसा, बेदखल), अनिता यलमाटे इत्यादी कथा लेखिकांनी मराठवाड्यातील कथालेखनात भर घातली आहे.

एकविसाव्या शतकातही सशक्त असे कथालेखन मराठवाड्यामध्ये होत आहे. अगदी तरूण पिढीमधील बालाजी सुतार यांचा दोन शतकांच्या सांध्यावरच्या नोंदी हा कथासंग्रह २०२१ मधील साहित्य अकादेमी पुरस्काराच्या अंतिम निवड यादीमध्ये पोहोचलेला कथासंग्रह आहे. कृष्णा किंबहुने यांचा प्रथम पुरुष भूमिती, हा आश्वासक असा कथासंग्रह आहे. नितीन कोत्तापल्ले,

शिवाजी वाठोरे, सुरेश पाटील या कथाकारांनीही नव्या पिढीमध्ये स्वतःचे स्थान निर्माण केले आहे. नॅशनल बुक ट्रस्ट ऑफ इंडिया ने २०१६ साली नवलेखन मराठी कथा या शीर्षकाने महाराष्ट्रातील नवीन कथालेखकांच्या कथांचा संग्रह प्रकाशित केला. या संग्रहामध्ये मराठवाड्यातील रमेश रावळकर, हंजराज जाधव, संदीप जगदाळे, अनिता यलमाटे यांच्या कथा प्रकाशित आहेत. या चौघांच्याही कथांमध्ये मराठवाड्यातील वास्तव प्रश्नांचे प्रदेशातील भाषिक वैशिष्ट्यांसह चित्रण येते. मराठवाड्यातील पुढील कथा ही दमदार आणि लक्षवेधी असेल याच्या सर्व खूणा या चौघांच्याही लेखनात आहेत असा अभिप्राय या कथांबद्दल पुस्तकाचे संपादक राजन गवस यांनी व्यक्त केला आहे.

१.२.२ मराठवाड्यातील कादंबरीलेखन :

कादंबरीलेखनाची समृद्ध परंपरा जशी एकूण मराठी कादंबरीला आहे तशी मराठवाड्यालाही आहे. कथा, कवितेबरोबर कादंबरीलेखनही मराठवाड्यातील लेखकांनी विपूल प्रमाणात केले आहे. केवळ संख्यात्मकदृष्ट्या नव्हे तर गुणात्मकदृष्ट्याही मराठवाड्यातील कादंबरी सकस आहे. जवळपास शंभर वर्षाचा इतिहास मराठवाड्यातील कादंबरीलेखनाला आहे. या शंभर वर्षांच्या कालखंडाचे १९६० पूर्वीची मराठवाड्यातील कादंबरी, मराठवाड्यातील साठोत्तरी कादंबरी व मराठवाड्यातील नव्वदोत्तर कादंबरी असे विभाजन अभ्यासकांनी केले आहे. मराठवाड्यातील ग्रामणी कादंबरी, मराठवाड्यातील दलित कादंबरी, मराठवाड्यातील स्त्रियांचे कादंबरीलेखन, मराठवाड्यातील मध्यवर्ती कादंबरी अशिही विभागणी मराठवाड्यातील कादंबरीलेखनाची केली जाते. प्रस्तुत शोध प्रकल्पामध्ये मराठवाड्यातील कादंबरीलेखनाची कालक्रमानुसार मांडणी केली आहे.

मराठवाडा हा दीर्घकाळ निजामाच्या जुलमी सत्तेत होता. सांस्कृतिक, भाषिक, धार्मिक, शैक्षणिक, राजकीय अशा सर्वच पातळ्यावर मराठवाड्यातील जनता निजामी राजवटीत पिचली गेली. निजामी राजवटीतील या जुलूमशाहीचे चित्रण सुरूवातीच्या म्हणजेच १९२० ते १९६० पर्यंतच्या कादंबऱ्यातून येते. १९६० नंतर एकूण मराठी वाङ्मयाप्रमाणे मराठवाड्यातील कादंबरी लेखनामध्येही ग्रामीण साहित्य, दलित साहित्य, स्त्रिवादी साहित्य असे प्रवाह निर्माण झाले. या प्रवाहामधून लिखाण करणाऱ्या लेखक-लेखिकांनी भाषिक वैशिष्ट्यांसह अत्यंत सकस व गंभीर

कादंबरीलेखन केले आहे. त्यामुळे मराठवाड्यातील कादंबरीलेखन अधिकच समृद्ध, अनुभवसंपन्न व वैविध्यपूर्ण झाले आहे.

१.२.२.१ बी. रघुनाथ :

१९३० ते १९५३ हा भगवान रघुनाथ कुलकर्णी उर्फ बी. रघुनाथांच्या साहित्य लेखनाला काळ आहे. हा काळ त्यांच्यासाठी सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि भाषिकदृष्ट्या प्रतिकूल असा काळा होता. या प्रतिकूल आणि अस्थिर वातावरणास तत्कालीन निजामी राजवट जबाबदार होती. १७२४-१९४८ अशी तब्बल सव्वादोनशे वर्षे मराठावाड्यातील समाज निजामी राजवटीचे अन्याय-अत्याचार सहन करत होता. सातत्याने उद्‌भवणारा हिंदू-मुस्लिम संघर्ष, मुस्लिम राजकर्त्यांकडून स्थानिकांची होणारी विटंबणा, धर्मांतरासाठी होणारा छळ, महत्त्वाच्या राजकीय आणि प्रशासकीय पदांवर मुस्लिम राजकर्त्यांचा असणारा वचक तसेच शिक्षण आणि राज्यकारभाराचे माध्यम उर्दू केल्यामुळे मराठी भाषा आणि भाषिकांची होणारी गळचेपी अशा प्रतिकूल परिस्थितीवर मात करून बी. रघुनाथ यांनी आपले कादंबरी लेखन पूर्णत्वास नेले. सार्वत्रिक प्रतिकूल परिस्थिती असतानाही त्यांनी निजामी राजवटीवर शाब्दिक असूड ओढले. निजामी राजवटीत पिचलेल्या जनतेचा आक्रोश त्यांनी आपल्या कादंबरी लेखनातून प्रकट केला, हा एक प्रकारचा विद्रोहच होता. निजामकालीन वातावरणाचे कलात्मक प्रतिबिंब त्यांच्या कादंबरी लेखनात उमटल्यामुळे त्यांच्या लेखनाला वाङ्‌मयीन मूल्याबरोबर ऐतिहासिक मोलही प्राप्त झाले आहे. किंबहुना निजामकालीन जनजीवनाचा शोध घेताना एक ऐतिहासिक दस्तऐवज म्हणूनही त्यांच्या कादंबरी लेखनाकडे पाहता येईल.

निजामकालीन वातावरणाबरोबरच बी. रघुनाथ यांच्या साहित्यलेखनाला दोन जागतिक महायुद्धे आणि तत्कालीन वाङ्‌मयीन परिस्थितीचीही पार्श्वभूमी आहे. बी. रघुनाथ ज्या काळात लेखन करत होते तो काळ मराठी साहित्यात फडके-खांडेकरांचा काळ होता. बी. रघुनाथ यांनी आशय-विषय आणि लेखनाची ही सर्व तंत्रे झुगारून दिली. स्वप्नरंजनापेक्षा आपल्या अनुभूतीला साजेशा अशा वास्तववादी लेखनाचे तंत्र त्यांनी विकसित केले. वास्तवाचे कलात्मक चित्रण करत त्यांनी निजामी राजवटीचा पट कादंबरी लेखनात वाचकांच्या डोळ्यांसमोर उभा केला.

बी. रघुनाथ यांच्या एकूण लेखनाप्रमाणे त्यांच्या कादंबरी लेखनातूनही समकालीन समाजाचे कलात्मक प्रतिबिंब उमटलेले आहे. 'ओऽऽ', 'हिरवे गुलाब', 'बाबू दडके', 'उत्पात', 'म्हणे लढाई

संपली', 'जगाला कळले पाहिजे' आणि 'आडगावचे चौधरी' या सात कादंबऱ्या बी. रघुनाथांनी लिहिल्या. निजामकालीन स्वातंत्र्य चळवळ, संस्थानातील सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि राजकीय जीवन, सर्वसामान्य जनतेवर होणारे अत्याचार तसेच तत्कालीन सरंजामी जीवनाचे प्रभावी चित्रण त्यांच्या कादंबऱ्यातून येते.

बी. रघुनाथ यांची आडगावचे चौधरी ही सर्वात यशस्वी कादंबरी होय. चौधरी घराण्याच्या तीनशे वर्षांच्या सरंजामशाहीचा इतिहास त्यांनी या कादंबरीत रेखाटला आहे. चौधरी या सरंजामदार घराण्याच्या नऊ-दहा पिढ्यांनी सामान्य जनतेवर कसे अत्याचार केले आणि शेवटी चौधरी घराण्याची कशी वाताहत झाली याचे प्रत्ययकारी चित्रण बी. रघुनाथ यांनी प्रस्तुत कादंबरीत केले आहे. ओऽऽ या कादंबरीतून निजामकालीन राजकारण मांडले आहे. 'हिरवे गुलाब' आणि 'जगाला कळले पाहिजे' या कादंबऱ्यातून हिंदू-मुस्लिम जीवन संघर्षाचे चित्रण केले आहे.

निजामकालीन वातावरणाचे चित्रण करीत असतानाच बी. रघुनाथ यांची लेखनी महायुद्धामुळे उद्ध्वस्त झालेल्या जनजीवनाचेही प्रभावी चित्रण करते. म्हणे लढाई संपली या कादंबरीत महायुद्धामुळे ग्रामीण आणि शहरी भागात आलेली नीतिभ्रष्टता, यांत्रिकता यांचे चित्रण केले आहे. ही कादंबरी तीन भागात लिहिली असून या तिन्ही भागाचे नायक वेगवेगळे असल्यामुळे ही कादंबरी मराठी कादंबरीच्या इतिहासात वेगळी ठरते. एकूणच बी. रघुनाथ यांच्या कादंबऱ्यातून समकालीन जीवनाचे कलात्मक प्रतिबिंब उमटले आहे.

१.२.२.२ वि. शं. पारगावकर :

वि. शं. पारगावकर हे मराठवाड्यातील पहिल्या पिढीतील लेखक आहेत. कथालेखनाबरोबर सशक्त असे कादंबरी लेखनही त्यांनी केले आहे. ललाट, वैशाखातील वावटळ, कालचक्र, शेवगा वेडा झाला, पांढरी माती, गोंदण, निगुडा व अंतरिता या कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या आहेत. कौटुंबिक जीवनातील ताणतणाव, मानसाच्या वेगवेगळ्या वृत्ती-प्रवृत्ती, स्त्रियांची समाजात होणारी कुचंबणा त्यांनी आपल्या कादंबऱ्यातून समर्थपणे मांडली. अंतरिता ही त्यांची सर्वात उल्लेखनीय अशी कादंबरी आहे. "ग्रामीण भागातील अठरापगड जातीतील सांस्कृतिक-सामाजिक ताणतणाव... ग्रामजीवनातले दबलते संकेत काही प्रमाणात या कादंबरीतून आले आहेत."[२८] त्यासोबतच ब्राह्मण

समाजाचे ग्रामीण जीवनातील स्थान आणि कौटुंबिक जीवनातील चढउतारही ही कादंबरी आविष्कृत करते.

१.२.२.३ रा. रं. बोराडे :

रा. रं. बोराडे हे स्वातंत्र्योत्तर कालखंडातील महत्त्वाचे कांदबरीकार आहेत. १९६० नंतरच्या काळात खेड्यापाड्यात शिक्षणाचा प्रचार-प्रसार झाल्यानंतर जी पहिली पीढी प्रवाहामध्ये आली या पिढीतील बोराडे हे एक लेखक आहेत. आपण जे जीवन जगत आहोत-भोगत आहोत ते आपण वाचत असलेल्या साहित्यात कुठेही आढळत नाही असा प्रश्न या पिढीला पडला आणि त्यातूनच १९६० नंतर ग्रामीण साहित्याची चळवळ सुरू झाली. ग्रामीण साहित्य चळवळीतील एक लेखक म्हणून बोराडे यांनी अत्यंत सकस असे लेखन केले आहे. एकापेक्षा एक सकस अशा कादंबऱ्या त्यांनी मराठी वाङ्मयाला दिल्या आहेत. पाचोळा, सावट, आमदार सौभाग्यवती, चारापाणी, महानगाव, रहाटपाळणा, इथं होतं एक गाव, मरणदारी, नामदार श्रीमती, रिक्त-अतिरिक्त, राजसा इत्यादी कादंबऱ्या बोराडे यांनी लिहिल्या आहेत.

शेतकरी-शेतमजूरांचे प्रश्न, ग्रामीण जीवनातील राजकारण, राजकारणातील स्त्रियांचे दुय्यम स्थान, गुरा-ढोरांचे प्रश्न, उद्ध्वस्त होणारी बलुतेदारी व्यवस्था, यंत्रयुगाने मोडकळीस आलेला गावगाडा, भूकंपग्रस्तांचे प्रश्न, गावखेड्यातील झुंडशाही व एकूणच गावगाड्यातील नानाविध प्रश्नांची मांडणी मराठवाडी आणि विशेषतः लातूर पट्ट्यातील बोलीसह बोराडे यांनी कादंबरीतून केली आहे. "त्यांची नाळ ही ग्रामीण संवेदनेशी पक्की जुळलेली आहे. गतिमान निवेदन, बोलीचा यथायोग्य वापर, आकर्षक संवाद, कथावस्तूवरची घट्ट पकड ही बोराड्यांच्या लेखनाची काही खास वैशिष्ट्ये होत."[२९] पाचोळा ही त्यांची सर्वाधिक चर्चिली गेलेली कादंबरी आहे. गावखेड्यातील राजकारण, कौटुंबिक ताणतणाव, मोडकळीस आलेली बलुतेदारी व्यवस्था आणि अशा ऊसवलेपणातही खंबीरपणे उभी राहणारी कादंबरीची नायिका बोराडे यांनी प्रभावीपणे उभी केली आहे.

१.२.२.४ बाबू बिरादार :

बाबू बिरादार हे कादंबरी या वाङ्मय प्रकाराची सजग जाण असलेले मराठवाड्याच्या नांदेड जिल्ह्यातील महत्त्वाचे कथा-कादंबरीकार आहेत. मातीखालचे पाय, कावड, अग्निकाष्ठ,

अंतःपुरूष, संभूती व गोसावी या कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या आहेत. विषयांची विविधता हे त्यांच्या कादंबरी लेखनाचे महत्त्वाचे वैशिष्ट्ये आहे. ग्रामीण आणि शहरी अशा द्वंद्वात अडकलेली पात्रे त्यांच्या कादंबऱ्यात आढळतात. आपल्या अस्तित्वासाठी झगडणारा शेतकरी व स्त्री त्यांच्या कादंबऱ्यातून मोठ्या प्रमाणात चित्रित होते. विशेष म्हणजे आध्यात्मिक स्वरूपाचे पण गूढ वातावरण त्यांच्या कादंबऱ्यामध्ये प्रकर्षाणे जाणवते.

१.२.२.५ नागनाथ कोत्तापल्ले :

ग्रामीण साहित्य चळवळीतील अत्यंत महत्त्वाचे लेखक म्हणजे नागनाथ कोत्तापल्ले होय. कविता, कथा, ललित लेखनाबरोबर सकस असे कादंबरीलेखनही नागनाथ कोत्तापल्ले यांनी केले आहे. पराभव, मध्यरात्र व गांधारीचे डोळे या तीन कादंबऱ्या कोत्तापल्ले यांनी लिहिल्या आहेत. त्यांची मध्यरात्र ही कादंबरी उलट चालला प्रवाह या नावानेही प्रकाशित आहे. कथा-कवितेप्रमाणेच त्यांचे कांदबरीलेखनही गंभीर प्रवृत्तीचे व वाचकाला अंतर्मुख करणारे आहे. फुले-शाहू-आंबेडकरांच्या वैचारिक लेखनातून प्रेरणा घेऊन साहित्यलेखन केल्यामुळे कोत्तापल्ले यांच्या कादंबरीलेखनाला एक वैचारिक बैठक प्राप्त झाली आहे. नितीने कार्य करणाऱ्या माणसाचा होणारा पराभव, कर्त्या समाजसुधारकांचा धूर्त समाजात होणारा पराभव व एकूणच गांधारीसारखी समाजाची झालेली अवस्था ते आपल्या लेखनातून मांडतात. सामान्यावरील अन्याय-अत्याचार, भ्रष्ट व्यवस्था, षंढ झालेला समाज, बदलत जाणारा गावगाडा, गढूळलेले राजकारण, दुभंगलेले समाजकारण व एकूणच मानवी मूल्यांचा होणाऱ्या ऱ्हासाचे चित्रण कोत्तापल्ले यांच्या कादंबऱ्यात येते.

१.२.२.६ बाबा भांड :

व्यवसायाने प्रकाशक असलेले बाबा भांड हे एक बहुआयामी लेखक आहेत. कथा, कादंबरी, बालसाहित्य, चरित्रात्मक व ललित लेखक म्हणून त्यांचा नावलौकिक आहे. जरंगा, धर्मा, काजोळ, दशक्रिया, तंट्या, युगद्रष्टा महाराजा : सयाजीराव गायकवाड, आनंदवन, योगी अशा कादंबऱ्यांचे लेखन त्यांनी केले आहे. विषयाची विविधता, चरित्रप्रधानता, सजग सामाजिक भाण, गंभीर प्रवृत्ती ही त्यांच्या कादंबरी लेखनाची मूलभूत वैशिष्ट्ये आहेत.

दशक्रिया व तंट्या या त्यांच्या बहुचर्चित कादंबऱ्या आहेत. कोणत्याही व्यक्तीची किंवा गोष्टीची दूर्लक्षीत बाजू बाबा भांड आपल्या लेखनातून समोर आणतात. जगाच्या दृष्टीने लुटारू, दरोडेखोर असणारा तंट्या आदिवासी समाजाचा नायक कसा आहे, याचे चित्रण या कादंबरीत येते. तर पैठण येथे दशक्रियेच्या निमित्ताने चालणारे आर्थिक व्यवहार व त्यातून होणारी सामान्यांची पिळवणूक दशक्रिया या कादंबरीत त्यांनी मांडली आहे. त्यांच्याच दशक्रिया या कादंबरीवर आधारित दशक्रिया या चित्रपटाचा राष्ट्रीय पातळीवर गौरव झाला आहे. युगद्रष्टा महाराजा सयाजीराव गायकवाड ही त्यांची चरित्रात्मक कादंबरी असून बडोदा संस्थानाचे सर्वेसर्वा सयाजीराव गायकवाड यांचे चरित्रकथन या कादंबरीत बाबा भांड यांनी केले आहे. सयाजीराव गायकवाड यांच्या व्यक्तिमत्वाचे विविध पैलू या कादंबरीमुळे समोर आले आहेत.

काव्य लेखनासाठी प्रसिद्ध असलेले ना. धों. महानोर यांची गांधारी ही एक महत्त्वपूर्ण कादंबरी आहे. जुलमी निजामी राजवटीत मराठवाड्यातील जनतेची झालेली आर्थिक, धार्मिक, शैक्षणिक, भाषिक, सांस्कृतिक, राजकीय कुचंबणा महानोर यांनी गांधारी या कादंबरीद्वारे मांडली आहे. निजामी राजवटीतील मराठवाड्याचा एक ऐतिहासिक दस्तऐवज म्हणजे गांधारी ही कादंबरी होय. ग्रामीण साहित्य चळवळीमध्ये सक्रिय असणारे आणि मुख्यतः कथालेखन व समीक्षा लेखनासाठी प्रसिद्ध असणारे वासुदेव मुलाटे यांची विषवृक्षाच्या मुळ्या ही एक प्रयोगशील कादंबरी आहे. सहकार क्षेत्रातील मूल्यऱ्हासाचे चित्रण विषवृक्षाच्या मुळ्या या कादंबरीमध्ये मुलाटे यांनी ताकदिनिशी केले आहे. "खरे तर सहकार क्षेत्र आले ते मुळात गरजवंताच्या अवघडलेल्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी.... पण वास्तवात घडले मात्र नेमके उलट. बघता बघता शेत खावे तसे मुळासकट खाणे सुरू झाले. सहकार क्षेत्राचे सुक्ष्म अंतरंग आजपावेतो कुठल्याही ललित साहित्यकृतीने टिपले नाहीत. हा मान विषवृक्षाच्या मुळ्या या कादंबरीला अपोआपच जातो."[३०] सहकार क्षेत्रातील लूट, तेथील सरंजामशाही व गुंडगिरी बेरकी स्वभावाच्या व्यक्तिरेखा, सर्वसामान्याची होणारी पिळवणूक भाषिक वैशिष्ट्यांसह मुलाटे मांडतात.

गणेश आवटे हे ग्रामीण कथा-कादंबरीलेखनातील एक महत्त्वाचे नाव आहे. चुकार, गणगोत, पाणसळ, भिरुड या चार कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या आहेत. ग्रामजीवनातील शेतकऱ्यांचे प्रश्न, स्त्रियांची होणारी अवहेलना, स्त्रियांवरील लैंगिक अत्याचार व एकूणच गावगाड्याचे चित्रण

त्यांच्या कादंबऱ्यातून येते. भिरुड या अत्यंत महत्त्वाच्या कादंबरीतून आवटे यांनी गावपातळीवरील बदलते राजकारण व समाजकारण, जातियता व अस्पृश्यता माणसांच्या बेरकी स्वभावासह चित्रित केले आहे. परभणी जिल्ह्यातील बोलीभाषेचा प्रभाव त्यांच्या कादंबरी लेखनावर जाणवतो.

शेषराव मोहिते हे ग्रामीण साहित्य चळवळीशी निगडित आणखी एक महत्त्वाचे लेखक आहेत. असं जगणं तोलाचं, धुळपेरणी या दोन कादंबऱ्यातून त्यांनी ग्रामजीवनातील वास्तवता व शेतकऱ्यांच्या अवनतीचा विचार मांडला आहे. धूळपेरणी ही त्यांची विशेष गाजलेली कादंबरी आहे. या "कादंबरीत १९७० ते १९८० च्या दशकातील शेतकऱ्याच्या शिकणाऱ्या मुलाचे जीवन आणि विचार भावना प्रकट झाल्या आहेत.... शेतकऱ्याच्या स्थितीत काही बदल घडवून आणण्याची क्षमता आपण घेतलेल्या शिक्षणात नाही हे त्याला प्रत्ययाला आल्याने तो वैफल्यग्रस्त होतो. सामाजिक न्याय, अन्याय इ. गोष्टी त्याला महत्त्वाच्या वाटत नाहीत. महत्त्वाचे वाटते ते शेतीला आणि शेतकऱ्याला न्याय मिळणे. शिक्षित ग्रामीण तरूणाला आत्मभान येत असल्याची जाणीव देणारी ही कादंबरी आहे."[३१] सर्व प्रकारची मेहनत घेऊनही शेवटी हाती काहीच लागत नाही हे सूचीत करणारे धूळपेरणी या कादंबरीचे शीर्षकही सूचक व समर्पक आहे.

भीमराव वाघचौरे हे ग्रामीण जीवनाचे वास्तववादी चित्रण करणारे कादंबरीकार आहेत. रानखळगी, गराडा, पानगळी, अंधारकूस या चारही कादंबऱ्यातून त्यांनी ग्रामजीवनाचा वेध घेतला आहे. खेड्यातील फाटका पण स्वाभिमानी शेतकरी, त्याचे प्रामाणिक कष्ट, कष्ट करत असताना त्याला सतावणारे आस्मानी-सुलतानी संकटं, आणि या संकटांच्या गराड्याविरूद्ध शेतकऱ्याने केलेला विद्रोह त्यांच्या कादंबऱ्यातून येतो. रा. रं. बोराडे यांच्या प्रभावात वाढले असले तरी भास्कर चंदनशिव यांच्या कथेप्रमाणेच भीमराव वाघचौरे यांच्या कादंबऱ्यांतून विद्रोहाचे चित्रण येते.

काळी आई, हऱ्या नाऱ्या व लिडर या तीन कादंबऱ्यांतून त्र्यंबक असरडोहकर यांनी ग्रामजीवनाचा वेध घेतला आहे. काळी आई ही धरणग्रस्तांच्या प्रश्नांना वाचा फोडणारी कादंबरी होय. शासनाने धरण बांधण्यासाठी शेतकऱ्यांच्या जमिनी बळजबरीने हडप केल्या व त्यानंतर आलेल्या पैशांचा कसा वाममार्गाने चुराडा झाल्या याचे उपहासात्मक चित्रण असरडोहकर यांनी केले आहे. अचानाक हातात पैसा आल्यामुळे भारावून जाणारा शेतकरी प्रसंगी व्यसनाधीन होतो आणि पैसा संपल्यावर कसा रत्यावर येतो याचे मार्मिक चित्रण काळी आई या कादंबरीत येते.

बालसाहित्यिक म्हणून प्रसिद्ध असणाऱ्या महावीर जोंधळे यांच्या शिवाची वाडी व बिगूल या दोन कादंबऱ्या प्रकाशित आहेत. उदात्त विचारांचा शिवा सैन्यात भरती होऊन देशसेवेसाठी स्वतःला कसे समर्पित करतो याचे चित्रण जोंधळे यांनी शिवाची वाडी या कादंबरीत केले आहे. अंधेर नगरी व इन्कलाब जिंदाबाद या लक्ष्मीकांत देशमुख यांच्या कादंबऱ्या आहेत. मूल्यहीन राजकारणाचे चित्रण करणारी अंधेरनगरी ही त्यांची विशेष गाजलेली कादंबरी आहे. "राजकारण आणि तत्पर प्रशासन समाजाच्या इच्छित परिवर्तनाचे प्रभावी तंत्र असते. परंतु राजकारणाचे रूपांतर नीतीभ्रष्ट सत्ताकारणात झाले की, समाजपुरूषात विच्छिन्न करणाऱ्या प्रवृत्ती बेबंद होतात याचे प्रत्ययकारी चित्र या कादंबरीत रेखाटले आहे. जाती, धर्म, पंथ, स्वार्थ, पैसा, भ्रष्टाचार आणि नैतिक मूल्यांचा अभाव यामुळे समाज ऱ्हासशील होतो. या प्रवृत्तीचे अनेक नमुने लेखकाने या कादंबरीत सजीव केले आहेत."[३२] मूल्यऱ्हासाचे प्रत्येयकारी चित्रण या कादंबरीत आले आहे.

प्रकाश देशपांडे-केजकर यांच्या एकाची गोष्ट, ढाळज व बादराना या तीन महत्त्वपूर्ण कादंबऱ्या आहेत. ढाळज या कादंबरीत निजामी राजवटीत होरपळलेल्या मराठवाड्याची कहाणी देशपांडे यांनी मांडली आहे. तर बारदाना या कादंबरीत बदलत जाणारे ग्रामीण वास्तव व त्यात पिचला जाणारा सामान्य माणूस यावर भाष्य केले आहे. विपूल प्रमाणात कथालेखन करणाऱ्या भालचंद्र देशपांडे यांच्या उर्वरित नंतर, आणि धरणी कंप होत राहिल्या व अंधार इथला संपत नाही या तीन कादंबऱ्या प्रकाशित आहेत. उर्वरित नंतर या कादंबरीत पत्रकारिता विश्वाचे तर आणि धरणीकंप होत राहिला या कादंबरीत किल्लारी येथील भूकंपाचे चित्रण देशपांडे यांनी केले आहे. कॉलेज व गढी या गोविंद देशपांडे यांच्या दोन कादंबऱ्या प्रकाशित आहेत. कॉलेज या कादंबरीमध्ये महाविद्यालयीन राजकारणाचे चित्रण देशपांडे यांनी केले आहे. तर गढी या कादंबरीत मराठवाडा-विदर्भातील वतनदारांची अगतिकता देशपांडे यांनी मांडली आहे.

भारत काळे हे कादंबरीलेखनातून ग्रामीण भाग जीवंत करणारे महत्त्वाचे लेखक आहेत. ऐसे कुणबी भुपाळ ही त्यांची बहुचर्चित कादंबरी आहे. गावपातळीवरील राजकरण, शेतकऱ्यांचे दुःख-दैन्य-दारिद्र्य, स्त्रियांची समाजात होणारी कुचंबना व एकूणच गावशिवारातील समाजजीवनाचे चित्रण या कादंबरीत येते. माणसांचा बेरकी स्वभाव आणि त्याचा दलबदलूपणा ग्रामीण बोलीसह ऐसे कुणबी भूपाळमध्ये येतो. कोयता आणि दात या सरदार जाधव यांच्या महत्त्वपूर्ण कादंबऱ्या

आहेत. ऊसतोड कामगारांच्या जीवनातील दारूण दु:खाचे चित्रण कोयता या कादंबरीत लेखकाने समर्थपणे केले आहे. महेश मोरे यांच्या गावपांढरी या कादंबरीत गावशिवाराचे यथार्थ चित्रण आले आहे. गावातील शेतकरी-शेतमजूरांच्या जगण्यातील विविध पदर या कादंबरीत लेखकाने उलगडले आहेत.

मराठवाड्यामधील लेखकांनी मोठ्या प्रमाणात ऐतिहासिक कादंबरीलेखन केले नसले तरी रंगनाथ तिवारी, प्रदीप म्हैसेकर व बाबा भांड यांचे या क्षेत्रातील योगदान उल्लेखनीय आहे. रंगनाथ तिवारी यांनी देवगिरी बिलावल व बेगम समरू या दोन ऐतिहासिक कादंबऱ्या लिहिल्या आहेत. देवगिरी बिलावलमध्ये यादवांच्या पतनाचे तर बेगम समरू या कादंबरीत मोगल सत्तेच्या ऱ्हासाचे चित्रण तिवारी यांनी केले आहे. प्रदीप म्हैसेकर यांनी ऐतिहासिक दस्तावेजाचा शोध घेत निर्भिडपणे ऐतिहासिक कादंबरी लेखन केले आहे. धम्म सांगती बाबा, तथागत, अशोक, शहाजीराजे, जीजाऊ, ॲझुर्स्पर्मिया, अखेरचा सम्राट, चंदनपेटी, यज्ञकन्या इत्यादी चरित्रात्मक व ऐतिहासिक कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या आहेत. "इतिहास पुरूषांच्या कतृत्वाबद्दल रूढ ज्ञानावर अवलंबून ललित लेखन करण्यापेक्षा त्यांचा परिपूर्ण ससंदर्भ अभ्यास करणे महत्त्वाचे असते... हे भान कादंबरीकार म्हैसेकर यांना आहे. त्यामुळे त्यांनी कादंबरीलेखन करताना त्या त्या विषयाचा पूर्ण अभ्यास केला... तत्कालीन समाज, लोकाचार, लोकरिती, लोकश्रद्धा, भाषा या साऱ्यांसह त्यांनी आपले कादंबरीलेखन केले आहे."[३३] बाबा भांड यांच्या तंट्या व युगद्रष्टा महाराजा सयाजीराव या दोन ऐतिहासिक कादंबऱ्या प्रकाशित आहेत. तंट्या या कादंबरीत आदिवासी समाजातील तंट्याचे चित्रण भांड यांनी केले आहे. तर युगद्रष्टा महाराजा सयाजीराव या कादंबरीतून बडोदा संस्थानातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक परिस्थितीबरोबरच सयाजीराव गायकवाड यांच्या कार्याला उजाळा देण्याचे काम बाबा भांड यांनी केले आहे.

बी. रघुनाथ यांच्यापासून १९९० पर्यंतचा मराठवाड्यातील कादंबरी लेखनाचा आलेख उंचावत जाणारा आहे. बी. रघुनाथ, रा. रं. बोराडे, वि. शं. पारगावकर, बाबू बिरादार, नागनाथ कोत्तापल्ले, बाबा भांड इत्यादी कादंबरीकारांनी कादंबरीलेखनात जसे भरीव योगदान दिले आहे तसे संख्या कमी असूनही महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या अनेक कादंबऱ्या मराठवाड्यातील लेखकांनी लिहिलेल्या आहेत. दत्तो आप्पाजी तूळजापूरकर (माझे रामायण), दिवाकर कृष्ण (किशोरीचे हृदय, विद्या आणि

वारूणी), वा. दा. गाडगीळ (विचित्र संसार), चारूलता जतकर (निराधार लता), बंकट पाटील (मंधान), जनार्दन वाघमारे (बखर एका खेड्याची), लक्ष्मीकांत तांबोळी (दूर गेलेले घर, कृष्ण कमळ), गजमल माळी (कामायनी), शरद देऊळगावकर (मैत्रिण), प्रकाश कामतीकर (महदंबेची दिवाळी), प्रकाश मेदककर (नोरिया), विजय पाथरीकर (थोरले साहेब), वसंत कुंभोजकर (वाताहत, डोळे उघडले), भगवान कोठेकर (वंचना, अभिषिक्त), अमृत देशमुख (माहेरी नांदते सासू), नारायण मुंढे (मागे फिरा पतंगांनो), भगवान काळे (कर्मरेखा), राजीव उन्हाळे (काचकांगऱ्या), देविदास फुलारी (पाच आऱ्याचे चाक), मदन काळे (डायलिसिस), बा. ह. कल्याणकर (कंदील, अराजक, पूर्वसंध्या), बा. भो. शास्त्री (झांजर), दिगंबर कुलकर्णी (एक होता डॉक्टर, प्रकाशमेघ, विदुषक), टी. एस. पाटील (तेजश्विनी, मैली गंगा), सुधाकर डोईफोडे (परवड), नागनाथ पाटील (लम्बाडी, कोंडगातलं जिणं), भास्कर बडे (पाणकणसे), फ. म. शहाजिंदे (मी तू), ए. वि. जोशी (रानभूल), भारत सासणे (राहीच्या स्वप्नाचा उलगडा), इंद्रजित भालेराव (भिंगुळवाणा, आबा), खु. शा. घोरपडे (संघटना), श्री. रं. देशपांडे (नवरात्र संपले), गणेश घांडगे (सुली), दि. गो. मुंढे (केवड्याचे कणिस, रसिका), गो. गो. कुलकर्णी (काहूर), राजेंद्र मलोसे (स्वप्नपंख), विठ्ठल जाधव (पांढरा कावळा), रब्बानी शेख (खांदेमळणी), शैलेंद्र टिकारिया (चकवा) इत्यादी कादंबरीकारांनी मराठवाड्यातील कादंबरी लेखन समृद्ध केले आहे.

साठोत्तरी कालखंडात उदयास आलेला दलित साहित्याचा प्रवाह ही मराठी साहित्यातील एक क्रांतीकारी घटना आहे. महात्मा जोतिबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या समताधिष्टित विचारांना प्रमाण मानून, त्यांच्या विचारांनी प्रेरित होऊन १९६० नंतर दलित साहित्याचा सशक्त प्रवाह निर्माण झाला आहे. कविता, आत्मकथने, नाटक, कथा, कादंबरी अशा सर्वच वाङ्मय प्रकारांत सकस लेखन दलित साहित्यिकांनी केले आहे. यापैकी कविता व आत्मकथने हा साहित्यप्रकार मराठवाड्यातील लेखकांनी अधिक समृद्ध केला असला तरी काही प्रमाणात कादंबरी लेखनही झाले आहे. मराठवाड्यातील कादंबरी वाङ्मयाच्या इतिहासाच्या दृष्टीने ते महत्त्वपूर्ण आहे.

शरणकुमार लिंबाळे हे मराठवाड्यातील एक महत्त्वाचे दलित कादंबरीकार आहेत. दंगल, उपल्या, हिंदू, बहुजन, झूंड इत्यादी कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या आहेत. "त्यांच्या कादंबरीमध्ये दलितांच्या वास्तव जीवनाचे चित्रण येते. दलितांच्या राजकारणाचे उपहासगर्भ उपरोधपूर्ण चित्रणही

ते करतात. झोपड्यातील जीवन, वेश्यांच्या जगण्यातील परवड, प्रस्थापितांकडून होणारे शोषण, गावगुंडांकडून होणारा अन्याय-अत्याचार, नव्या लोकशाही व्यवस्थेतही माणसाचे होणारे अवमूल्यन अशा विविध विषयाचे वास्तव चित्र त्यांच्या कादंबरीत आहे."[३४] एकूणच दलित समाजाचे होणारे शोषण व या शोषणाला जबाबदार असणारी प्रस्थापित व्यवस्था यांच्याविषयीचे विचार शरणकुमार लिंबाळे यांनी आपल्या कादंबऱ्यातून मांडले आहेत.

सुखराम हिवराळे (अभाळ, जागरण), योगीराज वाघमारे (सभापती, शिक्षणनामा, धुराळा), बाबुराव गायकवाड (आग, झळ), विजय सिरसाट (कुस्ती, काळगर्भ), राजेश कांबळे (गायरान), एकनाथ सोनवणे (दृष्टचक्र), जयराम काळे (वाहेगावचा गुणा कोतवाल), बा. बा. कोटंबेर (तिटा, कदाचित, अंधार, काळरात्र, झावळ, मुसाफीर, पैंजण), बापू घोक्षे (प्रलय), दि. रा. वाघमारे (कल्लोळ), अनंत राऊत (काहिली), प्रकाश त्रिभूवन (कुळंबीण) इत्यादी कादंबरीकारांनी मराठवाड्यातील एकूण कादंबरीलेखनाचे दालन समृद्ध केले आहे. पिढ्यान्‌पिढ्या दलितांवर होणारे अन्याय-अत्याचार, दलितांना मिळणारी अमानुष वागणूक, दलित स्त्रियांचा होणारा छळ, अस्पृश्यता जातियतेचे चटके व व्यथा या कादंबरीकारांनी आपल्या लेखणात मांडल्या आहेत.

मराठवाड्यातील लेखिकांनीही कादंबरी लेखनात मौलिक भर घातलेली आहे. रेखा बैजल, अनुराधा वैद्य, छाया महाजन, मथू सावंत, कविता महाजन, शांता जोशी इत्यादी स्त्री कादंबरीकारांनी महत्त्वपूर्ण लेखन केले आहे. देवव्रत, अग्निपुष्प, युगवार्ता आणि तृप्ता या चार कादंबऱ्यांच्या माध्यमातून रेखा बैजल यांनी समाजामध्ये विज्ञानवादी दृष्टिकोन रूजवण्याचा प्रयत्न केला आहे. रेखा बैजल यांच्या कादंबऱ्यात पौराणिकता, रंजकता, नाट्यात्मकता, काव्यात्मकता अढळत असली तरी विज्ञानवाद हा त्यांच्या कादंबरीलेखनाचा स्थायिभाव आहे.

माझी चिंध्याची बाहुली, राणीवसा, आजन्म, चौफुला, उजेडाचं दार, विसर्जन, श्वानप्रस्थ आणि माध्यम इत्यादी कादंबऱ्यांच्या माध्यमातून अनुराधा वैद्य यांनी समाजाचा स्त्रीविषयक दृष्टिकोन आविष्कृत केला आहे. समाजात स्त्रियांना मिळणारी दुय्यम वागणूक तिचे होणारे शोषण, स्त्रिचे वात्सल्य, तिचा संसारासाठी चालेलेला आटापिटा आणि एकूणच समाजात स्त्रियांची होणारी कुचेष्टा मनोविश्लेषनाच्या पातळीवर जाऊन लेखिका मांडते. स्त्रिप्रधानता हे अनुराधा वैद्य यांच्या एकूण लेखनाचे महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य आहे.

छाया महाजन यांनी कॉलेज, मानसी व तन अंधारे या तीन कादंबऱ्या लिहिल्या आहेत. कॉलेज या बहुचर्चित कादंबरीत त्यांनी महाविद्यालयीन क्षेत्रात चालणाऱ्या राजकारणाचा वेध घेतला आहे. ब्र आणि भिन्न या कविता महाजन यांच्या दोन सशक्त कादंबऱ्या आहेत. स्त्रिवादी दृष्टिकोनातून पुरूषी व्यवस्थेची चिकित्साच आपल्या कादंबऱ्यामधून कविता महाजन करतात. स्त्री स्वातंत्र्याचा उद्‌घोष हे त्यांच्या लेखनाचे महत्त्वपूर्ण विशीष्ट्य आहे. मथू सावंत या ग्रामीण जीवनाच्या भाष्यकार आहेत. आपल्या लेखनातून शेतकरी, शेतमजूर, ग्रामीण स्त्रियांचे दुःख व एकूणच गावगाड्याविषयीचे चित्रण त्या करतात. विधवा, परित्यक्ता स्त्रियांबरोबर कतृत्ववान स्त्रियांनादेखील पुरूषी व्यवस्था कसे दुय्यम स्थान देते याचे चित्रण त्या प्रकर्षाने करतात. राहू केतू आणि जिनगानी या दोन कादंबऱ्या मथू सावंत यांनी लिहिल्या आहेत.

शांता जोशी यांच्या भावलीचा गाव व गव्हानी या दोन कादंबऱ्या प्रकाशित आहेत. स्त्रियांचे दुय्यमत्व, उसतोड कामगारांच्या जगण्याची परवड, गावखेड्यातील श्रद्धा-अंधश्रद्धा व एकूणच बदलत्या ग्रामवास्तवाचे चित्रण शांता जोशी यांनी आपल्या कादंबऱ्यात केले आहे. याशिवाय सौ. मिनल (अभिलाषा), कल्याणी वाघ इत्यादी कादंबरीकार स्त्रियांनी मराठवाड्यातील स्त्री कादंबरीलेखनाचे दालन समृद्ध केली आहे.

बालसाहित्य हे मराठी साहित्याचे एक अविभाज्य अंग आहे. मराठवाड्यातील लेखकांनिही बालकादंबरी हा वाङ्मय प्रकार हाताळलेला आहे. आकाराने थोड्या लहान म्हणजेच दीर्घकथा ठराव्यात अशा बहुसंख्य बालकादंबऱ्या मराठवाड्यामध्ये लिहिल्या गेल्या आहेत. मनोरंजन करणे, विज्ञानवादी दृष्टिकोन रूजवण्याचे काम या बालकादंबऱ्यांनी केले आहे. ग्रामीण आणि नागर अशा दोन्ही स्तरावरील जीवनाचे चित्रण साध्या, सोप्या, बालसुलभ भाषेसह या कादंबऱ्यातून येते. बाबा भांड (धर्मा, एकघर एक ओटा, आनंदमेळा, खरी कमाई, गोष्ट एका गावाची, दशक्रिया घाटावरील मुलं), महावीर जोंधळे (शिवाची वाडी), दत्ता डांगे (शिकला गजा झाला राजा), अनुराधा वैद्य (सुमी आणि सोम्या), रेखा बैजल (प्रकाशाची फुले), आशा भांड (माणूस बोलू लागला), धर्मराज महालकर (भिलाटीतला नाग्या), अरूण वि. देशपांडे (फुलपाखरं, चंदर), देविदास फुलारी (देश जोडण्याचा खेळ), धारा भांड (टिटूडू), वृन्दा दिवाण (पंपूशेठ), शिवाजी मरगीळ (आगाव पांड्या), भगवान अंजनीकर (विसराळू राजा), रमेश चिल्ले (मन वढाय वढाय), सरिता वैद्य (अफलातून

बंड्या प्रधान), रेणू पाचपोर (एक हिरवंगार वर्ष), सूर्यकांत सराफ (न्यूटन विरूद्ध विश्वामित्र) इत्यादी बालकादंबरीकारांनी मराठवाड्यातील कादंबरीलेखन समृद्ध केले आहे.

एकूणच मराठवाड्यातील मराठी कादंबरीकारांनी एकूण मराठी कादंबरी वाङ्मयाची परंपरा समृद्ध केली आहे. बदलत्या राजकीय, सामाजिक, धार्मिक परिस्थितीनूसार कादंबरीतील चित्रणही बदललेले दिसते. जागतिकीकरणाचे फायदे-तोटे आणि त्यामुळे बदललेले गाव आणि शहर आजचे कादंबरीकारही तेवढ्याच ताकदीने आपल्या लेखनातून मांडत आहेत. श्रीकांत देशमुख (पिढीजात, कोवळे वर्तमान), बालाजी मदन इंगळे (झिम पोरी झिम), आसाराम लोमटे (तसनस), उमेश मोहिते (वळण, बांधणूक), विजय जावळे (चारखणी, दमकोंडी, कोयतं, कोरा सातबारा), सुरेंद्र पाटील (चिखलवाटा), सुशील धसकटे (जोहार), रमेश रावळकर (टिश्यू पेपर) इत्यादी कादंबरीकारांनी नव्वदोत्तर कालखंडातील बदलते जीवन, शेतकऱ्यांचे होणारे शोषण, निबर झालेली राजकीय व प्रशासकीय व्यवस्था, गढुळलेले राजकारण, मूल्यहीन समाजकारण व एकूणच वर्तमान ग्रामीण-नागर जीवनाचे चित्रण आपल्या कादंबऱ्यांतून केले आहे.

साहित्य हा समाजाचा आरसा आहे असे म्हटले जाते. त्याप्रमाणे समाजातील बदल मराठवाड्यातील कादंबरीमध्ये ठळकपणे आले आहेत. "या सर्व कादंबरीलेखनाचा विचार केला तर मराठवाड्यातील बहुसंख्य कादंबऱ्यांनी बदलत्या वास्तवाचा वेध घेण्याचा प्रयत्न केला आहे. हैद्राबाद मुक्तिसंग्राम आणि ग्रामीण जीवन हे त्यांच्या आत्मियतेचे विषय आहेत. ग्रामीण दलितांच्या प्रश्नाबरोबरच काळाच्या ओघात जीवनाच्या विविधांगात होणारे बदल त्यांनी टिपण्याचा प्रयत्न केल्या आहे. राजकारण, समाजकारण, अर्थकारण, वैद्यकीय क्षेत्र, शिक्षण क्षेत्र अशा विविध जीवनक्षेत्रावर या कादंबऱ्या लिहिल्या गेल्या आहेत."[३५] मराठवाड्यातील बदलत्या जीवनाबरोबर मराठवाडी बोलीचा देखिल प्रत्यय या कादंबऱ्यांतून येतो.

१.२.३ मराठवाड्यातील कविता :

मध्ययुगीन कालखंडामध्ये मराठवाड्यात संख्यात्मक व गुणात्मकदृष्ट्या विपूल प्रमाणात काव्यलेखन झाले. किंबहुना मराठवाड्यामध्येच मराठी कवितेचा उगम झाला आणि सोळाव्या शतकापर्यंत मराठवाडा हेच काव्यलेखनाचे केंद्र होते. गीतेवरील भाष्य, रामायण-महाभारतातील विविध विभागावर आधारीत काव्य, आख्याने, अभंग, विरहिणी, ओव्या, भारूड, आरत्या अशा

विविध प्रकारात मध्ययुगीन कालखंडात काव्यलेखन झाले. परकीय आक्रमणे, राजकीय-सांस्कृतिक अस्थिरतेमुळे संत एकनाथ महाराजानंतर मराठवाड्यातील साहित्यलेखनाची परंपरा क्षीण झाली. साहित्यिक-सांस्कृतिक केंद्रदेखील पुण्याकडे गेले. सतराव्या, आठराव्या आणि एकोणिसाव्या शतकात मराठवाड्यामध्ये अपवादात्मक परिस्थितीमध्येच लेखन झाले. विसाव्या शतकामध्ये निजामी राजवटीत असलेल्या मराठवाड्यातील जनतेचा पुण्याकडील ब्रिटिश सत्तेशी संपर्क सुरू झाला. आणि त्या निमित्ताने मराठवाड्याबाहेरील आधुनिक साहित्याशीही संपर्क आला. इंग्रजी राजवटीच्या संपर्कामुळे विसाव्या शतकापासून म्हणजे तब्बल तीनशे वर्षानंतर मराठवाड्यामध्ये पुन्हा एकदा काव्यलेखनाला नव्याने सुरूवात झाली.

मराठवाड्यातील आधुनिक काव्यलेखनाला विसाव्या शतकात सुरूवात झाली असली तरी मागील शंभर-सव्वाशे वर्षात मराठवाड्यामध्ये विपूल प्रमाणात काव्यलेखन झाले आहे. १९६० पूर्वकालीन मराठवाड्यातील कविता, मराठवाड्यातील साठोत्तरी कविता, मराठवाड्यातील नव्वदोत्तर कविता अशात विविध कालखंडात मराठवाड्यातील आधुनिक कवितेचे विभाजन केले जाते. मराठवाड्यातील दलित कविता, मराठवाड्यातील ग्रामीण कविता, मराठवाड्यातील स्त्रियांची कविता, मराठवाड्यातील भटक्या-विमुक्तांची कविता, जागतिकीकरण आणि मराठवाड्यातील कविता या प्रकारची विभागणीही अनेक अभ्यासकांनी केली आहे. अशा विविध विभागातील मराठी कवितेचे स्वरूपही वेगळे आहे. तिचे आशय-विषय अभिव्यक्ती पद्धती, जीवन चित्रणही वेगवेगळे आहे. अध्यात्मिक जाणीव, निजामी राजवटीचे प्रतिकार करणारी कवितेतून प्रकर्षाने व्यक्त होतात. त्याचबरोबर जागतिकीकरणाची देण असणारी स्वकेंद्री जाणिवही मराठवाड्यातील कवितेतून प्रकर्षाणे अभिव्यक्त होते.

१.२.३.१ मराठवाड्यातील १९६० पर्यंतची कविता :

१९०० ते १९६० हा मराठवाड्यातील आधुनिक कवितेचा पहिला टप्पा होय. १९६० पर्यंतची मराठवाड्यातील कविता ही त्रिस्तरीय स्वरूपाची आहे. जुन्या वळणाची कविता, जुन्या नव्याच्या संगमाची कविता आणि आधुनिक जाणिवेची कविता असे तीन स्तर १९६० पर्यंतच्या मराठवाड्यातील कवितेत आढळतात. धर्मप्रधानता व व्यक्तिमहिमा हे जुन्या वळणाच्या कवितेचे महत्त्वाचे विशेष आहेत. जुन्या नव्या वळणाची कविता ही परंपरा व नवता यांची सांधेजोड करणारी

आहे. आपल्या कवितेतून पूर्णतः आधुनिकतेचा आविष्कार करणारी कविता ही आधुनिक वळणाची कविता होय.

जुन्या वळणाच्या काव्य परंपरेमध्ये बाबा महाजन उमरीकर (सुंदर विलासदीपिका देशिक लीलामृत), सदाशिव जयराम वैद्य (सहजामृत, ईशोपनिषद टीका, गीता टीका), नागोराव साठे (ज्ञानचक्षू, देहवर्ण प्रकाश, लघू भक्तविजय), विष्णुदास माहुरकर (विष्णुदासांची कविता), माधव दातार (विष्णुसहस्त्रनाम टीका), व्यंकटेश दातार (श्रीगुरू करूणामृत, सत्संग सरिता), दासगणू (भक्तलीलामृत, संतकथामृत, भक्तिसारामृत, अमृतानुभव), भगवंत तोडेवाले (अज्ञान कंसवध, रावण-मंदोदरी संवाद), वासुदेव धोत्रिकर (वासुदेवानंद स्तवनमाला, गोदामाहात्म्य, दत्त स्तोत्र), विष्णू जोशी (सत्यनारायण कथामृत, गुलाबकुसुमा), वि. बा. जोशी (हंस-सत्कार), गोविंद जोशी (नामदेवाची दिवाळी), माणिकप्रभु महाराज, विनायकानंद इत्यादी कवींचे लेखन हे जुन्या कळणाचे आहे.

जुन्या नव्याच्या संगमावरील काव्यलेखनही मराठवाड्यातील काव्येतिहासाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. जुन्या वळणाशी नाते सांगत नव्या वृत्ती-प्रवृत्तीचा स्वीकार करणारी ही कविता आहे. दे. ल. महाजन (महाजनांची कविता, मानस विहार, केकावली, मोत्याची मागणी), यशवंत कोरेकल (काव्यकुसुमकलिका), दत्तात्रय पद्माकर (प्रफुल्ल पद्माकर), दत्तकिंकर (दत्तकिंकरांची कविता), श्रीकृष्ण गाडगीळ (माझी फुले) इत्यादी कवींनी या प्रवाहामध्ये महत्त्वपूर्ण काव्यलेखन केले आहे. भक्तिमाहात्म्याबरोबर केशवसुतांच्या कवितेशी या प्रवाहातील कवी जोडले गेली आहेत.

आधुनिक वळणाच्या कवितेमध्ये ना. गो. नांदापुरकर सी. ग. मनाठकर, मुकुंद, न.शे. पोहनेरकर, वा.रा. कांत, बी. रघुनाथ, पार्थिव,, कृष्णकुमार, पुरुषोत्तम जवळगेकर यांचे महत्त्वाचे योगदान आहे. यापैकी ना.गो. नांदापूरकर मराठवाड्यामध्ये केशवसुतांच्या वळणाची कविता पहिल्यांदा लिहिली. या संदर्भात श्रीनिवास पांडे म्हणतात, "खऱ्या अर्थाने आधुनिक वळणाचे पहिले कवी म्हणून नांदापूरकरांचा गौरवाने उल्लेख करावा लागेल. महाराष्ट्रात केशवसुतांच्या क्रांतीनंतर ज्या नव्या जाणिवेने कविता लिहिली जाऊ लागली. तिचा उद्‌भव, नांदापूरकरांच्या कवितेत प्रथम ठळकपणे आपल्याला जाणवतो."[३६] केशवसुत, गोविंदाग्रज, बालकवींच्या कवितेचा प्रभाव

नांदापूरकरांच्या लेखनावर आहे. वाग्विलास व माझी मराठी हे महत्त्वाचे काव्यसंग्रह नांदापूरकरांनी लिहिले. नांदापूरकरांशिवाय सी. ग. मनाठकर (जानकी, शरयू, शूर्पणखा) मुकुंद (प्रेमांजली), पुरूषोत्तम जवळगेकर, न. शे. पोहनेरकर (बागशाही), विठ्ठल कोटकर (बालकाव्यलहरी), पार्थिव-कृष्णकुमार-वा. रा. कांत (पहाटतारा, फटत्कार), र. लु. जोशी (रावसाहेबांची कविता), हरिहर सोनुले इत्यादी कवींनी आधुनिक वळणाची कविता लिहिली आहे.

बी. रघुनाथ आणि वा. रा. कांत ही आधुनिक वळणाच्या काव्येतिहासातील महत्वाची नावे आहेत. 'आलाप आणि विलाप' आणि 'पुन्हा नभाच्या लाल कडा' हे दोन कवितासंग्रह बी. रघुनाथांनी लिहिले. सुरूवातीच्या काळात त्यांच्या कवितेवर बा.भ. बोरकर, ना.घ. देशपांडे आणि रविकिरण मंडळातील कवींचा प्रभाव जाणवतो. नंतर मात्र ते स्वतंत्रपणे काव्यलेखन करू लागले. वैविध्यपूर्ण आशय-विषय, उपहास आणि उपरोध, तरल संवेदनशीलता, ग्रामीण शब्दकळा, उत्कटता आणि समाजसन्मुखता ही त्यांच्या काव्यलेखनाची ठळक वैशिष्ट्ये आहेत.

'ते न तिने कधी ओळखले' या कवितेत प्रेमाच्या नाजुक धाग्याची उकल करताना ते लिहितात,

"ते न तिने कधी ओळखले
दिले उशाला काळीज ठेऊन
स्पंदनात पण दुखले"[३७]

एकीकडे प्रेमाच्या अशा नाजूक भावनांची पखरण करतानाच दुसरीकडे मूल्यांची होणारी घसरणही ते समर्थपणे मांडतात. समाजातील अनैतिकता आणि अपप्रवृत्तींचा समाचार त्यांची काव्यप्रतिभा नेमकेपणाने घेते. महात्मा गांधींच्या वधानंतरच्या मूल्यविहीन समाजवास्तवाचा उपरोधिक वेध घेताना बी. रघुनाथ म्हणतात,

"या जगताची तृषा भयंकर
या जगताची नशा भयंकर
या जगताला हवे महात्मे
गोळ्या घालून मारायाला"[३८]

प्रेमविषयक जाणिवा, मूल्यविहिनता मांडत असताना बी. रघुनाथ यांनी आपल्या काव्यातून ग्रामीण जनजीवनाचेही वास्तववादी चित्रण केले आहे. ग्रामीण भागातील शेतकरी, शेतमजूरांचे दु:ख, दैन्य, दारिद्र्य, सावकाराकडून शेतकरी-शेतमजूरांची होणारी लूट, ग्रामीण भागातील निसर्ग आणि एकूणच गावगाड्याचे प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे चित्रण बी. रघुनाथ आपल्या काव्यातून करतात. निसर्गाच्या लहरी स्वभावाखाली आणि सावकाराच्या दडपणाखाली पिचलेल्या शेतकऱ्याचे चित्रण बी. रघुनाथ आपल्या कवितेत करतात. एकूणच बी. रघुनाथांनी आपल्या लेखनातून निजामी राजवटीवर असूड ओढले आहेत.

वा. रा. कांत हे दीर्घकाळ काव्यलेखन करणारे कवी आहेत. पहाटतारा, फटत्कार, वाजली विजेची टाळी, वेलांटी, मरणगंध, दोनुली असे अनेक काव्यसंग्रह वा. रा. कांत यांनी लिहिले आहेत. "कांत हे प्रवृत्तीने मूलतः सौंदर्यवादीच पण नवकाव्याचे संस्कार पचवलेले कवी आहेत. मराठी कवितेतील बदलत्या प्रवृत्तीचे संस्कार पचवून विकासोन्मुख राहिलेली कांतांची कविता आहे."[३९] सौंदर्यप्रधान कवितेबरोबर राष्ट्रवादी जाणिवेची कविता ही वा. रा. कांत यांनी लिहिली आहे. वा. रा. कांत हे मुळचे मराठवाड्यातील असून प्रदीर्घकाळ त्यांचे वास्तव्य मराठवाड्याबाहेर होते. तरीदेखील त्यांनी अगदी सुरूवातीच्या काळातील त्यांची अनेक कवितांमधून निजामी राजवटीला प्रखर विरोध केला आहे. वा.रा. कांत यांच्या कवितेबाबद ज्येष्ठ समीक्षक सुधीर रसाळ म्हणतात की, "निझामी सत्तेनं हैद्राबाद संस्थानात सामान्य माणसावर जे अनेक निर्बंध लावले होते, मराठी भाषेची जी गळचेपी केली होती त्यांचे तीव्र पडसाद कांतांच्याही कवितेत उमटत होते."[४०] वा. रा. कांत यांच्या कवितेतून वैविध्यपूर्ण जाणिवांचा आविष्कार झाला आहे.

१.२.३.२ मराठवाड्यातील साठोत्तरी कविता :

मराठवाड्यातील साठोत्तरी कविता ही विविधांगी आहे. वैविध्यपूर्ण जाणिवांचा आविष्कार साठोत्तरी कवितेतून होतो. मध्यवर्ती कविता, ग्रामीण कविता, दलित कविता, आदिवासी कविता, स्त्रियांची कविता, बालकविता अशा विविधांगी पद्धतीने साठोत्तरी कविता लिहिली गेली आहे.

१) मध्यवर्ती कविता :

मराठवाड्यातील मध्यवर्ती कवितेमध्ये नागर जाणिवेची कविता, भावकविता, अनुवादित कविता, सामाजिक व गंभीर प्रवृत्तीच्या कवितेचा अंतर्भाव होतो. फ. मुं. शिंदे, चंद्रकांत पाटील,

गोविंद कुलकर्णी, लक्ष्मीकांत तांबोळी, भागवंत क्षीरसागर, नरेंद्र मारवाडे, रमेश दीक्षित, दासू वैद्य, श्रीधर नांदेडकर, पी. विठ्ठल इत्यादी कवींनी मराठवाड्यातील मध्यवर्ती कवितेचा प्रवाह समृद्ध केला आहे. मध्यवर्ती काव्यप्रवाहातील फ. मुं. शिंदे हे एक गंभीर प्रवृत्तीचे कवी आहेत. त्यांची कविता ही प्रामुख्याने उपहास, उपरोध व विडंबनात्मक आहे. सामाजिक व राजकीय विसंगतीवर ती सातत्याने भाष्य करते. "सर्वसामान्य माणसाचे दु:ख, एकाकीपणा, स्वत:शीच चाललेला त्यांचा छुपा संघर्ष फ. मुं. शिंदेनी कवितेतून मांडला...... त्यांची कविता शब्दापेक्षा अर्थातून विचार करायला लावते."[४१] फ. मुं. शिंदे यांचे आदिम, वृंदगान, अवशेष, सार्वमत, प्रार्थना, गाथा, आई आणि इतर कविता, सूर्यमुद्रा, मिथक इत्यांदी काव्यसंग्रह प्रकाशित आहेत.

चंद्रकांत पाटील हे लघुअनियतकालीकाच्या चळवळीतील महत्त्वाचे कवी आहेत. मानवी अस्तित्वाचा शोध घेणे हे त्यांच्या कवितेचे महत्त्वाचे विशेष आहे. नि:संदर्भ, इत्यंभूत, बायका आणि इतर कविता, दिक्काल हे चंद्रकांत पाटील यांचे महत्त्वपूर्ण काव्यसंग्रह आहेत. लक्ष्मीकांत तांबोळी हे मराठवाड्यातील एक सशक्त कवी असून विविध विषयांवर त्यांनी आपल्या कवितेतून भाष्य केले आहे. हुंकार, अस्वस्थ सूर्यास्त, मीधात्री, मी धरित्री, गोकुळवाटा हे लक्ष्मीकांत तांबोळी यांचे काव्यसंग्रह आहेत. याबरोबरच रमेश दीक्षित (इब्लिस), गोविंद कुलकर्णी (अनिमिष, पाऊले, मनाचे डोळे), राजा मुकुंद (तणावा), भगवंत क्षीरसागर (मध्यान्ह, बीजमंत्राची कविता), श्री. दि. इनामदार (शिवगान, दिंडी जाय दिगंतरा) इत्यादी कवींनी मराठवाड्यातील काव्यलोनात मोलाचे योगदान दिले आहे.

नव्वोदत्तर कालखंडामध्ये बदलत्या सामाजिक परिप्रेक्षानूसार मराठवाड्यातील कविताही बदलत गेली. जागतिकीकरणामुळे उभी ठाकलेली आव्हाने आणि एकूणच मूल्यऱ्हासाचे चित्रण मराठवाड्यातील कवितेत येऊ लागले. दासू वैद्य (तूर्तास, तत्पूर्वी), पी. विठ्ठल (सखी आणि मी : एक विसंवाद, माझ्या वर्तमानाची नोंद), श्रीधर नांदेडकर (सुफी प्रार्थनांचा किनाऱ्यावरून, परतीचा रस्ता नाहीय), मंगेश नारायण काळे (शक्तिपाताचे सूत्र, तृतीय पुरूषाचे आगमन, मायावियं तहरीर), पृथ्वीराज तौर (गाव आणि शहराच्या मधोमध), मनोज बोरगावकर (कोरा कागद निळी शाई) इत्यादी कवींच्या कवितेतून जागतिकीकरणाचे प्रभावी चित्रण आले आहे.

मराठवाड्यातील मध्यवर्ती मराठी कवितेत आपले योगदान देणारे अनेक कवी आहेत. त्यामध्ये रे. म. भारवाडकर (धून), दीनानाथ फुलवाडकर (अंधारकळ्या), भु. द. वाडीकर (पाणी नितळ गंगेचे), शिवाजी गऊळकर (अपर्णा), तु. शं. कुलकर्णी, शंकर झुल्पे (अभाळवेल, रानभूल), बलभीमराज गोरे (वैचारिकी, लघुत्तम, चिंतनिका), नरेंद्र मारवाडे (झारेकऱ्याचे विद्यापीठ), सुरेश सावंत (अबोली, दुभंग), बा. ग. हरसूलकर (सुहासिनी, सतपत्र), गजमल माळी (नागफणा आणि सूर्य, गंधवेणा), फ. म. शहाजिंदे (शेतकरी), भ. मा. परसवाळे (आरोह, रस्ते दुभंगत आहेत), रेणू पाचपोर (डाळींबाचे दाणे, अवथर, घनगर्द), सुहास जेवळीकर (दहशतीची दैनंदिनी), केशव वसेकर (तफावत, चांदवा, साक्षात्कार), विश्वास वसेकर (कोरस, पैगाम, शरसंधान, विडंबन), राजेसाहेब कदम (संदर्भाच्या शोधात, साक्षी), गणेश विसपुते (आवाज नष्ट होत नाहीत, सिनार), किरण सगर (रवी मावळता), सर्जेराव जिगे (अंतःस्थ), देविदास फुलारी (साक्षदा, सायरा), प्रभाकर साळेगावकर (वादळ), डी. के. शेख (प्रेमायन), सुभाष कड (प्रेमसागर), मधुकर धर्मापुरीकर (जानिग ए मंजिल), माधव गरड (श्वासभर), मधू जामकर (नादरंग), भगवान कौठेकर (भाळ-आभाळ), श्रीकांत उमरीकर (दोन शब्दामध्ये), रमेश राऊत (भूपाळी), नागनाथ हेगे (शिवांगी), अरुण कुलकर्णी (बुजगावणं), रमेश राजपंखे (ओस झाल्या दिशा), विलास वैद्य (गलफ आलाप), मुकुंद राजपंखे (राजपंखी कविता), भारत सातपुते (भूकंपानंतरची मने), चंद्रशेखर मलकपट्टे (कळभूईच्या पोटात) इत्यादी कवींचे काव्यलेखन महत्त्वाचे आहे.

२) मराठवाड्यातील ग्रामीण कविता :

साठोत्तरी कालखंडामध्ये आणि विशेषतः १९७५ नंतर मराठवाड्यामध्ये विपूल प्रमाणात ग्रामीण काव्यलेखन झाले आहे. शेतकऱ्यांचे दुःख-दैन्य-दारिद्र्याचे चित्रण, लहरी निसर्ग, वर्गविरोधी भूमिका, ग्रामसंस्कृतीचा आविष्कार, स्वार्थी राजकारण अशा विविध वैशिष्ट्यांनी ग्रामीण कविता युक्त होती. एकूणच गावगाड्यातील पशु-पक्षी, गुरे-ढोरे, झाडे-झुडपे तेथील सामाजिक-राजकीय स्थित्यंतरासह ग्रामीण कवितेत आविष्कृत होतात. ना. धों. महानोर हे या प्रवाहातील एक उल्लेखनीय कवी आहेत. वही, रानातल्या कविता, पावसाळी कविता, प्रार्थना दयाघना, तिची कहाणी, पानझड, पक्ष्यांचे लक्ष थवे, अजिंठा इत्यादी काव्यसंग्रह महानोर यांनी

लिहिले. ग्रामीण भागातील मोडलेल्या माणसाचे दु:ख, तेथिल निसर्ग लोकलयीसह महानोर यांच्या कवितेत आविष्कृत होतो. त्यामुळे 'महानोरांच्या कवितेतून खरेखुरे मराठी खेडे प्रथमच साकार झाले', असे वा. ल. कुलकर्णी म्हणतात.

इंद्रजित भालेराव हे मोडकळीस आलेल्या गावखेड्याचे चित्रण करणारे आघाडीचे ग्रामीण कवी आहेत. ग्रामीण भागातील सामान्य शेतकरी-शेतमजूरांचे दु:ख, त्यांची घूसमट, सातत्याने होणारी ग्रामीणांची अवहेलना व्यक्त करत असताना ग्रामीणांना आत्मभान देण्याचे काम भालेराव यांची कविता करते. पीकपाणी, आम्ही काबाडाचे धनी, दूर राहिला गाव, पेरा, टाहो, भूमीचे मार्दव, सारे रान इत्यादी काव्यसंग्रह इंद्रजित भालेराव यांनी लिहिले आहेत. भालेराव यांच्या कवितेत शेणामातीचा दरवळ खेड्यातील भाषेसह चित्रमय शैलीमध्ये अभिव्यक्त होतो.

श्रीकांत देशमुख हे ग्रामीणांचा स्वर व्यक्त करणारे आणखी एक महत्त्वाचे कवी आहेत. बळीवंत, आषाढमाती, बोलावे ते आम्ही हे देशमुख यांचे उल्लेखनीय काव्यसंग्रह आहेत. ग्रामीण जीवनाची वेदना अत्यंत गंभीरपणे व्यक्त करत ग्रामजीवनातल्या विरोधाभासाचे चित्रण त्यांच्या कवितेतून येते. ग्रामीण जीवन सशक्तपणे आविष्कृत करणाऱ्या कविंमध्ये जगदीश कदम (रास आणि गोंडर, झाडमाती, नामदेव शेतकरी), केशव सखाराम देशमुख (पाढा, गाभा, तंतोतंत, अथक चालणारे अनवाणी पाय), जयराम खेडेकर (ऋतूवंत, मेघवृष्टी), महेश मोरे (हिरवं रान, पाऊसकाळ), ललित अधाने (कुणबी बाप), बालाजी मदन इंगळे (मातरं, मेलं नाही आभाळ अजून, या परावलंबी दिवसात), विनय अपसिंगकर (कविता खेड्याच्या, त्या उजाड गावावरती), रवी कोरडे (धूसर झालं नसतं गाव), भास्कर बडे (वावर), केशव खटींग (सालोसाल), उत्तम बावस्कर (विद्रोह), श्रीराम गव्हाणे (होऊ दे रे आबादाणी), विष्णू सलामपुरे (गुलमोहराच्या झाडाखाली), नवनाथ गोरे (पुन्हा जन्म घेण्यासाठी), शिवाजी हुसे (बाप झाला कासाविस, सखी आणि पाऊस, वेदनांचा गाव), मारोती घुगे (माय, बाप आणि मी), विनायक पवार (नामुस्किचे पिढीजात वर्तमान), रमेश रावळकर (मातीवेणा, गावकळा), संदीप जगदाळे (असो आता चाड), बाळू दुगडूमवार (शिशरवेणा) यांचे काव्यलेखन महत्त्वाचे आहे.

३) मराठवाड्यातील दलित कविता :

स्वातंत्र्य, समता, बंधुता व सामाजिक न्यायाचा पुरस्कार, प्रस्थापित व्यवस्थेला नकार, मनुप्रणीत विचारांविरूद्ध बंड, विज्ञानवादी दृष्टिकोन व फुले-शाहू-आंबेडकर यांच्या विचारांशी बांधिलकी या वैशिष्ट्यांनी युक्त दलित कविता १९६० नंतर मोठ्या प्रमाणात लिहिली गेली. मराठवाड्यामध्ये हरिहर सोनुले यांच्या रूपाने दलित जाणिवेची कविता प्रथम लिहिली गेली. पुढील काळात अस्मितादर्श सारखे हक्काचे विचारपीठ उपलब्ध झाल्यामुळे मराठवाड्यातील दलित कवितेला बहर आलेला दिसतो. वामन निंबाळकर (गावकुसाबाहेरील कविता, महायुद्ध), त्र्यंबक सपकाळे (सुरूंग), शरणकुकार लिंबाळे (उत्पात), रविचंद्र हडसनकर (ठिणगी, देणगी), बापूराव जगताप (निळ्या पहाडाच्या कविता), नरेश इंगळे (अंगारा), राम दुतोंडे (रापी जेव्हा लेखणी बनते, गल्ली बदललेला मोर्चा), उत्तम अंभोरे (पत्ता बदलत जाणारा गनीम, धगिवरची अक्षरं), महादेव गायकवाड (निळ्या वाटा), राजेंद्र गोणारकर (अनारंभ), प्रकाश मोगले (दंभस्फोट), अदिनाथ इंगोले (पाखंड), मारूती कसाब (पोरगं शेकत बसलय), ना. तु. पोघे (निळ्या क्षितिजाचे देणे, शोषितांचे अभंग) इत्यादी कवींनी मराठवाड्यातील दलित काव्यलेखन समृद्ध केले आहे.

मध्यवर्ती प्रवाहातील कविता, ग्रामीण कविता, दलित कवितेबरोबर मराठवाड्यातील आदिवासी व भटक्याविमुक्त समुहातील कवींनीही महत्त्वाचे काव्यलेखन केले आहे. भुजंग मेश्राम (आदिवासी कविता, ऊलगुलान), संजय बालघाटे (आम्हाला आधार नाही), जवाहर राठोड (डोंगराचे ढोल), रावजी राठोड (मलाण), राजाराम राठोड (आर्त), किशन पवार (रानपाखरं), रतन आडे (कडापो), उत्तम राठोड (फाटकं आयुष्य, व्यासपीठ), प्रेमदास राठोड (रानबा, बंब, गराशा), वीरा राठोड (सेनसाय येस) इत्यादी कवींनी मराठवाड्यातील भटके-विमुक्त समाजाच्या कवितेच्या अशयाभिव्यक्तीतील वेगळेपण व वैशिष्ट्यपूर्ण भाषा यामुळे एकूण मराठी कविताच श्रीमंत झाली आहे. काव्य लेखनात मोलाचे योगदान दिले आहे.

४) मराठवाड्यातील स्त्रियांची कविता :

मराठवाड्यातील स्त्रिलिखित कवितेचे दालन अत्यंत समृद्ध आहे. स्त्रियांच्या आयुष्यातील कोंडमारा, समाजातील दुय्यमत्व, स्त्रियांचे होणारे शोषण, स्त्री हक्काचा पुरस्कार अशा विविधांगी जाणिवा स्त्रियांच्या काव्यलेखनातून व्यक्त होतात. सुहासिनी इर्लेकर (अक्षर, गाथा, छांदस), लीला

धनपलवार (गुलमोहर), अनुराधा पाटील (दिंगत, तरीही, दिवसेंदिवस, वाळूच्या पात्रात मांडलेला खेळ), सुनेत्रा ओक (चेतसी), शैला लोहिया (गजाआडच्या कविता), वृषाली किन्हाळकर (वेदन, तारी), ललिता गादगे (अग्नीजळ, फसवी क्षितिजे), संजिवनी तडेगावकर (फुटवे), तृप्ती अंधारे (अंतर्दाह), उर्मिला चाकूरकर (चांदन चाफा), संध्या रंगारी (कवडसे, आघात), मंगला वैष्णव (समांतर, तालमोर), प्रतिभा जोशी (निसटते क्षण), रसिका देशमुख (श्रावणसरी), कविता महाजन (तत्पुरूष), छाया तातेड (कवनतरू), आशा पैठणे (संवेदन, उघडमीठ), आशा डांगे (परिघाबाहेर), श्रद्धा बेलसरे (मोरपंखी, त्याहीनंतर), रंजन कंधारकर (स्वधा), गीता लाटकर (माझं मुठभर आकाश), पुष्पा देशमुख (बोन्साय), कांचन पाडगावकर (ओढ), ललिता शिंदे (स्त्रिमुक्ती), प्रतिभा अहिरे (मला हवी असणारी पहाट), प्रिया धारूरकर, वृषाली पाटील, विनिता कुलकर्णी, प्रणिता चाकूरकर, विद्या बायस, भाग्यश्री केसकर इत्यादी कवयित्रींनी मराठावाड्यातील काव्य लेखनाचे दालन समृद्ध केले आहे. स्त्रियांचे दुःख, व्यथा-वेदना या कवितांमधून व्यक्त होत असल्या तरी निखळ स्त्रिवादी जाणिवेची कविता महाराठवाड्यात फारशी आढळत नाही.

बाल कविता हे मराठवाड्यातील कवितेचा महत्त्वाचा भाग आहे. महावीर जोंधळे (पावसाचे पाय, चिमणी चिमणी खोपा दे, बाहुलीचे डोळे, टिम टिम टिमाँग), रेणू पाचपोर (एक हिरवेगार वर्ष), दासू वैद्य (क-कवितेचा), देविदास फुलारी (दुधावरची साय), अनिल होळकर (हिरवी गाणी), सय्यद अल्लाउद्दीन (बबलू छबलू, उंटावरची शाळा, आई माझी नातवांची आजी), विलास सिंदगिकर (आनंद गाणी), बालाजी मदन इंगळे (रंगीत रंगीत रानफुले), नारायण खरात (चंद्रावरची सहल), समाधान शिळेतोड (थेंब झेलू या अंगावर), गणपत व्यास (चिमणचारा, सासर-माहेर) गणेश घुले (सुंदर माझी शाळा) इत्यादी कवींनी बालकाव्यामध्ये महत्त्वाचे लेखन केले आहे. स्वतंत्र काव्यलेखनाशिवाय पृथ्वीराज तौर व स्वाती काटे यांनी संपादीत केलेल्या 'सृजन पंख' आणि तृप्ती अंधारे यांनी संपादित केलेला 'दप्तरातल्या कविता' हे संपादनेही बालकवितेच्या दृष्टीने महत्त्वाची आहेत. याशिवाय गणेश घुले यांच्या बालकवितांवर आधारित 'सुंदर माझी शाळा' या सांगीतक कार्यक्रमाने मराठवाड्यातील बालकविता समृद्ध केली आहे.

एकूणच मराठवाड्यामध्ये मध्ययुगीन कालखंडाप्रमाणेच आधुनिक कालखंडातही विपूल काव्यलेखन झाले आहे हे दिसून येते. विविध प्रवाहात विखुरलेल्या मराठवाडी कवितेचा समग्रपणे

विचार केल्यास एकूण मराठी कविताच मराठवाड्यातील कवितेने समृद्ध केली आहे, हे जाणवते. आधुनिक कालखंडामध्ये मराठवाड्यामध्ये उशीराने काव्यलेखनास सुरूवात झाली असली तरी, संख्यात्मक आणि गुणात्मकदृष्ट्या मराठवाड्यातील कविता मराठी कविते एवढीच दर्जेदार आहे. सर्वच प्रवाहातील आधुनिक कविता ही मराठवाड्याचे वेगळेपण सिद्ध करत असताना एकूण मराठी कवितेशी साधर्म्य सांगणारी आहे. "या काळातील एकूण कवितेचे आकलन करताना असे लक्षात येते की, आत्मनिष्ठेकडून समुहनिष्ठेकडे काव्य जाणिवांचा लंबक स्थलांतरित होत गेलेला आहे. व्यक्तिलक्षी जाणिवा समूहलक्षी जाणिवेकडे स्थानांतरित होत गेलेल्या दिसतात. कविता अधिक समाजसन्मुख होत सामाजिक जाणिवा प्रकट करू लागली. तिने अधिक व्यापक मानवतावादी भूमिका अंगिकारली. व्यापक अर्थघनता तिला प्राप्त झाली."[४२] एकूणच मराठवाड्यातील कवितेने एकूण मराठी कविता समृद्ध केली आहे.

१.२.४ मराठवाड्यातील आत्मचरित्रलेखन :

कविता, कथा, कादंबरी व नाट्यलेखनाच्या तुलनेत मराठवाड्यामध्ये आत्मचरित्र लेखन फारसे झाले नाही. जे आत्मचरित्र लेखन प्रकाशात आले आहे त्यापैकी अधिकाधिक लेखन हे मराठवाडा मुक्तिसंग्रामातील स्वातंत्र्यसेनानींचे आहे. निजामी राजवटीविरूद्ध मराठवाड्यातील अस्सल अनुभवांची दाहकता या आत्मचरित्रातून प्रत्ययास येते. स्वामी रामानंद तीर्थ (हैद्राबाद मुक्तिसंग्रामाच्या आठवणी), श्रीधरराव कुलकर्णी (नवरात्र संपले), सेतू माधवराव पगडी (जीवनसेतू), अनंत भालेराव (पेटलेले दिवस, पळस गेला कोकणा), दिगंबरराव बिंदू (हैद्राबाद राज्याचे विसर्जन आणि मी), पुरूषोत्तम चपळगावकर (घडून गेलेली गोष्ट), चंद्रशेखर वाजपेयी (हैद्राबाद स्वातंत्र्यसंग्राम आणि मी), ज. रा. बर्दापूरकर (माझ्या आठवणी) आणि व्य. स. कुलकर्णी यांचे हैद्राबादच्या आठवणी ही आत्मचरित्रे मौलिक आहेत.

मराठवाडा मुक्तिसंग्रामातील दाहकतेशिवाय वैयक्तिक आयुष्यातील दाहकता व अनुभूती मांडणारी आत्मचरित्रे मराठवाड्यात लिहिली गेली. भिमराव पिंगळे (दावणगुण), ना. य. डोळे (प्राचार्य), यादवराव पाटील (श्रमाचा सुगंध), जी. बी. शिंदे (तपस्या), जनार्दन वाघमारे (मुठभर माती), वि. बा. घुगे (साक्षात), निर्मलकुमार सुर्यवंशी (अक्षरनाती), बा. भो. शास्त्री (मार्गस्थ) इंदुमती जोंधळे (बिनपटाची चौकट) इत्यादी आत्मचरित्र मराठवाड्यातील वाङ्मयाच्या दृष्टीने

महत्त्वाची आहेत. मराठवाड्यातील एकूण आत्मचरित्र लेखनाचा विचार केल्यास "प्रारंभिची आत्मचरित्रे विचारात घेता त्या हैद्राबाद मुक्तिसंग्रामाच्या रणरणगाथा आहेत. तर त्यानंतरची आत्मचरित्रे स्वातंत्र्योत्तर प्रश्नांची रडगाथा कथन करणारी आहेत."[४३] असे सुरेश पैठणकर यांना वाटते.

१.२.५ मराठवाड्यातील दलित व भटक्या-विमुक्तांची स्वकथने :

मराठवाड्यामध्ये दलित व भटक्या विमुक्तांच्या आत्मकथनांची संख्या ही लक्षवेधी आहे. संख्यात्मदृष्ट्या ही आत्मकथने जशी विपूल प्रमाणात आहेत तशी गुणात्मकदृष्ट्या श्रेष्ठ दर्जाची आहेत. मराठी वाङ्मयाच्या इतिहासात दलित आत्मकथनाला महत्त्वाचे स्थान आहे. किंबहुना दलित आत्मकथने ही भारतीय वाङ्मयाच्या इतिहासातील एक क्रांतीकारी घटना म्हणावी लागेल. "दलित आत्मकथन, अनुभवकथन किंवा स्वकथनांनी पारंपरिक आत्मचरित्र लेखनाच्या सर्व रूढ संकेतांना छे दिला.... आयुष्याच्या 'लागले नेत्र रे पैलतीरी' अशा टप्प्यावर आत्मचरित्र लिहिण्याचा पहिला संकेत दलित स्वकथनांनी झुगारला. प्रतिष्ठा वा थोरपण लाभलेल्याच व्यक्तींनी आत्मचरित्रे लिहावित हा संकेतही नाकारला. दलित स्वकथनांनी सांगण्यासारखे गच्च आहे आणि आता सांगितलेच पाहिजे या दोन जाणिवांशी इमान राखून ऐन तारूण्यात आपली जीवनकहाणी लिहिली."[४४] असे समीक्षक भगवान ठाकूर म्हणतात.

विविध संकेताबरोबरच स्वकथनामध्ये आशयदृष्ट्या देखील लक्षणीय बदल झालेला आहे. दलित समाजाच्या वाट्याला पिढ्यान्‌पिढ्या आलेले अभावग्रस्ततेचे व अन्यायाचे चित्रण प्रथमच मराठी साहित्यामध्ये आले. या संदर्भात आत्मचरित्रात्मक लेखनाचे अभ्यासक कैलास अंभुरे म्हणतात की, "या समाजाच्या वाट्याला जे पशुत्वसमान जगणे आलेले होते त्याचा अंत होऊन कधितरी त्याचा स्फोट होणार हे शाश्वत सत्य होते, परिणामतः दलित स्वकथनात स्वतःबरोबरच जात आणि समाजाची वेदना मुखर झाली."[४५] एकूणच प्रेरणा, स्वरूप आणि उद्देशांच्या दृष्टीने दलित आत्मकथने ही आत्मचरित्र लेखनापेक्षा भिन्न आहेत.

मराठवाड्यातील दलित व भटक्या विमुक्तांच्या आत्मकथनांमध्ये, प्र. ई. सोनकांबळे (आठवणींचे पक्षी), रुस्तुम अचलखांब (गावकी), शरणकुमार लिंबाळे (अक्करमाशी), लक्ष्मण गायकवाड (उचल्या), वैजनाथ कळसे (आयरणीच्या घणा), श्रीरंग तलवारे (धूळपाटी), आर. के.

त्रिभुवन (दे दान सुटे गिरान), किशोर शांताबाई काळे (कोल्हाट्याचं पोर), जनाबाई गिऱ्हे (मरणकळा), कचरू गिऱ्हे (भटक्या), गौतम कावळे (बावळट), इंदुमती चिटणीस (आमचे डॉक्टर), सदानंद पुंडगे (गँगमन), एस. एस. बोडरले (महार वकील), अनिल कांबळे (सावत्र आई), आनंद गायकवाड (मी एक शिल्पकार), महादेव बनसोडे (निवडुंग ते बोधिवृक्ष), ना. तु. पोघे (इरवाड), सुदाम मगर (भोगवटा), वासुदेव बेंबळकर (जसे घडले तसे), गौतम गायकवाड (माय लेकरू), सुनिता आरळीकर (हिरकणीचे बिऱ्हाड), शिवाजी राठोड (टाबरो), रावजी राठोड (तांडेल), संतोष पवार (चोरटा), उमा राठोड (सिटी ऑफ मांडवी), अशोक पवार (बिराड), गणेश जाधव (धडपड), एकनाथ आवाड (जग बदल घालुनि घाव) इत्यादी लेखकांची स्वकथने महत्त्वाची आहेत. दलित, भटके-विमुक्त व एकूणच उपेक्षितांचे अंतरंग या स्वकथनातून आविष्कृत होतात.

१.२.६ मराठवाड्यातील ललित गद्य :

कथा, कविता, कांदबरी, नाटक, आत्मचरित्र अशा मुख्य वाङ्मय प्रकारबाह्य जे ललित लेखन असते त्याचा अंतर्भाव ललित गद्यामध्ये होतो. लघुनिबंध, व्यक्तिचित्रे, प्रवासवर्णन, प्रसंगचित्रे अशा स्फुट बाबींचा यामध्ये समावेश होतो. मराठवाड्यामध्ये स्वातंत्र्यपूर्व कालखंडामध्ये मोजकेच ललित गद्य लेखन झालेले असले तरी स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये ललित गद्य लेखनात लक्षणीय वाढ झालेली आहे. बी. रघुनाथ (अकलेचा प्रवासी), भगवंत देशमुख (आलोक), गणेश विसपुते (निरिहयात्रा), माधव गरड (रस्ता अटळ आहे), विश्वास वसेकर (रेघोट्या, अठरापगड), प्रकाश कामतीकर (यात्रा), सुरेश जाधव (कदाचित), भगवान अंजनीकर (निमित्त), मंगेश उदगीरकर (गप्पाष्टक), केशव वसेकर (देहभूल, पाऊलवाटा, शाबास विवेक, लहाणपण देगा देवा), दादासाहेब थेटे (हरवलेली माणसं), दासू वैद्य (अजूबाजूला, मेळा), प्रकाश कामतीकर (स्वप्नगंधा, क्षितिजरंग), कांचन पाडगावकर (असाही एक अल्बम), तेजस्विनी वाडेकर (स्त्रीधन), दगडु लोमटे (राहून गेलेली पत्रे), आसाराम लोमटे (धूळपेर), राजकुमार तांगडे इत्यादी लेखकांचे ललितलेख संग्रह महत्त्वाचे आहेत.

मराठवाड्यामध्ये प्रवासवर्णनात्मक लेखक कमी झाले असले तरी दर्जेदार असणारे हे लेखन आहे. अनंत भालेराव (पळस गेला कोकणा), अनंत उमरीकर (आंदोलन), अच्युत बन (परिक्रमा पश्चिम युरोपची), बाबा भांड (लागेबाधे, झेलम ते बियास, पांगोरे), बापूराव जगताप (मराठवाडा ते

मास्को), जनार्दन वाघमारे (ज्ञान-विज्ञानाच्या देशात), श्रद्धा बेलसरे (सरदार सरोवराच्या काठाणे), सुदाम जाधव इत्यादी लेखकांनी दर्जेदार प्रवासवर्णनपर लेखन केले आहे. व्यक्तिचित्रे या ललितगद्य प्रकारातही मराठवाड्यातील लेखकांनी भरीव लेखन केले आहे. न. शे. पोहनेरकर (विरलेल्या गारा), यु. म. पठाण (मराठवाडी माणसं), सेतू माधवराव पगडी (अशी माणसे येती), जनार्दन वाघमारे (जीवनरेखा, व्यक्तिवेध), गंगाधर पानतावणे (वादळाचे वंशज, स्मृतिरोप, विद्रोहाचे पाणी पेटले आहे), अविनाश डोळस (तुफाणातील दिवे), अनंतराव भालेराव (मांदियाळी), महावीर जोंधळे (जनगोत), सुधीर रसाळ (लोभस), ना. धों. महानोर (ऐसी कळवळ्याची जाती), चंद्रकांत पाटील (चौकटीबाहेरचे चेहरे), वासुदेव मुलाटे (वाटेवरल्या सावल्या), इंद्रजित भालेराव (घरीदारी, मराठवाडी), प्रवीण बर्दापूरकर (क्लोजअप), चंद्रकांत तलवारे (मळग्याची धार) इत्यादी लेखकांचे व्यक्तिचित्रणात्मक लेखन वाचनीय आहे.

१.२.७ मराठवाड्यातील अनुवादीत साहित्य :

मराठवाड्यामध्ये मराठी भाषेतून इतर भाषांमध्ये व इतर भाषांमधून मराठी भाषेमध्ये अनुवादाचे कार्य मोठ्या प्रमाणात झाले आहे. सुर्यनारायण रणसुभे हे मराठीतील दलित साहित्य हिंदी भाषेत अनुवादीत करणारे महत्वाचे अनुवादक आहेत. त्यांनी मराठीतील आठवणींचे पक्षी, अक्करमाशी व उचल्या या आत्मकथनाचा तसेच अश्मक, बामनवाडा, साक्षीपूरम या नाटकांचा हिंदी अनुवाद केला आहे. चंद्रकांत पाटील हे हिंदी-मराठी कवितेचे अनुवादक असून त्यांचे कवितान्तरण, तिची स्वप्ने, संगिनी, साठोत्तर मराठी कविताएँ, तमस हे महत्त्वाचे अनुवादीत ग्रंथ आहेत. याशिवाय संजय नवले (मराठी दलित कहानिया, अगन पथ), प्रदीप म्हैसेकर (सच्चो संग हो), बाबा भांड (एलिनॉर कोअर यांच्या सादको आणि बगळे तसेच रिचर्ड बाका यांच्या जोनाथन लिव्हिंग सिंगल या कथासंग्रहाचे अनुवाद), मधुकर धर्मापुरीकर (मालगुडी डेजू), सुधाकर शेंडगे (बिहार ते तिहार), नितीन कोत्तापल्ले (पाऊलो कोएलोच्या द अल्केमिस्ट आणि द नाहीर या कादंबऱ्याचे अनुवाद), ललिता गादगे, रमेश दिक्षीत, माधवराव सोनटक्के, चंद्रभानू सोनवणे, वेदकुमार वेदालंकार, बलभिमराज गोरे, प्रकाश देशपांडे, मंगला वैष्णव, अनुया दळवी, भारतीय गोरे, पृथ्वीराज तौर, संदीप जगदाळे इत्यादी अनुवादकांचे लेखन महत्त्वाचे आहे.

१.२.८ मराठवाड्यातील वैचारिक साहित्य :

वैचारिक साहित्य हे मराठवाड्यातील साहित्य लेखनाचे अविभाज्य अंग आहे. सामाजिक, राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक, आर्थिक अशा विविध घटकांवर मराठवाड्यातील वैचारिक साहित्यातून मंथन झाले आहे. आ. कृ. वाघमारे (संघर्ष, भाग-१, संघर्ष, भाग-२), अनंत भालेराव (आलो याची कारणाशी), स. रा. गाडगीळ (लोकायत, साहित्यमीमांसा आणि समाज दर्शन, विचारमंथन), जनार्दन वाघमारे (हाक आणि आक्रोश, समाजपरिवर्तनाच्या दिशा, साहित्य चिंतनयात्रा, मंथन, विचारमुद्रा), गंगाधर पानतावणे (दलितांचे प्रबोधन, हलगी, बुद्ध आणि चिंतन), भगवानराव देशपांडे (समाजक्रांतीचे चिंतन, विचारमंथन), नरेंद्र चपळगावकर (संघर्ष आणि शहानपण, राज्यघटनेचे अर्धशतक), शेषराव मोरे (सावरकरांचा बुद्धिवाद : एक चिकित्सक अभ्यास, काश्मिर : एक शापित नंदनवन, मुस्लिम मनाचा शोध, काँग्रेसने गांधीजींचा अखंड भारत का नाकारला), गजमल माळी (राष्ट्रीय काँग्रेस आणि सत्यशोधक समाज, वैदिक धर्म परंपरा आणि महात्मा जोतिराव फुले), नागनाथ कोत्तापल्ले (जोतिपर्व, उद्याच्या सुंदर दिवसासाठी), वासुदेव मुलाटे (चिंतनाच्या क्षितीजावर, शोध जाणिवांचा), भास्कर चंदनशीव (भूमी आणि भूमिका, माती आणि मंथन, माती आणि नाती), अविनाश डोळस (आंबेडकरी चळवळ : परिवर्तनाचे संदर्भ), सुधीर गव्हाणे (क्रांतिसूर्य महात्मा फुले), यादव गायकवाड (अन्वयार्थ, सम्यक संवाद, समकालीन शिक्षण), प्रदीप म्हैसेकर (योगदासी, रामायणाची बुद्धिनिष्ठ चिकित्सा, ऋग्वेद, सांस्कृतिक दिशा आणि दृष्टी), उमेश बगाडे (फुले-आंबेडकरांचा राष्ट्रवाद, महाराष्ट्रातील प्रबोधन आणि वर्ग जातिप्रभुत्व), जयदेव डोळे (समाचार आरेसेस, खबर, प्राध्यापक लिमिटेड), प्रल्हाद लुलेकर (बलुतेदार, गावगाड्याचे शिल्पकार), प्रकाश मोगले (निर्दालन करकांचे), पृथ्वीराज तौर (वसुधैव कुटुम्बकम), प्रदीप पुरंदरे (पाण्याशपथ), एकनाथ खिल्लारे (वंचितांचा प्रदेश), राजकुमार तांगडे (शिवार गाऱ्हाणं), नंदू मुलमुले (दुभंगवाणी), ना. य. डोळे (संघ आणि सेवादल, काश्मीर प्रश्न, हैद्राबाद स्वातंत्र्य संग्राम), सुधाकर डोईफोडे (शब्दबाण) इत्यादी लेखकांनी मराठवाड्यातील वैचारिक लेखनामध्ये मौलिक भर घातली आहे.

मराठवाड्यातील वैचारिक लेखन परंपरेमध्ये नरहर कुरुंदकर हे एक चिंतनशील व भूमिकानिष्ठ लेखक आहेत. "त्यांच्या सर्वच लेखनाला चिंतनाचा आणि व्यासंगाचा, तर्कशुद्ध

विचारांचा आणि प्रवर्तकतेचा, आग्रही भूमिकेचा आणि त्यासाठीच्या अभिनिवेशाचा, निरपेक्षतेचा आणि निर्भयतेचा पाया आहे. मौलिक चिंतनातून नवा विचार आणि नवी दिशा देण्याचे महत्त्वाचे कार्य त्यांच्या लेखनाने सहज पार पाडले आहे."[४६] स्पष्ट व रोखठोक शैलीमुळे कुरुंदकर यांचे एकूणच लेखन वादाचा विषय झाले असले तरी जवळपास पस्तीस ग्रंथातून कुरुंदकर यांनी मौलिक विचारमंथन केले आहे. हैद्राबाद : विमोचन आणि विसर्जन, शिवरात्र, जागर, मनुस्मृती : काही विचार, छायाप्रकाश, मागोवा, अन्वय, ओळख इत्यादी मौलिक ग्रंथाचे लेखन नरहर कुरुंदकर यांनी केले आहे.

१.२.९ मराठवाड्यातील साहित्यसमीक्षा आणि संशोधन :

साहित्यसमीक्षा हे वाङ्मयीन व्यवहाराचे महत्त्वपूर्ण अंग असते. मराठवाड्यामध्ये प्रदीर्घ काळ निजामी राजवट होती. या राजवटीत वाङ्मयीन गळचेपीमुळेच मराठवाड्यामध्ये साहित्य समीक्षा लेखनासही उशीर झालेला आहे. १९३० नंतर मराठवाड्यात समीक्षालेखनाला सुरूवात झाली असली तरी स्वातंत्र्योत्तर काळात हे समीक्षालेखन अधिक प्रमाणात झाले. आज मराठवाड्यात संशोधन, संपादन आणि समीक्षालेखन विपूल प्रमाणात होत आहे. अभ्यासकांनी मध्यवर्ती साहित्य समीक्षा, दलित साहित्य समीक्षा, ग्रामीण साहित्य समीक्षा आशी विभागणी जरी केलेली असली आणि संशोधन, संपादन व समीक्षा या बाबींमध्ये सूक्ष्म फरक असला तरीही विस्तारभयास्तव प्रस्तुत ठिकाणी या सर्व बाबींचा एकत्रित आढावा घेतला आहे.

मराठवाड्यातील साहित्य समीक्षा लेखनाला आधुनिक काळात सुरूवात झाली असली तरीही मध्ययुगीन काळामध्ये संत एकनाथ महाराजांनी ज्ञानेश्वरीचे पाठभेद दूर करून ज्ञानेश्वरीची संशोधित प्रत तयार केली. मध्ययुगीन काळातील संत एकनाथ महाराजांचे हे संशोधन मराठवाड्यातील संशोधनाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. आधुनिक कळामध्ये न. शे. पोहनेरकर यांनी दासोपंतांच्या पासोडीचे केलेले संपादन तसेच भावार्थ रामायणची तयार केलेली चिकित्सक प्रत महत्त्वाची आहे.

ना. गो. नांदापूरकर हे मराठवाड्यातील महत्त्वाचे कवी, लेखक, समीक्षक व मराठी विषयात पीएच.डी. मिळविणारे पहिले संशोधक आहेत. 'मुक्त मयुरांची महाभारते' या ग्रंथामध्ये त्यांचे संशोधन समाविष्ट आहे. याशिवाय भालचंद्र महाराज कहाळेकर (हरिचंद्राख्यान चे संपादन),

भिमराव परतुरकर (श्रीपतीकृत जोतिषरत्नमालाचा शोध), यज्ञेश्वर शास्त्री कस्तुरे (विकृतीधर्म आणि प्रवृत्तीधर्म, रसविचार), श्रीधर कुलकर्णी (नाथांचा भागवत धर्म, ओवी ते लावणी, प्राचीन मराठी गद्य प्रेरणा आणि परंपरा), भगवंत देशमुख (आलोक, पंतांची सात आख्याने, एकनाथ वाङ्मयदर्शन इ. संपादने), व. दा. कुलकर्णी (कवी डिंभ यांच्या श्रीकृष्णजन्माष्टमी या काव्याचे संपादन) इत्यादी लेखकांनी १९६० पूर्व कालखंडामध्ये मराठवाड्यातील साहित्य संशोधन व संपादनात महत्वपूर्ण योगदान दिले आहे.

साठोत्तरी कालखंडामध्ये मराठवाड्यामध्ये संशोधन व समीक्षा लेखन गतीमान झाले. देविसिंग चव्हाण हे साठोत्तर काळातील महत्त्वाचे संशोधक आहेत. मराठी आणि दख्खिनी हिंदी, उखाहरणाचा काळ, नामदेवांची छंदोरचना, ऋग्वेद : समस्या आणि उकल हे चव्हाण यांचे महत्त्वपूर्ण ग्रंथ आहेत. सेतू माधवराव पगडी हे मराठवाड्यातील एक बहुआयामी व्यक्तिमत्व आहे. सुफी संप्रदाय : तत्त्वज्ञान आणि कार्य, मिर्झा गालिब आणि त्यांच्या गझला, पानिपतचा संग्राम, मराठे व औरंगजेब, मराठवाड्यातील आधुनिक कविता, मराठवाड्यातील गद्य वाङ्मय इत्यादी ग्रंथ सेतू माधवराव पगडी यांनी लिहिले आहेत. स. रा. गाडगीळ हे साहित्य व तत्त्वज्ञानाचे अभ्यासक आहेत. मध्ययुगीन तसेच आधुनिक साहित्यावरील त्यांचे विश्लेषण हे मौलिक स्वरूपाचे आहे. काव्यशास्त्रप्रदीप, भारतीय धर्मविचार आणि संत, विचारमंथन, शोकात्म विश्वरूपदर्शन, मराठी साहित्यातील इंद्रधनू : कवयित्री इंदिरा संत यांचे काव्यसौंदर्य, मराठी काव्याचे मानदंड खंड-१, आणि खंड-२, साहित्यमीमांसा आणि समाजदर्शन हे महत्त्वपूर्ण ग्रंथ स. रा. गाडगीळ यांनी लिहिले आहे.

वा. ल. कुलकर्णी हे मराठवाड्यातील साहित्यसमीक्षेला वळण देणारे महत्त्वाचे समीक्षक आहेत. मराठीतील जवळपास सर्वच वाङ्मय प्रकारांवर व सर्वच प्रवाहांवर त्यांनी समीक्षा लेखन केले आहे. "ललित वाङ्मय कृतीचा प्रांजळपणे आस्वाद घेणे, या आस्वादात रममाण होतानाच तिच्या अंतःस्थरूपाचा शोध घेणे, वाङ्मयाच्या स्वरूपाविषयी विविध प्रश्न उपस्थित करणे, त्यांचा शोध घेण्याचा प्रयत्न करणे आणि या प्रश्नांना सामोरे जाताना कोणतेही निर्णायक उत्तर न देण्याची दक्षता घेणे ही त्यांच्या समीक्षालेखनाची वैशिष्ट्ये आहेत."[४७] वाङ्मयातील वादस्थळे, वाङ्मयीन टीपा आणि टिपणी, वाङ्मयीन दृष्टी आणि दृष्टिकोन, साहित्य आणि समीक्षा, साहित्य : शोध

आणि बोध, हरिभाऊंची सामाजिक कादंबरी, मराठी कविता : जुनी आणि नवी, नाटककार खाडीलकर : एक अभ्यास, तुकारामांची कविता, मराठी समीक्षा, मराठी नाटक आणि रंगभूमी, काव्यातील दुर्बोधता, एका पिढीचे आत्मकथन हे मौलिक ग्रंथ वा. ल. कुलकर्णी यांनी लिहिले आहेत. मराठीच नव्हे तर एकूण समीक्षालेखनाच्या इतिहासामध्ये वा. ल. कुलकर्णी यांचे लेखन दिशादर्शक आहे.

समीक्षा, संशोधन व संपादनातील यु. म. पठाण एक महत्त्वाचे नाव आहे. भाऊसाहेबांची बखर, मराठवाड्यातील लोककथा, परमानंदाचे अभंग, महानुभाव साहित्य संशोधन खंड-१, लीळाचरित्र : एकाक, सभासदी बखर, दृष्टांतपाठ, फार्सी मराठी अनुबंध, मराठी बखरीतील फार्सीचे स्वरूप, संत संग, मध्ययुगीन संतसाहित्य : काही आयाम, संत साहित्य पुनर्मूल्यांकन इत्यादी ग्रंथ त्यांच्या भाषा, साहित्य व संशोधनाविषयीच्या कार्याची साक्ष देतात. स. मा. गर्गे (इतिहासाची साधने : एक शोधयात्रा, स्वप्न आणि सत्य, समाजविज्ञान आणि संस्कृती), सुहासिनी इर्लेकर (यादवकालीन मराठी काव्यसमीक्षा, प्राचीन मराठी संतकवयित्रींचे वाङ्मयीन कार्य, तुकारामाची प्रभावळ, संतकवी आणि कवयित्री : एक अनुबंध, साहित्य संवाद, महदंबेचे धवळे, जनाबाईचे निवडक अभंग), ब्रह्मानंद देशपांडे (इयेनाथाचिये नगरी, चक्रपाणी, चिंतन, शब्दवेध, सप्तपर्णी, देवगिरीचे यादव), अनंतराव जगताप (इये मराठीचिये नगरी : गांधींजी, मराठी कवितेतील प्रेमाचे आणि सौंदर्याचे स्वरूप, हिंदी-मराठी कविता मे स्वच्छंद धारा) इत्यादी समीक्षकांचे लेखन महत्त्वपूर्ण आहे.

नरहर कुरुंदकर हे चिंतनशील, व्यासंगी व तर्कशुद्ध समीक्षक आहेत. केवळ मराठवाडाच नव्हे तर मराठी समीक्षेच्या वाटचालीमध्ये कुरुंदकर हे नाव आदराने घेतले जाते. रिचर्डस्‌ची कलामीमांसा, मागोवा, धार आणि काठ, छत्रपती शिवाजी महाराजांचे जीवनरहस्य, भजन, आकलन, आरक्षणाचा प्रश्न, रससूत्र, रसविमर्श, रंगशाळा, रूपवेध इत्यादी ग्रंथामधून कुरुंदकारांच्या प्रतिभासामर्थ्याचे दर्शन घडते. जनार्दन वाघमारे यांचे अमेरिकन निग्रो : साहित्य आणि संस्कृती, साहित्यचिंतन, दलित साहित्याची वैचारिक पार्श्वभूमी, अमेरिकन ब्लॅक लिटरेचर इत्यादी ग्रंथ अभ्यासनीय आहेत. के. रं. शिरवाडकर हे आणखी एक महत्त्वाचे समीक्षक आहेत.

आपले विचारविश्व, रंगविश्वातील रसयात्रा, विल्यम शेक्सपिअर, मार्क्सवादी साहित्यविचार, साहित्यातील विचारधार या ग्रंथांमधून शिरवाडकर यांचे समीक्षालेखन सिद्ध झाले आहे.

सुधीर रसाळ यांनी समीक्षाक्षेत्रात मोलाचे योगदान दिले आहे. कविता आणि प्रतिमा, काही मराठी कवी : जाणिवा आणि शैली, वाङ्मयीन संस्कृती, समीक्षक भालचंद्र नेमाडे, मर्ढेकरांचे कथात्म आणि नाट्यात्म वाङ्मय, कविता निरूपणे, ना. घ. देशपांडे यांची कविता, मर्ढेकरांची कविता : आकलन आणि विश्लेषण इत्यादी मौलिक ग्रंथांचे लेखन सुधीर रसाळ यांनी केले आहे.

चंद्रकांत पाटील हे अनुवादक व समीक्षक म्हणून प्रसिद्ध आहेत. आणि म्हणूनच, विषयांतर आणि तोपर्यंत, पाटीवरच्या टीपा, कवितेसमक्ष इत्यादी महत्त्वपूर्ण समीक्षा ग्रंथ चंद्रकांत पाटील यांनी लिहिले आहेत. किंबहुना या समीक्षाग्रंथातून रवींद्र किंबहुने यांचा समीक्षाविचार सिद्ध झाला आहे तर प्रभाकर बागले यांनी निमित्ताच्या निमित्ताने, साहित्य आणि सांस्कृतिक संवदेन, राजकीय रंगभूमी आणि आमदार सौभाग्यवती, कृष्णवर्णीय नाट्यत्रयी या समीक्षात्मक व संपादीत ग्रंथातून आपला समीक्षा विचार मांडला आहे. उषा हस्तक या आणखी एक महत्त्वाच्या समीक्षक आहेत. कादंबरी आणि मराठी कादंबरी, मराठीतील आत्मचरित्रपर लेखन, हरिभाऊंच्या कादंबरीतील व्यक्ती हे ग्रंथ उषा हस्तक यांनी लिहिले आहेत.

बाळकृष्ण कवठेकर (वाङ्मयीन चर्चा आणि चिकित्सा, दलित साहित्य : एक आकलन, प्रतिसाद, लेखप्रभा), सूर्यनारायण रणसुभे (अनुवादाचे समाजशास्त्र, कहाणी संस्कृती), नंदू मुलमुले (रचनेच्या खोल तळाशी), प्रकाश मेदककर (सामाजिक नाटक : स्वरूप विचार, नाटक : लोक आणि लौकिक, साहित्यविचार : प्रदेश आणि परिसर), प्रकाश देशपांडे (मराठी कविता : नवी वळणे, संत कविता, आधुनिक मराठी कविता, समकालीन मराठी कविता), चंद्रकांत धांडे (मराठी नाट्यसमीक्षेचा विकास १८४३ ते १९४७, नाट्यमंथन), कौतिकराव ठाले पाटील (संमेलनाच्या मांडवाखालून, मराठी भाषिक आणि वाङ्मयीन संस्कृती), सतीश साळुंके (बीड जिल्ह्यातील शिलालेख, ताम्रपट, हैद्राबादचा स्वातंत्र्यसंग्राम आणि बीड जिल्ह, मराठवाडवाड्याची नाट्यपरंपरा), केशव तुपे (साहित्य : सर्जन आणि संदर्भ, साहित्याचे सांस्कृतिक संचित, साहित्यविचार, अनुवादमीमांसा), सतीश बडवे (मध्ययुगीन साहित्याविषयी, साहित्याची सामाजिकता, संत साहित्य समीक्षेचे बीजप्रवाह, संत एकनाथ समग्र अभ्यास, संत रामदास : एक पुनर्विचार), विद्यासागर

पाटंगणकर (मध्ययुगीन साहित्याचा इतिहास, जनीजनार्दन, ज्ञानेश्वर ते तुकाराम, लीळाचरित्र : एकाक), मधू जामकर (मराठी कविता : ध्यास आणि अभ्यास, मराठी नाटक : सृष्टी आणि दृष्टी, ग्रंथोपजीविये), फ. मुं. शिंदे (स्वान्त, कालमान निरूपण), भास्कर कुलकर्णी (नाटककार बेंडे : व्यक्ती आणि वाङ्मय), पी. विठ्ठल (जागतिकीकरण : सामाजिक वास्तव आणि समकालीन कविता, मराठी कविता : समकालीन परिदृश्य, विशाखा : एक परिशिलन) इत्यादी अभ्यासकांनी मराठवाड्यातील समीक्षा व संशोधनात मौलिक भर घातली आहे.

मराठवाड्यातील एक चिंतनशील समीक्षक म्हणून श्रीपाल सबनिस हे महत्त्वाचे नाव आहे. प्रामुख्याने वैचारिक व समीक्षा लेखनाचे काम सबनिस यांनी केले आहे. आदिवासी प्रतिभावंतांचे मराठी साहित्य, आंबेडकरी प्रतिभावंतांचे प्रज्ञाविलास, इहवादी संस्कृती शोध, कलासंचित, तौलनिक साहित्य आणि भाषांतरमीमांसा, संत नामदेव-तुकारामांचे सांस्कृतिक संचित, नामदेवांचे संतत्व आणि कवित्व, प्रतिभावंत मराठी लेखिका, ब्राह्मणी सत्यशोधकांचे अब्राह्मणी सौंदर्यशास्त्र, संत साहित्यातील सेक्यूलॅरिझम, ज्ञानेश्वर ते आंबेडकर इत्यादी समीक्षा ग्रंथ सबनिस यांनी लिहिले आहेत.

साठोत्तरी साहित्याची चिकित्सा करणारे प्रल्हाद लुलेकर हे मराठवाड्यातील आणखी एक समीक्षक आहेत. त्यांनी संख्यात्मकदृष्ट्या विपूल प्रमाणात समीक्षालेखन केले आहे. वेध आणि वेधक, प्रतिभेचे प्रदेश, वेदनांचा प्रदेश, पंचधारांचा प्रदेश, साठोत्तरी साहित्य प्रवाह भाग-१, साठोत्तरी साहित्य प्रवाह भाग-२, बहुजन संस्कृतीचे जनक, मराठवाड्यातील साहित्य, आस्वाद आणि समीक्षा, भंजनाचे भंजन इत्यादी समीक्षाग्रंथ प्रल्हाद लुलेकर यांनी लिहिले आहेत. मराठवाड्यातील साहित्यसमीक्षेचा इतिहास लिहिणारे देवकर्ण मदन हे मराठवाड्यातील आणखी एक महत्त्वाचे समीक्षक आहेत. साहित्य : रूप आणि गंध, मराठवाड्यातील साहित्यसमीक्षा आणि संशोधन, शरच्चंद्र मुक्तिबोध : साहित्य आणि समीक्षा भाग-१, भाग-२ व भाग-३, हे मौलिक ग्रंथ देवकर्ण मदन यांनी लिहिले आहेत. केशव सखाराम देशमुख यांचे फ. मुं. शिंदे यांची काव्यप्रतिभा, भाषाचिंतन व चिंतनाचा समुद्र हे समीक्षालेखन महत्त्वाचे आहे.

साठोत्तर कालखंडामध्ये ग्रामीण साहित्य चळवळ सुरू झाली. या चळवळीला मराठवाड्यातील लेखक-समीक्षकांनी व्यापक रूप दिले. रा. रं. बोराडे, नागनाथ कोत्तापल्ले,

भास्कर चंदनशिव व वासुदेव मुलाटे यांनी ग्रामीण साहित्य चळवळीला आकार देत असताना मूलभूत साहित्यनिर्मिती व समीक्षात्मक लेखनही केले आहे. ग्रामीण साहित्य : चळवळ आणि निर्मिती, ग्रामीण साहित्यनिर्मिती, ग्रामीण साहित्याची चळवळ, ग्रामीण साहित्य, नाटक आणि रंगभूमी इत्यादी ग्रंथ रा. रं. बोराडे यांनी लिहिले आहेत. नागनाथ कोत्तापल्ले यांनी आपल्या समीक्षात्मक लेखनाने मराठवाड्यातील व एकूणच मराठी समीक्षा लेखनात मौलिक भर घातली आहे. त्रिज्या, ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि शोध, आधुनिक मराठी कविता : काही दृष्टिक्षेप, पापुद्रे, साहित्याचा अवकाश, साहित्याचा अन्वयार्थ, नवकथाकर शंकर पाटील, मराठी कविता : आकलन आणि आस्वाद, आस्वाद आणि समीक्षा, संतांची स्वप्नदृष्टी, इत्यादी समीक्षा ग्रंथाबरोबर निवडक बी. रघुनाथ, स्त्री-पुरूष तुलना, संत तुकारामाचे आत्मवृत्त, शेतकऱ्यांचा असूड ही संपादनेही नागनाथ कोत्तापल्ले यांनी केली आहेत.

भास्कर चंदनशिव हे मोजकेच पण मौलिक ललित व समीक्षात्मक लेखन करणारे लेखक आहेत. जाणिवपूर्वक समीक्षालेखन केले नसले तरी भूमी आणि भूमिका, माती आणि मंथन, माती आणि नाती या ग्रंथातून त्यांचे समीक्षात्मक लेखन समोर येते. शेतकऱ्यांचा असूड, अखंड काव्यरचना, स्त्री पुरुष तुलना, ग्रामीण आत्मकथन ही संपादनेही चंदनशिव यांनी केली आहेत.

वासुदेव मुलाटे यांनी ग्रामीण साहित्याविषयी मूलभूत समीक्षालेखन केले आहे. "वासुदेव मुलाटे हे दलित साहित्य आणि ग्रामीण साहित्य दोन्ही प्रवाहाबद्दल समान वेदनांच्या मुळाशी जाऊन साधर्म्य शोधताना दिसतात..... वासुदेव मुलाटे यांच्या साहित्यसमीक्षेचे स्वरूप लक्षात घेतले तर त्यात जीवनवादाला, माणसाच्या माणूसपणाला, आधुनिक लोकशाही मूल्यांना, शोषणमुक्त व्यवस्थेला आणि ग्रामीण समाजाच्या उन्नयनाला महत्त्वाचे स्थान प्राप्त झालेले दिसते."[४८] ग्रामीण कथा : स्वरूप आणि विकास, ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि दिशा, सहा दलित आत्मकथने : एक चिंतन, साहित्य : रूप आणि स्वरूप, ग्रामीण साहित्य : चिंतन आणि चर्चा, साहित्य, समाज आणि परिवर्तन, बिंब प्रतिबिंब, शोध जाणिवांचा, साहित्य : स्वागत आणि समीक्षा या समीक्षा ग्रंथाबरोबर मराठवाड्याची कथा, ग्रामीण साहित्य चळवळ आणि आम्ही, महदंबेचे धवळे, संगीत सौभद्र, ग्रामायण ही संपादनेही वासुदेव मुलाटे यांनी केली आहेत.

दादा गोरे यांचे साहित्य लेखनाबरोबर समीक्षा लेखनातही महत्त्वाचे योगदान आहे. गोनिदांची प्रादेशिक कादंबरी, ऐतिहासिक चरित्रात्मक कादंबरी, साहित्य : समीक्षा आणि आस्वाद, साहित्यरूप, काव्यसंवेदन या ग्रंथाचे संपादनही दादा गोरे यांनी केले आहे. एस. एस. भोसले यांचे साहित्य आणि समीक्षा, सूर्ययुगाची सुरूवात, प्रेरणा आणि निर्मिती, अधिक उणे हे ग्रंथ महत्त्वाचे आहेत.

कवी म्हणून प्रसिद्ध असणारे इंद्रजित भालेराव यांनी मूलभूत समीक्षालेखन केले नसले तरीही त्यांनी संपादीत केलेल्या पुस्तकांतून त्यांचा समीक्षाविचार दृष्टीस येतो. समग्र बी. रघुनाथ, भिंगुळवाणा, बहिणाबाई चौधरी, ताराबाई शिंदे, गाऊ जीजाऊस आम्ही, लाला चिखल इत्यादी संपादने इंद्रजित भालेराव यांनी केली आहेत. ललित लेखिका म्हणून प्रसिद्ध असलेल्या मथू सावंत यांनी कथाकार भास्कर चंदनशिव, समाज, साहित्य आणि संस्कृती, साहित्य सौरभ, सर्जनाचा शोध इत्यादी समीक्षाग्रंथ लिहिले आहेत.

गजमल माळी हे सत्यशोधकी विचारधारेतील साहित्यिक व समीक्षक आहेत. प्राचीन आख्यानक कविता, तुकारामाचे निवडक १०० अभंग, लोकसाहित्य शब्दकोश, महात्मा फुले यांचे निवडक विचार इत्यादी संपदनांमधून त्यांचा समीक्षाविचार सिद्ध झाला आहे. जी. ए. उगले यांचे महात्मा फुले : एक मुक्त चिंतन, दिनबंधू आणि तानुबाई बिर्जे, सत्यशोधकांचे ओतूर इत्यादी ग्रंथ प्रकाशित आहेत. श्रीराम गुंदेकर यांनी सत्यशोधकी साहित्य : परंपरा आणि स्वरूप, ग्रामीण साहित्य : प्रेरणा आणि प्रयोजन, महात्मा फुले यांची अखंड रचना, महात्मा जोतिबा फुले : साहित्य आणि साहित्यमूल्य हे समीक्षा ग्रंथ लिहिले आहेत. याशिवाय संभाजी खराट (महात्मा फुले आणि निर्मिक, सत्यशोधक जलसे, शेतकऱ्यांचा कैवारी), रावसाहेब ढवळे (प्रसारमाध्यमे : वार्तापत्र लेखनकौशल्य, रॉबर्ट गिल-पारो : अजिंठ्याच्या डोंगरदऱ्यात विखुरलेली प्रेम कहाणी), संजय शिंदे (डॉ. वासुदेव मुलाटे : साहित्य आणि समीक्षा, अण्णा भाऊ साठे यांची परिवर्तनवादी कथा, अण्णा भाऊ साठे यांच्या विद्रोही कथा), मारोती कसाब (समकालीन साहित्य आणि समीक्षा) या समीक्षकांचेही मराठवाड्यातील साहित्य समीक्षेच्या वाटचालीत महत्त्वाचे योगदान आहे.

मराठवाडा ही दलित साहित्याची बीजभूमी आहे. दलित साहित्यासोबतच दलित साहित्य समीक्षाही मराठवाड्यात मोठ्या प्रमाणात लिहिली गेली. समीक्षक व विचारवंत गंगाधर पानतावणे

यांनी सुरू केलेल्या अस्मितादर्श या वाङ्मयीन नियतकालिकामुळे दलित लेखक समीक्षकांच्या अनेक पिढ्या लिहित्या झाल्या. अस्मितादर्श या नियतकालिकाचे कामकाज सुरू असतानाच गंगाधर पानतावणे यांनी महत्त्वाचे वैचारिक व समीक्षात्मक लेखन केले आहे. साहित्यनिर्मिती : चर्चा आणि चिकित्सा, मूल्यवेध लेणी, साहित्य : प्रकृती आणि प्रवृत्ती, आंबेडकरी जाणिवांची आत्मप्रत्ययी कविता, अर्थ आणि अन्वयार्थ, दलित वैचारिक वाङ्मय इत्यादी ग्रंथातून गंगाधर पानतावणे यांचा समीक्षाविचार सिद्ध झाला आहे.

दत्ता भगत हे दलित साहित्य चळवळीतील महत्त्वाचे नाटककार व समीक्षक आहेत. प्रामुख्याने नाटक या वाङ्मय प्रकारांसंबंधीचे समीक्षा लेखन भगत यांनी केले आहे. दलित साहित्य : वाङ्मयीन प्रवाह, दलित साहित्य : दिशा आणि दिशांतर, निळी वाटचाल, साहित्य समजून घेताना, नाटककार विजय तेंडूलकर : व्यक्ती आणि वाङ्मय, मराठी नाटक आणि रंगभूमीचा इतिहास या समीक्षाग्रंथासह तृतीयरत्न, सभासदाची बखर इत्यादी संपादनेही दत्ता भगत यांनी केली आहेत.

त्र्यंबक महाजन हे नाट्यलेखन व नाट्यसमीक्षा क्षेत्रात लेखन करणारे महत्त्वाचे नाव आहे. नाट्यधर्मी मराठवाडा, दलित रंगमंच, राजकीय रंगभूमी आणि आमदार सौभाग्यवती हे समीक्षात्मक व संपादित लेखन त्र्यंबक महाजन यांनी केले आहे. अविनाश डोळस हे नाटककार व समीक्षक म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांनी आंबेडकरी विचार आणि साहित्य, सम्यकदृष्टीतून, आंबेडकरी चळवळ : परिवर्तनाचे संदर्भ, मराठी दलित कथा हे समीक्षात्मक ग्रंथ लिहिले आहेत.

ललित लेखक म्हणून विख्यात असणारे रुस्तुम अचलखांब यांनी समीक्षा लेखनातही महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. लोकरंगभूमी व आधुनिक रंगभूमीचे चिंतन त्यांच्या ग्रंथात आले आहे. अभिनवशास्त्र, आधुनिक रंगभूमीचे शिल्पकार, मराठी रंगभूमीचे प्रारंभपर्व, तमाश, लोकरंगभूमी, रंगभूमी : पाश्चिमात्य आणि पौर्वात्य हे मौलिक समीक्षग्रंथ रुस्तुम अचलखांब यांनी लिहिले आहेत. ऋषिकेश कांबळे हे वैचारिक व समीक्षात्मक लेखनातील महत्त्वाचे नाव आहे. मराठी दलित कविता आणि अमेरिकन ब्लॅक पोएट्री, अस्तित्व आणि अस्मिता, कालवाह, वादाचिये गावा हे त्यांचे समीक्षाग्रंथ प्रकाशित आहेत.

डी. बी. जगत्पुरिया हे परिवर्तनवादी भूमिकेतून लेखन करणारे समीक्षक आहेत. मूल्याक्ष : कवितेची सम्यक समीक्षा, सत्वसार, माझी कविता व कवितेची समीक्षा, सृजनपर्व इत्यादी ग्रंथातून त्यांची काव्य समीक्षा सिद्ध होते. डी. बी. जगत्पुरिया यांच्या प्रमाणेच सुरेश पैठणकर (उत्तम बंडू तुपे यांचे साहित्य : आस्वाद आणि समीक्षा, साहित्य, समाज आणि संस्कृती, दलित स्वकथनांचे अंतरंग, साद प्रतिसाद), यादव गायकवाड (दलित रंगभूमी आणि नाटककार : प्रकाश त्रिभुवन, भीमरायाचा मळा), अनंत राऊत (विद्रोहमूल्य, मूल्यनिष्ठ जडणघडणीत साहित्याची भूमिका), कमलाकर कांबळे (दलित साहित्य : शोध आणि आस्वाद), संजय मून (शैली : दलित कवितेची), गौतम गायकवाड (सूर्यवंशीय कवितांचा आस्वाद), कीर्तीकुमार मोरे (साहित्यातील जाणिवा : स्वरूप आणि विश्लेषण, साहित्य : आकलन आणि अन्वयार्थ, आंबेडकरी चळवळ आणि दलित साहित्य, समग्र उर्मिला पवार : स्त्रिवादी आकलन), दुष्यंत कटारे (संत चोखामेळा आणि कर्ममेळा यांच्या अभंगातील दलित जाणीव, क्रांतिगर्भाची शाहिरी : शाहीर अमरशेख), मनोहर शिरसाट (सुंबरान आकलन आणि भूमिका), मनोज मुनेश्वर (भटक्या विमुक्तांची कविता : निर्मितीप्रक्रिया आणि भूमिका) यांचे समीक्षा लेखनही मराठवाड्यातील समीक्षेच्या वाटचालीत ललामभूत ठरणारे आहे.

एकविसाव्या शतकातील मराठवाड्याच्या समीक्षेच्या वाटचालीस योगदान देणाऱ्या समीक्षकांमध्ये अनेकांचे समीक्षा लेखन महत्त्वाचे आहे. अशा समीक्षकांमध्ये पृथ्वीराज तौर (साहित्यकारण), रामचंद्र काळुंखे (ग्रामीण कादंबरी : आकलन आणि विश्लेषण, आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास १९६० ते २०००, ग्रामीण वाङ्मयाचा इतिहास), संगीता मोरे (प्रतिष्ठानचे वाङ्मयीन कार्य, मराठवाड्यातील म्हणी), जयध्रत जाधव (जागतिकीकरण मराठी भाषा : आव्हाणे आणि उपाय, १९८० नंतरचे मराठी साहित्य : स्वरूप आणि समीक्षा), यशपाल भिंगे (प्रत्ययाप्रति), शंकर विभूते (स्वातंत्र्योत्तर मराठी कादंबरीची वाटचाल, आधुनिक मराठी कादंबरीतील सामाजिकता), भगवान काळे (मराठवाडा सारस्वत, मराठवाडा : काल, आज आणि उद्या), शिवाजीराव देशमुख (आदिवासी ठाकरांचे लोकसाहित्य), सर्जेराव जिगे (महाभारतातील स्त्रिया : नवा अन्वयार्थ), सदाशिव सरकटे (साहित्यसमीक्षेची मूलतत्त्वे, साहित्यशास्त्र), नवनाथ गोरे (दंडारन : एक शोध), कैलास इंगळे (वांङ्मयीन मराठवाडा), सुरेश सावंत (प्रत्ययाचे प्रांत,

अक्षरयात्री), रमेश जाधव (ग्रामीण कथा : वास्तवता आणि रंजकता), अशोक देशमाने (मराठी कथा : रूप आणि परिसर, वारकरी आविष्कार), ललित अधाने (नाट्यानुबंध), संदीप बनसोडे (विजय तेंडुलकर यांच्या नाटकातील स्त्रीप्रतिमा), विश्वास वसेकर (मराठी बालसाहित्य, बालसाहित्याचे अंतरंग), अरूण देशपांडे (बालसाहित्य मराठवाड्याचे), लता मोहरीर (शेक्सपिअर आणि मराठी नाटक), रामदास केदार (बालसाहित्य : वाटा आणि वळणे), गणेश मोहिते (समकालीन मराठी कादंबरी, अनुबंधाची प्रेरणा), केदार काळवणे (ग्रामीण साहित्य : संकल्पना आणि समीक्षा, कल आणि कस) यांचे समीक्षात्मक लेखन मराठवाड्यातील समीक्षा लेखनाच्या वाटचालीमध्ये महत्त्वाचे आहे.

कैलास अंभुरे हे मराठवाड्यातील नव्या पिढीतील समीक्षक आहेत. त्यांचा समीक्षाग्रंथ प्रत्यक्षात प्रकाशित झाला नसला तरी कथात्म साहित्यासंदर्भात विविध नियतकालिकांमधून त्यांचे समीक्षा लेखन प्रकाशित झाले आहे. त्यासोबतच ताहेर पठाण, न. ब. कदम, उमेश मोहिते यांचेही तरुण पिढीतील समीक्षालेखनात मोलाचे योगदान आहे. गिरिधर पांडे व तुषार बोडखे हे वाङ्मयावर आणि विशेषतः नाट्य वाङ्मयावर प्रेम करणारे पत्रकार आहेत. वेगवेगळ्या नाट्य स्पर्धांमध्ये व महोत्सवामध्ये उपस्थित राहून त्या नाटकांचे महाराष्ट्र टाईम्स या दैनिकासाठी परिक्षण लिहिण्याचे काम या दोघांनी सातत्याने केले आहे. महाराष्ट्र टाईम्ससाठी त्यांनी केलेले नाट्यपरिक्षण हे केवळ परिक्षण न राहता ते आस्वादात्मक समीक्षेच्या पातळीवर पोहोचते. त्यामुळे मराठवाड्यातील आस्वादात्मक समीक्षा लेखनामध्ये मौलिक भर पडली आहे.

१.२.१० मराठवाड्यातील नाट्यलेखन :

मराठवाड्यातील आणि एकूण मराठीतील नाट्यलेखनाचे मूळ विधिनाट्यामध्ये आढळते. विविध प्रकारच्या लोककलांमध्ये नाट्यात्मकता आढळत असल्यामुळे लोककलांमधून मराठी नाटकाचा उगम झाला असे लोकसाहित्य अभ्यासकांचे मत आहे. भारूड हे एकपात्री नाटक असून विष्णुदास भावे यांच्या सीता स्वयंवर या नाटकाप्रमाणेच एकनाथी भारूडामध्येही सर्व नाट्य घटक आढळतात. म्हणून संत एकनाथ महाराज हेच मराठवाडा आणि मराठी रंगभूमीचे जनक आहेत, असे मराठवाड्यातील अनेक नाट्य अभ्यासक मानतात.

आधुनिक नाट्यलेखनाचा विचार केल्यास मराठवाड्यामध्ये १९१९ मधील भगवंत तोडेवाले यांचे संगीत चुडाला हे पहिले नाटक आहे असे म्हटले जाते. स्वातंत्र्यपूर्व कालखंडामध्ये मराठवाड्यात अत्यल्प नाट्यलेखन झाले. श्रीपाद बेंडे, दिवाकर कृष्ण केळकर, शंकरलाल पूरवार अशा मोजक्याच नाटककारांनी स्वातंत्र्यपूर्व कालखंडात नाट्यलेखन केले आहे. स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये मात्र मराठवाड्यामध्ये आशय-विषयाच्या दृष्टिने वैविध्यपूर्ण नाट्यलेखन झाले आहे. प्रायोगिक रंगभूमी ही मराठवाड्यातील नाट्यलेखनाची मुख्य धारा असून अत्यल्प प्रमाणात व्यावसायिक नाट्यलेखन मराठवाड्यामध्ये आढळते. त्र्यंबक महाजन, म. भि. चिटणीस, दत्ता भगत, लक्ष्मणराव देशपांडे, कुमार देशमुख, प्रकाश त्रिभुवन, अजित दळवी, प्रशांत दळवी, सूर्यकांत सराफ, रा. रं. बोराडे, रेखा बैजल, किरण पोत्रेकर, भारत सासणे, दासू वैद्य, धनंजय सरदेशपांडे, बब्रूवान रूद्रकंठावार, ऋषिकेश कांबळे, राजकुमार तांगडे, अरविंद जगताप इत्यादी नाटककारांनी मराठवाड्यातील नाट्यलेखनाची परंपरा समृद्ध केली आहे. प्रस्तुत प्रकल्पाच्या पुढील तीन प्रकरणांमध्ये मराठवाड्यातील नाट्यलेखनासंदर्भात विस्तृत विवेचन केले आहे.

समारोप :

मराठवाड्यातील एकूण साहित्यलेखनामध्ये मध्ययुगीन व आधुनिक अशा दोन्ही कालखंडामध्ये विपूल अशी वाङ्मय निर्मिती झाली आहे. मध्ययुगीन कालखंडातील कवी मुकुंदराज, संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ, संत रामदास, महदंबा, मुक्तेश्वर, वामन पंडीत इत्यादी साहित्यिकांनी एकूण मराठी साहित्याची परंपरा समृद्ध केली आहे. 'मराठवाड्यातील साहित्य म्हणजेच मराठी साहित्य' अशी अवस्था मध्ययुगीन मराठी वाङ्मयाची आहे. आधुनिक कालखंडामध्येही आपल्या लेखनाने मराठी साहित्यात मानाचे स्थान मिळवणारे अनेक लेखक मराठवाड्यात आहेत. बी. रघुनाथ, वा. रा. कांत, रा. रं. बोराडे, ना. धों. महानोर, फ. मुं. शिंदे, भास्कर चंदनशिव, नागनाथ कोत्तापल्ले, दत्ता भगत, अजित दळवी, प्रशांत दळवी, इंद्रजित भालेराव, असाराम लोमटे इत्यादी लेखकांनी मराठी साहित्याचे दालन समृद्ध केले आहे. मुस्लिम राजवटीमुळे मराठवाड्यातील साहित्यलेखनात खंड पडला नसता तर आज एकूण मराठी वाङ्मयाच्या केंद्रस्थानी मराठवाड्यातील साहित्यिक राहिले असते.

संदर्भसूची

१. कोत्तापल्ले नागनाथ, मराठी साहित्यातील मराठवाड्याचे योगदान, मराठवाड्यातील साहित्य, संपा. प्रल्हाद जी. लुलेकर/सतीश बडवे, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद, प. आ. २००७, पृ. २१.

२. पाटंगणकर विद्यासागर, मराठवाड्यातील संत साहित्य, मराठवाडा : सृजन आणि साहित्य, संपा. मिलिंद कांबळे, इसाप प्रकाशन, नांदेड, प. आ. २०११, पृ. ५१.

३. मोरे सदानंद, नाथ संप्रदाय, मराठी वाङ्मयकोश खंड चौथा, संपा. विजया राजाध्यक्ष, म.रा.सा.सं. मंडळ, मुंबई, प. आ. २००२, पृ. १७६.

४. लुलेकर प्रल्हाद, मराठवाड्यातील मराठी वाङ्मयाचा इतिहास, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, प. आ. २०२१, पृ. १३५.

५. धोंड म. वा., वारकरी संप्रदाय, मराठी वाङ्मयकोश, खंड चौथा, संपा. विजया राजाध्यक्ष, म.रा.सा.सं. मंडळ, मुंबई, प. आ. २००२, पृ. ३२३.

६. गिंडे वा. पु., निवडक लेखांचा संग्रह, संपा. सतीश बडवे, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, प. आ. २००३, पृ. ३६.

७. नेमाडे भालचंद्र, टीकास्वयंवर, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, ति. आ. २०१५, पृ. ५१.

८. नसिराबादकर ल. रा., प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर, आवृत्ती ९ वी, २००६, पृ. ११९.

९. आडगावकर सुरेखा, संत एकनाथांचा धर्मविचार, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, प. आ. २०१२, पृ. १२८.

१०. नसिराबादकर ल.रा., प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर, आवृत्ती ९ वी, २००६, पृ. १२०.

११. नसिराबादकर ल. रा., प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर, आवृत्ती ९ वी, २००६, पृ. ९.

१२. सरदार गं. बा., संत वाङ्मयाची सामाजिक फलश्रुती, लोकवाङ्मय गृह, मुंबई, आवृत्ती आठवी, २०१०, पृ. १४१.

१३. तुळपुळे शं. गो., पाच संतकवी, व्हीनस प्रकाशन, पुणे, १९६२, पृ. ३८९.

१४. पटवर्धन वा. ब., उद्धृत, नसिराबादकर ल. रा., प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर, आवृत्ती ९ वी, २००६, पृ. १४४.

१५. भावे वि. ल., महाराष्ट्र सारस्वत, खंड १, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, सहावी आवृत्ती, १९८२, पृ. ३६५.

१६. कोत्तापल्ले नागनाथ, मराठी साहित्यातील मराठवाड्याचे योगदान, मराठवाड्यातील साहित्य, संपा. प्रल्हाद जी. लुलेकर/सतीश बडवे, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद, प्र. आ. २००७, पृ. २२.

१७. अदवंत म. ना., प्रदक्षिणा खंड पहिला, संपा. अनिरुद्ध कुलकर्णी, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, प. आ. १९४१, पु. मु. २००७, पृ. १२५.

१८. बी. रघुनाथ, स्वतःविषयी, समग्र बी. रघुनाथ खंड दुसरा, संपा. इंद्रजित भालेराव/श्रीकांत उमरीकर, गणेश वाचनालय व बी. रघुनाथ विश्वस्त समिती, परभणी, पृ. ४३५.

१९. भालेराव इंद्रजित, प्रस्तावना, समग्र बी. रघुनाथ, उनि, पृ. ७.

२०. लुलेकर प्रल्हाद, मराठवाडा : इतिहास, साहित्य आणि संस्कृती, विद्यापीठ अनुदान आयोगाला सादर केलेल्या अप्रकाशित बृहत संशोधन प्रकल्प, मार्च २०१५, पृ. २१२.

२१. गोरे दादा, मराठवाड्यातील कथा, मराठवाडा सृजन आणि साहित्य, संपा. मिलिंद कांबळे, इसाप प्रकाशन, नांदेड, प. आ. २०११, पृ. १८०.

२२. कदम जगदीश, मराठवाड्यातील ग्रामीण कथा, मराठवाडा : सृजन आणि साहित्य, संपा. मिलिंद कांबळे, इसाप प्रकाशन, नांदेड, प. आ. २०११, पृ. १९३-९४.

२३. भालेराव इंद्रजित, मलपृष्ठ, लाल चिखल (निवडक भास्कर चंदनशिव), लोकवाङ्मय गृह, मुंबई, दु. आ. २०१२.

२४. शिंदे संजय, नागनाथ कोत्तापल्ले : व्यक्ती आणि वाङ्मय, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, प. आ. २०१०, पृ. १६.

२५. भोळे भा. ल., मलपृष्ठ, आलोक, आसाराम लोमटे, शब्द पब्लिकेशन, ति. आ. २०१७.

२६. हातकणंगलेकर म.द., महाराष्ट्र टाईम्स, दि. ५ डिसेंबर २०२०, उद्धृत मलपृष्ठ, आलोक, आसाराम लोमटे, शब्द पब्लिकेशन, मुंबई, ती.आ. २०१७.

२७. कदम जगदीश, मराठवाड्यातील कथा वाङ्मय, मराठवाड्यातील साहित्य, संपा. प्रल्हाद जी. लुलेकर/सतीश बडवे, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद, प. आ. २००७, पृ. ११६.

२८. इंगळे कैलास, वाङ्मयीन मराठवाडा, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, प. आ. २०१७, पृ. २८१.

२९. मुलाटे वासुदेव, मराठवाड्यातील कादंबरी लेखनाचे स्वरूप, मराठवाड्यातील साहित्य, संपा. प्रल्हाद जी. लुलेकर/सतीश बडवे, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद, प. आ. २००७, पृ. १३३.

३०. पैठणकर सुरेश, मराठवाड्यातील कादंबरीलेखन : एक दृष्टिक्षेप, मराठवाड्यातील मराठी कादंबरीची स्वरूप-वैशिष्ट्ये, संपा. दत्तात्रय आघाव/मधुकर क्षीरसागर/रामनाथ वाढे, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, प. आ. मे. २०१३, पृ. २२.

३१. मुलाटे वासुदेव, मराठवाड्यातील कादंबरीलेखनाचे स्वरूप, मराठवाड्यातील साहित्य, संपा. प्रल्हाद जी. लुलेकर/सतीश बडवे, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद, प. आ., सप्टेंबर २००७, पृ. १३९.

३२. तत्रैव, पृ. १४०.

३३. लुलेकर प्रल्हाद, मराठवाड्यातील मराठी वाङ्मयाचा इतिहास, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, प. आ. एप्रिल २०२१, पृ. २४०.

३४. लुलेकर प्रल्हाद, मराठवाडा : इतिहास, साहित्य आणि संस्कृती, विद्यापीठ अनुदान आयोगाला सादर केलेला बृहत शोधप्रकल्प, मार्च २०१५, पृ. २७८.

३५. मुलाटे वासुदेव, मराठवाड्यातील कादंबरीलेखनाचे स्वरूप, मराठवाड्यातील साहित्य संपा. प्रल्हाद जी. लुलेकर/सतीश बडवे, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद, प. आ. २००७, पृ. १४३.

३६. पांडे श्रीनिवास, मराठवाड्यातील कविता (१९०० ते १९६०) मराठवाड्यातील साहित्य, संपा. प्रल्हाद जी. लुलेकर/सतीश बडवे, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद, प. आ. २०००, पृ. ७९-८०.

३७. कोत्तापल्ले नागनाथ (संपा.), निवडक बी. रघुनाथ, साहित्य अकादमी, नवी दिल्ली, प. आ. १९९५, पृ. ४०.

३८. कोत्तापल्ले नागनाथ (संपा.), निवडक बी. रघुनाथ, साहित्य अकादमी, नवी दिल्ली, प. आ., १९९५, पृ. ५४.

३९. घवी रवींद्र, स्वातंत्र्योत्तर कविता, प्रदक्षिणा खंड दुसरा, संपा. अनिरूद्ध कुलकर्णी, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, प. आ. १९९१, पृ. १४.

४०. रसाळ सुधीर, कांत : एक अंतर्बाह्य कवी, प्रतिष्ठान स.ऑ.नो.डि. २०२०, संपा. आसाराम लोमटे, पृ. ५

४१. इंगळे कैलास, वाङ्मयीन मराठवाडा, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, प. आ. जाने. २०१७, पृ. २६२.

४२. तौर पृथ्वीराज, १९७५ नंतरची मराठी कविता आणि त्यातील वैविध्यपूर्ण जाणिवा, मराठवाड्यातील साहित्य, संपा. प्रल्हाद जी. लुलेकर/सतीश बडवे, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद, प.आ. २००७, पृ. १०२.

४३. पैठणकर सुरेश, मराठवाड्यातील आत्मचरित्रे व दलित स्वकथने, मराठवाड्यातील साहित्य, उनि., पृ. १५७.

४४. ठाकूर भगवान, आंबेडकरी साहित्य : स्थिती आणि स्थित्यंतरे, आकांक्षा प्रकाशन, नागपूर, प. आ. २००७, पृ. १५०.

४५. अंभुरे कैलास, ग्रामीण स्वरूपाची चरित्रे-आत्मचरित्रे, ग्रामीण वाङ्मयाचा इतिहास, संपा. रामचंद्र काळुंखे, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, प. आ. २०१६, पृ. २७२.

४६. लुलेकर प्रल्हाद, मराठवाड्यातील मराठी वाङ्मयाचा इतिहास, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, प. आ. २०२१, पृ. ३७७.

४७. मदन देवकर्ण, मराठवाड्यातील साहित्यसमीक्षा आणि संशोधन, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, प. आ. २०१९, पृ. १२९.

४८. लुलेकर प्रल्हाद, मराठवाडा : इतिहास, साहित्य आणि संस्कृती, विद्यापीठ अनुदान आयोगास सादर केलेला बृहत शोध/प्रकल्प, मार्च २०१५, पृ. ४१८.

प्रकरण दुसरे

मराठवाड्यातील नाट्य चळवळ

- प्रस्तावना

२.१ मराठी रंगभूमी आणि मराठवाड्याची नाट्यपरंपरा

२.२ मराठवाड्यातील नाट्य चळवळीचे स्वरूप

२.२.१ औरंगाबाद जिल्ह्यातील नाट्य चळवळ

२.२.२ बीड जिल्ह्यातील नाट्य चळवळ

२.२.३ जालना जिल्ह्यातील नाट्य चळवळ

२.२.४ उस्मानाबाद जिल्ह्यातील नाट्य चळवळ

२.२.५ लातूर जिल्ह्यातील नाट्य चळवळ

२.२.६ नांदेड जिल्ह्यातील नाट्य चळवळ

२.२.७ हिंगोली जिल्ह्यातील नाट्य चळवळ

२.२.८ परभणी जिल्ह्यातील नाट्य चळवळ

२.३ मराठवाड्यातील रंगकर्मींचे योगदान

- समारोप

प्रस्तावना :

विशिष्ट ध्येयाने प्रेरित झालेल्या जनसमुदायाने आपले ध्येय साध्य करण्यासाठी केलेली सामूहिक कृती म्हणजे चळवळ होय. इंग्रजी भाषेत चळवळ या शब्दासाठी MOVEMENT हा प्रतीशब्द वापरला जातो. वैयक्तिक हितसंबंधांपेक्षा सामूहिक हितसंबंधांना चळवळीमध्ये महत्त्व असते. सामूहिक कृतीतून सामूहिक हितसंबंध जोपासण्याचा अधिकाधिक प्रयत्न चळवळीमध्ये केला जातो. समान हितसंबंध हा चळवळ सुरू होण्यामागील महत्त्वाचा विचार असतो. समान हितसंबंध असणारे अनेक लोक आपल्या विचारांचा संप्रदाय, पंथ, संस्था, संघटना किंवा गट स्थापन करतात. स्थापन केलेल्या संस्थेमार्फत आपल्या उद्दिष्टपूर्तीसाठी वेगवेगळे कार्यक्रम राबविले जातात. संस्थेच्या हितासाठी राबविलेल्या प्रत्येक कार्यक्रम किंवा केलेली प्रत्येक कृती ही एक प्रकारची चळवळ असते. कोणत्याही चळवळीद्वारे विधायक कृती घडावी असे अपेक्षित असले तरी, अनेकदा चळवळीतून समाजविघातक बदल घडतानाही आढळतात.

समाजाच्या प्रत्येक क्षेत्रात प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे चळवळ अस्तित्वात असते. सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक, धार्मिक, सहकार अशा विविध क्षेत्रातील चळवळीतून त्या-त्या क्षेत्राशी संबंधित बाबींचा ऊहापोह होत असतो. वाङ्मय किंवा कलेच्या क्षेत्रातही चळवळींना अनन्यसाधारण महत्त्व आहे. किंबहुना या क्षेत्रातील चळवळींमुळेच कला किंवा वाङ्मयाचे स्वरूप व्यापक होत असते. नृत्य, नाट्य, संगीत, साहित्य, चित्र अशा सर्वच कलाप्रकारांचा विकास त्या त्या कलेतील चळवळींमुळे झाला आहे, हे निर्विवाद सत्य आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये मराठवाड्यातील औरंगाबाद, नांदेड, परभणी, बीड, उस्मानाबाद, जालना, लातूर व हिंगोली या आठ जिल्ह्यामधील नाट्य चळवळीचा वेध घेणे अभिप्रेत आहे.

मराठवाड्याबाहेरील म्हणजेच उर्वरित महाराष्ट्रातील रंगभूमी ही मराठवाड्यापेक्षा जवळपास शंभर वर्ष पुढे आहे. या शंभर वर्षात मराठी रंगभूमीवर अनेक चळवळी व अनेक स्थित्यंतरे झाली. परंतु मराठवाडा या भौगोलिक प्रदेशातील आठ जिल्ह्याची मर्यादा प्रस्तुत अभ्यासाला असल्यामुळे केवळ मराठवाड्यातील नाट्य चळवळींच्या संदर्भात चर्चा करणे इथे अभिप्रेत आहे. मराठवाड्यातील ग्रामीण व नागर जीवनातील नाट्य चळवळीच्या कार्यासोबतच मराठवाड्यातील रंगभूमीवर निर्माण झालेले विविध प्रवाह अभ्यासले जाणार आहेत.

२.१ मराठी रंगभूमी आणि मराठवाड्याची नाट्यपरंपरा :

मराठी माणूस हा नाट्यवेडा आहे असे म्हटले जाते. ब्रिटिशांच्या आगमनानंतर नाट्यकलेला वाव मिळाला असला तरी, नाटक हा वाङ्मयप्रकार ब्रिटिशांकडून आपल्याकडे आला असे म्हणता येत नाही. कारण आपल्याकडील लोककलांमध्ये नाटकाची बीजे आढळतात हे सिद्ध झाले आहे. मराठवाड्याच्या नाट्यपरंपरेच्या उगमस्थानाबद्दल बोलताना नाटकाचे अभ्यासक सतीश साळुंके म्हणतात की, "मराठवाड्यात भारूड, ललित, गोंधळ, कीर्तन, कलगीतुरा, संपादण्या, पंचम्या, वाघ्या-मुरळी, भराडी, दिंडार, दिंडीगान, पांगूळ, शाहिरी, पोवाडा, वासुदेव, पोतराज, मरीआईवाले, नंदिवाले, भुत्या, जोगी, कोळपे, बाळसंतोष व तमाशा या सांरख्या लोकरंगधारा हजारो वर्षांपासून प्रवाहित असून त्या मराठवाड्यातील आध्यात्मिक व सांस्कृतिक लोकजीवनाला संस्कारित करीत आहेत. त्यांचे महत्त्वाचे कारण म्हणजे तुळजापूरची तुळजाभवानी व माहुरची रेणुका आई या महत्त्वाच्या देवींची स्थाने मराठवाड्यात आहेत. शिवाय परळीचा वैजिनाथ आणि वेरूळचा घृष्णेश्वर शिवशंकर या सारख्या देवतांमुळेच लोकसंस्कृतीच्या उपासकांना सतत प्रेरणा मिळत राहिली असावी."[१] या सर्वच लोककला प्रकारात कमी-अधिक प्रमाणात नाट्यात्मकता असून मराठवाड्यातील रंगभूमीचे उगमस्थान या लोककलाच आहेत असे प्रतिपादन सतीश साळुंके यांनी केले आहे.

गोंधळ, दशावतारी खेळ, लळीत, कीर्तन, भारूड, पोवाडा, कळसूत्री बाहुल्यांचे खेळ इत्यादी लोककलांमध्ये नाटकाची बीजे आढळतात. या सर्वच लोककला ब्रिटिशांच्या आगमनापूर्वीपासून महाराष्ट्रात अस्तित्वात आहेत. चंद्रकांत धांडे यांच्या मते, "मराठवाड्यातील लोककला प्राचीन काळापासून समृद्ध होत्या याचे अनेक दाखले आजही उपलब्ध आहेत. दशावतारी खेळांची परंपरा पैठण येथील शालिवाहन 'राजा हल' याच्या काळात सुरू झाली असे उल्लेख आढळतात. सहाव्या शतकात कर्नाटकातल्या कदंब राजांनी तुळजापूरच्या देवीला आपली कुलस्वामिनी मानली. त्यावेळेपासून गोंधळ परंपरा महाराष्ट्रात आली असावी असे विद्वानांचे मत आहे. संत वाङ्मयात आणि महानुभाव साहित्यातून 'पवाडे', 'पवाडा', 'गीतसूड' असे पोवाड्याचे उल्लेख आहेत. छत्रपती शिवाजी महाराज यांचे कुलदैवत असलेल्या तुळजापूरच्या देवीच्या गोंधळाबरोबर महाराष्ट्रात पोवाडे विकसित झाले."[२] चंद्रकांत धांडे यांच्या या विवेचनावरून हे स्पष्ट

होते की दशावतारी खेळ, पोवाडा, गोंधळ हे देशी लोककलाप्रकार असून या सर्वच कलाप्रकारात नाट्यबिजे दडलेली आहेत.

कळसूत्री बाहुल्यांचे खेळ, धवळे व भारूड या लोकरंजन प्रकारातही नाट्यबीज आढळते. कळसूत्री बाहुल्यांचा खेळ हा संत ज्ञानेश्वर महाराजांच्या काळातही अस्तित्वात होता. ज्ञानेश्वरीच्या नवव्या अध्यायात आपले गुरू निवृत्तीनाथांची प्रार्थना करताना ज्ञानेश्वरांनी दिलेल्या

"परी आतां आमुते गोड करावे।
ऐसें हे तांदुळी कासया विनवावे।
साइखडियाने काई प्रार्थावे।
सूत्रधाराते।।३०।।
काय तो बाहुलियांचिया काजा नाचवी।
कीं आपुलिये जाणिवेची कळा वाढवी
म्हणउनि आम्हा या ठेवाठेवी।
काय काज।।३१।।"[३]

या दृष्टांतावरून कळसूत्री बाहुल्यांचे खेळ ज्ञानेश्वरपूर्वकाळापासून आपल्याकडे अस्तित्वात होते हे सिद्ध होते. संत एकनाथ महाराजांच्या सोंगी भारूडामध्ये 'थिएटर लँग्वेज' आढळते. भारूडाची वैशिष्ट्ये आणि नाटक या वाङ्मयप्रकाराची वैशिष्ट्ये यात बऱ्यापैकी साम्य आढळते. या संदर्भात समीक्षक प्रभाकर बागले म्हणतात की, "भारूडातील रूपकात एक अंगभूत संदिग्धता असते. ज्या ताकदीनं त्या संदिग्धतेचा वापर एकनाथांनी केला आणि तिच्या आधारे भौतिक अधिभौतिकात जी ये-जा केली, शब्दांच्या अधिनित होणाऱ्या क्षमता साक्षात केल्या त्याला तोड नाही. त्याची रूपकनिष्ठ नाट्यप्रतिभा भारुडात व्यक्त झाली आहे. त्यांची भारूडं म्हणजे एक नाट्यसंहिताच! या नाट्यसंहितेत मानवी स्वभावाचं, मानवेतर प्राण्याच्या स्वभावाचं, त्याच्यामधील परस्पर संबंधाचं सार एकवटलेलं आहे असं जाणवत राहतं आणि हे त्यांनी शब्दाच्या दृश्य बंधातून, नादबंधामधून साकार केलं आहे. त्यांचे दृश्यबंध तर नेपथ्याचा प्रतिभास निर्माण करणारे आहेत."[४] एकनाथ महाराजांची भारूडं म्हणजे नाट्यसंहिताच आहे असे स्पष्ट मत प्रभाकर बागले यांनी व्यक्त केले आहे. म्हणजे प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे संत एकनाथ महाराजांनी मराठी रंगभूमीची पायाभरणी केली

असे म्हणता येईल. संत एकनाथ महाराज हे मराठवाड्यातील संत असल्यामुळे मराठी रंगभूमीची मूहूर्तमेढ मराठवाड्यातच रोवली गेली, हे प्रभाकर बागले यांच्या विवेचनावरून सिद्ध होते. एकूणच दशावतारी खेळ, भारूड, गोंधळ, पोवाडा, कळसूत्री बाहुल्यांचे खेळ, लळीत अशा सर्वच लोककला प्रकारात तसेच धवळे या विवाहप्रसंगीच्या गीतात आजच्या रंगभूमीचे पूर्वरंग दिसतात हे निश्चित आहे.

लोकरंगभूमीमध्ये मराठी रंगभूमीची बीजे दडलेली असली तरी १८१८ नंतरच म्हणजेच इंग्रजांच्या आगमनानंतरच महाराष्ट्रामध्ये मराठी रंगभूमीच्या परंपरेला प्रत्यक्ष सुरूवात झाली. नाटकाच्या सुरूवाती बाबतीतही अभ्यासकांमध्ये मतभेद आहेत. आपापल्या सोयीनुसार अभ्यासकांनी नाटकाला अग्रक्रम दिला आहे. काही अभ्यासकांनी १८४३ साली आलेले विष्णुदास भावे यांचे सीतास्वयंवर हे मराठीतील पहिले नाटक आहे असे म्हटले आहे. काहींच्या तर मते १८५५ साली आलेले तृतीयरत्न हे महात्मा फुले यांचे नाटक पहिले व परीपूर्ण नाटक आहे. काही अभ्यासकांनी अण्णासाहेब किर्लोस्कर यांच्या १८८० साली आलेल्या संगीत शाकुंतल या नाटकास पहिल्या नाटकाचा मान दिला आहे. मराठीतील पहिले नाटक कोणते? या प्रश्नावरून निर्माण झालेल्या या तीन प्रवाहांशिवाय आणखी एक प्रवाह रंगभूमीच्या अभ्यासकामध्ये आहे. या प्रवाहातील अभ्यासकांच्या मते छत्रपती शिवाजी महाराजांचे सावत्र बंधू एकोजी उर्फ व्यंकोजीराजे यांचे चिरंजीव शंभूराजे भोसले हे मराठीतील आद्य नाटककार आहेत. यासंदर्भात मकरंद साठे म्हणतात, "तंजावरचे नाटक म्हणजे शिवाजी राजांच्या, भोसले घराण्यातील त्यांच्या सावत्र बंधूच्या वंशाजांनी लिहिलेली नाटकं. हे एकच नाटक नव्हत. आजही ३४ ते ३५ नाटकांच्या संहीता उपलब्ध आहेत. ही नाटकं १६५० पासूनची म्हणजे भाव्यांच्या दोनशे वर्ष आधीची आहेत."[५] म्हणजे महाराष्ट्रातील पहिल्या मराठी नाटकाच्या २०० वर्ष अगोदर तंजावरमध्ये मराठी नाटकाची मुहूर्तमेढ रोवली असे मकरंद साठे यांचे मत आहे.

मराठवाड्यातील रंगकर्मी द. ग. देशपांडे यांनीही तंजावर येथील शहाराज भोसले यांना मराठीतील अद्य नाटककाराचा मान दिला आहे. शहाराज भोसले यांनी मराठीत एकूण बावीस नाटके लिहिली असून ही नाटके सतराव्या शतकातच लिहिली गेली आहेत, हेही द. ग. देशपांडे नमूद करतात. शहाराज भोसले यांचा गौरव करताना द. ग. देशपांडे म्हणतात. "मराठी रंगभूमीचा

उषःकाल तंजावर येथे १६८४ साली झाला व मराठी रंगभूमीवरचे पहिले नाटककार म्हणून शहाराज भोसले हे होत हे सिद्ध होते. परभाषिक प्रांतात मराठीतून नाटके लिहून ती रंगभूमीवर आणून तामिळ, तेलगु व कर्नाटकी भाषिकांना आकृष्ट करणारे मराठी भाषेची जाण देणारे हे आलम नाटककार भोसले यांनी मिळविलेले यश अवर्णनीय आहे. या बद्दल मराठी भाषिकांना अभिमानच वाटायला हवा. भोसले घराण्याच्या राजांनी तलवारीबरोबर लेखणीही गाजवली... मराठी रंगभूमी व मराठी रंगभूमीचा आद्य नाटककार या दृष्टीने महाराष्ट्रात शहाराज भोसले यांचे स्मारक उभारून त्यांच्या कार्याची आपुलकीच्या भावनेने मराठी माणसाने, साहित्यिकांनी नटनटांनी दखल घ्यायला हवी."[६] मराठीतील पहिले नाटक आणि आद्य नाटककार या बाबत अभ्यासकांमध्ये मतभेद असले तरी १८४३ साली रंगभूमीवर आलेल्या विष्णुदास भावे यांच्या सीतास्वयंवर या नाटकास बहुसंख्य अभ्यासकांनी मराठी रंगभूमीवरील पहिले नाटक म्हटले आहे.

१८४३ पासून सुरू झालेल्या मराठी रंगभूमीवर आजवर अनेक स्थित्यंतरे झाली. १८४३ ते १८८० हा बुकिश नाटकाचा काळ, १८८० ते १९२० हे मराठी रंगभूमीवरील सुवर्ण युग, बोलपटाच्या जमान्यातही विकसित झालेले १९२० ते १९४५ या काळातील सक्षम मराठी नाटक, १९४५-१९६० या काळातील न-नाट्य, साठोत्तरी काळात अनेकविध जाणिवांनी फुललेले मराठी नाटक आणि नव्वदोत्तर काळातील मूल्यऱ्हासाचे चित्रण करणारे नाटक अशा विविध स्थित्यंतरातून जात आज मराठी नाटकाने आपली परंपरा अधिक बळकट केली आहे. आज मराठी नाटक किंवा रंगभूमी आशय आणि अभिव्यक्तीच्या वेगळेपणामुळे एवढ्या उंचीवर गेली आहे की, देशातील रंगभूमीमध्ये मराठी रंगभूमीला महत्त्वाचे स्थान आहे.

१८४३ पासून आजपर्यंत पावनेदोनशे वर्षांचा टप्पा मराठी रंगभूमीने गाठला आहे. या पार्श्वभूमीवर मराठवाड्यातील रंगभूमीचा विचार केल्यास मराठवाड्यातील रंगभूमीविषयी आणि एकूणच मराठवाड्यातील आधुनिक साहित्याविषयीचे चित्र समाधानकारक आहे असे वाटत नाही. या वाङ्मयीन विदारकतेला कारणीभूत आहे ती मराठवाड्यावरील साडेसहाशे वर्षांची मुस्लिम सत्ता. मुस्लिमांची सत्ता येईपर्यंत म्हणजे १३१२ पर्यंत मराठवाडा हा सर्वांगाणे संपन्न प्रदेश होता. मराठवाडा हा प्रदेश महाराष्ट्राच्या भाषिक, सांस्कृतिक, साहित्यिक चळवळीचे केंद्र होता. किंबहुना संत एकनाथ महाराजांच्या काळापर्यंतही आद्य महाराष्ट्र म्हणजेच मराठवाड्याकडेच महाराष्ट्राचे

साहित्यिक-सांस्कृतिक नेतृत्व होते. या काळातील मराठवाड्यातील साहित्याचा इतिहास हाच मराठी साहित्याचा इतिहास ठरावा एवढे मोठे योगदान मराठवाड्यातील संत व महानुभाव साहित्यिकांनी दिले आहे. यादवांचा पाडाव झाल्यानंतर म्हणजेच १३१२ पासून १९४८ पर्यंत मराठवाडा हा प्रदेश मुस्लिम राजवटीच्या अधिपत्याखाली होता. खिलजी, तुघलक, बहामनी, आदिलशाही, कुतुबशाही, निजामशाही अशा विविध निरंकुश मुस्लिम राजवटींनी मराठवाड्यावर सत्ता गाजवली. मराठी भाषा, साहित्य, संस्कृतीबरोबर मराठवाड्यातील सामाजिक, आर्थिक, धार्मिक, शैक्षणिक जनजीवनच या राजवटींमुळे विस्कळीत झाले. परिणामी सोळाव्या शतकानंतर महाराष्ट्राचे सांस्कृतिक केंद्र असलेल्या मराठवाड्याची वाङ्मयीन पिछेहाट होऊन भाषिक, सांस्कृतिक व साहित्यिक केंद्र पुण्याकडे गेले.

१७२४ पासून मराठवाड्यात निजामाचा अंमल सुरू झाला. इतर मुस्लिम प्रशासकांच्या तुलनेत निजामी राजवट ही अधिक क्रूर होती. मराठी भाषेची गळचेपी करत उर्दू भाषेची सक्ती करणे, मराठवाड्यातील सांस्कृतिक-साहित्यिक कार्यक्रमांवर बंदी, हिंदू स्त्रियांची अब्रू लुटणे, हिंदूचे जबरदस्ती धर्मांतर करणे, मंदिरे उद्ध्वस्त करून मस्जिद बांधणे अशा प्रकारचे अनन्वित अत्याचार निजामाने मराठवाड्यातील जनतेवर केले. मराठवाड्यातील जनतेची निजामाकडून सर्वांगीण गळचेपी सुरू असताना तिकडे उर्वरित महाराष्ट्रावर इंग्रजांचा अंमल सुरू झाला होता. १८१८ साली पेशवाईचा पराभव करून इंग्रजांनी महाराष्ट्राची सत्ता काबिज केली होती.

मराठवाड्यातील निरंकुश निजामशाही आणि उर्वरित महाराष्ट्रातील ब्रिटिश सत्ता या दोन्ही सत्ता परकीय असल्या तरी ब्रिटिश सत्ता ही तुलनेने कमी अन्यायकारी व आधुनिक विचारांची होती. ब्रिटिशांच्या आधुनिक विचारांमुळेच महाराष्ट्रात आधुनिक शिक्षणपद्धती, आधुनिक साहित्य व एकूणच आधुनिक विचारांचे वारे वाहू लागले. परिणामी दोन्ही प्रदेश मराठी भाषिकांचे असूनदेखील भाषा, साहित्य, संस्कृती, विविध कलांच्या विकासात मराठवाडा मागे राहिला. मराठवाडा एवढा मागे राहिला की, नाट्य क्षेत्राचा विचार केल्यास मराठी रंगभूमीला शंभर वर्ष पूर्ण झालेले असताना मराठवाड्यातील रंगभूमीवर एखाद-दुसरे परिपूर्ण नाटक आले होते.

मराठवाड्यातील रंगभूमी आणि उर्वरित मराराष्ट्रातील रंगभूमीची तुलना करताना ज्येष्ठ रंगकर्मी त्र्यंबक महाजन म्हणतात की, "महाराष्ट्राच्या रंगभूमीवर विसाव्या शतकाच्या पहिल्या पन्नास

वर्षात जो रंगमंच उभा राहिला त्याला सुवर्णयुगाचं नेपथ्य होतं. परंपरा निर्माण करणारे नाटककार आणि ज्यांच्या अभिनयाचं मिथक झालं असे दिग्गज गद्य आणि संगीत नटसम्राट होते. अण्णासाहेब किर्लोस्कर, गोविंद बल्लाळ देवल, राम गणेश गडकरी यांच्या नाट्यसृष्टीने इतिहास निर्माण करणाऱ्या नाट्यसंस्था होत्या आणि रंगभूमीवरील अपूर्व रंगाविष्काराचं चीज करणारा प्रेक्षकवर्ग होता. १९४८ नंतर आधुनिक काळाच्या संदर्भात मराठवाड्याची रंगभूमी ज्यावेळी चाचपडत आपली वाट शोधीत होती त्यावेळी महाराष्ट्राची रंगभूमी आपलं रूप घडवत होती."[७] कथा, कविता, कादंबरी, नाटक अशा सर्वच वाङ्मयप्रकारांची जवळपास हीच अवस्था झाली होती. त्रोटक प्रयत्नांचा अपवाद वगळता मराठवाडा हा उर्वरित महाराष्ट्रापेक्षा शंभर वर्ष मागे राहिला आहे. १९१९ साली मराठवाड्यातील भगवंत तोडेवाले यांचे संगीत चुडाला व १९३० साली श्रीपाद बेंडे यांचे बेबी हे नाटक प्रकाशित झाले. परंतु या नाट्यसंहितांचा संबंध मराठवाड्यापेक्षा महाराष्ट्राशी अधिक जवळचा होता.

मराठवाड्यातील रंगभूमीचे स्वरूप विशद करताना भगवंत तोडेवाले व बेंडे यांच्या नाटकांबद्दल त्र्यंबक महाजन लिहितात, " 'नाट्यमन्वंतर' सारख्या रंगभूमीवरील कर्त्या संस्थेशी कै. बेंडे हे नाव निगडित होते. त्यांचं बेबी हे नाटक महाराष्ट्राच्या रसिकांना प्रयोगरूपानं प्रत्यक्ष पहायलाही मिळालं होतं. मात्र मराठवाड्याच्या रंगभूमीवर कुणीच हा नाटककार पाहिला नाही. दहा नाटकांची नोंद त्यांच्या नावावर आहे हे अजूनही मराठवाड्याला फक्त वाचून माहीत आहे. प्रयोगरूपानं पाहून नव्हे. १९३० च्या आसपासची ही अवस्था तर मग १९१९ मध्ये प्रकाशित झालेल्या पैठणच्या तोडेवाल्यांच्या नाट्यसंहितेबद्दल अधिक न बोललेलेच बरे... सगळीकडेच असा शुकशुगाट. अधूनमधून महाराष्ट्राच्या नामांकित कंपन्या येऊन 'खेळ' करून जायच्या आणि चुकुनमाकून हौशी मंडळी काही एका निमित्ताने नाटक करून कृतार्थ व्हायची. तत्कालीन सांस्कृतिक वातावरणाचं डॉ. सुधीर रसाळ यांनी आपल्या एका लेखत 'वाङ्मयीन गारवा' या अतिशय समर्पक शब्दात वर्णन केलं आहे. ते रंगभूमीच्या बाबतीत अर्थपूर्ण ठरणारं आहे."[८] एकूणच १९५० पर्यंत मराठवाड्यातील नाट्यक्षेत्रात काही सन्माननीय अपवाद वगळता शुकशुकाट होता. मराठवाड्यातील या वाङ्मीयन गारव्याचे मूळ हे निजामी राजवटीत आहे. निजामी राजवटीतील वाङ्मयीन गळचेपीमुळेच आज महाराठवाड्यातील मराठी रंगभूमी केवळ पाऊनशे

वर्षांची राहिली आहे. या तुलनेत मराठी रंगभूमी ही पावणेदोनशे वर्षांची झाली आहे. स्वातंत्र्यपूर्व कालखंडात मराठवाड्यातील रंगभूमीची अपवादात्मक वाढ झाली असली तरी स्वातंत्र्योत्तर कालखंडात मात्र आशयाभिव्यक्तीच्या व सादरिकरणाच्या ताकदीवर मराठवाड्यातील रंगभूमी आपला अनुशेष भरून काढत आहे.

२.२ मराठवाड्यातील नाट्य चळवळीचे स्वरूप :

स्वातंत्र्यपूर्व कालखंडात मराठी रंगभूमीएवढी मराठवाडी रंगभूमीची प्रगत अवस्था नसली तरी महाराष्ट्राप्रमाणेच मराठवाडाही नाट्यवेडा होता, हे द. ग. देशपांडे यांच्या 'नाट्यवेडा मराठवाडा' या ग्रंथाच्या वाचनातूनही सहज लक्षात येईल. नाट्य लेखनामध्ये भगवंत लोडेवाले (संगीत चुडाला), श्रीपाद बेंडे (बेबी), दिवाकर कृष्ण (गंगालहरी) व शंकरलाल पुरवार (देवदासी) यांनी नाट्यलेखन केले असले तरी बेंडे आणि दिवाकर कृष्ण यांचा मराठवाड्यातील रंगभूमीशी जास्त संबंध नव्हता. हे दोन्ही नाटककार मराठवाड्याचे असले तरी मराठी रंगभूमीशीच त्यांचा संबंध अधिक होता. त्यामुळे लेखनाच्या दृष्टीने स्वातंत्र्यपूर्व काळात मराठवाड्यातील रंगभूमीवर फार महत्त्वाचे काही घडलेले नाही. प्रत्यक्ष नाट्यलेखन झाले नसले तरी स्वातंत्र्यपूर्व कालखंडात मराठवाड्यातील रंगभूमीवर नाटकाचे प्रयोग होत असत. मराठवाड्यातील प्रत्येक जिल्ह्यामध्ये हौशी कलावंतांनी आपली आवड जोपसण्यासाठी वेगवेगळ्या नाट्यसंस्था स्थापन केल्या होत्या. मराठवाड्यातील नाट्यसंस्थाबरोबरच मराठवाड्याबाहेरील नाट्यसंस्थाही मराठवाड्यामध्ये तिकीट लावून नाटक सादर करत असत. जत्रा, नवरात्रोत्सव, रामनवमी, दिवाळी अशा वेगवेगळ्या प्रसंगी कधी छुप्या पद्धतीने तर कधी निजामाला न जुमानता मराठवाड्यात नाटकाचे प्रयोग होत असत.

आपली आवड जोपासण्यासाठी स्वातंत्र्यपूर्व काळात व स्वातंत्र्यानंतरही मराठवाड्यामध्ये अनेक नाट्यसंस्था स्थापन झाल्या. व्यवसायापेक्षा हौस भागविणे हा या संस्थाचा महत्त्वाचा उद्देश होता. निजामकालीन मराठवाड्यातील औरंगाबाद, परभणी, बीड, उस्मानाबाद, नांदेड अशा सर्वच जिल्ह्यांमध्ये नाट्यसंस्था स्थापन झाल्या. त्याचबरोबर स्वातंत्र्योत्तर काळातील जालना, लातूर, हिंगोली या जिल्ह्यातही अनेक नाट्यसंस्था स्थापन झाल्या. या सर्वच नाट्यसंस्थांनी सादर केलेली नाटके, त्यातील कलावंत-रंगकर्मी यांची माहिती जाणून घेणे हे एकूणच मराठवाड्यातील नाट्य

चळवळीचे स्वरूप समजून घेण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. मराठवाड्यातील एकूणच नाट्यसंस्थांचे मराठवाडी रंगभूमीसाठीचे योगदान समजून घेणे महत्त्वाचे आहे.

२.२.१ औरंगाबाद जिल्ह्यातील नाट्य चळवळ :

औरंगाबाद जिल्हा ही मराठवाड्याची राजधानी आहे, असे म्हटले जाते. मराठवाड्यातील विविध चळवळीचे महत्त्वाचे केंद्र औरंगाबाद आहे. मराठवाडी रंगभूमीही याला अपवाद नाही. मराठवाड्याच्या वेगवेगळ्या जिल्ह्यातील लोक नोकरी, व्यवसाय, शिक्षणाच्या निमित्ताने औरंगाबाद या ठिकाणी स्थायिक झाले. काही काळ लोटल्यानंतर बाहेरच्या जिल्ह्यातील हे लोक औरंगाबादचेच झाले. त्यामुळे साहजिकच औरंगाबाद जिल्ह्याने मराठवाडी रंगभूमीच्या विकासात इतर जिल्ह्यांच्या तुलनेत भरीव योगदान दिले आहे. मराठवाड्याच्या रंगभूमीवरील जवळपास पन्नास टक्के नाटककार, नट, रंगकर्मी हे औरंगाबाद जिल्ह्यातील रंगभूमीशी निगडित आहेत.

औरंगाबाद शहरातील स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर रंगभूमीची तुलना केल्यास स्वातंत्र्यपूर्व कालखंडात नाटकाचे जे प्रयोग झाले ती नाटके, मुखतः मराठवाड्याच्या बाहेरील लेखकांची होती. स्वातंत्र्योत्तर काळात मात्र नाट्येखनाच्या दृष्टीने मराठवाडा स्वयंपूर्ण झाला असे म्हणता येईल. औरंगाबाद शहरातील रंगभूमीचा विचार करताना रंगभूमीवर स्थापन झालेल्या वेगवेगळ्या संस्था, त्या संस्थांचे संस्थापक, त्या संस्थांनी सादर केलेली नाटके व त्या नाटकातील रंगकर्मीचा अभ्यास करणे महत्त्वाचे ठरते.

आशा निराशा हे १९२८ मध्ये औरंगाबादमध्ये सादर झालेले पहिले नाटक होय. यशवंत टिपणिस लिखित या नाटकाचा प्रयोग विनायकराव भगूरकर आणि कृष्णराव भगूरकर या बंधूंनी केला. गद्य-पद्य मिश्रित हे नाटक असून औरंगाबादमधील रंगकर्मींचे लक्ष या नाटकाने वेधून घेतले. आशा निराशा या नाटकाच्या प्रयोगानंतर औरंगाबादमधील रंगभूमीचा विकास अधिकच जोमाने झाला. औरंगाबाद येथील जगन्नाथ थिएटरात या नाटकाचा प्रयोग झाल्यापासून जगन्नाथ थिएटर चांगलेच चर्चेत आले. या नाटकाच्या प्रयोगानंतर औरंगाबाद शहरात नाट्य सादरिकरणाच्या क्षेत्रात अनेक संस्था व अनेक रंगकर्मी सहभागी झाले. एक प्रकारे आशा निराशा या नाटकाच्या प्रयोगामुळे शहरातील रंगभूमीची पायाभरणी झाली, असे म्हणता येईल.

१९२८ नंतर औरंगाबादच्या रंगभूमीवर अनेक नाट्यसंस्था सक्रिय झाल्या. या नाट्यसंस्थांमध्ये भारत विजयमंडळ, ललितकला विकास मंडळ, अभिनव नाट्यसंस्था, मराठवाडा थिएटर, रंगमंच, नाट्य आराधना, कुमार साहित्य मंडळ, रसगंध, ललितकला मंडळ, अभिनय सौरभ, नाट्यनिकेतन, दलित थिएटर, पारिजात, नाट्यदर्शन, नाट्यरंग, दिशांतर, कलावंत, भूमिका, गमत्या ग्रूप, जिगीषा, परिवर्तन इत्यादी नाट्य संस्थांनी औरंगाबाद रंगभूमीच्या विकासामध्ये भरीव योगदान दिले आहे. या नाट्यसंस्थांबरोबरच डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा नाट्यशास्त्र विभाग, सरस्वती भुवन महाविद्यालयाचा नाट्यशास्त्र विभाग, मराठवाडा साहित्य परिषदेचा नाट्यविभाग, मराठा हायस्कूलचा कला विभाग आणि औरंगाबाद शहरातील महाविद्यालयातील युवक महोत्सवाच्या निमित्ताने रंगभूमीची सेवा करणाऱ्या विभागामुळे औरंगाबादची रंगभूमी अधिकच सशक्त झाली आहे.

औरंगाबाद रंगभूमीवर कार्यरत असणाऱ्या नाट्यसंस्थांपैकी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा नाट्यशास्त्र विभाग, मिलिंद महाविद्यालयात सुरू झालेली दलित रंगभूमीची चळवळ आणि जिगीषा या नाट्यसंस्थेने सादर केलेली नाटके यामुळे केवळ मराठवाड्यातील रंगभूमीच नव्हे तर मराठी रंगभूमी श्रीमंत झाली आहे. मराठी रंगभूमीचे अविभाज्य अंग असलेली दलित नाट्य चळवळ औरंगाबादमधील नागसेन परिसरात सुरू झाली. त्र्यंबक महाजन यांचे झुलते मनोरे आणि म. भि. चिटणीस यांचे युगयात्रा ही नाटके दलित नाट्य चळवळीतील अगदी सुरूवातीची व भक्कम अशी नाटके आहेत.

औरंगाबादच्या नागसेन परिसरात उदयास आलेल्या दलित रंगभूमीविषयी ज्येष्ठ रंगकर्मी त्र्यंबक महाजन म्हणतात की, "जी दलित रंगभूमी आज आपल्या आशय-आविष्काराने केवळ मराठीच नव्हे तर अन्य भाषिकांसाठीदेखील एक नवीन आशयाचे रंग-शिल्प म्हणून अभ्यासाचा विषय झाली आहे, तिचं प्रारंभिचं रूप घडलं ते नागसेन परिसरात... आवर्त, थांबा रामराज्य येतंय, अश्मक, म्यूलॅटो, वाटा-पळवाटा या नाट्यलेखनातून प्रा. दत्ता भगत, प्रकाश त्रिभुवन.... या नाटककारांनी दलित रंगभूमीच्या चळवळीचा पाया घातला... महाराष्ट्र आणि नंतर राष्ट्रीय पातळीवर आपलं वेगळेपण सिद्ध करू पाहणाऱ्या दलित रंगभूमीच्या चळवळीचं केंद्र म्हणून मराठवाडा रंगभूमीला मिळालेली ही संधी निश्चितच तिच्या स्वरूपातील एक स्व-रूपाचा घटक

म्हणून नोंदविली पाहिजे."[९] औरंगाबादच्या नागसेन परिसरात सुरू झालेल्या दलित नाट्य चळवळीमुळे एकूण मराठी रंगभूमीची मान उंचावली असे निरिक्षणच त्र्यंबक महाजन यांनी नोंदविले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील नाट्यशास्त्र विभागातील प्राध्यापक, नाटककार व रंगकर्मींचे औरंगाबाद रंगभूमीच्या विकासात महत्त्वाचे योगदान आहे. "१९७३ साली सुरू झालेल्या नाट्यशास्त्र विभागामुळे औरंगाबादच्या नाट्य चळवळीला शास्त्रशुद्ध ज्ञानाची जोड मिळाली. या विभागातून अनेक नाट्यलेखक, दिग्दर्शक, कलावंत आणि तंत्रज्ञ औरंगाबादच्या रंगभूमीला मिळाले. या रंगकर्मींनी औरंगाबादच्या रंगभूमीवर उल्लेखनीय कार्य केले. मराठवाड्याची आधुनिक रंगभूमी उभी करण्यात या सर्वांचे महत्त्वाचे योगदान आहे."[१०] विद्यापीठाच्या नाट्यशास्त्र विभागातील रंगकर्मींमध्ये प्राध्यापक व विभागात नाट्य प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनीही उल्लेखनीय कार्य केले आहे.

कमलाकर सोनटक्के, लक्ष्मणराव देशपांडे, कुमार देशमुख, रुस्तुम अचलखांब, त्र्यंबक महाजन, शशिकांत बऱ्हाणपूरकर, जयंत शेवतेकर, दासू वैद्य, अशोक बंडगर, स्मिता साबळे, दीपक गरुड, गजानन दांडगे, योगेश सिरसाट, योगेश चिकटगावकर, नंदू भुरे, रमाकांत भालेराव, अनिलकुमार साळवे, राजू सोनवणे, दुष्यंता रामटेके, निरज बोरसे, नितीन गरूड, सुनील टाक, गहिनीनाथ वळेकर, गणेश शिंदे, योगेश सिरसाट, शैलेश कोरडे, मणिराज पवार, रावबा गजमल, प्रविण पाटेकर, श्रुती कुलकर्णी, श्वेता मांडे, कोमल सोमारे, रत्नदीप वाव्हळ, बाळू बटुळे, असिफ अन्सारी, विशाखा शिरवाडकर, सिद्धार्थ तायडे, अनिल बडे, सिद्धेश्वर थोरात, ऋषिकेश वांभुरकर, रोहीत देशमुख, अशोक कानगुडे, रामदास ठोके, पूजा सोळंके, आकाश पवार, अस्लम शेख, रूपेश परतवाघ, संदीप कणके डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील या सर्वच प्राध्यापक व विद्यार्थ्यांचे औरंगाबाद रंगभूमीच्या उत्कर्षामध्ये महत्त्वाचे योगदान आहे.

राज्यनाट्य स्पर्धा, कामगार नाट्य स्पर्धा, विद्यापीठीय युवक महोत्सव व वार्षिक नाट्य महोत्सवाच्या निमित्ताने नाट्यशास्त्र विभागात सातत्याने नाट्य जागर सुरू असतो. विद्यापीठाच्या नाट्यशास्त्र विभागात प्राध्यापक म्हणून कार्यरत असलेल्या लक्ष्मणराव देशपांडे यांनी 'वऱ्हाड निघालय लंडनला' या एकपात्री नाटकाच्या निमित्ताने औरंगाबाद रंगभूमीचे नाव जगभर पोहचवले.

गिनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद घेण्यायोग्य कार्य लक्ष्मणराव देशपांडे या प्राध्यापक-कलावंत-नाटककाराने केले. "लंडनपर्यंत दौरे करून आलेला हा एकपात्री प्रयोग प्रा. देशपांड्यांना उत्कृष्ट नट म्हणून सिद्ध करता आला. लेखन, अभिनय, तंत्र या सर्वच गोष्टी चांगल्याच जमवून घेऊन प्रा. देशपांडे प्रशंसापात्र ठरले... हजार प्रयोग करण्याचा मान महाराष्ट्रात प्रा. देशपांडे यांनी पटकावला. ही बाब मराठवाड्यालाच नव्हे तर अखिल महाराष्ट्राला भूषणावह, गौरवास्पद आहे."[११] मराठवाड्याच्याच नव्हे तर मराठी रंगभूमीच्या इतिहासातील या नाटकांचे महत्त्व अत्यंत साधारण आहे. आजही या नाटकांचे प्रयोग संदीप पाठक तेवढ्याच ताकदीने करत आहेत.

औरंगाबादमधील नाट्यसंस्थापैकी जिगीषा ही अत्यंत महत्त्वाची नाट्यसंस्था असून आज मराठी रंगभूमीवर या नाट्यसंस्थेचा लौकिक आहे. चंद्रकांत कुलकर्णी, प्रशांत दळवी, प्रतीक्षा लोणकर, अजित दळवी, दासू वैद्य, मकरंद अनासपुरे या आजच्या आघाडीच्या लेखक-कलावंत मंडळींनी जिगीषा या संस्थेची ऐन तारूण्यात असताना स्थापना केली. सुरूवातीच्या काळात औरंगाबादमध्ये यश मिळवल्यानंतर मुंबईत जाऊन या संस्थेने मराठी रंगभूमीसाठी योगदान दिले. पौंगड, डॉक्टर! तुम्हीसुद्धा...!, गांधी विरूद्ध गांधी, ध्यानिमनी, सेलिब्रेशन, चारचौघी, वाडा चिरेबंदी, हमिदाबाईची कोठी, हॅम्लेट आशा अनेक नाटकांचे महाराष्ट्रभर यशस्वी प्रयोग या संस्थेने केले. "जिगीषाचे वैशिष्ट्य म्हणजे या संस्थेचे स्वतःचे लेखक, दिग्दर्शक होते... चंद्रकांत कुलकर्णी यांनी १९८८ साली केलेले पौंगड ते सध्या २०२१ साली चालू असलेले त्यांचे नाटक हॅम्लेट या दीर्घ नाट्यप्रवासात त्यांनी विविध प्रयोगशील नाटके केली. सामाजिक बांधिलकीच्या जाणिवेच्या नाटकांवर आपले लक्ष केंद्रित केले. जिगीषाने सातत्याने प्रायोगिक रंगभूमीचा स्वीकार केला."[१२] सुरूवातीला प्रायोगिक रंगभूमीचा स्वीकार केल्यानंतर पुढील काळात जिगीषा या नाट्यसंस्थेने महाराष्ट्रभर नाटकाचे यशस्वीरीत्या व्यावसायिक प्रयोगही केले. प्रायोगिक आणि व्यावसायिक अशा दोन्ही स्तरावर यश संपादन करणे ही बाब जिगीषाचे वेगळेपण सिद्ध करते.

औरंगाबादमधील नाट्यसंस्थाप्रमाणेच विविध नाट्यसंस्थांमार्फत नाट्यसेवा करणाऱ्या रंगकर्मीचेही रंगभूमीसाठी महत्त्वाचे योगदान आहे. विनायकराव भगूरकर, कृष्णराव भगूरकर, शंकरलाल पूरवार, बाळकृष्ण पारगावकर, द. ग. देशपांडे, पुरूषोत्तम हौजवाला, त्र्यंबक महाजन, म. भि. चिटणिस, मामा दातार, शालिनीताई दातार, सतीश महाजन, कमलाकर मुळे, चंद्रकांत

भालेराव, वासंती वालावलकर, बंकट पाटील, नंदू मुळे, नाना बापट, लता राणे, सुरेश देशपांडे, चित्रा पाराशर, कुमार देशमुख, अलोक चौधरी, अरूण विटकर, जागृती पाटील, कुमुदिनी देशमुख, सुजाता चुबे, श्रीधर बापट, शैलजा कुलकर्णी, शशांक जोशी, कुमार जोग, वासंती दातार, सुखराम हिवराळे, वरूण भगत, मदन गायकवाड, देवदत्त म्हात्रे, प्रभूदास पाठोळे, रमेश जयकर, सी. डी. पवार, शोभा देशमुख, कुंदा पवार, शकुंतला बहिरट, विलास वाळवेकर, शोभना गोखले, विजयकुमार गवई, दिंगबर गोसावी, जयश्री गोडसे, भालचंद्र कांगो, श्रीकांत कुलकर्णी, मधुकर कुलकर्णी, मधुकर पोहणेरकर, धनंजय सरदेशपांडे, विजया शिरोळे, चंद्रकांत शिरोळे, पद्मनाभ पाठक इत्यादी रंगकर्मी-नाटककारांनी औरंगाबाद रंगभूमी समृद्ध केली आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात नव्या विचारांचे भान आलेला व प्रयोगशीलतेला महत्त्व देणारा नाटककार-रंगकर्मींचा मोठ्याप्रमाणत उदय झाला. वरील नाटककार रंगकर्मींशिवाय रा. रं. बोराडे, गंगाधर पानतावणे, दत्ता भगत, फ. मुं. शिंदे, अनुराधा वैद्य, शशिकांत वैद्य, विजय दिवाण, दिलीप घारे, यशवंत देशमुख, विश्वास साळुंके, सुजात कांगो, वसंत दातार, अविनाश डोळस, प्रकाश त्रिभुवन, गणेश चदंनशिवे, शिव कदम, दिलिप महालिंगे, प्रेषित रूद्रवार, बब्रूवान रूद्रकंठावार अशा अनेक नाटककार-कलावंतांनी औरंगाबाद रंगभूमीच्या निमित्ताने एकूण मराठवाड्याची व मराठी रंगभूमी समृद्ध केली आहे.

औरंगाबादमधील रंगकर्मींपैकी त्र्यंबक महाजन, रा. रं. बोराडे, म. भि. चिटणिस, गंगाधर पानतावणे, कुमार देशमुख, रूस्तुम अचलखांब, दत्ता भगत, प्रकाश त्रिभुवन, दासू वैद्य, बब्रूवान रूद्रकंठावार, अजित दळवी, प्रशांत दळवी, अरविंद जगताप इत्यादी नाटककारांनी आपल्या लेखनीने योगदान दिले आहे. यापैकी त्र्यंबक महाजन यांनी अगदी सुरूवातीच्या काळात म्हणजेच १९५५ साली झुलते मनोरे हे नाटक लिहून मराठवाड्यातील शैक्षणिक रंगभूमीचा पाया घातला.

नाट्यलेखनाबरोबर दिग्दर्शन, अभिनय, नाट्यमीमांसा अनुवाद अशा नाटकाशी संबंधित सर्वच क्षेत्रात त्र्यंबक महाजन यांनी योगदान दिले. त्याचबरोबर महाजन यांनी अनेक रंगकर्मींनाही प्रेरित केले. त्र्यंबक महाजन यांच्याविषयी नाट्य दिग्दर्शक कमलाकर सोनटक्के म्हणतात की, "महाजनांचा साहित्याच्या विविध शाखाचा व्यासंग हा फार मोठा त्यांची रचनात्मक समीक्षावृत्ती ही नेहमीच नवनव्या प्रयोगांना आणि प्रयोगशीलतेला दोन्ही हात पसरून सामोरी गेली. त्यांनी त्यांच्या

समकालीन सहकाऱ्यांचे लेखन खऱ्या अर्थानं फुलवण्याचं फार मोठं काम केलं... महाजनांनी अगदी सुरूवातीच्या काळात झुलते मनोरे, वासूकाका, दीपस्तंभ, जावईबापू, कॅक्टसची सावली ही प्रयोगक्षम स्वतंत्र नाटकं लिहिली... महाजनांनी प्रकाशझोतात येण्यासाठी आयुष्यात कधी काही केलं नाही."[१३] थोडक्यात, त्र्यंबक महाजन हे औरंगाबाद रंगभूमीवरील एक अष्टपैलू नाट्यकर्मी आहेत. नाटककार अजित दळवी यांनी 'कुठल्याही चौकटीत न बसणारं अजब रसायन' अशा शब्दात त्र्यंबक महाजन यांचा गौरव केला आहे.

औरंगाबाद शहरातील मराठी रंगभूमीचा १९२८ पासूनचा चढता आलेख उपरोक्त विश्लेषणातून सिद्ध होतो. स्वातंत्र्यपूर्व काळात शहरापेक्षा औरंगाबाद जिल्ह्यातील आणि एकूणच मराठवाड्यातील ग्रामीण रंगभूमी ही शहराच्या तुलनेत अधिक सक्रीय होती. औरंगाबाद जिल्ह्यात विचार केल्यास पैठण येथील साळीवाडा रंगभूमी, सिल्लोड तालुक्यातील सोयगाव रंगभूमी, कन्नड तालुक्यातील चिकलठाणा रंगभूमी ग्रामीण भागातील अशा अनेक रंगभूमींनी औरंगाबाद जिल्हा रंगभूमी समृद्ध केली आहे.

२.२.१.१ साळीवाडा रंगभूमी :

सांगली या शहरास मराठीतील नाट्यपंढरी संबोधले जाते. परंतु पैठणमधील साळीवाडा या रंगभूमीचा गांभीर्याने अभ्यास केल्यास पैठण हेच मराठी नाटकाचे उगमस्थान आहे, हे सिद्ध होते. सोळाव्या शतकातील संत एकनाथ महाराजांच्या भारूडामध्ये एकपात्री नाटकाची बीजे आढळतात. एकनाथ महाराजांनंतर १८२८ मध्ये पैठणमध्ये साळीवाडा रंगभूमीचा उदय झाला. म्हणजेच सीतास्वंयवर या नाटकाच्याही अगोदर पैठणमध्ये रंगभूमी अस्तित्वात होती. पैठणच्या साळीवाडा भागातील रामसाळी व लक्ष्मण साळी यांच्यासारख्या अनेक लोकांना सोंगे घेण्याचा छंद होता. सोंगाबरोबर दशावतार, आख्यानपर नाटके, संगीतप्रधान नाटके जवळपास तीस कलावंतांच्या मदतीने सादर केले जात होते. नेपथ्यासह रंगमंचावर नाटक सादर करण्याची परंपरा साळीवाडा रंगभूमीवर होती. नाटकाचे नेपथ्य तत्कालीन प्रसिद्ध पेंटर करिम पेंटर पडदे रंगवण्यातून साकार करत असत.

नारायण विनायक कुलकर्णी यांच्यासारख्या प्रसिद्ध नाटककारांचे कान्होपात्रा हे नाटक साळीवाडा रंगभूमीवर सादर झाले आहे. सुरूवातीच्या काळात आध्यात्मिक नाटके सादर करणाऱ्या

साळीवाडा रंगभूमीने नंतरच्या काळात रंजनप्रधान व प्रबोधनपर नाटकेही सादर केली. साळीवाडा रंगभूमीप्रमाणेच पैठण येथे चिंतामणसेठ भावसार यांच्या हनुमान संगीत मंडळी या नाट्यसंस्थेने व राजाभाऊ चौधरी यांच्या 'राजाभाऊ थिएटर'ने नाट्यक्षेत्रात भरीव योगदान दिले आहे.

२.२.१.२ सोयगाव रंगभूमी :

मराठवाड्याच्याच नव्हे तर महाराष्ट्राच्या रंगभूमीवर आपल्या कार्याने स्वतंत्र स्थान व दबदबा निर्माण करणारी रंगभूमी म्हणजे सोयगाव रंगभूमी होय. औरंगाबाद जिल्ह्यातील सिल्लोड तालुक्यातील सोयगाव या गावात १९०५ मध्ये लोटू पाटील यांनी 'श्रीराम संगीत मंडळी' या नाट्यसंस्थेची स्थापना केली. केवळ स्थापनाच केली नाही तर काळे पाटलांच्या तब्बल तीन पिढ्यांनी सोयगाव रंगभूमीच्या निमित्ताने मराठी रंगभूमीची जवळपास दोनशे वर्ष सेवा केली. निजामी राजवटीमध्ये अवघा मराठवाडा होरपळून निघत असताना, भाषेची-संस्कृतीची साहित्याची गळचेपी होत असताना, जबरदस्ती हिंदूची धर्मांतरे केली जात असताना, आया-बहिणीची अब्रू लुटली जात असताना आणि नाटकाची कोणतीही परंपरा नसताना साऱ्या प्रतिकुलतेवर मात करत श्रीराम संगीत मंडळीच्या माध्यमातून ग्रामीण भागात मराठी रंगभूमीसाठी जे कार्य केले ते सुवर्णाक्षरांनी लिहून ठेवण्यासारखे आहे, असे निरिक्षण अनेक अभ्यासकांनी नोंदविले आहे.

सोयगावच्या रंगभूमीबद्दल व एकूणच पाटील घराण्याच्या नाट्यप्रेमाबद्दल ज्येष्ठ विचारवंत जनार्दन वाघमारे म्हणतात, "सोयगाव हे नाटकवेडे गाव आहे. नाटकवेडा हा महाराष्ट्राचा गुण आहे. हा गुण सोयगावच्या अंगी मुरलेला आहे. सोयगावच्या रामजी पाटील यांनी हौसेपोटी विसाव्या शतकाच्या आरंभी येथे नाट्य परंपरेची सुरूवात केली. त्यांचा मुलगा केशवराव पाटील उर्फ लोटू पाटील यांनी ही परंपरा समृद्ध केली. अनेक नाटकांचे प्रयोग त्यांनी येथे केले ते स्वतः एक प्रसिद्ध नट होते. दिग्दर्शकही होते. त्यांना बालगंधर्वाची उपमा दिली जाते."[१४] ते मराठवाड्याच्या मातीत नाट्य चळवळ रूजवणारे बहुआयामी व्यक्तिमत्त्व आहे.

रामजी पाटील यांच्या अंतिम दिवसांमध्ये सोयगाव रंगभूमीची जबाबदारी त्यांचे पूत्र लोटू पाटील यांच्यावर आली. लोटू पाटील यांनी बालपणापासूनच नाटकात काम केले असल्यामुळे अभिनयकौशल्यासह सारे नाट्यगुण त्यांच्या ठायी मुरलेले होते. वडीलांच्या पश्चात लोटू पाटील यांनी सोयगाव रंगभूमीला विस्तृत रूप दिले. १९०५ मध्ये 'श्रीराम संगीत मंडळी' या संस्थेची

स्थापना करून त्यांनी या नाट्यसंस्थेला व सोयगावला एकूण मराठी रंगभूमीवर मानाचे स्थान मिळवून दिले. लोटू पाटलांच्या या नाट्यप्रेमामुळे आणि प्रेमळ, नम्र स्वभावामुळे तब्बल पाच दशके मराठी रंगभूमीवरील महत्त्वाचे नाटककार व नाट्यसंस्था सोयगावमध्ये प्रयोग करणे सन्मानाचं समजत असतं.

पंचक्रोशीतील लोक लोटू पाटील यांना प्रेमाने भाऊ म्हणत असत. "सोयगावसारख्या खेड्यात भाऊंच्या उदाहरणामुळे 'श्रीराम संगीत मंडळी'स स्थैर्य लाभले. ...पण भाऊ मोठ्या नम्रपणे सांगातात की, गावकऱ्यांचे अमोल-प्रेमळ साहाय्य नसते तर काहीही झाले नसते. अत्यंत उदार, सर्मपित जीवन जगणाऱ्या भाऊंनी सोयगावच्या या नाट्यकलेला अजरामर केले... एकमेकांविषयीचे प्रेम, आदरभावना, ध्येयाची तळमळ यामुळे श्रीराम संगीत मंडळी दिवसेंदिवस वैभवाच्या उंच शिखरावर जात होती. या काळात महाराष्ट्रातल्या अनेक नाट्यसंस्था जन्मास आल्या आणि काही काळानंतर गेल्याही, परंतु श्रीराम संगीत मंडळी ही १९०५ सालापासून अव्याहतपणे नाट्यकलेला वाहून घेत होती... धिप्पाड देहयष्टीच्या बलदंड कलावंताने तन-मन-धनाने या नाट्यभूमीची सेवा केल्यामुळेच सोयगावचे नाव दूरवर गेले."[१५] आपल्या स्वभाववैशिष्ट्यांमुळे लोटू पाटलांनी तत्कालीन महाराष्ट्रातील तमाम रंगकर्मींना आपलेसे केले होते.

लोटू पाटील यांनी सोयगाव रंगभूमीच्या उत्कर्षासाठी अत्यंत निष्ठेने प्रयत्न केले. नाविन्याचा ध्यास, प्रयोगशील वृत्ती, उदार वृत्ती, कलाप्रियता, शोधक नजर, संघटन कौशल्य, नियोजनबद्धता, शिस्तबद्धता, दूरदृष्टिकोन, सामाजिक बांधिलकी, ध्येयवादी वृत्ती व एकूणच रंगभूमीविषयीची अपार निष्ठा या गुणवैशिष्ट्यांमुळे लोटू पाटील यांची महाराष्ट्रभर लौकिक मिळवला होता. "लोटू पाटील यांचा नाट्यसंहितेपासून ते नाटकाच्या सादरीकरणाच्या आधुनिकतेवर भर होता. त्यांचा एकूण नाट्य व्यवहार पाहिला की हे सिद्धच होते की, श्रीराम संगीत मंडळी अर्थार्जनासाठी नव्हे तर, 'नाटकासाठी नाटक' करीत होती. ज्या काळात नेपथ्य म्हणून धोतर-लुगड्यांना पडद्याप्रमाणे लावून त्याच्यासमोर नाटक केले जात होते त्याकाळात श्रीराम संगीत मंडळीने पुण्या-मुंबईहून उत्कृष्ट रंगवलेले पडदे आपल्या नाटकासाठी मागवले. नाट्यमंडळाला लागणारे केशभूषा व वेशभूषेचे साहित्य उच्च दर्जाचे असावे याकडे त्यांचा कल होता... त्यांचे अभिनयकौशल्य व्यावसायिक

नाटांनाही आश्चर्याचा धक्का देत असे."[१६] गुणवत्ता व अभिनय कौशल्यामुळे लोटू पाटलांची नाटके महाराष्ट्रभर चर्चेचा विषय ठरत असत.

श्रीराम संगीत मंडळी सोयगावच्या रामजन्म महोत्सवात सतत सात दिवस अखंडपणे नाट्यप्रयोग करत असत. रामजन्मोत्सव स्थानिक कलावंतांच्या साहाय्याने पंचक्रोशितील जनतेला दिलेली एक नाट्यपर्वणीच होती. सवतासुभा, संगीत संशयकल्लोळ, विरसेन मंजिरी, भक्त प्रल्हाद, सत्यविजय, कुसुमचंपा, संगीत मानापमान, संत कान्होपात्रा, पंताची सून, संत तुकाराम, संत दामाजी, सत्यविजय, मनोविजय, शशिकला, पुण्यप्रभाव, संगीत द्रौपदी, राक्षसी महत्वाकांक्षा, तिकडची शोभा, व्याही विहिन इत्यादी नाटके श्रीराम संगीत मंडळींनी सादर केली. सोयगाव रंगभूमीसोबतच इतर गावी दौरे करून नाटके सादर केली. सादर केलेली नाटके उच्च अभिरूचीची तर होतीच पण सर्वसामान्यांपर्यंत आशय पोहचेल अशीही नाटके श्रीराम संगीत मंडळींनी सादर केली. सुरूवातीच्या काळात लोटू पाटील यांनी नाटकामध्ये स्त्री भूमिका केल्या नंतर मात्र ते पुरूष भूमिकांकडे वळले.

महाराष्ट्रातील महत्त्वाच्या नाटकांबरोबर मराठवाड्यातील महत्त्वाची नाटकेही लोटू पाटील यांनी रंगभूमीवर आणली. महाराष्ट्रात प्रसिद्ध असलेले मराठवाड्यातील नाटककार श्रीपाद बेंडे यांचे बेबी हे नाटक तसेच शंकरलाल पूरवार यांचे देवदासी हे नाटक लोटू पाटलांनी रंगभूमीवर आणले. महत्वाचे म्हणजे महाराष्ट्रीयन रंगभूमीवर इतर संस्थानी बसवलेल्या व महाराष्ट्रभर गाजलेल्या नाटकांना त्यांनी सोयगावच्या रंगभूमीवर निमंत्रण दिले. गंभीर व कलात्मक अशा दोन्ही प्रकारच्या नाटकांचे मिश्रण त्यांच्या नाट्य निवडीमध्ये होता. नाट्य विषयांची संमिश्रता, स्थानिक कलावंतांना प्रोत्साहन, नाविन्याची ओढ, समाजहित दक्षता, सहकाऱ्यांवरील प्रेम, कलात्मक जाण अशा वैशिष्ट्यामुळे लोटू पाटील यांची श्रीराम संगीत मंडळी सातत्याने चर्चेत होती.

स्त्री पात्रांची भूमिका स्त्रियांनीच करणे हे त्या काळाच्या विचार करता महत्वाचे पाऊल लोटू पाटलांनी उचलले होते. श्रीराम संगीत मंडळीमध्ये लोटू पाटील यांच्याबरोबर काशिराम देसाई, विठ्ठल देवकर, जनार्दन चौधरी, प्रल्हाद पाटील, सखाराम चौधरी, दामू लोहार, सोमनाथ झंवर, आत्माराम वाघ, विठ्ठल जोशी, लक्ष्मीबाई शहापूरकर, कृष्णा अग्रवाल, विमलबाई कर्नाटकी इत्यादी

रंगकर्मींनी महत्वाचे योगदान दिले. स्थापनेपासून तब्बल पाच दशके लोटू पाटील यांचा झंझावात महाराष्ट्रीयन रंगभूमीवर होता.

१९५५ च्या आसपास लोटू पाटील यांचे सुपुत्र नारायणराव केशवराव पाटील यांच्याकडे श्रीराम संगीत मंडळाची सूत्रे आली. नारायणराव पाटील यांनी स्वातंत्र्योत्तर काळातील बदललेल्या नाट्यतंत्राचा अंगिकार करून श्रीराम संगीत मंडळाला प्रवाहीत ठेवले. नारायणराव पाटील यांच्या कारकीर्दीत श्रीराम संगीत मंडळींनी अखेरचे बंड, धर्मवीर संभाजी, आगऱ्याहून सुटका, साष्टांग नमस्कार, रायगडाला जेव्हा जाग येते, मोरुची मावशी, बाजिराव मस्तानी, इच्छा माझी पुरी करा, पाटलाची अवलाद इत्यादी नाटके सोयगाव रंगभूमीवर सादर केली. १९८५ पर्यंत सोयगाव रंगभूमीवर श्रीराम संगीत मंडळीकडून नाट्यप्रयोग होत असत. २२ एप्रिल २००५ रोजी ना. धों. महानोर, निळू फुले, जब्बार पटेल अशा दिग्गज लेखक, अभिनेते, दिग्दर्शकांच्या उपस्थितीत सोयगाव या ठिकाणी श्रीराम संगीत मंडळीचा भव्यदिव्य शताब्दी सोहळा पार पडला. आज श्रीराम संगीत मंडळाचे तेज ओसरले असले तरी काळे पाटील घराण्याच्या नव्हे तर मराठी रंगभूमीच्या इतिहासामध्ये सोयगाव रंगभूमीचे कार्य मैलाचा दगड ठरले आहे. लोटू पाटील यांनी महाराष्ट्रभर केलेल्या रंगसेवेमुळेच आजही मराठवाडा साहित्य परिषदेतर्फे नाट्यक्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या रंगकर्मीला लोटू पाटील नाट्य पुरस्कार देण्यात येतो.

साळीवाडा रंगभूमी, सोयगाव रंगभूमी प्रमाणेच औरंगाबाद जिल्ह्याच्या कन्नड तालुक्यातील व चिकलठाणा या गावची चिकलठाणा रंगभूमी प्रसिद्ध आहे. छोट्याशा खेड्यातही शंभर वर्षांची नाट्यपरंपरा या रंगभूमीने राखली आहे. १९०० पूर्वी या गावामध्ये लोककलाचे सादरिकरण होत असे त्यातूनच पुढे १९०० नंतर सामाजिक, पौराणिक, ऐतिहासिक नाटके सादर होऊ लागली. सुनील दत्तात्रय चव्हाण, नरेंद्र तांबी, पंढरीनाथ पारखे इत्यादी रंगकर्मींनी चिकलठाणा रंगभूमीसाठी योगदान दिले. नटसम्राट, सिंहाचा छावा, सरनौबत, वीर अभिमन्यू, गोरा कुंभार, संत जनाबाई, संत तुकाराम इत्यादी नाटके चिकलठाणा रंगभूमीवर सादर झाली आहेत. एकूणच औरंगाबाद जिल्ह्यातील ग्रामीण आणि नागर रंगभूमीमुळे मराठवाडाी रंगभूमी आणि पर्यायाने मराठी रंगभूमी समृद्ध झाली आहे.

२.२.२ बीड जिल्ह्यातील नाट्य चळवळ :

बीड जिल्हा हा कलेची निस्सिम उपासना करणारा जिल्हा आहे. बीड जिल्ह्यात कलावंतांची खाण आहे, असेही सातत्याने बोलले जाते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या युवक महोत्सवात 'कलावंतांचा बालेकिल्ला, बीड जिल्हा... बीड जिल्हा' ही घोषणा प्रत्येक वर्षी दुमदुमत असते. ही घोषणा देताना महोत्सवातील कलावंताच्या चेहऱ्यावर अहंभाव जाणवत असला तरी बीड जिल्हा हा खरोखर कलावंतांचा बालेकिल्ला आहे हे कोणत्याही अभ्यासकला नाकारता येणार नाही. बीड जिल्ह्याने मराठी रंगभूमीला जसे गुणी रंगकर्मी दिले आहेत तसेच चित्रपट सृष्टीसाठी उत्तम अभिनेतेही दिले आहेत. बीड जिल्ह्याच्या गेवराई तालुक्यातील चकलांबा रंगभूमी तसेच परळी तालुक्यातील सिरसाळा रंगभूमीने नाट्यपरंपरेची शंभर वर्षे पूर्ण केली आहेत. एवढी या जिल्ह्याची मोठी नाट्यपरंपरा आहे.

बीड शहरातील रंगभूमी विकसित करण्यात अनेक नाट्य संस्थांबरोबर रंगकर्मींचा सिंहाचा वाटा आहे. नटराज, निशिगंधा, नटरंग, अभिरंग, ॲक्टिव्ह ग्रूप, परिवर्तन प्रतिष्ठान, नाट्यशृंगार इत्यादी नाट्यसंस्थांबरोबरच बलभीम महाविद्यालय, के.एस.के. महाविद्यालय, बंकटस्वामी महाविद्यालयातील नाट्यशास्त्र विभागांनी विविध नाट्यस्पर्धांच्या निमित्ताने बीड जिल्हा रंगभूमीसाठी भरीव योगदान दिले आहे. एस.टी. महामंडळाच्या वतीनेही बीडमध्ये महत्वाची नाटके सादर करण्यात आली आहेत.

संगीत सौभद्र, संगीत संशयकल्लोळ, कीचकवध इत्यादी नाटके १९२०-५० च्या दरम्यान बीड मधील दत्त मंदिरात सादर झाली. स्वातंत्र्योत्तर काळात बीडमध्ये मोठ्या प्रमाणात नाट्यप्रयोग होवू लागले. कवडीचुंबक, साष्टांग नमस्कार, एकच प्याला, वेटिंग फॉर गोदो, आशीर्वाद, मला काही सांगायचय, अंमलदार, झाशीची राणी, देवमाणूस, पाणिगहण, तुझे आहे तुजपाशी, मोरूची मावशी, मिशी हरवली आहे, पांडव प्रताप, लग्नाआधी वराड, तीन चोक तेरा, शांतेचं कार्ट चालू आहे, सासरा मागतो आसरा, सारे प्रवासी तिमिराचे, हंगामी नवरा पाहिजे, महानिर्वाण, चोरी झ ालीच नाही, पूर्णसत्य, सवाल सर सवाल, अंतयात्रा, स्मारक, भोवरा, वाटा-पळवाटा, भग्नमूर्ती इत्यादी महत्वपूर्ण नाटकांचे प्रयोग बीड शहरातील विविध नाट्य संस्थांनी सादर केले आहेत.

बीड शहारातील रंगभूमी समृद्ध करण्यामध्ये अनेक रंगकर्मींनी योगदान दिले आहे. मधुकर गोडसे, सुहासिनी इर्लेकर, वामन केंद्रे, कुलदीप धुमाळे, दीपा क्षीरसागर, सतीश साळुंके, भरत लोळणे, संजय पाटील देवळाणकर, सुधीर निकम, एकनाथ आबूज, हेमलता पाटील, श्रीराम बडे, सुरेखा पाटणकर, देवदत्त म्हात्रे, रामदास जोगदंड, नंदकुमार सबनीस, सुनीता देशपांडे, संजिवनी काळे, प्रशांत जाधव, कृष्णा जाधव, शक्तिकुमार केंडे, वैशाली कोरडे, महेंद्र खिल्लारे, अरूण खोडसकर, वसंत कदम इत्यादी रंगकर्मींनी बीड शहरातील रंगभूमी घडविली आहे. त्यातही सुहासिनी इर्लेकर, वामन केंद्रे, सतीश साळुंके व सुधीर निकम यांनी रंगभूमीसाठी उल्लेखनीय योगदान दिले आहे.

बीड जिल्ह्याचे केवळ मराठवाडी रंगभूमीसाठीच नव्हे तर भारतीय रंगभूमीसाठी महत्त्वाचे योगदान आहे, हे पटवून देताना रंगकर्मी सतीश साळुंके म्हणतात की, "एकेकाळी मुंबई विद्यापीठाच्या नाट्यशास्त्र विभागाचे प्रमुख पद्मश्री प्रा. वामन केंद्रे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या नाट्यशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. शशिकांत बऱ्हाणपूरकर व सरस्वती भुवन महाविद्यालयाच्या नाट्यशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. दिलीप घारे हे तिघेही बीड जिल्ह्यातीलच हा योगायोग नव्हता. तर बीड जिल्ह्याच्या रंगभूमीचे ते कतृत्व होते."[१७] नंतरच्या काळात वामन केंद्रे यांची एनएसडीच्या संचालकपदी निवड झाल्यामुळे बीड जिल्ह्याच्या रंगभूमीचा राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवर गौरव झाला.

बीड हा कलावंतांचा जिल्हा असून तेथिल रसिक प्रेक्षक चोखंदळ आहेत. बीड जिल्ह्यातील नाट्य चळवळीविषयी रंगकर्मी दीपा क्षीरसागर म्हणतात, "बीड जिल्ह्यातील रसिकांनी नाट्याची आपली परंपरा निर्माण केली. विविध जन्मोत्सवातून, लळीतातून अशा प्रकारचे नाट्य निर्माण झालेले दिसून येते. ग्रामीण लोकरंगभूमी ही संपन्न आहे. डोंगरदऱ्यात, निसर्गाच्या कुशीत, पर्वतरांगांच्यामध्ये वसलेला हा जिल्हा एकीकडे जीवन जगण्यासाठी कष्ट, परिश्रम, यातायात करीत आहे तर दुसरीकडे त्याच जीवनसंघर्षाचे गीत गात त्यातून नाट्य निर्माण करत आहे..... नाट्यकलावंताची पिढी घडविणे, उत्तमोत्तम नाटकांची निर्मिती करणे, त्यांचे प्रयोग यशस्वी करणे, नाट्यशिक्षण, नाट्यप्रशिक्षण, नाट्यशिबीरे, नाट्यकार्यशाळांची योजना करणे, तसेच नाट्यमहोत्सव, एकांकिका महोत्सव, नाटकांचे संगीत, प्रायोगिक, व्यावसायिक, सामाजिक, ऐतिहासिक अशी

नाटके बसवून ती यशस्वी करणे, बालनाट्य, विनोदी नाटक, ग्रामीण नाटके, दलित नाटके, एकांकिका, मूकाभिनय, पथनाट्ये अशी सर्व प्रकारची नाट्य-चळवळीची विविध अंगे आज विकसीत होताना दिसून येत आहेत."[१८] जीवनाच्या अत्यंत कठीण प्रसंगातही बीडच्या नाट्यरसिकांनी नाटकाची साथ सोडलेली नाही.

बीड शहारातील रंगभूमीशिवाय तालुक्यांमध्ये आणि काही गावांमध्येही नाट्य चळवळीला पूरक कार्य झाले आहे. अंबाजोगाई, आष्टी, सिरसाळा, माजलगाव, चकलांबा, गेवराई, पाटोदा, केज अशा ठिकाणी नाटके सादर होत असत. अंबाजोगाईमध्ये कलाकेंद्र, कलासंगम, राष्ट्रसेवादल मंच, नाट्य आराधना, रंगवेध, अंकुर प्रतिष्ठान, दासोपंत नाट्य मंडळ, योगेश्वरी महाविद्यालयातील नाट्य चळवळ अशा विविध संस्थांमार्फत नाट्य चळवळ सुरू होती. केशवराव देशपांडे, संपदा कुलकर्णी, राम मुकादम, रा. द. अरगडे, दासू वैद्य, सुधीर वैद्य, सुधीर कुलकर्णी, प्रकाश प्रयाग, शैला लोहिया, ॲड. चौसाळकर, कांतराव मांडवकर, ललिता मुकादम, गीतांजली जाधव, सदानंद कुलकर्णी, अश्विनकुमार देशपांडे, रंगनाथ तिवारी, दिलीप घारे, प्रमोद महाजन, रेखा महाजन, अमर हबीब, द्वारकादास लोहिया, सुरजचंद्र मुथा, स्मिता मुकादम, भिकाऊ राखे, गोपाळराव पांडे, माणिकचंद संघई, माधव मोरे, के. ज. पुरोहित इत्यादी नाटककार व रंगकर्मींनी अंबाजोगाई येथील रंगभूमीसाठी महत्त्वाचे योगदान दिले आहे.

अंबाजोगाई हे मराठवाड्यातील एक महत्त्वाचे सांस्कृतिक साहित्यिक केंद्र असल्यामुळे नाट्य चळवळही येथे रुजली आणि वाढली. साठोत्तरी कालखंडात मराठी रंगभूमीवर गाजलेली जवळपास सर्व नाटके विविध संस्थांच्याद्वारे अंबाजोगाई रंगभूमीवर सादर झाली. अंमलदार, वाजे पाऊल आपले, चक्रव्यूह, रूद्रवर्षा, नटसम्राट, अखेरचा सवाल, कस्तुरीमृग, पुढारी पाहिजे, बिनबियाचं झाडं, हा खेळ सावल्यांचा, माणूस नावाचे बेट, सावल्या, चारचौघी, साटं-लोटं, साती, साती पन्नास, पाहिजे जातीचे, काटी श्रीदेवी, नियतीच्या बैलाला, चाहूल इत्यादी नाटके अंबाजोगाई रंगभूमीवर सादर झाली. वरील बहुसंख्य नाटकातील आशय-विषय हा गंभीर स्वरूपाचा आहे. त्यामुळे अंबाजोगाई रंगभूमीवर प्रामुख्याने प्रयोगशील नाटकांचे प्रयोग मोठ्या प्रमाणात झाले आहेत हे लक्षात येते. महाराष्ट्रातील महत्त्वाच्या नाटककारांसोबतच अंबाजोगाईमधील नाटककारांची नाटकेही सादर करण्यात आली. रा. द. अरगडे यांच्या लाडली बाई, प्रेम आंधळं नसतं, घट डोईवर

घट कमरेवर याबरोबर दासू वैद्य यांच्या आम्हाला बांधाचंय मंदिर या नाटकाचेही अनेक प्रयोग अंबाजोगाई रंगभूमीवर झाले आहेत.

बीड जिल्ह्यातील गेवराई रंगभूमीवरील खेडेगावामध्येही अनेक नाट्य चळवळी कार्यरत आहेत. चकलांबा गावच्या रंगभूमीला शंभर वर्षापेक्षा अधिक मोठी परंपरा आहे. रोकडेश्वर देवाच्या उत्सवानिमित्त चकलांबा येथे सुरूवातीच्या काळात सोंगे, दशावतारी खेळ, लळीत, आख्यान सादर होत असे. व्यंकटराव देशमुख, अनंतराव देशपांडे, नारायणराव काळे, भानुदास सुलाखे, बापुदेव मुळे, सुरेंद्र सुलाखे इत्यादी रंगकर्मींनी चकलांबा रंगभूमीवर राजा हरिश्चंद्र, संत सखू, संगीत शारदा, राजा शिवाजी, मोरूची मावशी अशी नाटके सादर केली. तालुक्यातील सिरसमार्ग या गावी नाट्य सादरिकरणाची मोठी परंपरा आहे. संतूबाईच्या यात्रेच्या निमित्ताने सिरसमार्गमध्ये बेबंदशाही, राजा हरिश्चंद्र, कवडीचुंबक अशी नाटके सादर झाली आहेत. राक्षसभुवन या गावामध्ये लिंबराज पाठक व विठोबा काश्यपगोत्री यांच्या पुढाकाराने साक्षात्कार, सिहांचा छावा, भगवा झेंडा, आगऱ्याहून सुटका अशी पौराणिक व ऐतिहासिक नाटके सादर झाली. जातेगावमध्ये रामधन पवार, पांडुरंग मरकड यांच्या पुढाकाराने सरपंच खुनी पाटील बेईमानी, बेईमान सारखी नाटके सादर झाली. याशिवाय रामपुरी, बोंडराई, राजापूर, उमापूर, पाडळसिंगी, लाकडगाव इत्यादी गावामध्ये धार्मिक सणोत्सवाच्या निमित्ताने नाटके सादर झाली.

गेवराई या तालुक्याच्या ठिकाणी कलोपासक नाट्यमंडळ, नाट्य मंडळ निकम गल्ली, हनुमान प्रासादिक नाट्य मंडळ अशा संस्था कार्यरत आहेत. बाळासाहेब पाटील, रामभाऊ मोरे, हमीद पटेल, लक्ष्मीकांत पुराणिक, हरिभाऊ बोर्डे, हमिदमियाँ पटेल, प्रकाश चिंचोलकर, वसंत जोशी, राम मुळे, सुदामराव पंडीत, भगवान सुतार इत्यादी रंगकर्मींनी गेवराई शहरातील रंगभूमीसाठी कार्य केले. भोवरा, लेक लाडकी या घरची, रास रंगली भंडाऱ्याची, यंत्रमानव अशी नाटके गेवराईमध्ये सादर झाली. शिवाजी अंडरग्राऊंड इन भिमनगर मोहल्ला या नाटकाचे दिग्दर्शक आणि हरिश्चंद्राची फॅक्टरी या चित्रपटामुळे देशभर विख्यात झालेले नंदू माधव यांचेही गेवराई रंगभूमीसाठी महत्त्वपूर्ण योगदान लाभलेले आहे. गेवराई तालुक्यातील पाडळसिंगी येथील अरविंद जगताप यांनी अवघ्या मराठी नाटक-चित्रपट क्षेत्रात ठसा उमटवला आहे. त्यांनी लिहिलेल्या स्टॅच्यू ऑफ लिबर्टी या प्रयोगशील नाटकाचे अनेक व्यावसायिक प्रयोग झाले आहेत.

२०१० नंतर गेवराई रंगभूमीशी निगडित रावबा गजमल यांनी औरंगाबाद शहरात राहून नाट्य क्षेत्रात सपूंर्ण महाराष्ट्र गाजवले आहे. मसनातलं सोनं, भक्षक, रावणायन, मादी, भोंगे इत्यादी नाटक-एकांकिकांमधून गेवराई तालुक्यातील किनगावमधील रावबा गजमल यांनी वर्तमान मराठी रंगभूमीला भरीव योगदान दिले आहे. लेखन, दिग्दर्शन, अभिनय अशा सर्वच क्षेत्रात विविध नाटक-एकांकिका स्पर्धेत रावबा गजमल यांनी पुरस्कार मिळविले आहेत. राक्षसभुवन या गावात शंभर वर्षांची नाट्य परंपरा आहे. श्रीराम व्यास, शेषराव व्यास, बापुदेव पाठक, काशिनाथ दांडेगावकर इत्यादी रंगकर्मींनी राक्षसभुवन रंगभूमीवर स्वर्गावर स्वारी, भक्त प्रल्हाद, एकच प्याला इत्यादी नाटके सादर केली.

बीड जिल्ह्यातील पाटोदा येथील दाजी भोसले आणि एस.डी. काकरीया यांनी १९६५ ते १९७५ या दशकात पाटोदा रंगभूमीसाठी महत्त्वपूर्ण कार्य केले. नाट्यप्रयोगाला रंगभूमीवर सादर करण्यासाठी या दोघांनी मिळून नवरंग नाट्य क्लबची स्थापना केली. रमेश पिसाळ, गनी मास्तर, शिवाजीराव जाधव यांच्या साहाय्याने नवरंग क्लबने तो मी नव्हेच, मोरूची मावशी, लग्नाची बेडी अशी नाटके सादर केली. त्याचबरोबर पी.एस.पवार, शरीफ खान यांनी पुणे-मुंबई येथे गाजलेली वस्त्रहरण, सूर्यास्त, घाशीराम कोतवाल अशी नाटके पाटोदा रंगभूमीवर सादर केली. बीड जिल्ह्यातीलच आष्टी येथे लोकमान्य कलारंग ही नाट्यसंस्था कार्यरत होती. या नाट्यसंस्थेतील मधुकरराव सोळसे, सुरेंद्र शिंदे, मारूती निकाळजे इत्यादी रंगकर्मींनी हिरो पाहिजे, निवडणूक अशा एकांकिका सादर करून बेंडे एकांकिका स्पर्धा गाजवली आहे.

बीड जिल्ह्यातील माजलगाव मध्ये श्याम पाठक, ल.ना. देशपांडे, नरेंद्र निळेकर, स्नेहल पाठक इत्यादी रंगकर्मींनी पसंती, अर्धविराम, ऋणानुबंध अशी नाटके सादर केली. माजलगावच्याच संदीप पाठक यांनी अवघी महाराष्ट्राची रंगभूमी गाजवली. घडलय बिघडलय, कॉमेडी एक्सप्रेस सारख्या नाटकांबरोबर वऱ्हाड निघालंय लंडनला या एकपात्री नाटकाचे जगभर यशस्वी प्रयोग केले आहेत. याचबरोबर प्रदीप साळुंके, प्रभाकर साळेगावकर, अनिलकुमार साळवे, सिद्धार्थ टाकणखार, प्रवीण पाटेकर इत्यादी लेखक-रंगकर्मींनी माजलगाव रंगभूमीसाठी महत्त्वाचे योगदान दिले आहे.

अनिलकुमार साळवे यांनी ग्लोबल आडगाव, कथा खैरलांजी, शांतता...दंगल सुरू आहे इत्यादी नाटक-एकांकिका लिहून महाराष्ट्रभर सादरही केल्या आहेत. प्रवीण पाटेकर यांनी नाट्यलेखन, दिग्दर्शन व अभिनयामुळे महाराष्ट्रभर लौकिक मिळवला आहे. अखंड, पाझर, मॅट्रिक अशा नाटक-एकांकिकांच्या माध्यमातून ग्रामीण रंगभूमीपासून ते पुणे-मुंबईच्या रंगभूमीपर्यंत यशस्वी वाटचाल केली आहे.

परळी तालुक्यातील सिरसाळा रंगभूमीला शंभर वर्षांची परंपरा आहे. राम जन्मोत्सवानिमित्त १९१८ पासून सिरसाळा येथे नाटके सादर केली जात होती. अनंतराव वैद्य, गोपाळराव भिलेगावकर, अंबादासराव पांडे, गोपाळराव खेळकर इत्यादी रंगकर्मींनी सिरसाळा रंगभूमीवर संत तुकाराम, संगीत शारदा, संगीत सौभद्र, मनोविजय ही नाटके सादर केली. सिरसाळा येथील एस.पी.पी. महाविद्यालयातील नाट्यशास्त्र विभाग व तेथील नाट्यशास्त्राचे प्राध्यापक चंद्रशेखर कणसे यांनी सिरसाळा येथे बालनाट्य शिबिरे आयोजित करून बालरंगभूमीसाठी महत्त्वाचे योगदान दिले आहे. सिद्धार्थ तायडे यांनी सिरसाळा रंगभूमीसोबतच एकूण मराठवाडी रंगभूमीसाठी आपल्या नाट्यलेखन, दिग्दर्शनातून महत्त्वाचे योगदान दिले आहे. ब्लॅक कॅनव्हास, डायरी एका डोंगराची ही बालनाट्येही तायडे यांनी लिहिली आहेत.

बीड जिल्ह्यातील एकूण रंगभूमीचा अभ्यास केल्यास मराठवाडी व मराठी रंगभूमीसाठी बीड जिल्ह्याने भरीव योगदान दिले आहे, हे सिद्ध होते. वामन केंद्रे, अरविंद जगताप, रा.द. अरगडे, नंदू माधव, मिलिंद शिंदे, दासू वैद्य, शशिकांत बऱ्हाणपूरकर, दिलीप घारे, सुहासिनी इर्लेकर, दीपा क्षीरसागर, संदीप पाठक, रावबा गजमल अशी नाट्य-सिनेक्षेत्रात नावलौकिक मिळवलेले दिग्गज कलावंत बीड जिल्ह्यातील आहेत. बीड जिल्ह्याच्या रंगभूमीविषयी सतीश साळुंके म्हणतात, "नाट्य चळवळीच्या सर्व टप्प्यांमध्ये बीड जिल्ह्याने महत्त्वाचे योगदान दिले आहे. चकलांबा, राक्षसभुवन, सिरसाळा, नेकनूर, सिरसमार्ग गावात काही नाटके केली जात होती. तर आष्टी परिसरात असणाऱ्या प्रतिकूलतेवर मात करून नाट्यकलावंतांनी आपली कला जोपासली नवनाट्याच्या वाऱ्याचे या जिल्ह्याने स्वागत केले. अनेक प्रायोगिक नाटकांचे सादरिकरण करून प्रयोगशील रंगभूमी उभारली. वर्तमानकाळात जिल्ह्यात बीड आणि अंबाजोगाई वगळता अन्य ठिकाणचे नाटक क्षीण झाल्याचे जाणवते हे मात्र खरे."[११] बीड आणि अंबेजोगाई वगळता इतरत्र नाट्य चळवळ क्षीण

झाली आहे असे सतीश साळुंके यांनी नमूद केले असले तरी त्यांच्या विधानामध्ये संपूर्णतः तथ्य असल्याचे प्रस्तुत अभ्यासकास वाटत नाही. कारण माजलगाव तालुक्यातील अनिलकुमार साळवे, संदीप पाठक, प्रवीण पाटेकर या तरूण नाट्यकर्मींनी मराठी रंगभूमीवर स्वतःचे कर्तृत्व गाजवले आहे. त्याचबरोबर गेवराई तालुक्यातील नव्या दमाचे लेखक, दिग्दर्शक अरविंद जगताप, रावबा गजमल यांनीही आपले कर्तृत्व सिद्ध केले आहे.

२.२.३ जालना जिल्ह्यातील नाट्य चळवळ :

जालना हा मराठवाड्यातील सांस्कृतिक, ऐतिहासिक व व्यापारी केंद्र या अर्थाने महत्त्वाचा जिल्हा आहे. जालना शहराबरोबर अनेक लहानमोठ्या गावातही रंगभूमीविषयक कार्यक्रम पार पडलेले आहेत. जिल्ह्यातील भागुजी आप्पा कोष्टी रंगभूमी, जाफराबाद रंगभूमी, सेवली रंगभूमी, परतूर रंगभूमी या रंगभूमीला तर शंभर वर्षांचा इतिहास आहे. याशिवाय भोकरदन, तीर्थपुरी, पारद, भारज, घनसावंगी, जांब समर्थ, साष्ट पिंपळगाव, रांजणी, जामखेड, शहागड, भणंग जळगाव अशा विविध गावांमध्ये नाट्य चळवळी चालत असत. काही गावांमधील नाट्य चळवळ आज क्षीण झाली असली तरी जांब समर्थ सारखी अनेक गावे आज रंगभूमीसाठी महत्त्वाचे योगदान देत आहेत.

जालना शहरामध्ये श्रेयश, मराठवाडा नाट्य परिषद, अभिनव थिएटर्स, कलाश्री, मत्स्योदरी थिएटर, कलायतन, रंगमंच, कलोपासक, नाट्यांकूर, जालना स.भु. प्रशाला कला विभाग, महिला मंडळ जुना जालना, कला मंडळ जालना इत्यादी नाट्यसंस्थांनी जालना शहरातील रंगभूमीसाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. द. ग. देशपांडे, रेखा बैजल, शंकर परचुरे, सूर्यकांत सराफ, जयंत दिवाण, बाबुराव जाफ्राबादकर, जयंत देशपांडे, लक्ष्मीकांत प्रामाणिक, देवदत्त म्हात्रे, गणेश जळगावकर, संजय टिकारिया, मुरलीधर मोल्हार, बसवराज कोरे इत्यादी नाटककार-रंगकर्मींनी जालना रंगभूमी घडविली आहे. चांदणे शिंपित जा, थँकयू मिस्टर ग्लाड, सौजन्याची ऐशीतैशी, मुलगी झाली हो अशा महाराष्ट्रभर गाजलेल्या नाटकाबरोबर आकाशओढ सारखी स्थानिक लेखकांनी लिहिलेली नाटकेही जालना रंगभूमीवर सादर झाली.

जालना जिल्ह्यातील जाफराबाद रंगभूमीवर १८८५ सालापासून नाट्य चळवळ अस्तित्वात आहे. सखारामपंत खापरखुंटीकर यांनी परतूर रंगभूमीसाठी मोलाचे कार्य केले आहे. सव्वाशे वर्षांची परंपरा परतूर रंगभूमीला आहे. अंबड रंगभूमीसाठी त्रिंबकराव जळगावकर, शहागड

रंगभूमीसाठी श्यामबुवा पुराणिक, भारज रंगभूमीसाठी नानासाहेब चिटणिस, तीर्थपुरी रंगभूमीसाठी बन्सीधर काका जोशी यांनी महत्त्वाचे योगदान दिले आहे. सेवली या गावातील रंगभूमीसाठी हरिहर प्रासादिक नाटक मंडळी (१९१२) आणि आरूणोदय संगीत मंडळ (१९४०) या नाट्यसंस्थांनी भरीव योगदान दिले आहे.

संत रामदास महाराजांचे गाव म्हणून प्रसिद्ध असणारे जांब समर्थ हे जालना जिल्ह्यातील गाव आज नाट्य चळवळीसाठीही तेवढेच प्रसिद्ध आहे. जांब येथील रंगमळा या नाट्यसंस्थेने अल्पावधीतच जागतिक लौकिक मिळवला आहे. राजकुमार तांगडे, संभाजी तांगडे, अश्विनी भालेराव, कैलास वाघमारे, पूजा सोळंके इत्यादी रंगकर्मी रंगमळा या नाट्य संस्थेशी संबंधित आहेत. ग्रामीण जीवनाचे वाङ्मयीन भाष्यकार असणारे राजकुमार तांगडे या नाटककार-अभिनेत्याने स्थानिक कलाकारांना सोबत घेऊन जागतिक स्तरावर रंगमळा या नाट्यसंस्थेचे नाव पोहचविले. दलपतसिंग येती गावा, आकडा, हितशत्रू, शिवाजी अंडरग्राऊंड इन भिमनगर मोहल्ला अशा नाटकांमधून तांगडे यांनी शेतकरी, शेतमजूर व सर्वसामान्याचे प्रश्न मांडले. त्यांच्या शिवाजी अंडरग्राऊंड इन भिमनगर मोहल्ला या प्रायोगिक नाटकाने व्यावसायिकतेच उच्चांक गाठले आहेत.

२.२.४ उस्मानाबाद जिल्ह्यातील नाट्य चळवळ :

उस्मानाबाद हा सांस्कृतिक व लोककलेचा वारसा लाभलेला जिल्हा आहे. तुळजाभवानी मातेच्या उपासनेचा भाग म्हणून वर्षानुवर्ष उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये लोककला व लोकसंस्कृतीचा पगडा राहिलेला आहे. लोकरंगभूमीवरील विविध कलाप्रकारातूनच पुढे उस्मानाबाद रंगभूमीचा विकास झाला आहे. "उस्मानाबाद जिल्ह्यातले नाटक उभे राहिले ते शहराऐवजी ग्रामीण भागात. लोकरंगभूमीच्या ऐश्वर्याची पार्श्वभूमी लाभलेला उस्मानाबाद जिल्ह्याला लोकधर्मी नाटकाची उज्ज्वल परंपरा आहे. आई तुळजाभवानीच्या अधिष्टानामुळे देवी उपासनेचा रंगाविष्कार हा इथल्या जीवन शैलीचाच भाग बनला. त्याचाच परिणाम म्हणून तुळजापूर, मुरूम, जेवळी, उपळे, बारूळ, केशेगाव या सारख्या लहान-लहान गावातही नाटकाची शंभर वर्षापर्यंतची परंपरा सहज सापडते. या परंपराचे बिजारोपन शतकानुशतकापासून इथल्या वातावरणाला संमोहित करणाऱ्या आराधी, गोंधळी या लोकरंगभूमीने केले आहे. त्यात संत गोरोबाकाका व शिवरामबुवा यांच्या रूपात संत काव्याने इथले मन संस्कारित केले. आख्यान नाटकांपासून सुरू झालेल्या उस्मानाबाद शहरातील

नाट्यपरंपरेने पुढे गद्य नाटकांच्या प्रवासालाही मन:पूर्वक स्वीकारले."[२०] उस्मानाबाद रंगभूमीची परंपरा व स्वरूपच सतीश साळुंके यांनी आपल्या विधानातून स्पष्ट केले आहे.

उस्मानाबादमध्ये माधव गरड, उल्का पाटील, व्यंकटेश हंबीरे, अंबादासराव दानवे, अशोक कुलकर्णी, कुमार व्यास, नौशाद पठाण, योगीराज वाघमारे, रमेश बोर्डीकर, विशाल शिंगाडे इत्यादी रंगकर्मींनी उस्मानाबाद रंगभूमीसाठी कार्य केले. होय, मी शेवंता बोलतेय, गिऱ्यान अशा सामाजिक नाटकाचे लेखन करून १९८० पासून अभिनयाच्या क्षेत्रातही माधव गरड यांनी महत्त्वाचे योगदान दिले आहे. उस्मानाबादमधील विद्युत महामंडळ व एस.टी. महामंडळातील कलावंतांनी एकत्र येऊन स्थापन केलेल्या 'चेतना नाट्य मंडळ' या नाट्य संस्थेमुळे उस्मानाबाद रंगभूमी अधिकच समृद्ध झाली. वामन जाधव, प्रकाश परंडकर, शोभा गायकवाड, कुमार व्यास यासारख्या रंगकर्मींनी शेवंता जिती हाय, स्मारक, थँक्यू मिस्टर ग्लाड अशी नाटके सादर करून स्पर्धांमध्ये यश मिळविले.

ग्रामीण भागात शहरापेक्षा नाट्य चळवळ अधिक गतीमान होती. बारूळ येथील बालेश्वर प्रासादिक संगीत नाटक मंडळी (१९३४), केशेगावातील चन्ने बसवेश्वर नाट्य मंडळ (१९५०), तुळजापुर येथील नगरविकास मंडळ, नागझिरा नाट्य मंडळ, जवाहर तरूण मंडळ, रणसम्राट नाट्यमंडळ, त्रिमूर्ती नाट्यमंडळ इत्यादी नाट्यसंस्थांनी रंगभूमीची सेवा केली. श्रीकांत नाडापुडे, दिलीप भोसले, रवींद्र घन, संभाजी भोसले, भगवंत शामराज, प्रकाश हुंडेकरी, संजय कवठेकर इत्यादी रंगकर्मींनी पचरंग (१९८५) या नाट्यसंस्थेमार्फत प्रयोगशील नाटकांचे सादरिकरण करून अवघ्या मराठवाड्यामध्ये नाव लौकिक मिळवला. यासोबतच उमेश जगताप, शहाजी निकम, बाळासाहेब मंडणे, शिवाजीराव गंगणे, सुरेश दीक्षित इत्यादी कलावंतानी उस्मानाबाद रंगभूमीसाठी महत्त्वाचे योगदान दिले आहे.

२.२.५ लातूर जिल्ह्यातील नाट्य चळवळ :

लातूर जिल्ह्याने मराठवाडी रंगभूमीसाठी मोलाचे योगदान दिले आहे. अगदी सुरूवातीच्या कालखंडात लातूरमध्ये दत्त जयंती महोत्सवात ललित सादर होत असे. ललितातून नंतरच्या काळात लातूरमध्ये संगीत रंगभूमीचा उदय झाला. ग्राम्य नाट्य चळवळ, नागरी नाट्य चळवळ अशा चळवळी एकाच वेळी लातूरच्या रंगभूमीवर कार्यरत होत्या. राजाभाऊ म्हैसकर यांची कलोपासक (१९५६) ही नाट्य संस्था, भीमाशंकर आप्पा पंचाक्षरी यांची नवयुग नाट्य मंडळ

(१९६१) ही नाट्यसंस्था, संजय आयाचित यांची रंगवेध ही नाट्यसंस्था, शैलेश गोजमगुंडे यांची सर्वोदय सांस्कृतिक कलामंच ही नाट्यसंस्था, दिपरत्न निलंगेकर यांची जनरंग अकादमी या नाट्यसंस्थांनी आणि संस्थापकांनी लातूरची रंगभूमी समृद्ध केली.

रसबहार, नारी प्रबोधन मंच, विलासराव देशमुख फाऊंडेशन, आशादीप, लायन्स क्लब व रजनीगंधा फाऊंडेशन, नाट्यस्पंदन इत्यादी नाट्यसंस्थानी लातूर रंगभूमीवर केलेले कार्यही महत्त्वाचे आहे. सुरूवातीच्या कालखंडामध्ये जगन्नाथ सोनवणे, देविदासराव कुलकर्णी, विष्णूदास पुराणिक, भागुराम लोहारे यांनी रंगभूमी रूजविण्याचा प्रयत्न केला. नंतरच्या काळात श्रीराम गाजमगुंडे, उमाकांत खानापुरे, शिरिश पोकळे, ज्योत्स्ना कुकडे, बसवराज पाटील, संजय आयाचित, श्रृतीकांत ठाकूर, बाळकृष्ण धायगुडे, शैलेश गोजमगुंडे, अभय कुलकर्णी, सुनील साळुंके, सारिका पाठक, कोमल सोमारे, रेश्मा माने, लीना काटे, सत्यविजय जाधव, विलास एकतारे, स्मिता वैद्य, मुकुंद भिसे, सुनील कुलकर्णी इत्यादी लेखक-कलावंतांनी लातूर रंगभूमी उभी करण्यात मोलाचे योगदान दिले आहे.

लोकरंगभूमीकडून संगीत रंगभूमी व नंतरच्या काळात प्रायोगिक रंगभूमीकडे लातूर रंगभूमीचा कल आहे असे दिसते. साठोत्तर काळातील मराठी रंगभूमीवर यशस्वी झालेल्या व अशय-विषयाच्या दृष्टीने गंभीर नाटकांचे अधिकाधिक सादरिकरण लातूर रंगभूमीवर झाले आहे. बंदिशाळा, चकवा, सोनेरी सकाळ, कुलवधू, रायगडाला जेव्हा जाग येते, हयवदन, हमिदाबाईची कोठी, घराबाहेर, बेगम बर्वे, मुलगी झाली हो, आपण सारे घोडेगावकर, अशी पाखरे येती, आधे अधुरे, दूरचे दिवे, माणूस नावाचे बेट, अँटीगणी, बाकी इतिहास, इन्शाअल्ला, अनादी अनंत इत्यादी नाटके लातूर रंगभूमीवर वेगवेगळ्या नाट्यसंस्थांनी सादर केली आहेत. लातूर रंगभूमीची प्रवृत्ती गंभीर होती हे या नाटकांच्या शीर्षकावरूनही लक्षात येते. लातूर जिल्ह्यातील चिंचोली, बल्लाळनाथ, महापूर, बोरगाव, भादा, खंडापूर, शिवली इत्यादी गावांमध्ये नाट्य चळवळ रूजली आहे.

२.२.६ नांदेड जिल्ह्यातील नाट्य चळवळ :

नांदेड ही जशी स्वातंत्र्यलढ्याची भूमी आहे तशी ती नाट्यप्रेमींचीही भूमी आहे. सुरूवातीच्या काळात सणोत्सवाच्या निमित्ताने नाट्यसदृश्य लोककला नांदेड जिल्ह्यात सादर होत असत.

नंतरच्या काळात संगीत नाटकांबरोबर प्रयोगशील नाटके नांदेड रंगभूमीवर मोठ्या प्रमाणात सादर झाली. किंबहुना प्रयोगशीलता हा नांदेड रंगभूमीचा स्थायिभाव आहे असे म्हणता येईल. या संदर्भात सतीश साळुंके म्हणतात, "नांदेड रंगभूमी अगदी आरंभापासूनच विचारप्रवर्तक होती असे वाटते. त्यात हौशिपणाचा भाग होताच पण दुसऱ्या बाजूला यज्ञेश्वर शास्त्री कस्तुरे, एकनाथ महाराज, प्राचार्य बारलिंगे, नरहर कुरुंदकर, प्राचार्य स.रा. गाडगीळ आणि के.रं. शिरवाडकर हे विचारवंत नाट्यशास्त्रासह अभिनयाचे मूलभूत विचार, नाट्य साहित्य, रससिद्धांत यांची चिकित्सक मांडणी करीत होते या विचारमंथनाच्या जोडीला एक रात्र अर्धा दिवस, खडाष्टक, हाच मुलाचा बाप... तो मी नव्हेच, भावबंधन या सारखी नाटके होत असल्याने नांदेडची रंगभूमी मुळापासून विकसीत होऊन ती प्रयोगशील होत होती. असे चित्र मराठवाड्यात अन्यत्र अपवादानेच पहायला मिळते."[२१] नाटककार, नाट्य समीक्षक, विचारवंत, संगीतज्ज्ञ, गुणी कलावंतांच्या एकत्रिकरणामुळे नांदेड रंगभूमी समृद्ध आहे.

नांदेड रंगभूमीच्या विकासमध्ये प्रतिभा नाट्य मंदीर, नांदेड नाट्य संघ, सांस्कृतिक मंच नांदेड, तन्मय ग्रूप सरस्वती प्रतिष्ठान, शक्ती प्रतिष्ठान इत्यादी नाट्यसंस्थांनी भरीव योगदान दिले आहे. शाहीर अण्णा चव्हाण यांनी लोहा या गावात 'प्रेरणा नाट्य मंडळ' ही नाट्यसंस्था स्थापन करून पूर्णवेळ रंगभूमीसाठी कार्य केले. शंभर वर्षापेक्षा मोठी परंपरा लोहा रंगभूमीला आहे. नांदेडच्या किनवट भागामध्ये आदिवासी समाजातर्फे सणोत्सवाच्या निमित्ताने नाटके सादर होतात.

अभ्यासू विचारवंत व मेहनती कलावंतामुळे नांदेड रंगभूमी इतर जिल्ह्यापेक्षा सरस आहे. अण्णासाहेब गुंजकर, तात्यासाहेब कानोले, नरहर कुरूंदकर, राम शेवळकर, स. रा. गाडगीळ, ग. ना. अंबेकर, नाथ नेरळकर, लीलाताई धर्मपुरी, केशवराव नागपूरकर, प्राचार्य बारलिंगे, दत्ता भगत, के. रं. शिरवाडकर, नलिनी देशपांडे, मोहन भालेराव, सुरेश पुरी, लक्ष्मण संगेवार, जीवन पिंपळवाडकर, रवी शामराज, दीपक मुळे, विजयकुमार माहुरे, प्रभाकर गादेकर, बाबुराव सारंगधर, बसवेश्वर घोडके, गणेश पांडे, कविता पत्की, सुनीताताई सहस्त्रबुद्धे, उषाताई हर्षे, राजीव किवळेकर, दिलीप पाध्ये, ज्योती पाध्ये, नाथा चितळे, उमेश भालेराव, जगदीश कदम, अमेय दक्षिणदास, किरण पोत्रेकर, सुहास देशपांडे, राजेश दुर्ग, राम चव्हाण, शेख सलीम, अंबादास कांबळे इत्यादी लेखक, कलावंत, विचारवंतांच्या योगदानामुळे नांदेड रंगभूमी समृद्ध झाली आहे.

शांतता! कोर्ट चालू आहे, भ्रमाचा भोपळा, दुरितांचे तिमिर जावो, माणूस नावाचे बेट, वेटिंग फॉर गो, किरवंत, शितयुद्ध सदानंद, घाशीराम कोतवाल, ढोलताशे, खेळ मांडियेला, गिधाडे, सखाराम बाईंडर, हिमालयाची सावली, वाटा पळवाटा, वीज म्हणाली धरतीला अशी महाराष्ट्रीयन रंगभूमीवर गाजलेली प्रयोगशील नाटके नांदेड रंगभूमीवर सादर झाली आहेत.

२.२.७ हिंगोली जिल्ह्यातील नाट्य चळवळ :

१९९९ मध्ये हिंगोली जिल्ह्याची निर्मिती झाली. परभणी जिल्ह्यातून स्वतंत्र झालेल्या या जिल्ह्याच्या रंगभूमीचा इतिहास हा अवघ्या वीस वर्षांचा असला तरी मराठवाडी रंगभूमीच्या दृष्टीने मौलिक कार्य हिंगोलीमध्ये झालेले आहे. श्रीपाद बेंडे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ होणाऱ्या बेंडे एकांकिका स्पर्धेमुळे हिंगोली या शहराचे नाव अवघ्या महाराष्ट्रीयन रंगभूमीपर्यंत प्रसिद्ध झाले आहे. बेंडे हे मूळचे परभणी जिल्ह्यातील पाथरी तालुक्यातील झोडगाव या गावचे आहेत. नाटकाची व कलेची प्रचंड आवड असल्यामुळे मुंबई येथील प्रसिद्ध नाट्यमन्वंतर या नाट्यसंस्थेत त्यांनी नटाचे काम केले. त्याबरोबर दहा नाटकांचे लेखनही त्यांनी केले आहे.

मराठी रंगभूमीचा संधीकाळ चालू असताना श्रीपाद बेंडे यांनी अस्सल मातीशी इमान राखणारे नाट्यलेखन केले. त्यांच्या बेबी सारख्या नाटकाचे १९३२ नंतर मुंबई-पुणे कडील रंगभूमीवर दिडशे पेक्षा जास्त व्यावसायिक प्रयोग झाले. परंतु मराठवाड्यामध्ये मात्र बेंडे यांच्या योगदानाची कोणतीही चर्चा नव्हती. श्रीपाद बेंडे यांच्या योगदानाची माहिती पुणे-मुंबईसोबतच मराठवाड्यातील नाट्यप्रेमींना व्हावी म्हणून मूळचे हिंगोली जिल्ह्यातील (तत्कालीन परभणी) परंतु नोकरीच्या निमित्ताने पुणे-मुंबईकडे स्थायिक झालेल्या प्रियकर जैन व सी.एम. साकळे यांनी बेंडे यांच्या नावाने नाट्यस्पर्धा घेण्याचे ठरविले. त्यातूनच पुढे १९६८ साली बेंडे यांच्या नावाने एकांकिका स्पर्धा घेण्याचा निर्णय झाला.

प्रियकर जैन, सी.एस. साकळे यांच्यासोबतच कमलाकर मुक्कीमवार, फुलचंद मुक्कीमवार, विजय सावळे, पुंडलिक झाडे, कालिदास कुलकर्णी, जे.एम. मंत्री, पुरुषोत्तम बजाज, आर.पी. अग्रवाल इत्यादी नाट्यप्रेमींनी १९६८ ते १९९५-९६ पर्यंत ही एकांकिका स्पर्धा सुरू ठेवली. आर्थिक नियोजन व अंतर्गत रस्सीखेचामुळे १९९५-९६ च्या दरम्यान बेंडे एकांकिका स्पर्धा बंद झाली. स्पर्धा बंद झाली असली तरी ३०-३५ वर्षात या स्पर्धेने अवघी महाराष्ट्रीयन रंगभूमी गाजविली. बेंडे

एकांकिका स्पर्धेला त्या काळात महाराष्ट्रभर मानाचे स्थान होते. ३०-३५ वर्षात जवळपास सहाशे एकांकिका या स्पर्धेत सादर झाल्या. त्यामुळे एकांकिका लेखनास तर वाव मिळालाच परंतु ग्रामीण रंगभूमीचा देखील विकास झाला.

श्रीपाद बेंडे यांच्या लेखन-अभिनयाचा गौरव करताना रंगकर्मी चंद्रकांत धांडे म्हणतात, "मुंबईच्या नाट्यमन्वंतर या संस्थेत ते नट म्हणून दाखल झाले. त्यांनी बेबी, मोऱ्यांची मोहना, बुवा, सती शर्मिला, पांचाली, शक्ती, आरसा अशी एकूण दहा नाटके लिहिली असे म्हणतात. त्यांचे बेबी हे नाटक फार गाजले... तीन वर्षात या नाटकाचे शंभर प्रयोग झाले... रंगभूमीची अधोगती होत असलेल्या काळात रंगभूमी गाजविणाऱ्या या गुणी नटाकडे आणि नाटककाराकडे समाजाचे दुर्लक्ष होणे स्वाभाविक आहे."[२२] मराठी रंगभूमीची अधोगती होत असताना श्रीपाद बेंडे यांनी आपल्या लेखनीने हातभार लावणे ही मराठवाडी रंगभूमीच्या दृष्टीने खरोखर गौरवाची बाब आहे.

बेंडे यांच्याशिवाय प्रियकर जैन हे स्वतः नट व लेखक होते. याला जीवन ऐसे नाव हे नाटक त्यांनी लिहिले होते. हिंगोलीतील स्नेहविकास मंडळाच्या डॉ. शिरसमकर, प्र.म. देशपांडे, सुभाष कन्नमवार यांनीदेखील हिंगोली रंगभूमीसाठी कार्य केले. याशिवाय विलास वैद्य, प्रवीण जोग, राजीव घन यांनीही उल्लेखनीय कार्य केले. आमदार सौभाग्यवती, तुझे आहे तुजपाशी, वाढतो ही दुर्वाची जुडी, चोरी झालीच नाही अशी नाटके हिंगोली रंगभूमीवर सादर झाली.

२.२.८ परभणी जिल्ह्यातील नाट्य चळवळ :

परभणी रंगभूमीला दीर्घ परंपरा लाभली असून या रंगभूमीने मराठवाड्याची रंगभूमी समृद्ध केली आहे. परभणी रंगभूमीवर उदेश्वर गणेश मंडळ, बालगणेश मंडळ, शिवाजी गणेश मंडळ, सप्तरंग थिएटर्स सेलू, गणेश नाट्य कलामंडळ, विठ्ठल प्रासादिक नाट्यमंडळ, ओंकार नाट्यमंडळ अशा नाट्यसंस्थांनी कार्य केले आहे. परभणी शहराबरोबर जिंतूर, सेलू, वालूर, चारठाणा, देऊळगाव गात, पाथरी, सोनपेठ इत्यादी ठिकाणच्या रंगकर्मीचे रंगभूमीसाठी महत्त्वाचे योगदान लाभले आहे. यापैकी देऊळगाव गात येथील रंगभूमीला शंभर वर्षाचा इतिहास आहे.

चारठाणा हे परभणी जिल्ह्यातील एक अग्रगण्य नाट्य चळवळीचे केंद्र आहे. चारठाणा येथील रंगभूमीचे स्वरूप सांगताना रंगकर्मी द. ग. देशपांडे म्हणतात, "चारठाणा येथे दोन नाट्यसंस्था कार्यरत होत्या. एक गणेश नाट्य कलामंडळ व दुसरी विठ्ठल प्रासादिक नाट्यमंडळ

वरील नाट्यमंडळ गणेशोत्सवात दहा दिवस मेळ्याचे, नृत्याचे व नाटकाचे कार्यक्रम हिरिरीने करीत असत. तेथील ग्रामदैवत गोकुळेश्वर महादेव. शिवरात्री उत्सवात दहा दिवस नाटकांचे प्रयोग सादर केले जात. दरवर्षी डिसेंबर-जानेवारीत श्री. संत जनार्दन स्वामींच्या महायात्रेत १९४० ते १९६५ पर्यंत विठ्ठल प्रासादिक नाट्यमंडळ संगीत नाटके उत्तम प्रकारे सादर करीत होते."[२३] चारठाणा रंगभूमीवरील रंगकर्मींनी व्रतस्थपणे रंगभूमीची सेवा केली आहे.

पद्माकर कुंडीकर, पद्माकर पेडगावकर, दादासाहेब लिंबेकर, भगवानशास्त्री लिंबेकर, प्रभाकर वाईकर, श्यामलाबाई वाईकर, नारायणराव काशिकर, अनंतराव उमरीकर, शरद देऊळगावकर, राम निकम, रामकृष्ण ढेरे, अप्पासाहेब पुळूजकर, रा. रं. बोराडे, हनुमानदास वर्मा, किशोर पुराणिक, दत्ता चौगुले, उदय कातनेश्वर, प्रभाकर लोणीकर, रेखा देसाई, बाबुराव मठपती, वंदना जोशी, कृष्णा मोहरीर, गणेश धोंडगे, जगन सरकटे, श्रीराम भारस्वाडकर, अशोक परळीकर, भास्कर कुलकर्णी, विजय करभाजन, सुनंदा डिगोळकर, गिरीश कऱ्हाडे, किशोर पुराणिक, रविशंकर झिंगरे, अभय पेडगावकर, शेख शफी, शोभना व्यास इत्यादी रंगकर्मींनी परभणी रंगभूमीला आकार दिला आहे.

परभणी रंगभूमीवर सादर झालेली नाटकेही वैविध्यपूर्ण आहेत. सामाजिक, ऐतिहासिक, पौराणिक, विनोदी, ग्रामीण व दलित जीवन अभिव्यक्त करणारी ही नाटके आहेत. भ्रमाचा भोपळा, साष्टांग नमस्कार, वेगळं व्हायचंय मला, एकच प्याला, बुवा तेथे बाया, दुरितांचे तिमीर जावो, चूक भूल घ्यावी न द्यावी, तुझं आहे तुजपाशी, काळे बेट लाल बत्ती, मद्रासीने केला मराठी भ्रतार, पुण्यप्रभाव, लिलाव, रणदुदुंभी, कफन, वा! गुरू, मातृकामेष्टी, खंडहर, तरुण तुर्क म्हातारे अर्क, सुर्याला आले पडसे, लिंबू म्हणे टिंबू अशी वैविध्यपूर्ण आशय-विषय अभिव्यक्त करणारी नाटके परभणी रंगभूमीवर सादर झाली आहेत.

परभणी जिल्ह्यातील पाथरी, सोनपेठ तालुक्यातील अनेक गावे गोदावरी नदीच्या किनाऱ्यावर आहेत. नाथरा, मंजरथ, बाणेगाव, मरडसगाव, कासापुरी, पाथरगव्हाण, जवळा, ढालेगाव, कानसूर, गुंज, रामपुरी, बाभुळगाव, धारासूर, नरवडी पाथरी व सोनपेठ तालुक्यातील या गावांमध्ये नव्वदच्या दशकात गणेशोत्सव, जत्रा, अखंड हरिनाम सप्ताह, नवरात्रोत्सव अशा विविध धार्मिक सणोत्सवाच्या वेळी नाटके सादर होत असत.

शेतकरी-शेतमजूर कलावंत दिवसभर शेतातील काम करून आल्यानंतर रात्री बारा वाजेपर्यंत नाटकाची तालीम करत असत. प्रयोगाच्या पहिल्या दिवशी रंगीत तालीम होत असे आणि दुसऱ्या दिवशी नाटकाचा प्रत्यक्ष प्रयोग होई. प्रत्येक वर्षी सात-आठ नाटके बसवली जात. गावातील चावडी किंवा मंदिराचा परिसर हा या गावातील मंडळींचा रंगमंच असे. शेतीत वापरले जाणारे थप्पड अथवा साड्यांना-साड्या जोडून तयार केलेला पडदा नाटकात वापरला जात असे. सुरूवातीपासून शेवटपर्यंत एकाच प्रकारची प्रकाशयोजना, स्टेजच्या दोन बाजूला लटकवलेले दोन माईक, परवडेल अशा प्रकारची घरगुती साहित्य वापरून केलेली रंगभूषा व वेशभूषा, दिवसभर शेतात राबलेला आणि तरीही उत्साह कायम असलेला प्रेक्षकवर्ग, अधूनमधून विंगेतून ग्रामीण ढंगात होणारी प्रॉम्पटिंग आणि पुरूषाने केलेल्या स्त्री पात्राचे रंगमंचावर आगमन होताच सर्वत्र टाळ्यांचा होणारा कटकडाट. एकूणच अशा भारवलेल्या वातावरण रात्री आठ वाजेपासून बारा वाजेपर्यंत नाटके होत असत. नाटकाच्या मध्यभागी किंवा प्रयोग संपल्यानंतर गावातील नाट्यप्रेमी लोक आवडलेल्या पात्रासाठी शंभर रूपयांपासून पाचशे रूपयांपर्यंतची बक्षीसी देत असत.

वरील जवळपास सर्वच गावांमध्ये विशेषत: गणेशोत्सवात अशी नाटके बसवली जात. गावात प्रयोग झाल्यानंतर वेगवेगळ्या गावातील नाटकांच्या नाट्यस्पर्धा होत असत. या स्पर्धांमध्ये सोनपेठ, पाथरी तालुक्यातील गावांबरोबर गोदावरी नदीच्या दूसऱ्या तीरावरील गेवराई, माजलगाव तालुक्यातील (बीड जिल्हा) सादोळा, गंगामसला, पुरूषोत्तमपुरी, जायकवाडी, अबुजवाडी, राजेगाव, टाकरवण, रामपुरी या गावांबरोबर जालना जिल्ह्याच्या परतूर तालुक्यातील सावंगी, गोळेगाव, आष्टी, श्रीष्टी, लोणी अशा गावातील नाट्यमंचही स्पर्धेत सहभागी होत असत. गोदावरी नदीच्या परिसरातील गावांमध्ये या सर्व स्पर्धा होत असत. गोदावरी नदीस या परिसरामध्ये गंगा असेच संबोधले जाते. त्यामुळे या चार-पाच तालुक्यातील रंगभूमीस गंगथडी रंगभूमी असे म्हणता येईल.

गंगथडी रंगभूमीवरील परभणी जिल्ह्यातील नाथरा या गावी १९८० नंतरच्या काळात सणोत्सवाच्या निमित्ताने आठवडाभर नाटके सादर केली जात असत. बाळ चिल्या, सरपंच खुनी पाटील बेईमानी, गाव घेरलंय गुंडांनी, चोरी झालीच नाही, नटसम्राट अशी ग्रामीण ढंगाची नाटके नाथरा रंगभूमीवर सादर झाली आहेत. तुळशीराम वाकणकर, हरिश्चंद्र वाकणकर, कल्याण वाबळे,

विश्वंभर ढवळे, अनंत वाकणकर, गणेश वाबळे, शंकर देशमुख, बाबुराव हाळे, महादेव देशमुख, प्रल्हाद पायगिरे, दिगंबर वाकणकर इत्यादी रंगकर्मी शेतीच्या कामासोबत रंगभूमीची सेवा करत असत. एकूणच गंगथडी रंगभूमीमुळे मनोरंजनाबरोबर रंगभूमीची सेवाही घडली आहे. मागील आठ-दहा वर्षामध्ये गावागावातील राजकारणाने प्रवेश केल्यामुळे ग्रामीण जनजीवनच गढूळ झाले आहे. राजकारणामुळे आणि यंत्रयुगामुळे माणसामाणसांमध्ये सुसंवादच राहिला नाही. रंगभूमी ही सुसंवादातूनच सामूहिकरित्या पुढे जात असते. समूहच विखुरल्यामुळे, सुसंवाद हरवल्यामुळे आज गंगथडी रंगभूमीची परंपरा खंडीत झाली आहे.

२.३ मराठवाड्यातील रंगकर्मींचे योगदान :

मराठवाड्यातील नाट्य चळवळीमधून अनेक रंगकर्मींचा मराठवाडी रंगभूमीवर उदय झाला आहे. मराठवाड्यापासून ते महाराष्ट्र, भारत आणि जगभर काही रंगकर्मींना यश मिळाले आहे. लोटू पाटील, शंकरलाल पूरवार, पुरुषोत्तम हौजवाला, मामा दातार, कमलाकर सोनटक्के, लक्ष्मणराव देशपांडे, श्रीराम गोजमगुंडे, विजय दिवाण, रूस्तुम अचलखांब, अनंत उमरीकर, शरद देऊळगावकर, वामन केंद्रे, दिलीप घारे, यशवंत देशमुख, त्र्यंबक महाजन, कुमार देशमुख, विश्वास साळुंके, शिवदास घोडके, विभाकर मिरजकर, गणेश चंदनशिवे, देवदत्त म्हात्रे, द. ग. देशपांडे, चंद्रकांत शिरोळे, अविनाश डोळस, विजयकुमार गवई, संजय पाटील-देवळाणकर, सुधीर निकम, श्रीकांत सराफ, संभाजी भोसले, माधव गरड, किशोर पुराणिक, हनुमानदास वर्मा, नाथा चितळे, कविता पत्की, लीलाताई धर्मपूरी, शैलेश गोजमगुंडे, केशव देशपांडे, रंगनाथ तिवारी, ललिता मुकादम, दीपा क्षीरसागर, सुहासिनी इर्लेकर, जयश्री गोडसे, जयंत फडके, माधुरी दातार, वसंत दातार, विजया शिरोळे, शशिकांत बऱ्हाणपूरकर, सुजाता कांगो, शालीनीताई दातार, गणपतराव जोशी, ग. ना. अंबेकर, रामभाऊ मुकादम, रामजी पाटील, नारायणराव पाटील, किशोर सिरसाट इत्यादी रंगकर्मींनी मराठवाडा रंगभूमीच्या जडणघडणीत मौलिक योगदान दिले आहे.

मराठवाड्यातील अनेक रंगकर्मी आज मराठी-हिंदी चित्रपटामध्ये आघाडीवर आहेत. मकरंद अनासपुरे, चंद्रकांत कुलकर्णी, प्रतीक्षा लोणकर, नंदु माधव, मंगेश देसाई, संजय सुगावकर, धनंजय सरदेशपांडे, अरविंद जगताप, संदीप पाठक, उमेश जगताप, शिव कदम, मिलिंद शिंदे, राजकुमार तांगडे, संभाजी तांगडे, शुभांगी गोखले, योगेश सिरसाट, केतकी सराफ, शार्दूल सराफ,

संकर्षण कऱ्हाडे असे मराठी-हिंदी चित्रपट गाजवणारे अभिनेते मराठवाड्याच्या नाट्य चळवळीची देण आहे. या सर्वच रंगकर्मींचा उदय हा नाट्य चळवळीतून झाला आहे.

मराठवाड्यातील तरुण पिढीतील शेकडो रंगकर्मी आज नाट्य-सिनेक्षेत्रात यशस्वी वाटचाल करत आहेत. पद्मनाभ पाठक, अनिलकुमार साळवे, प्रेषीत रूद्रवार, रमाकांत भालेराव, अशोक बंडगर, स्मिता साबळे, नीरज बोरसे, नंदू भूरे, रोहीत देशमुख, योगेश चिकटगावकर, शैलेश कोरडे, मनिराज पवार, रावबा गजमल, प्रवीण पाटेकर, शेख अस्लम, निलेश चव्हाण, कोमल सोमारे, श्वेता मांडे, अश्विनी भालेकर, कैलास वाघमारे इत्यादी रंगकर्मींनी मराठवाड्यातील आजच्या रंगभूमीसाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. मराठवाड्यातील प्रत्येक रंगकर्मीच्या योगदानामुळे मराठवाडा रंगभूमीची वाटचाल सुकर झाली आहे. प्रत्येक रंगकर्मीचे योगदान उल्लेखनीय असले तरी प्रस्तुत प्रकल्पात मराठवाड्यातील नाट्यलेखन हा घटक केंद्रीभूत असल्यामुळे मराठवाड्यातील नाट्यलेखनाचा सविस्तर विचार करणे क्रमप्राप्त आहे.

मराठवाड्यातील नाट्य-चळवळीच्या वर्तमान स्थितीगतीविषयी समीक्षक कैलास इंगळे म्हणतात, "आधुनिक विविध दृक-श्राव्य वाहिण्यांचा मराठी रंगभूमीवर परिणाम झाला असला तरी, स्पर्धेच्या निमित्ताने का होईना आजही येथे नाट्यप्रयोग होतात. बदलत्या मनोरंजनाच्या साधनांमुळे व्यावसायिक नाटकेही फारशी होताना दिसत नाहीत. त्यांची जागा ठसकेबाज व काहीशा अंगप्रदर्शनीय लावण्याच्या कार्यक्रमाने घेतल्याने वेगळी रूची असलेला प्रेक्षक निर्माण झाला. चोविस तास प्रक्षेपण करून हिडिस आणि लैंगिक भावना चेतावणाऱ्या वाहिन्यांच्या गर्तेत मराठी रंगभूमी केविलवाण्या अवस्थेतून मार्गक्रमण करतेय. ही अवकळा एकूणच रंगभूमीला आल्याचे दिसून येते."[२४] एकूणच माणसांचे समाजशील मन राजकीय व यांत्रिक झाल्यामुळे सुसंवाद हरवत चालला आहे. सुसंवाद हरवत चालल्यामुळे माणूस एकलकोंडा होत आहे. एकाकी व्यक्ती रंगभूमी चालवू शकत नाही. त्यामुळे भविष्यात आपले सत्व आणि स्वत्व टिकविण्याचे आव्हान जागतिक, भारतीय, मराठी, मराठवाडी अशा सर्वच रंगभूमीसमोर आहे.

समारोप :

मराठवाड्यातील शहरी आणि ग्रामीण अशा दोन्ही नाट्य चळवळीवर दृष्टिक्षेप टाकल्यास ग्रामीण रंगभूमीची परंपरा आज खंडीत होताना दिसते. शहरी नाट्य चळवळही विविध नाट्यस्पर्धा, महाविद्यालयीन वार्षिकोत्सव, विद्यापीठीय युवक महोत्सवामुळे टिकून आहे असे वाटते. नव्याने स्थापन झालेल्या काही नाट्यसंस्था रंगभूमीवर स्वतःचे अस्तित्व सिद्ध करत आहेत ही चांगली बाब असली तरी श्रीपाद बेंडे एकांकिका स्पर्धेसारखी नाट्य चळवळ खंडीत होणे ही रंगभूमीच्या वाटचालीसाठी हितावह गोष्ट नक्कीच नाही.

संदर्भसूची

१. साळुंके सतीश, मराठवाड्याची नाट्यपरंपरा, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद, प. आ. नोव्हे. २०२१, पृ. ७१.

२. धांडे चंद्रकांत, नाट्यमंथन, किर्ती प्रकाशन, औरंगाबाद, प.आ. ऑगस्ट २००३, पृ. १५९.

३. तत्रैव, पृ. १५९.

४. बागले प्रभाकर, प्रस्तावना, नाट्यधर्मी मराठवाडा, त्र्यंबक महाजन, प्रतिमा प्रकाशन, पुणे, प.आ. २००५, पृ. ०७.

५. साठे मकरंद, मराठी रंगभूमीच्या तीस रात्री (खंड पहिला), पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प. आ. २०११, पृ. १३.

६. देशपांडे द. ग., नाट्यवेडा मराठवाडा, मल्हार प्रकाशन, जालना, प. आ. १९९२, पृ. १५.

७. महाजन त्र्यंबक, मराठवाडी रंगभूमी : स्वरूप आणि स्व-रूप, मायबोलीचा मराठवाडा (खंड-१), संपा. श्रीराम पाटील, योगेश प्रकाशन, औरंगाबाद, प. आ. जाने २००२, पृ. २५०.

८. तत्रैव, पृ. २५१.

९. महाजन त्र्यबंक, मराठवाडा रंगभूमी : स्वरूप आणि स्व-रूप, मराठवाडा : सृजन आणि साहित्य (संपा.), मिलिंद कांबळे, इसाप प्रकाशन, नांदेड, प. आ. २०११, पृ. २३०/३१.

१०. साळुंके सतीश, उनि, पृ. ३१०.

११. देशपांडे द. ग., उनि., पृ. ४७.

१२. साळुंके सतीश, उनि, पृ. ८९२-९३.

१३. सोनटक्के कमलाकर, त्र्यंबक महाजन : एक कलासक्त ज्ञानमार्गी मित्र, दादामुनी (त्र्यंबक महाजन गौरवग्रंथ), संपा. सर्वेषा महाजन, ओम अभिनय बहुउद्देशी संस्था, औरंगाबाद, प. आ. २०११, पृ. १७-१८.

१४. वाघमारे जनार्दन, अजिंठा, (स्मरणिका-३८ वे मराठवाडा साहित्य संमेलन सोयगाव, जि. औरंगाबाद), संपा. ज्योती स्वामी धामणकर, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद, डिसें. २०१६, पृ. १२.

१५. दहिफळे बाळासाहेब, सोयगावची शतकी नाट्यपरंपरा, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद, प.आ. मार्च २००८, पृ. २४-२५.

१६. साळुंके सतीश, उनि, पृ. १३४.

१७. साळुंके सतीश, मराठवाड्याची नाट्यपरंपरा, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद, प. आ. नोव्हें. २०२१, पृ. ३२३.

१८. क्षीरसागर दीपा, रंगवेध (बीड जिल्ह्यातील नाट्यपरंपरा), उन्मेष प्रकाशन, पुणे, प. आ. फेब्रू २००९, पृ. ६/७.

१९. साळुंके सतीश, उनि., पृ. ३७७.

२०. साळुंके सतीश, नाट्यवेडा मराठवाडा, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद, प. आ. नोव्हें. २०२१, पृ. ४७०.

२१. तत्रैव, पृ. ४१०.

२२. धांडे चंद्रकांत, मराठवाड्यातील नाट्य चळवळ, विश्वसंकेत दिवाळी विशेषांक, २००९, पृ. ८.

२३. देशपांडे द. ग., नाट्यवेडा मराठवाडा, मल्हार प्रकाशन, जालना, प. आ. मार्च १९९२, पृ. १४२.

२४. इंगळे कैलास, वाङ्मयीन मराठवाडा, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, प. आ. जाने. २०१७, पृ. ३०१.

प्रकरण तिसरे

मराठवाड्यातील मराठी नाट्यलेखनाचे स्वरूप

- प्रस्तावना

३.१ मराठवाड्याची नाट्य परंपरा

३.२ मराठवाड्यातील नाट्यलेखनाचे स्वरूप

३.२.१ मराठवाड्यातील १९६० पुर्वीचे नाट्यलेखन

३.२.२ मराठवाड्यातील दलित नाटक

३.२.३ मराठवाड्यातील व्यावसायिक नाटक

३.२.४ मराठवाड्यातील ग्रामीण नाटक

३.२.५ मराठवाड्यातील स्त्रियांचे नाटक

३.२.६ मराठवाड्यातील बालनाट्य

३.२.७ मराठवाड्यातील प्रायोगिक नाटक

- समारोप

प्रस्तावना :

मराठवाड्यातील लिखित रंगभूमीला शंभर वर्षांची परंपरा आहे. मराठी रंगभूमीच्या तुलनेत मराठवाड्याची रंगभूमी पाऊणशे वर्ष मागे असली तरी, मराठवाडी रंगभूमीच्या शंभर वर्षांच्या परंपरेमुळे एकूण मराठी रंगभूमी अधिक समृद्ध झाली आहे, हे निर्विवाद सत्य आहे. मराठी रंगभूमी १९४३ साली आपला शतसावत्सरिक महोत्सव साजरा करत असताना मराठवाडी रंगभूमीवर एखाददुसरे लिखित नाटक आले होते. असले तरी मराठवाड्यात नाट्य सादरिकरणाची परंपरा दीर्घ स्वरूपाची होती. एकूण मराठी रंगभूमीचा उदय लोकरंगभूमीवरील दशावतारी खेळ, सोंगे, गोंधळ, भारूड, ललित, कळसूत्री बाहुल्याचे खेळ या लोककलांमधून झाला आहे हे अभ्यासाअंती सिद्ध झाले आहे. यातील अनेक लोककला हजारो वर्षांपासून मराठवाड्यामध्ये प्रचलित आहेत.

मराठवाड्यातील संत ज्ञानेश्वरांनी तेराव्या शतकात लिहिलेल्या ज्ञानेश्वरीच्या नवव्या अध्यायात कळसूत्री बाहुल्यांच्या खेळाचे उल्लेख आढळतात. सोळाव्या शतकातील संत एकनाथांच्या भारूडामध्ये संगीत, नृत्य, अभिनय, नेपथ्य या सर्वच बाबी होत्या. आधुनिक नाटकातील जवळपास सर्वच घटक संत एकनाथ महाराजांच्या भारूडामध्ये आढळतात. त्याअर्थाने मराठवाडा ही मराठी रंगभूमीची जननी आणि संत एकनाथ महाराज हे मराठी रंगभूमीचे जनक ठरतात. मराठवाड्यासारख्या मागास ठरलेल्या प्रदेशाला मराठी रंगभूमीच्या जनकत्वाचा मान दिल्यास आपले खुजेपण सिद्ध होईल. केवळ आणि केवळ याच भितीपोटी मराठी रंगभूमीचे जनकत्व संत एकनाथ महाराज यांच्याकडे म्हणजेच पर्यायाने मराठवाड्याकडे देण्यास मराठी रंगभूमीच्या एकांगी इतिहासकारांनी टाळाटाळ केली आहे. क्षेत्र कोणतेही असो मराठवाड्यासंदर्भात सातत्याने बुद्धीभेद झाला हे मात्र निर्विवाद सत्य आहे.

मध्ययुगीन कालखंडात मराठवाडा हेच दीर्घकाळ साहित्य-संस्कृतीचे केंद्र होते. आधुनिक कालखंडात साहित्य-संस्कृतीच्या क्षेत्रात मराठवाडा मागे राहण्यास राजकीय कारणे आहेत. १३१२ पासून ते १९४८ पर्यंत तब्बल साडेसहाशे वर्ष मराठवाडा हा प्रदेश इस्लामी राजवटीच्या अधिपत्याखाली होता. शेवटची सव्वादोनशे वर्षांच्या निजामशाहीत तर मराठवाड्याची अधिकच घूसमट झाली. भाषा, साहित्य, संस्कृती, धर्म, राजकारण, शिक्षण अशा सर्वच बाबतीत निजामाची दडपशाही मराठवाड्याने अनुभवली. मध्ययुगात मराठवाडा अन्यायाच्या गर्तेत असताणा उर्वरित

महाराष्ट्र स्वराज्यामध्ये होता. १८१८ साली इंग्रजाच्या आगमनानंतरही महाराष्ट्रातील भाषिक, सांस्कृतिक, धार्मिक, शैक्षणिक वातावरण काही मर्यादांसह अबाधित होते. त्यामुळे भाषिक-सांस्कृतिक विकासामध्ये महाराष्ट्राची परंपरा मराठवाड्यापेक्षा मोठी असणे स्वाभाविकच आहे.

स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये मराठवाड्याने आपला सांस्कृतिक अनुशेष भरून काढत विपूल नाट्यनिर्मिती केली आहे. प्रायोगिक, व्यावसायिक, दलित, ग्रामीण, बालरंगभूमी अशा सर्वच प्रकारच्या रंगभूमीवर मराठवाड्यातील लेखक-रंगकर्मींनी आपले अस्तित्व निर्माण केले आहे. त्यामुळेच 'मराठी रंगभूमीवरील आशयसंपन्न नाटक आज मराठवाड्यामध्ये लिहिले जात आहे'. अशा शब्दात अभिनेते-दिग्दर्शक अमोल पालेकर यांनी मराठवाडी रंगभूमीचा गौरव केला आहे.

३.१ मराठवाड्याची नाट्य परंपरा :

मराठवाड्यातील साहित्याची परंपरा ही समृद्ध आहे. सोळाव्या शतकापर्यंतच्या मराठी साहित्याचा इतिहास हा मराठवाड्यातील साहित्यिकांनीच व्यापलेला आहे. सोळाव्या शतकापर्यंत मराठवाडा हेच साहित्य संस्कृतीचे केंद्र होते. एकनाथ महाराज यांच्या कालखंडानंतर म्हणजेच सोळाव्या शतकानंतर साहित्य-संस्कृतीचे केंद्र मराठवाड्याकडून पुण्याकडे सरकले. मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्रातील राजकीय परिस्थिती भिन्न-भिन्न असल्यामुळे महाराष्ट्राची वाङ्मयीन भरभराट झाली आणि त्या तुलनेत मराठवाडा मागे राहिला. वाङ्मयेतिहासकारांच्या मते आधुनिक कथा, कविता, कादंबरी, नाटक या सर्वच बाबतीत मराठवाडा मागे राहिला. परंतु अनेक बाबतीत मराठवाडा मागे राहिला म्हणण्यापेक्षा मराठवाडा मागे ठेवला असे म्हणणे सयुक्तिक ठरेल.

वाङ्मयाचा इतिहास लिहिताना वाङ्मयेतिहासकारांनी मराठवाड्यावर सातत्याने अन्यायच केला आहे. मराठी कवितेचे प्रवर्तक आद्यकवी मुकुंदराज हेच आहेत हे पुराव्यासह सिद्ध झालेले असताना मुकुंदराज हेच विदर्भातील आहेत असा शोध काही अभ्यासक लावतात. मराठी नाटकाच्या जनकत्वाच्या संदर्भातही असाच मराठवाड्यासोबत बुद्धीभेद झाला आहे. सोळाव्या शतकातील संत एकनाथ महाराजांच्या भारुडामध्ये नाटाकाचे सर्व घटक असताना एकोविसाव्या शतकातील विष्णुदास भावे यांना रंगभूमीच्या इतिहासकारांनी मराठी नाटकाच्या जनकत्वाचा मान दिला आहे.

वास्तविक पाहाता विष्णुदास भावे यांनी सीता स्वयंवर हे एक नाटक लिहिले तर संत एकनाथ महाराजांनी ३०० भारूडे लिहिली आहेत. सीता स्वयंवर आणि भारूड या दोन्हींचेही स्वरूप आध्यात्मिक होते. दोन्हींमध्ये नाट्य घटक होते. उलटपक्षी भारूड हे लोकजीवनाच्या अधिक जवळ जाणारे होते. किंबहुना संत एकनाथ महाराजांचे एक भारूड म्हणजे एक परिपूर्ण नाट्यसंहिताच होती. परंतु संत एकनाथांचे हे योगदान लक्षात न घेता मराठवाडा निजामी राजवटीच्या जोखडाखाली पिचलेला असतानाच विष्णुदास भावे यांना मराठी रंगभूमीचे जनकत्व बहाल केले. मराठवाडा स्वतंत्र झाल्यानंतर मराठवाड्यातील अभ्यासकांनी संत एकनाथ महाराज हेच आद्य नाटककार आहेत हे पुरव्यासह सिद्ध केले आहे. त्यातूनच मराठी रंगभूमीची मुहूर्तमेढ सांगलीमध्ये नव्हे तर मराठवाड्यामधील पैठणमध्ये रोवली गेली हा निष्कर्ष पुढे आला आहे.

संत एकनाथ महाराज हेच मराठीतील आद्य नाटककार आहेत यासंदर्भात मराठवाड्यातील अनेक अभ्यासकांनी आपला विचार मांडला आहे. मराठवाड्याच्या बाहेरीलही अनेक अभ्यासक संत एकनाथ महाराजांच्या भारूडामध्ये नाट्यात्मकता, दृश्यबंध, नादबंध असल्याचे सांगतात परंतु नाटकाच्या जनकत्वाचा मान मात्र ते विष्णुदास भावे यांनाच देतात. नरहर कुरूंदकर, त्र्यंबक महाजन, प्रभाकर बागले, चंद्रकांत धांडे, द. ग. देशपांडे, सतीश साळुंके अशा अनेक विचारवंत, लेखक, नाटककार, रंगकर्मी व अभ्यासकांनी संत एकनाथ हेच आद्य नाटककार आहेत हे सोदाहरण सिद्ध केले आहे.

ज्येष्ठ रंगकर्मी त्र्यंबक महाजन यांच्या नाट्यधर्मी मराठवाडा या ग्रंथातील सूत्रधार व नटीच्या संवादातून संत एकनाथ महाराजांचे जनकत्व सिद्ध होते. या ग्रंथातील सूत्रधार नटीला म्हणतो, "अगं हीच तर आहे मराठवाड्याची आद्य रंगभूमी, दक्षिण गंगेच्या वाळवंटात नाटककार एकनाथांनी उभा केलेला अभिनव रंगमंच! या रंगमंचावर लोकमानसाच्या प्रबोधनासाठी रंगाविष्कारांची जी अपूर्व दुनिया निर्माण केली... एकनाथांनी संगीत, नृत्य, अभिनय, नेपथ्य यातून जे नाट्यविश्व उभं केलं, ते अद्‌भूत आहे सगळं. त्यात डोंबारी आहे, जागल्या आहे, वासुदेव आहे, जोगीण आहे, भुत्या आहे, मुरळी आहे, चोपदार आहे, मांग आहे, भटीण, कुंटीण, कोल्हाटीण आहे, डौर आहे, गारूडी आहे, समाजातील कितीतरी व्यक्तिरेखा त्यांच्या सगळ्या वैशिष्ट्यांसह नाथांनी आपल्या रंगमंचावर उभ्या केलेल्या आहेत. हे सगळे समाजस्तर त्यांच्या भारूड-नाट्याचे नायक आहेत. प्रत्येकाची भाषा

निराळी, वेश निराळा, रूप निराळं, भावमुद्रा निराळ्या! आहे की नाही 'युनिक गेश्चर' आणि 'पोश्चर' अगदी 'मेकअप' कॉस्च्युमसह"[१] संत एकनाथ महाराजांच्या भारूडांमध्ये संगीत, नृत्य, अभिनय, नेपथ्य, विविध भावमुद्रा, रंगभूषा, वेशभूषा इत्यादी सर्वच नाट्यघटक त्या-त्या समाजाच्या भाषिक वैशिष्ट्यांसह येतात असे सूत्रधाराच्या करवी त्र्यंबक महाजन म्हणतात. वाळवंटातील रंगमंचावर लोकाभिमुख व समाजसन्मुख नाट्य एकनाथांनी उभे केले आणि तेही मराठी रंगभूमीच्या जवळपास दोनशे वर्ष अगोदर.

प्राख्यात विचारवंत नरहर कुरुंदकर यांच्या रंगशाळा या नाटकाची अर्पणपत्रिका आहे "एकनाथ महाराज यांस..."[२] वास्तविक पाहाता रंगशाळा हा ग्रंथ नाट्यशास्त्राचे मूलगामी विवेचन करणारा आहे आणि नाट्यशास्त्राचे विवेचन करताना तो ग्रंथ संत एकनाथ महाराजांना अर्पण करावा असे नरहर कुरुंदकर यांच्यासारख्या बुद्धिवंताला वाटणे यामध्ये एक सूचकता आहे. ज्या नाट्यशास्त्राची सैद्धांतिक मांडणी आपण करत आहोत ती मांडणी प्रयोगरूपाने पैठणच्या वाळवंटात सोळाव्या शतकातच झाली आहे ही सूचकता त्यांच्या या अर्पण पत्रिकेत आहे. ग्रंथाची अर्पणपत्रिका हा ग्रंथाचा आरंभबिंदू असतो. रंगशाळा या नाट्यशास्त्रावरील ग्रंथाचा आरंभबिंदू संत एकनाथ आहेत म्हणजे सूचक अर्थाने संत एकनाथ महाराज हेच मराठी रंगभूमीचे जनक आहेत असे म्हणता येते.

मराठवाड्यातील ज्येष्ठ रंगकर्मी द.ग. देशपांडे संत एकनाथ महाराजांच्या भारूडाविषयी लिहितात, "त्यांनी रचलेली भारुडे व त्यातील निरनिराळ्या जाती-जमातीच्या व्यक्तींची स्वभावचित्रणे रेखाटली आहेत ती आजही ललितात पहावयास, ऐकावयास मिळतात. ही सोंगे करणारे नटच. सारांश या पंचम्यातील सोंगे, भारुडातील सोंगे हे सर्व नाट्यकलेचे द्योतक व एकप्रवेशी नाटकेच होत व ती भरताच्या नाट्यशास्त्राला विसंगत नाहीत, असे मला वाटते... नाथांच्या भारुडातील सोंगे नाट्यछटांचे स्वरूप दर्शवितात. त्यादृष्टीने पाहिले तर नाथांच्या भारूडाचा वारसा घेऊन या विभागातील नाट्यकला फोफावली असे म्हणावयास हरकत नाही."[३] संत एकनाथांच्या भारूडातील सोंगे ही नाट्यकलेचे द्योतक असून भारूडातील नाट्यात्मकता भरताच्या नाट्यशास्त्राला विसंगत नाही असा स्पष्ट निर्देश द. ग. देशपांडे यांनी केला आहे.

संत एकनाथ महाराज आणि रंगभूमीचा अनुबंध जोडताना चंद्रकांत धांडे म्हणतात, "नाथांच्या भारुडांनी मराठवाड्यामध्ये रंगभूमीचा पाया घातला असे म्हटले तर वावगे ठरू नये. नाथांच्या अनेक भारूडामध्ये कथानक, अभिनय, संगीत, जीवनदर्शन आणि नाट्य असल्यामुळे नाटकाची रंगत या भारुडामध्ये दिसते."[४] धांडे यांना अशयाभिव्यक्तीचे सर्वच घटक संत एकनाथांच्या भारूडात आढळतात.

एकनाथी भारूडाविषयी रंगभूमीचे अभ्यासक सतीश साळुंके म्हणतात, "नाटकाच्या अत्यंत जवळ जाणारी कला म्हणजे भारूड. भारूड हे एकपात्री नाटकाचे सर्वोत्तम उदाहरण... एकनाथांनी भारूडातील विषय, आशय व सादरीकरणात अमूलाग्र बदल करून भारूडाला खऱ्या अर्थाने जनपदाशी जोडले. त्यांनी उपासनेसोबत रंजकता आणि प्रबोधनाचा अप्रतिम संगम भारूडात घडवून आणला... ललिताच्या सादरिकरणाला मंदिराची मर्यादा आलेली असताना नाथांनी भारूडाला मंदिरातून मुक्त केले. त्यांनी आपल्या भारूडातील पात्रात पुराणकथेतील देवादिकांच्या तुलनेत कष्टकरी, श्रमकरी, बहुजन आणि बहिष्कृत जीवन जगणाऱ्यांना महत्त्व दिले आणि सर्वसामान्य माणसाच्या दु:खाला भारूडाच्या केंद्रस्थानी आणले... भारूडाच्या सादरीकरणातील मुक्तता, भारूडातील विविध पात्रे उभी करण्यासाठी होणारी अभिनयाची मागणी, संवादातील वैविध्यता, त्याला गायनाची संगत या सगळ्या गुणवैशिष्ट्यांमुळे संत एकनाथ (१५३३-१५९९) हेच मराठवाड्याच्या नाट्यपरंपरेतील आद्य नाटककार ठरतात."[५] नाट्य सादरिकरणाचे सर्वच घटक संत एकनाथांच्या भारूडामध्ये असून भारूडाचा आशय आधुनिक आहे असा साळुंके यांच्या मताचा सार आहे. त्यामुळे आधुनिक नाटकाप्रमाणेच अशयाभिव्यक्तीचे सर्व घटक नाथांच्या भारुडामध्ये असतील तर संत एकनाथ हेच मराठी रंगभूमीचे आद्य नाटककार ठरतात.

नरहर कुरुंदकर, त्र्यंबक महाजन, द. ग. देशपांडे, चंद्रकांत धांडे, सतीश साळुंके या सर्वच अभ्यासकांच्या विवेचनाचा सार संत एकनाथ महाराज हेच मराठी रंगभूमीचे आद्य नाटककार आहेत असाच आहे. संत एकनाथ महाराज यांच्यापूर्वी आद्यकवी मुकुंदराज, संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत चोखामेळा यांनी भारूडाची रचना केली असली तरी नाटक या वाङ्मयप्रकाराला अभिप्रेत असणारे घटक संत एकनाथ महाराजांच्या भारूडामध्येच आढळतात. कारण संत एकनाथ महाराजांनी भारूडाच्या आशयाभिव्यक्तीमध्ये अमूलाग्र बदल करून ते समाजसन्मुख व लोकप्रिय

केले. त्यामुळे १८४३ मध्ये विष्णुदास भावे यांना वाङ्मयेतिहासकारांनी ज्या निकषांच्या आधारावर मराठी रंगभूमीचे जनकत्व बहाल केले ते सर्व निकष पाऊणेतीनशे वर्षे अगोदरच लिहिल्या गेलेल्या एकनाथी भारूडांनी पूर्ण केलेले आहेत.

नाट्य अभ्यासकांचे मत मान्य केले तर संत एकनाथ महाराज हेच मराठी रंगभूमीचे जनक, आद्य नाटककार, प्रवर्तक आहेत. सोळाव्या शतकामध्ये मराठवाड्यातील पैठण या ठिकाणी संत एकनाथ महाराजांनी मराठी रंगभूमीची मूहूर्तमेढ रोवली. मराठी रंगभूमीच्या नाट्यपरंपरेला संत एकनाथ महाराज यांच्यापासून सुरूवात झाली. संत एकनाथ महाराज हे मराठवाड्यामधील संत आहेत. म्हणून महाराष्ट्रातील व मराठवाड्यातील नाट्यलेखनाची परंपरा संत एकनाथ महाराजांच्या भारूडांपासून सुरू झाली असे म्हणता येईल.

आधुनिक कालखंडातील मराठवाड्यातील नाट्यलेखनाचा विचार केल्यास सोयगाव रंगभूमीवरील रामजी पाटील, लोटू पाटील व नारायणराव पाटील यांचे योगदान मराठवाडी रंगभूमीसाठी महत्त्वाचे आहे. सोयगाव या ठिकाणी विसाव्या शतकातील मराठी रंगभूमीवर गाजलेल्या जवळपास सर्वच नाटकाचे प्रयोग झाले. नाट्य सादरीकरणाच्या अंगाने सोयगाव रंगभूमी ही स्वयंपूर्ण असली तरी नाट्यलेखनाच्या दृष्टीने ती परिपूर्ण नव्हती. नाट्यसंहितेसाठी सोयगाव रंगभूमी पूर्णतः मराठी रंगभूमीवर अवलंबून होती. मराठवाडी रंगभूमीच्या इतिहासातील सर्वात यशस्वी रंगभूमी नाट्यसंहितेसाठी इतरांवर अवलंबून असणे हीच सोयगाव रंगभूमीची मोठी मर्यादा होती. परंतु केवळ संहितेसाठी सोयगाव रंगभूमी परावलंबी असली म्हणून तीचे मोल नाकारता येणार नाही. सादरिकरणाच्या अंगाने आधुनिक मराठवाडी रंगभूमी निष्ठेने घडवण्याचे श्रेय सोयगाव रंगभूमीलाच जाते.

मराठवाडी रंगभूमीवरील आधुनिक नाट्यसंहितेचा विचार केल्यास १९१९ साली पैठण येथील भगवंत गोविंद तोडेवाले यांनी लिहिलेले संगीत चुडाला हे नाटक पहिले ठरते. त्यानंतर १९३२ मध्ये मराठवाड्याच्या परभणी जिल्ह्यातील झोडेगावच्या परंतु मुंबईमध्ये स्थायिक असलेल्या श्रीपाद नृसिंह बेंडे यांचे बेबी हे नाटक मराठी रंगभूमीवर प्रयोगरूपाने सादर झाले. मुंबईच्या नाट्यमन्वंतर या नाट्यसंस्थेने बेबी या नाटकाचे दिडशेपेक्षा अधिक प्रयोग केले असे अभ्यासकांचे मत आहे. मूळचे मराठवाड्यातील असणारे परंतु मराठवाड्याबाहेर स्थायिक असणारे आधुनिक मराठी

लघुकथेचे जनक दिवाकर कृष्ण केळकर यांनी १९३४ मध्ये तोड ही माळ हे नाटक लिहिले या नाटकाचे दुसरे नाव गंगालहरी असे असून हे संगीत नाटक होते. १९४१ मध्ये शंकरलाल पुरवार यांनी देवदासी हे नाटक लिहिले. देवदासी या नाटकानंतर १९५४ पर्यंत मराठवाडी रंगभूमीवर नाटक लिहिले गेले याचे पुरावे आढळत नाहीत.

१९५४ मध्ये त्र्यंबक महाजन यांचे झुलते मनोरे हे नाटक प्रकाशित झाले. त्यानंतर १९५६ साली म. भि. चिटणिस यांचे युगयात्रा हे नाटक प्रकाशित झाले. त्र्यंबक महाजन यांना साक्षात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा सहवास लाभला तर म. भि. चिटणीस यांच्या युगयात्रा या नाटकाचा प्रयोग डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या उपस्थितीत सहा लाख बौद्ध अनुयायांसह नागपूरच्या दीक्षा भूमीवर झाला. युगयात्रा हे नाटक मराठवाड्यातील दलित रंगभूमीची नांदी आहे. शिवाय शैक्षणिक परिसरात हे नाट्यलेखन झालेले आहे म्हणून शैक्षणिक किंवा महाविद्यालयीन रंगभूमीची नांदी म्हणून या नाटकाकडे पाहता येईल. पुढे गंगाधर पानतावणे यांच्या पुढाकाराने अस्मितादर्श नियतकालिक सूरू झाल्यानंतर दलित रंगभूमीवर मोठ्या प्रमाणात नाट्यलेखन होऊ लागले. त्यामध्ये दत्ता भगत (वाटा-पळवाटा, खेळीया, अश्मक), प्रकाश त्रिभुवन (थांबा! रामराज्य येतंय!, गणनायिका आम्रपाली), रुस्तुम अचलखांब (कैफियत, कात्यायणी), ऋषिकेश कांबळे (भाई तुम्ही कुठे आहात!) अशी नाटके दलित रंगभूमीवर आली.

१९७० नंतर विविध वाङ्मयीन चळवळीच्या प्रभावामुळे प्रेरित झालेले नाटककार मराठवाड्यामध्ये लिहिते झाले. त्याचबरोबर १९७३ साली तत्कालीन मराठवाडा विद्यापीठामध्ये नाट्यशास्त्र विभागाची स्थापना झाल्यामुळे नाट्यशास्त्राचे शास्त्रीय ज्ञान मराठवाड्यातील रंगकर्मींना मिळू लागले. याचाच परिणाम म्हणून काहीच वर्षांमध्ये मराठवाडी रंगभूमीवर विपूल प्रमाणात नाट्यलेखन झाले व रंगभूमी अधिकच गतिमान झाली.

मराठवाड्यातील रंगभूमीसंदर्भात समीक्षक प्रल्हाद लुलेकर म्हणतात, "मराठवाड्यातील नाटक साधारणतः १९८० नंतर अधिक संपन्न, समृद्ध झाले. या काळात सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक आणि धार्मिक स्थिती बदलत गेली. या सामाजिक स्थित्यंतराचे परिणाम नाटकावरही झाले. जनतेच्या मनात व्यवस्थेविषयी चीड होती. संताप होता. त्यांच्या भोवतीचा अवकाश भयावह स्थितीचा होता. त्यामुळे सामान्य माणूस अशांत, अस्वस्थ, अगतिक झाला होता.

त्याचे पडसाद मराठवाड्यातील नाटकांमधून उमटले. व्यक्तिसंघर्षापेक्षा सामाजिक संघर्ष नाटकाचा विषय म्हणून येऊ लागले... विजय तेंडुलकर, सतीश आळेकर, महेश एलकुंचवार यांनी थेट वास्तवच नाटकांमधून आणले... त्यामुळे कौटुंबिक, मध्यमवर्गीय जाणिवाचे नाटक कमी झाले. सामाजिक भान असणे या काळात महत्त्वाचे ठरले. मराठवाड्यातील नाटकाने याच भूमिकेतून रंगभूमीला आपले योगदान दिले. सामाजिक, राजकीय प्रश्न नाटकाच्या केंद्रस्थानी आले आणि या स्वरूपाची नाटके रंगभूमीवर आणणारे मराठवाड्यातील रंगकर्मी रंगभूमीच्या केंद्रस्थानी झाले."[६] प्रयोगशीलता, सामाजिक भान असणाऱ्या समाजसन्मुख व वास्तववादी नाटकस १९८० नंतर अधिक महत्त्व येत गेले. हे प्रल्हाद लुलेकर यांचे निरीक्षण यथार्थ वाटते.

१९८० नंतर मराठवाडा रंगभूमीवर लक्ष्मण देशपांडे, अजित दळवी, प्रशांत दळवी, कुमार देशमुख, रा.रं. बोराडे, भारत सासणे, रा.द. अरगडे, जगदीश कदम, रेखा बैजल, अनुराधा वैद्य, दासू वैद्य, किरण पोत्रेकर, रविशंकर झिंगरे, राजकुमार तांगडे, अनिलकुमार साळवे, अरविंद जगताप, धनंजय चिंचोलीकर, बालाजी सुतार, सूर्यकांत सराफ, विश्वास साळुंके, कमलेश महाजन, सतीश महाजन, रावबा गजमल इत्यादी नाटककार-एकांकिकाकारांचा उदय झाला. विविधांगी जाणिवा व आशयविषय या लेखकांच्या लेखनातून अभिव्यक्त होतो.

वऱ्हाडकार लक्ष्मण देशपांडे यांनी वऱ्हाड निघालय लंडनला या नाटकाच्या निमित्ताने संपूर्ण जगाला हसवले. तर अजित दळवी, प्रशांत दळवी, दासू वैद्य यांनी नव्वदोत्तर काळातील मूल्यऱ्हासाचे विद्रूप रूप आपल्या नाट्यलेखनातून मुखर केले. दलित रंगभूमीवरील दत्ता भगत, गंगाधर पानतावणे, रूस्तुम अचलखांब, अविनाश डोळस, प्रकाश त्रिभुवन, ऋषिकेश कांबळे यांनी दलित समाजाची ठसठसणारी जखम आपल्या नाट्यलेखनातून अभिव्यक्त केली तर रेखा बैजल, अनुराधा वैद्य, जयश्री गोडसे, शोभना व्यास या स्त्री नाटककारांनी स्त्रियांच्या घूसमटीला वाट मोकळी करून दिली. सुर्यकांत सराफ, सुनंदा गोरे, इंदूमती जोंधळे, धनंजय सरदेशपांडे इत्यादी नाटककारांनी बालरंगभूमी श्रीमंत केली तर राजकुमार तांगडे, अरविंद जगताप, बालाजी सुतार, धनंजय चिंचोलीकर यांनी एकविसाव्या शतकातील भोवताल व त्या भोवतालातील विसंगतीवर उपहास-उपरोधात्मक भाष्य केले.

नव्वदोत्तर मराठवाड्यातील नाटक हे करमणूकप्रधानतेपेक्षा वास्तवाला थेट भिडणारे आहे. भोवतालच्या कोलाहलातील गांभीर्याला मुखर करणारे आहे. "हे नाटक कौटुंबिक-पारंपरिक नाटकाच्या चळवळीत अडकून पडले नाही. त्यामुळे नव्या युगातील सामाजिक भान घेऊन ही नाटके लिहिली गेली. परिणामी, मराठवाड्याची नाटके अधिक वास्तवसन्मुख झाली. मानवी जीवनातील ताणतणाव, सातत्याने होत गेलेला मूल्यऱ्हास, स्त्री-पुरूष संबंधातील वर्तमान स्थिती, माणसाच्या अनेकविध वृत्ती-प्रवृत्ती, राजकीय-सामाजिक-सांस्कृतिक सत्तेची रूपे-स्वरूपे, नीती-अनीतीचे सांस्कृतिक प्रश्न, विषय-आशयातील वैविध्य, रंगभूमीचे युगभान, व्यक्ती-व्यक्तिंचे संबंध, माणसाच्या वर्तनातून निर्माण होणारी जीवनातील गुंतागुंत, परिवर्तनाशी असलेला अनुबंध, मानवी मूल्यांशी आणि संस्कृतीशी निगडित असणारी अनुभूती हे या नाटकातून आविष्कृत केले आहे."[७] एकंदरीत मराठवाडी नाटकांमध्ये आशयाभिव्यक्तीचे अद्वैत आहे. वैविध्यपूर्ण जाणिवांच्या आविष्कारामुळे मराठवाडी रंगभूमीने व मराठवाड्याच्या नाट्यपरंपरेने एकूण मराठी नाटकाची परंपराच समृद्ध केली आहे.

३.२ मराठवाड्यातील नाट्यलेखनाचे स्वरूप :

एकूण मराठी रंगभूमीचा विचार केल्यास नाटक या वाङ्मयप्रकारातील घटकांच्या आधारे संत एकनाथ महाराज हे मराठी रंगभूमीवरील आद्य नाटककार ठरतात. कारण नाटक या वाङ्मयप्रकाराचे संहिता, नेपथ्य, रंगभूषा, वेशभूषा, संगीत, अभिनय हे सर्वच घटक संत एकनाथ महाराजांच्या भारूडामध्ये आहेत. भारूड हे एकपात्री नाटकच असल्यामुळे द. ग. देशपांडे, त्र्यंबक महाजन, प्रभाकर बागले, चंद्रकांत धांडे, सतीश साळुंके असे काही नाटकाचे अभ्यासक संत एकनाथ महाराजांनाच आद्य नाटककार मानतात तर आधुनिक रंगभूमीची सर्वच वैशिष्ट्ये नाथांच्या भारूडामध्ये आढळत नाहीत, नाटक आणि भारूड हे स्वतंत्र वाङ्मयप्रकार आहेत असा दावा करत अनेक अभ्यासकांनी विष्णुदास भावे यांना मराठी रंगभूमीचे जनकत्व बहाला केले आहे. विष्णुदास भावे यांना जनकत्वाचा मान दिल्यामुळे मराठवाड्यातील नाट्यलेखनाची सुरूवात सोळाव्या शतकातील संत एकनाथ महाराज यांच्यापासून होण्याऐवजी थेट १९१९ मधील भगवंत तोडेवाले यांच्या संगीत चुडाला या नाटकापासून होते.

१९१९ मधील संगीत चुडाला हे मराठवाड्यातील पहिले आधुनिक स्वरूपाचे नाटक असून मराठवाड्यातील रंगभूमीला किंवा नट्यलेखनाला शंभर वर्ष पूर्ण झाले आहेत. या शंभर वर्षांमध्ये मराठवाड्यात जे नाट्यलेखन झाले आहे त्या नाट्यलेखनाचे स्वरूप अभ्यासकांनी आपापल्या पद्धतीने विशद केले आहे. काही अभ्यासकांनी कालखंडानुसार १९६० पूर्व, साठोत्तरी, नव्वदोत्तरी अशा प्रकारे मराठवाड्यातील नाटकाचे विभाजन केले आहे. तर काही अभ्यासकांनी वाङ्मयीन प्रवाहानुसार मराठवाड्यातील नाट्यलेखनाचे स्वरूप मांडले आहे.

प्रस्तुत प्रकल्पामध्ये मराठवाड्यातील १९६० पूर्वीचे नाटक, मराठवाड्यातील व्यावसायिक नाटक, मराठवाड्यातील दलित नाटक, मराठवाड्यातील ग्रामीण नाटक, मराठवाड्यातील बालनाट्य, मराठवाड्यातील स्त्रियांचे नाटक, मराठवाड्यातील प्रायोगिक नाटक, मराठवाड्यातील अनुवादीत नाटक अशा विभागणीच्या आधारे मराठवाड्यातील शंभर वर्षांच्या नाट्यपरंपरेचे स्वरूप सिद्ध करण्याचे प्रयोजन आहे. कालखंडानुसार व प्रवाहानुसार अशा संमिश्र पद्धतीने मराठवाड्यातील नाट्यलेखनाचे स्वरूप या अभ्यासामध्ये सिद्ध करण्याचा मानस आहे.

३.२.१ मराठवाड्यातील १९६० पुर्वीचे नाट्यलेखन :

१९१९ साली प्रकाशित झालेले संगीत चुडाला हे मराठवाड्यातील पहिले नाटक आहे व या नाटकाचे लेखक भगवंत गोविंद तोडेवाले हे मराठवाड्यातील पहिले नाटककार ठरतात. संगीत चुडाला या नाटकाच्या शंभर वर्षे अगोदरपासून मराठवाड्यामध्ये कंट्री नाटक किंवा देशी नाटकाची परंपरा होती. परंतु या कंट्री नाटकाची संहिता ही केवळ हस्तलिखित स्वरूपामध्ये उपलब्ध होती. या संदर्भात सतीश साळुंके म्हणतात, "मराठवाड्यात नाट्यलेखकाचा आरंभ होतो तो 'कंट्री' नाटकांच्या हस्तलिखितापासून. सादरिकरण हाच त्याचा मुख्य हेतू होता. गावात नाटकाची आवड असणारी मंडळी, कीर्तनकार, प्रवचनकार किंवा शिक्षित मंडळी एकत्रित येऊन गावाच्या धार्मिक उत्सवासाठी विविध पौराणिक व धार्मिक कथांवर, आख्यानावर हस्तलिखित स्वरूपात नाटक रचून ते सादर करीत; ते गावात केले जाई आणि ते नाटक त्या गावापूरतेच मर्यादित राहत. अशा नाटकांना 'देशी नाटक' किंवा 'कंट्री नाटक' म्हटले जाई. मराठवाड्याच्या शेकडो गावात अशी कंट्री नाटके झाल्याचे उल्लेख आढळतात."[८] कंट्रीनाटकाची संहिता लिखित स्वरूपामध्ये असली आणि तिचे प्रयोग झाले असले तरी मुद्रणाअभावी आणि निश्चित लेखक माहित नसल्यामुळे कंट्री

नाटकांचा रंगभूमीचा इतिहास लिहित असताना विचार केला जात नाही. त्यामुळे १९१९ साली मुद्रित स्वरूपात प्रकाशित झालेले भगवंत तोडेवाले यांचे संगीत चुडाला हे मराठवाड्यातील पहिले आधुनिक नाटक ठरते.

१९१९ ते १९६० म्हणजेच चाळीस वर्षांच्या काळामध्ये मराठवाड्यामध्ये मोजक्याच लेखकांची मुद्रित नाटके उपलब्ध आहेत. त्यामध्ये भगवंत तोडेवाले (संगीत चुडाला), श्रीपाद नृसिंह बेंडे (बेबी, बुवा, पांचाली), दिवाकर कृष्ण केळकर (संगीत तोड ही माळ अर्थात गंगालहरी), त्र्यंबक महाजन (झुलते मनोरे), म. भि. चिटणीस (युगयात्रा), शंकरलाल पुरवार (देवदासी) इत्यादी नाटककारांचे योगदान महत्त्वाचे आहे. याशिवाय १९४२ च्या जवळपासच्या कालखंडामध्ये लातूरमधील हनुमंतराव रेणापूरकर यांनी लातूरमध्येच सिंहाचा छावा हे नाटक लिहून सादर केले होते. नाटकाच्या शीर्षकाप्रमाणेच हे नाटक स्वातंत्र्यलढ्याला मुखर करणारे होते. 'वंदे मात्रम' या गीताने या नाटकाचा समारोप होत असे. सिहांचा छावा मुळे एकंदर लातूर परिसरामध्ये निजामी राजवटीविरूद्ध असंतोष निर्माण झाला होता. शेवटी दडपशाहीचे धोरण अवलंबून निजामाने सिंहाचा छावा या नाटकाच्या प्रयोगावर बंदी आणली. नाट्यलेखनातून निजामाविरूद्ध ठोस भूमिका घेणारे हनुमंतराव रेणापूरकर हे लातूर जिल्ह्यातील पहिले नाटककार आहेत.

औरंगाबाद जिल्ह्यातील नाटककार व अभिनेते कमलाकर मुळे यांनी मराठी नाट्यलेखणात मोलाची भर घातली आहे. १९४५ नंतर त्याचे नाट्यलेखन प्रकाशित झाले. हृदयाचे मंथन हे त्यांचे पहिले नाटक होय. समाजातील व्यंगावर भाष्य करत असतानाच सामाजिक जीवनातील विसंगतीवरही मुळे यांनी या नाटकाच्या माध्यमातून भाष्य केले आहे. हृदयाचे मंथन या नाटकाबरोबरच मुळे यांनी मदन दहन, सम्राट अशोक, झपाटलेले झाड इत्यादी नभोनाट्ये लिहिली आहेत. गाजरपारखी या नाटकामध्ये मुळे यांनी ग्रामीण जीवनातील हलकेफुलके विनोद मांडले आहेत. एकूणच कमलाकरराव मुळे यांची एकूण प्रवृत्ती ही गंभीर नाटककाराची आहे. तत्कालीन समाजातील विसंगतीवर त्यांची लेखणी प्रकर्षाणे भाष्य करते.

परभणी जिल्ह्यातील अशोक परळीकर यांनी विपूल प्रमाणात नाटक-एकांकिका लिहिल्या आहेत. १९६० पूर्वी त्यांनी नाट्यलेखनाला सुरूवात केली असली तरी त्यांचे महत्त्वाचे नाट्यलेखन १९६० नंतरच प्रकाशित झाले आहे. मनोरथ चल नगरीला, त्याचं असं झालं, सोचा था क्या,

हलाहल अमृतात न्हाले, महासती, कैकयी, होते म्हणून स्वप्न एक इत्यादी नाटकांबरोबर मृत्यूपाश, अनोखे नाटक, पराधीन आहे जगती अशा एकांकिकाही अशोक परळीकर यांनी लिहिल्या आहेत. १९६० पुर्वीच्या मराठवाड्यातील या एकूण नाटककारांपैकी भगवंत तोडेवाले, श्रीपाद नृसिंह बेंडे, दिवाकर कृष्ण केळकर, शंकरलाल पूरवार, त्र्यंबक महाजन व म. भि. चिटणीस यांचे नाट्यलेखन हे आधुनिक मराठवाडी रंगभूमीची पायाभरणी होण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे आहे. त्यामुळे या सहा नाटककारांच्या कार्याच्या संदर्भात सविस्तर चर्चा होणे आवश्यक आहे.

३.२.१.१ भगवंत गोविंद तोडेवाले :

पैठण येथील भगवंत तोडेवाले हे मराठवाड्याच्या रंगभूमीवरील पहिले नाटककार आहेत. १९१९ मध्ये संगीत चुडाला हे नाटक लिहून त्यांनी मराठवाडी रंगभूमीची मुहूर्तमेढ रोवली. संस्कृत भाषेतील योगवसिष्ट या ग्रंथातील 'चुडाला आख्यान' हे संगीत चुडाला या नाटकाचे कथानक आहे. संगीत चुडाला या नाटकाच्या संदर्भात नाट्य समीक्षक चंद्रकांत धांडे म्हणतात, "संगीत चुडाला हे नाटक पाच अंकी असून चौथा अंक तीन प्रवेशी तर पाचवा अंक केवळ एक प्रवेशी आहे. नटी आणि सूत्रधार यांच्यासह नाटकात वीस पात्रे आहेत. या नाटकात एकूण १०६ पदे असून प्रत्येक पदाच्या प्रारंभी अभंग, साकी, लावणी, श्लोक, दिंडी अशी काव्यप्रकारांची नोंद आहे. त्याचप्रमाणे राग, ताल आणि चाल यांचीही नोंद आहे. या नाटकातील पदात अनंत वामन बरवे यांनी लिहिलेली दोन पदे आहेत. नाटकाच्या पुस्तकाच्या मलपृष्ठावर 'सुशिक्षण मिळाले असता स्त्रिया पुरुषांपेक्षा किती लवकर पुढे सरसावल्या जातात व आपल्या प्रिय पतिचे ऐहिक आणि पारमार्थिक हित कसे करतात.' हे या नाटकात उत्तम प्रकारे पाहण्यास मिळते. स्त्री समाजास आपले खरे कर्तव्य काय हे समाजावण्यासाठी अशीच नाटके पुढे आली पाहिजेत असा हाजी काजी तमिजोद्दीन यांचा अभिप्राय आहे."[९] एकंदरीत नाट्यरचनेला फार अनुकूल नसलेल्या वेदांत विषयावर भगवंत तोडेवाले यांनी काव्यात्म भाष्य केले आहे. समाजाला सन्मार्ग दाखवण्याचे, नवी दिशा देण्याचे काम मराठवाडी रंगभूमीवरील पहिल्याच नाटकाने करावे हे एकूण मराठवाड्याचा भोवताल पाहता योग्यच आहे.

नाटकाचे अभ्यासक चंद्रकांत धांडे आणि त्र्यंबक महाजन या दोघांनिही संगीत चुडाला या नाटकाचे स्वरूप उलगडून दाखवले आहे परंतु दोघांच्या मतामध्ये साम्य आढळत नाही. त्र्यंबक महाजन यांच्या नाट्यधर्मी मराठवाडा या ग्रंथातील सूत्रधार संगीत चुडाला या नाटकाविषयी म्हणतो,

"१९१९ साली मुद्रीत होणारी मराठवाड्यातली ही पहिलीच नाट्यसंहिता! या पाच अंकी नाटकात २६ प्रवेश आहेत १०१ पदं आहेत. त्याकाळच्या नाटकासारखीच आख्यानक रचना आहे आणि त्यातही 'मराठवाडीपण' आलेलं आहे."[१०] प्रवेश आणि पदांच्या संख्येबाबत त्र्यंबक महाजन आणि चंद्रकांत धांडे यांच्यामध्ये मतभिन्नता असली तरी इतर सर्वच बाबींमध्ये व विचारांमध्ये साम्य आढळते. संगीत चुडाला या नाटकासोबतच तोडेवाले यांनी राधाविलास, जगन्नाथ पंडीत व अज्ञात कंसवध ही नाटकेही लिहिली परंतु तोडवाले यांच्या काळामध्ये निजामी राजवटीमुळे एकूणच भाषिक-साहित्यिक-सांस्कृतिक वातावरण हे दुषित होते त्यामुळे त्यांची ही तीनही नाटके अप्रकाशीत राहिली. अशा प्रतिकूल परिस्थितीतही संगीत चुडाला हे नाटक मराठवाड्याबाहेर जाऊन छापण्याचे धाडस भगवंत तोडेवाले यांनी दाखवले याला नाट्य वाङ्मयाच्या इतिहासात तोड नाही.

३.२.१.२ श्रीपाद नृसिंह बेंडे :

श्रीपाद नृसिंह बेंडे यांना व्यावसायिक रंगभूमीवरील मराठवाड्याचे पहिले नाटककार म्हटले जाते. त्याचा जन्म परभणी जिल्ह्यातील पाथरी तालुक्यातील झोडगाव येथे झाला परंतु नाट्यवेडापायी ते मुंबईस स्थिरावले. विनोदी नट, चित्रपट कथा लेखक, चित्रपट दिग्दर्शक, नाटककार, संघटक अशा विविध क्षेत्रात बेंडे यांनी काम केले आणि यशही मिळविले. त्यांनी एकूण दहा नाटके लिहिली अशी नोंद आढळते परंतु प्रत्यक्षात त्यांचे तीन नाटके संहितारूपाने उपलब्ध आहेत. बेबी, बुवा, पांचाली, मोऱ्याची मैना, सती शर्मिला, शक्ती, सौदा, आरसा, कुंवर या नाटकांपैकी पहिल्या तीन संहिता उपलब्ध आहेत. अनंत काणेकर, श्री. वि. वर्तक, के. नारायण काळे यांच्यासारख्या दिग्गज रंगकर्मींच्या सहवासात राहून नाट्यमन्वंतर या नाट्य चळवळीचा सदस्य होण्याचा मान बेंडे यांना मिळाला आहे.

श्रीपाद बेंडे यांच्या एकूण नाटकांपैकी बेबी हे त्याचे सर्वात यशस्वी नाटक आहे. २६ नोव्हेंबर १९३२ मध्ये मुंबईमध्ये या नाटकाचा पहिला प्रयोग झाला. त्यानंतर या नाटकाने प्रयोगाची शंभरी गाठली. बेबी हे सामाजिक नाटक असून समकाळाची स्पंदने या नाटकात आढळतात. बेबी या नाटकासंदर्भात द. ग. सारोळकर म्हणतात, "हे नाटक कुमार व कुमारिका यांच्या एका विशिष्ट आयुष्यक्रमाचे दृश्यकाव्य आहे. मराठी रंगभूमीवर अशा थाटाचे मोठे अगर छोटे नाटक आजपर्यंत झालेले नाही. हे नाटक ठराविक साच्याचे नसून विषयही नवाच आहे. एका विशिष्ट विषयावर हे

नाटक लेखकाने लिहिले आहे. तो विषय नाटकाला योग्य की अयोग्य याचा विचार रसिकांनी करावयाचा आहे."[११] एकंदरीत कुमार-कुमारिकांच्या जीवनावर भाष्य करणारे हे नाटक आहे असे सारोळकर म्हणतात.

बेबी या नाटकामध्ये अनेक ठिकाणी प्रसंगनिष्ठ, स्वभावनिष्ठ विनोद येतो परंतु मूळ विषयावरून लेखक थोडासाठी बाजूला होत नाही. बेबी या नाटकाचे मध्यवर्ती सूत्र सांगताना शर्मिष्ठा भगत शेंडे म्हणतात, "आर्थिक, सांस्कृतिक दैन्याला बळी पडून भोवतालच्या परिस्थितीला पाठमोरी झालेली युवापिढी तसेच भावी आयुष्यात येणारी अयशस्विता माहीत असूनही काहीशी रंगेलवृत्ती जोपासणारी युवापिढी, अस्तित्वाचा अर्थ चुकीचा घेतल्याने चुकीच्या पद्धतीने अस्तित्व प्रस्थापित करू पाहणारी तरूण पिढी आणि त्यातून त्यांच्या जीवनात निर्माण झालेल्या समस्या, असे बेबी या नाटकाचे मध्यवर्ती सूत्र आहे."[१२] बेबी या नाटकाप्रमाणे बेंडे यांच्या इतर नाटकांची फार चर्चा झाली नाही. वास्तविक पाहता मराठवाड्याच्या रंगभूमीशी संबंध आलेला नसतानाही बेंडे यांनी मराठवाडी रंगभूमीवर मानाचे स्थान प्राप्त केले आहे.

सोयगाव येथील लोटू पाटील यांच्या श्रीराम संगीत मंडळी ने बेबी या नाटकाचा सोयगाव रंगभूमीवर प्रयोग केला. हिंगोली येथे १९६८-१९९५ पर्यंत अविरतपणे बेंडे एकांकिका स्पर्धा प्रियकर जैन या नाट्यवेडा रंगकर्मीच्या पुढाकाराने आयोजित केली गेली. केवळ मराठवाड्यामध्येच नव्हे तर महाराष्ट्रभर बेंडे एकांकिका स्पर्धा चर्चेत होती.

३.२.१.३ दिवाकर कृष्ण केळकर :

दिवाकर कृष्ण केळकर हे एक बहुआयामी लेखक आहेत. मराठी कथालेखनामध्ये केळकर यांनी अर्थपूर्ण कथालेखन केले असून त्यांना आधुनिक लघुकथेचे जनक म्हटले जाते. कथा, कादंबरी, नाटक अशा सर्वच क्षेत्रात दिवाकर कृष्ण केळकर यांनी यश मिळविले आहे. १९३४ मध्ये केळकर यांचे संगीत तोड ही माळ अर्थात गंगालहरी हे नाटक प्रकाशित झाले. तोड ही माळ ही त्या कालखंडामध्ये चर्चेत राहिलेले नाटक आहे.

संगीत तोड ही माळ नाटकातील आशय-विषयासंदर्भात अभ्यासकांमध्ये मतभिन्नता आढळते. या नाटकाच्या संदर्भात त्र्यंबक महाजन म्हणतात. "पंडितराज जगन्नाथ आणि लवंगी यांच्या प्रेम कथेवर आधारित १९३० सालातील असलेलं हे तीन अंकी नाटक दिवाकर कृष्णाच्या

नाट्यलेखनाचं रूप रसिकांसमोर ठेवणारे आहे."[१३] आशय-विषयाबरोबर नाटकाच्या प्रकाशन वर्षाबाबतही त्र्यंबक महाजन व सतीश साळुंके यांचे मत वेगवेगळे आहे. तोड ही माळ या नाटकासंदर्भात सतीश साळुंके म्हणतात, "त्यांनी १९४३ साली संगीत तोड ही माळ हे नाटक लिहिले. ब्रिटिश व निजाम यांच्या गुलामीच्या साखळ्या तोडून प्रेक्षकात स्वातंत्र्याची भावना वृद्धिंगत करण्याचा संदेश या नाटकातून दिला गेला होता. त्यामुळे निजामाने या नाटकावर बंदी आणली... कलेच्या मुस्कटदाबीचा हा आरंभीचा काळ होता. सेन्सॉरशिपच्या नावाने बंद केलेले हे मराठवाड्यातील पहिले नाटक."[१४] एकंदरीत नाटकाचे प्रकाशन वर्ष व आशय विषयातील कमलीची मतभिन्नता दोन्ही अभ्यासकांमध्ये संगीत तोड ही माळ या नाटकाच्या संदर्भात आढळते. अशा मतभिन्नतेमुळे नवीन वाचकांच्या मनात संभ्रम निर्माण होतात हे मात्र निश्चित आहे.

३.२.१.४ शंकरलाल पुरवार :

शंकरलाल पुरवार हे औरंगाबाद येथील कवी व नाटककार आहेत. औरंगाबादमधील ते पहिले नाटककार आहेत. साधारणतः १९४१ मध्ये पुरवार यांनी पुजारीण हे नभोनाट्य लिहिले. औरंगाबाद नभोवाणीवर प्रसारण झाल्यानंतर या नभोनाट्यालाच विस्तृत रूप देवून पुरवार यांनी 'देवदासी' नाटक पुढे आणले. पुजारीण या नभोनाट्यापेक्षा प्रभावीपणा देवदासी या नाटकामध्ये आला होता. बालविधवांच्या प्रश्नांना या नाटकातून पुरवार यांनी मुखर केले आहे. बालविधवांचे प्रश्न कायद्याने नव्हे तर समाजाच्या मानसिकतेत बदल झाल्यानंतरच संपू शकतात असा विचार पुरवार यांनी देवदासीमध्ये मांडला आहे. या नाटकाचा आशय-विषय आवडल्यामुळे सोयगाव रंगभूमीचे सर्वेसर्वा लोटू पाटील यांनी या नाटकाचा प्रयोग सोयगाव रंगभूमीवर केला. देवदासी या नाटकानंतर राजा-राणी आणि दोन शालोपयोगी नाटिका ही दोन बालनाट्येही पुरवार यांनी लिहिली आहेत.

३.२.१.५ त्र्यंबक महाजन :

त्र्यंबक महाजन हे मराठवाड्याच्या रंगभूमीवरील एक बहुआयामी व्यक्तिमत्व आहे. नाटककार, रंगकर्मी, समीक्षक, अनुवादक, प्राध्यापक आणि विशेषतः नवीन कलावंतांना प्रोत्साहीत करणारे दादामुनी अशी त्यांची ख्याती आहे. त्र्यंबक महाजन यांच्या एकूण व्यक्तिमत्वाविषयी नाटककार अजित दळवी म्हणतात, "आपल्या भागातल्या प्रत्येकाचं मोठेपण

ठराविण्यासाठी आपण तो आमचा अमुक-तमुक असा उल्लेख करीत असतो. महाजन सर आमचे कोण आहेत वि.भा. देशपांडे? पण सर फक्त समीक्षक नाहीत. नाट्यगुरू? पण ते रंगकर्मींही आहत. नाट्यपरिषदेचे पदाधिकारी? पण ते कार्यकर्तेही आहेत. हौशी नाट्यवेडे किंवा नाट्यशहाणे? पण ते चिंतकही आहेत. म्हणजे वि.भा. प्रेमानंद गज्वी कृ. रा. सावंत..? थोडक्यात महाजन सर हे अजब रसायण आहे. बघा कुठल्या चौकटीत बसवता येते का?"[१५] कोणत्याही चौकटीत बसवता न येणारे अजब रसायण एक बहुआयामी व्यक्तिमत्व म्हणजेच त्र्यंबक महाजन आहेत.

त्र्यंबक महाजन यांच्या व्यक्तिमत्वाप्रमाणेच त्यांच्या ग्रंथनिर्मितीतही विविधता आढळते. नाटक-एकांकिका लेखन, अनुवाद, समीक्षा अशा विविध प्रकारात त्यांनी लेखन केले आहे. झुलते मनोरे, दीपस्तंभ, जावईबापू, वासुकाका या नाटकांबरोबर बुद्धं शरणं गच्छामी, रायचरण, डाकबाबू आणि काबुलीवाला या एकांकिका त्र्यंबक महाजन यांनी लिहिल्या आहेत. अनुवादाच्या क्षेत्रातही महाजन यांनी मूलभूत कार्य केले आहे. त्यांनी दत्ता भगत यांच्या वाटा-पळवाटा या नाटकाचे रास्ते-चोररास्ते या नावाने हिंदीत भाषांतर केले. तर मोहन राकेश यांच्या लहरोके राजहंस या नाटकाचे लहरिचे राजहंस या नावाने मराठीत भाषांतर केले. द फादर या इंग्रजी नाटकाचे कॅक्टसची सावली या नावाने मराठी भाषांतर केले. म्युलॅटो या नाटकाचे हिंदी रूपांतर करून राईजन इन द सन्स या नाटकाचे प्रभाकर बागले यांच्या सहयोगाने रूपांतर केले. त्याचबरोबर मराठीमध्ये गाजलेल्या गाढवाचे लग्न या लोकनाट्याचे त्यांनी गर्दभविवाह या नावाने हिंदी भाषांतर केले. याशिवाय त्यांनी नाट्यधर्मी मराठवाडा या ग्रंथामध्ये नाट्यात्म पद्धतीने मराठवाडी रंगभूमीचा इतिहास समीक्षेच्या पातळीवर लिहिला आहे.

त्र्यबंक महाजन यांच्या एकूण नाट्यलेखनापैकी झुलते मनोरे हे अधिक चर्चिले गेलेले नाटक आहे. महाजन विद्यार्थी दशेमध्ये असतानाच १९५४ मध्ये हे नाटक महाविद्यालयीन रंगभूमीवर आले. महाविद्यालयीन रंगभूीवरील झुलते मनोरे हे पहिले नाटक आहे असे प्रभाकर बागले म्हणतात. विद्यार्थ्यांनीच स्नेहसंमेलनानिमित्त या नाटकाचा पहिला यशस्वी प्रयोग केला. या नाटकाच्या स्वरूपाबाबत प्रभाकर बागले म्हणतात, "सर्व सामान्यांच्या जीवनाला कवेत घेणारं लोकशाही राजकारण या राजकारानं जन्माला घातलेली राजकीय संस्कृती, राजकारणाचं कौटुंबिकीकरण, कुटुंबाचं राजकियीकरण या प्रक्रियेत धूसर होणारं घरपण, घरपणाच्या अभावात

व्यक्तीचं होणारं उभं विघटन, विघटनामुळं अंतर्मुख न होत बहिर्मुख होणं अशा गंभीर विषयासाठी विनोद निर्माण करणाऱ्या शब्दचिन्हांची मांडणी करणं अवघड असतं. कारण हसण्याचा उपयोग फसवण्यासाठी करता येत असतो, भान निर्माण करण्यासाठी हसवणं तुलनेनं कठीण असतं... 'झुलते मनोरे'च्या नाटककाराची निकोप लोकशाही राजकारणावरची आस्था हे निर्मितीसूत्र या नाटकात नाट्यरूप घेताना दिसते."[१६] एकंदर आपल्या पहिल्याच नाटकामध्ये त्र्यंबक महाजन यांनी मराठवाडी रंगभूमीवर स्वतंत्र स्थान निर्माण कले. समाजसन्मुखता, अनुभवसंपन्नता, चिंतनशीलता ही त्र्यंबक महाजन यांच्या नाट्यलेखनाची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत. नाट्यलेखनाबरोबर दलित रंगभूमीची चळवळ रूजवण्यात व वाढविण्यात त्र्यंबक महाजन यांचे मोठे योगदान आहे.

३.२.१.६ म. भि. चिटणीस :

औरंगाबाद येथील मिलिंद महाविद्यालयाचे प्राचार्य म. भि. चिटणीस हे दलित रंगभूमीवरील पहिले नाटककार आहेत. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सूचनेवरून त्यांनी लिहिलेले युगयात्रा हे पहिले दलित नाटक आहे. युगयात्रा या नाटकापूर्वी दलित रंगभूमीला आंबेडकरी जलश्यांची परंपरा होती. परंतु एक स्वतंत्र नाटक म्हणून युगयात्रा हेच पहिले नाटक ठरते. युगानुयुगे दलित-शोषित-उपेक्षित समाजावर होणाऱ्या अमानुष वागणुकीची यात्रा या नाटकात म. भि. चिटणीस यांनी मांडली आहे. सामाजिक, धार्मिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक अशा प्रत्येक क्षेत्रात दलित समाजाला तत्कालिन सवर्णियांकडून मिळालेल्या यातनांचा आलेख युगयात्रामध्ये नाटककाराने मांडला आहे.

१९५५ मध्ये या नाटकाचा पहिला प्रयोग मिलिंद महाविद्यालयामध्ये झाला. १९५४ मधील झुलते मनोरे या त्र्यंबक महाजन यांच्या नाटकाच्या प्रयोगानंतर महाविद्यालयीन रंगभूमीवर प्रयोग करणारे युगयात्रा हे मराठवाड्यातील दुसरेच नाटक आहे. त्यामुळे औरंगाबादमधील आणि मराठवाड्यातील शैक्षणिक रंगभूमीची पायाभरणी करण्याचा मानदेखील युगयात्रा या नाटकाकडे जातो.

युगयात्रा या नाटकासंदर्भात रंगकर्मी त्र्यंबक महाजन म्हणतात, "यानंतर दुसरा रंगमंचीय आविष्कारही महाविद्यालयीन रंगभूमीवर घडणारा आणि एक अभूतपूर्व इतिहास निर्माण करणारा रंगमंच मिलिंद महाविद्यालयाचा खुला रंगमंच. नाटककार मिलिंदचे प्राचार्य म. भि. चिटणीस नाटक

भारतरत्न-बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनकार्याचा आढावा घेणारे आणि त्यानिमित्ताने युगानुयुगे चालत आलेल्या मूक वेदनेची कथा सांगणारे युगयात्रा! डॉ. आंबेडकरांच्या उपस्थितीत झालेला हा नाट्यप्रयोग आधुनिक संदर्भातील दलित रंगभूमीचं पहिलं नाटक आणि दीक्षाभूमी नागपूरला लाखोंच्या साक्षीनं रंगभूमीच्या विक्रमी नोंद करणारी रंगघटना कदाचित मराठी रंगभूमीच्या इतिहासातील पहिलीच ऐतिहासिक महत्त्व असलेली म्हणून नोंदवावी लागेल."[१७] खरोखर युगयात्राचा प्रयोग ही मराठीच नव्हे तर जागतिक रंगभूमीवरील एक ऐतिहासिक घटना आहे.

युगयात्रा या नाटकाच्या बहिरंगाबरोबर त्याचे अंतरंग म्हणजे नाटकाचा आशय-विषयदेखील गर्भित स्वरूपाचा आहे. परंपरेच्या अमानुष बेड्या व हे साखळदंड तोडणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जीवनकार्य नाटकातून चित्रित झाले आहे. या नाटकाच्या स्वरूपाबद्दल नाटकाचे अभ्यासक कमरंद साठे लिहितात, "प्रभुत्ववादाच्या अगदी मुळापर्यंत पोहचू शकरणारी ही आंबेडकरी इतिहासदृष्टी आहे. त्यातून अगदी खोलवरचं शोषनाचं आणि अन्यायाचं लपलेलं राजकारणही उघड झाल्यावाचून राहत नाही. आणि यानंतर तर नाटक या 'धार्मिक सत्ताकारणातून थेट 'राजकारणातच' येते... यात विद्रोहाची ठिणगी जरुर आहे, अन्यायाची थेट मांडणीही आहे. अर्थातच ती काळ्या-पांढऱ्यात आहे. पण ती करत असता लेखकाचा भर अभिनिवेशी अकांडतांडवावर नाही, तर अत्यंत मुद्देसूदपणे, सैद्धांतिक अंगानं विचार करून राजकीय प्रभुत्ववादाचे अंत:प्रवाह उलगडून दाखवण्यावर आहे. त्यामुळे हे नाटक भावनांना आवाहन करतं. पण त्यचबरोबर विचारप्रवृत्त करून खोलातलं परिस्थितीभान निर्माण करतं."[१८] एकंदरीत युगयात्रा हे नाटक एक युगभान निर्माण करणारे नाटक आहे. या नाटकाच्या निमित्ताने दलित रंगभूमीची पायाभरणी झाली. म. भि. चिटणीस यांचे हे नाटक एकूण दलित रंगभूमीला दिशादर्शक आहे.

१९६० पुर्वीच्या मराठवाडी रंगभूमीवरील भगवंत तोडेवाले, श्रीपाद बेंडे, दिवाकर कृष्ण केळकर, शंकरलाल पुरवार, त्र्यंबक महाजन, म. भि. चिटणीस या नाटककारांबरोबर गोविंदराव पाटील, एकनाथराव तांदळे, रामकृष्णराव सोमयागी या नाटककारांनीही मराठवाडी रंगभूमी समृद्ध केली आहे. गोविंदराव पाटील यांच्या नाट्यलेखनाचा कालखंड निश्चित सांगता येत नाही. परंतु

१९६० पुर्वीच्या काळामध्ये सेलू या ठिकाणी त्यांनी भयंकर मुकाबला, भामाविलास ही नाटके लिहिली आहेत.

परभणी जिल्ह्यातील सेलूचेच नाटककार एकनाथराव तांदळे यांचे बभ्रूवाहन हे नाटक महत्त्वाचे आहे. रामकृष्ण सोमयागी यांनी तरंगिणी या नाटकाद्वारे १९६० पूर्वीच्या मराठवाड्यातील रंगभूमीसाठी महत्त्वाचे योगदान दिले आहे. एकंदरीत १९६० पूर्वीच्या काळामध्ये मराठवाड्यामध्ये विपूल नाट्यलेखन झाले नसले तरी जे लेखन झाले ते आशय-विषयाच्या दृष्टीने संपन्न व बांधिलकी जोपासणारे नाटक होते. साठोत्तरी कालखंडामध्ये जे विपूल प्रमाणात नाट्यलेखन मराठवाड्यामध्ये झाले त्याची पायाभरणी १९६० पूर्व काळात झाली आहे.

३.२.२ मराठवाड्यातील दलित नाटक :

दलित साहित्य ही एकूण साहित्यविश्वातील एक क्रांतिकारी घटना आहे. कथा, कविता, कादंबरी, आत्मकथनाच्या निमित्ताने शब्दरूप असलेली दलित समाजाची वेदना नाटकाच्या निमित्ताने दृश्यरूपाने जेव्हा रंगभूमीवर आली तेव्हा त्या वेदनेतील दाहकता अधिकच जाणवली. युगानुयुगे दलित समाजावर झालेला अन्याय, स्पृश्यास्पृश्यता, दुय्यमत्व, जातिभेद, श्रेष्ठ-कनिष्ठत्व आणि दलित समाजाला मिळणारी अमानुष वागणूक जेव्हा दलित नाटकाच्या निमित्ताने दृश्यरूपामध्ये रंगमंचावर सादर झाली आणि दलित रंगभूमीबद्दल साहित्यक्षेत्रातून वेगवेगळ्या क्रिया-प्रतिक्रिया उमटण्यास सुरूवात झाली. दलित लेखक-समीक्षक-रसिकांनी एकूण भारतीय परंपरांचा धिक्कार केला. अनेक कर्मठ लोकांनी भडक, अतिरंजित म्हणून दलित नाटकाची हेटाळणी केली. परंतु अनेक दलितेतर लेखक समीक्षकांनी दलित रंगभूमीचे मनस्वी स्वागतही केले. पु.ल. देशपांडे, वा.ल. कुलकर्णी, रा.ग. जाधव, भालचंद्र फडके अशा अनेक दलितेतर लेखक-समीक्षकांनी दलित साहित्य व दलित नाटकाचे स्वागत केले.

मराठी दलित नाटक किंवा दलित रंगभूमीला मोठी परंपरा आहे. "आजच्या दलित रंगभूमीच्या निर्मितीची बिजं म. फुल्यांच्या 'तृतीयरत्न' (१८५५) या नाटकात असल्याचे लक्षात येते. सत्यशोधक जलसे (१९१०-१९३०) आंबेडकरी जलसे (१९३५ ते १९५६) हे दलित रंगभूमीचे आद्यरूप म्हटले पाहिजे... दलित रंगभूमीचे आणखी एक सर्वात महत्त्वाचे ऊर्जाकेंद्र म्हणजे, प्राचार्य म. भि. चिटणीस यांचे युगयात्रा (१९५५) हे नाटक होय."[१९] उपरोक्त विधानाच्या आधारे भगवान

ठाकूर यांनी दलित नाटकाची परंपरा तृतीयरत्न या नाटकापर्यंत नेली आहे. तर शिवाजीराव जवळगेकर यांनी दलित रंगभूमीचे उगमस्थान लोककलांमध्ये शोधले आहे.

"लोककला
↓
दंडार
↓
रायरंद सोंग
↓
दशावतारी खेळ
↓
वाघ्या-मुरळी
↓
कसरीती सोंगे
↓
गाणे वाजविणे
↓
शाहीरी
↓
सत्यशोधकीय जलसे
↓
आंबेडकरी जलसे
↓
दलित नाटके
↓
दलित नभोनाट्ये"[२०]

अशाप्रकारे लोककलेमध्ये दलित नाटकाचे उत्पत्तीस्थान जवळगेकर यांनी शोधले आहे. दलित नाट्यपरंपरेचे विश्लेषण करताना जवळगेकर म्हणतात, "इ.स. १९१२ साली जन्मलेले भिमराव करडक हे आंबेडकरी जलस्याचे संस्थापक असून १९५२ पर्यंत त्यांनी आंबेडकरी जलस्यांचे कार्यक्रम सादर केले. सत्यशोधकीय जलस्यांपेक्षा आंबेडकरी जलसा हा आधुनिक मराठी दलित रंगभूमी आणि नाट्य चळवळीचा पाया ठरतो.... आंबेडकरी जलस्यांनी दलितांमध्ये नवी जाणीव व अस्मिता निर्माण केली. पारंपरिक तमाशातील देवदेवतांच्या स्तवनाची प्रेरणा प्रथा मोडली व गणपती ऐवजी भिमाला नमन करणे सुरू केले. थोडक्यात जनसामान्यांचे उद्‌बोधन व समाजपरिवर्तनाचे कंकण बांधूनच हे आंबेडकरी जलसे निर्माण झाले."[२१] परंपरागत लोककलांमध्ये आधुनिक आशय-विषय बसवून जलश्यांच्या माध्यमातून सादर करण्यात आला.

जलसा हे एक प्रकारचे काव्यनाट्यच आहे. समाजप्रबोधनाचे प्रभावी माध्यम म्हणून सत्यशोधकी जलसे आणि आंबेडकरी जलश्यांकडे पाहावे लागेल. जलशांचे महत्त्व विशद करताना

नाट्यसमीक्षक कमरंद साठे म्हणतात, "आंबेडकरी जलशामध्ये दलितांना प्रथमच आपलं दु:ख, दैन्य, शोषण, वेदना आणि त्यामागची कारणं यांची मांडणी करताही येत होती आणि ऐकायला-बघायलाही मिळत होती. इतिहास, रूढी, परंपरा, जात, वर्ण, अंधश्रद्धा इत्यादी बाबी अगदी सोप्या, सुलभ करून रंजक पद्धतीनं मांडल्या जात. त्यात माफक विनोद होता, अस्पृश्य समाज जर बाबासाहेबांचा आदेश, संदेश आणि वचनाप्रमाणे चालला तर त्यांची दैन्यावस्था समूळ नष्ट होऊन सर्व प्रकारच्या गुलामगिरीतून त्यांची मुक्तता होईल अशा प्रकारची भविष्यकालीन सुखस्वप्न जलशांतून दाखवली जात."[२२] एकूणच युगयात्रा या पहिल्या दलित नाटकाच्या निमित्ताने १९५६ मध्ये उदयास आलेल्या दलित रंगभूमीचे बिजारोपन हे खऱ्या अर्थाने जलस्यामध्ये झाले होते.

आंबेडकरी जलस्यासंदर्भात सर्जेराव कांबळे म्हणतात, "१९३० ते १९५६ च्या दरम्यान ज्या जोमाने, त्वेषाने, ज्या आंतरिक उर्मीने आंबेडकरी जलसे निर्माण झाले. परिवर्तने घडविली तो बाज १९५६ नंतर राहिला नाही. कारण अपवाद वगळता जवळजवळ जलसे नाहीशे झाले. त्याचे रुपांतर कलापथकात, गायन पार्ट्यात, भजनी मंडळात व कव्वाली पार्ट्यांमध्ये झाले. रूचिनुसार कालमान परिस्थितीनुसार हे प्रकार घडत गेले. मात्र आज अस्तित्वात असणाऱ्या दलित रंगभूमीची जन्मदायी म्हणून आंबेडकरी शाहीरी, आंबेडकरी जलशे हीच होती हे मान्य करावे लागेल."[२३] एकंदरीत, आजच्या दलित नाटकाची आद्यभूमी ही आंबेडकरी जलशेच आहेत. जलशामुळेच दलितांच्या वेदनेला दृश्यरूप आले आणि त्यातूनच दलित रंगभूमी आकारास आली.

१९५६ मध्ये नागपूर येथील दीक्षाभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या उपस्थितीमध्ये युगयात्रा या नाटकाच्या निमित्ताने दलित रंगभूमीची सुरूवात आली. ६ लाख रसिकांच्या उपस्थितीत म.भि. चिटणीस यांच्या युगयात्राचा प्रयोग झाला. दलित रंगभूमीसमोर एक वस्तुपाठ युगयात्रा या नाटकाने ठेवला. युगानुयुगे आंबेडकरी समूहाच्या वाट्याला आलेली दलितत्त्वाची यात्रा या नाटकातून नाटककाराने मांडली आहे. "दलित कलावस्तु, कलावंत आणि रसिक या तिघांचेही रक्ताचे नाते दलित जीवनाशी आहे. या दलितत्वाचा जो लक्षणीय अर्थ, तोच दलित कलेचाही लक्षणीय अर्थ ठरेल. चित्ररूपाने, शिल्परूपाने, साहित्यकृतीच्या रूपाने जो कलात्मक आकृतिबंध दलित कलावंत निर्माण करतो, त्याची लक्षणीयता, अर्थपूर्णता दलितपणाशी निगडीत आहे."[२४] इतर दलित कलाप्रमाणेच युगयात्रा या नाटकाचा आकृतिबंध देखील दलितत्वाशी निगडीत आहे.

युगानुयुगे दलित म्हणून मिळणारी हीन वागणूक आणि बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणेतून आलेले आत्मभान या नाटकातून म. भि. चिटणीस यांनी मांडले आहे.

युगयात्रा या नाटकाच्या निमित्ताने दलित रंगभूमीस आरंभ झाला. युगयात्रा ला मिळालेल्या प्रतिसादामुळे सर्वांच्याच लक्षात आले की इतर वाङ्मयप्रकारांपेक्षा नाटक हा वाङ्मयप्रकार दलित वेदना मुखर करण्यासाठी अधिक प्रभावी आहे. त्यादृष्टीने अनेक अभ्यासक, समीक्षकांनी मांडणीही केली आहे. दलित साहित्याचे प्रेरणास्त्रोत असलेले म.ना. वानखडे म्हणतात. "कथा, कविता, कादंबऱ्या शिक्षितांची गरज पुरी करू शकतात. पण नाटक सर्व समाजाला एकाचवेळी अपिल करू शकते. आपल्या समाजातील शिक्षणाचे प्रमाण लक्षात घेऊन नाटकावर जोर देणे जरूरीचे आहे... आमेरिकेतील काळ्या लेखकांनी नाटकाचे हे सर्वस्पर्शी सामर्थ्य ओळखून आपल्या नाटक मंडळी, नटनटी निर्माण करून काळे नाटक उभे केले आणि काळ्या वस्त्यातून, चौरस्त्यावरून लोकभाषेत लोकनाट्य सादर केली... दलित समाजातील बहुसंख्य अशिक्षितांना जागे करण्यासाठी त्यांच्या वस्त्यात जाऊनच नाटकाद्वारे प्रचार करणे आवश्यक आहे. त्यांना त्यांच्या जीवनाची, दु:खाची, दुर्दशेची व प्रश्नांची जाणीव त्यांच्याच भाषेत करून देणे गरजेचे आहे व दलित लेखकाने या प्रकाराचा मोठ्या प्रमाणात वापर करावा असे मला वाटते."[२५] म. ना. वानखडे यांच्या या आवाहनाला दलित नाटककारांनी विशेष प्रतिसाद दिला आणि दलित रंगभूमीवर मोठ्या प्रमाणात नाटके सादर झाली.

युगयात्रा या नाटकाच्या निमित्ताने मराठवाडा व नागसेन परिसर ही दलित रंगभूमीची बिजभूमी ठरली होती. मराठवाड्याच्या बाहेरील नाटककारही अत्यंत ताकदिनिशी नाट्यलेखन करू लागले. त्यामुळे मराठी रंगभूमीची आशय आणि अभिव्यक्तीची पद्धत देखील बदलली. पारंपरिक सामाजिक, कौटुंबिक नाटकांपेक्षा वेगळ्या धाटणीची नाटके रंगभूमीवर सादर होऊ लागली. दलित नाटकांमधून कोणता आशय अभिव्यक्त झाला या संदर्भात बापू घोक्षे यांच्या यातना उत्सव या दीर्घांकामधील एक संवाद बोलका आहे. या दीर्घांकाच्या सुरूवातीलाच पार्श्वध्वनी येतो तो असा आहे

"रक्तात उसळलेल्या असंख्य अग्नीकणांची
शपथ घेऊन सांगतो...
माय-बापहो,
आम्ही शब्दांनी बेईमान नाही.
आणि म्हणूनच-
कुणाच्या तरी गुलाबी-गुलाबी, गोबऱ्या गोबऱ्या गालावर
रूळणाऱ्या, कुरूळया-कुरूळया, बटांवर लेखन करण्यापेक्षा
आम्ही-
आदीम शोषणाचा इतिहास उराशी घेऊन अस्वस्थपणे
उसळणाऱ्या शब्दांच्या लाटांवर लिहिणं अधिक पसंत करतो...."[२६]

एकूण दलित नाटककार व साहित्यिकांच्या साहित्य लेखनामागील प्रेरणा व प्रयोजनच बापू घोक्षे यांच्या दीर्घांकातील संवादामधून व्यक्त होते.

दलित नाट्याच्या आरंभानंतर दलित चळवळ ही अधिक प्रभावी झाली असे म्हणता येईल. एका अर्थाने चळवळीला अभिप्रेत असणारेच काम दलित नाटकांनी केले आहे. या संदर्भात अनिल सपकाळ म्हणतात, "दलित रंगभूमीने वेदना विद्रोह आणि नकार यांचा दलित साहित्यामधून स्वीकार केला आहे. या मूल्यांनी दलित रंगभूमीच्या आशय आणि अभिव्यक्तीवर प्रभाव निर्माण केला. दलित रंगभूमीने भरतमुनीच्या नाट्यशास्त्राला नाकारत अश्वघोषप्रणित नाट्यशास्त्र, महात्मा फुले यांनी स्वीकरलेले आधुनिक मराठी नाट्यलेखन तंत्र, सत्यशोधक जलसे, डॉ. आंबेडकर यांच्या विचारांनी प्रेरित झालेली शाहिरी आणि जलसे तसेच कमानी रंगभूमीवरील नाटके यांच्या प्रभावांना प्रेरणास्त्रोत मानले आहे. हिंदू धर्म तत्त्वज्ञानातील विषमतेच्या विचारांना नाकारण्याचा प्रयत्न जो दलित चळवळींनी केला तो दलित रंगभूमीनेही केलेला आहे. आशय आणि आविष्काराच्या बाबतीत दलित रंगभूमी ही दलित चळवळींला पूरक राहिली आहे."[२७] दलित नाटकाचे स्वरूपविशेष व दलित नाट्य चळवळ आणि दलित चळवळ यांचे अनुबंध सपकाळ यांच्या वरील विवेचनातून अभिव्यक्त होतात.

१९५६ मध्ये युगयात्रा या नाटकाच्या निमित्ताने सुरू झालेली दलित रंगभूमीची यात्रा १९९० पर्यंत अत्यंत प्रभावीपणे सुरू होती. १९९० नंतर मात्र दलित नाटकाचा प्रवाह क्षीण झालेला दिसतो. या संदर्भात नाटकाचे अभ्यासक मकरंद साठे म्हणतात, "त्यातली एक मर्यादा म्हणजे त्यात आलेला एकसुरीपणा. तोचतोचपणा या नाटकातून मांडलं जाणारं वास्तव खूप वेगळं होतं हे खरं. पण सुरूवातीच्या काळानंतर त्यातला 'वेगळेपणा' संपला. तसंच सुरूवातीच्या काळात असणारा, स्वाभाविक क्रोध, बंडखोरपणा, अभिनिवेश, स्वतःतच पुरेसा आणि प्रभावी 'आशय'च होता. नंतर तोही स्वाभाविकपणे एकसुरी होऊ लागला."[२८] नव्वदोत्तर काळात दलित रंगभूमीची परंपरा क्षीण झाली असली तरी दलित रंगभूमीने आशय व अभिव्यक्तीच्या वेगळेपणामुळे एकूण मराठी रंगभूमी समृद्ध केली आहे. म. भि. चिटणीस, दत्ता भगत, प्रकाश त्रिभुवन, प्रेमानंद गज्वी, नामदेव व्हटकर, गंगाधर पानतावणे, संजय पवार, ऋषिकेश कांबळे, रामनाथ चव्हाण, टेक्सास गायकवाड, रा. द. अरगडे, रुस्तुम अचलखांब, प्रज्ञा दया पवार अशा विविध नाटककारांनी दलित रंगभूमीबरोबरच मराठी रंगभूमीलाही आपल्या नाट्यलेखनातून योगदान दिले आहे.

मराठवाडा ही दलित नाटकाची जन्मभूमी आहे. म. भि. चिटणीस यांचे युगयात्रा हे दलित रंगभूमीवरील पहिले नाटक आहे. म. भि. चिटणीस हे मराठवाड्यातील नागसेन परिसरातील मिलिंद महाविद्यालयाचे प्राचार्य होते. त्याच्या युगयात्रा या नाटकापासून दलित रंगभूमीचा आरंभ झाला या बद्दल अभ्यासकाचे एकमत आहे. या संदर्भात सतीश साळुंके म्हणतात, "थेट दलित जीवनातील व्यथा-यातनांना रंगमंचावर मांडणारे 'युगयात्रा' हे दलित रंगभूमीचे पहिले नाटक ठरते. केवळ दलितांच्या बहिष्कृत जीवनाला पौराणिक कालखंडापासून ते अर्वाचिन कालखंडापर्यंत मांडण्यासाठी युगयात्रा हे नाटक लिहिले गेले होते. मराठवाड्याच्याच नव्हे तर एकूणच मराठी रंगभूमीवर दलित रंगभूमीची पायाभरणी करणारे 'युगयात्रा' हे पहिले नाटक आणि तेही प्रत्यक्ष बाबासाहेबांच्या प्रेरणेने झालेले. देशातल्या वंचितांच्या जीवनात उर्जा भरून त्यांच्यात आत्मविश्वास पेरण्याचं युगप्रवर्तक कार्य करणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे मराठवाड्यातील दलित रंगभूमीचे प्रेरणास्त्रोत ठरले. युगयात्रा म्हणजे शतकानुशतकापासून सामाजिक प्रथांच्या साखळदंडामध्ये बंदिस्त मुक्या जीवनाची दुःखकथा. अगदी रामायण काळापासून ते कालपर्यंतच्या उपेक्षित आणि बहिष्कृत समाजमनाची व्यथा. ही कथा होती कस्पटाप्रमाणे गावकुसाबाहेर फेकून दिलेल्या निर्वासित

मानवी जीवनाची भेदरलेल्यांची, दडलेल्यांची, रंजलेल्यांची आणि गाजलेल्यांची."[२९] युगयात्रा ने पुढील काळात फक्त मराठवाड्यातीलच नव्हे तर मराठी रंगभूमीवरील नाटकाला प्रेरित केले. त्यामुळेच युगयात्रानंतर पुढील जवळपास चाळीस वर्षातील नाटकावर व रंगभूमीवर म. भि. चिटणीस यांचा प्रभाव जाणवतो.

युगयात्रा या नाटकानंतर मराठी रंगभूमीवर दलित लेखकांचे नाट्यलेखन सुरू असले तरी, मराठवाड्यामध्ये मात्र जवळपास विस वर्षे फारसे नाट्यलेखन झाले नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून १४ एप्रिल १९७८ मध्ये औरंगाबाद येथे दलित थिएटर, औरंगाबाद या नाट्यसंस्थेची स्थापना झाली. दलित थिएटरच्या चळवळीनंतर मात्र मराठवाड्यातील दलित रंगभूमी अधिकच गतिमान झाली. गंगाधर पानतावणे, अविनाश डोळस, दत्ता भगत, प्रकाश त्रिभुवन, रा. द. अरगडे, विजयकुमार गवई, आर.के. क्षीरसागर, अविनाश महातेकर, राम दोतोंडे, प्रकाश सिरसाट, रुस्तुम अचलखांब, मधूसूदन गायकवाड, योगीराज वाघमारे, भगवान सवाई, हनुमानदास वर्मा, अशोक बुरबुरे, विलासराज भद्रे, राहूल जोंधळे, दिनेश कवडे, गौतम गायकवाड, अनिलकुमार साळवे, सिद्धार्थ तायडे, माधव जाधव, किशोर घोरपडे, खंडू गायकवाड, अ. को. सुरडकर, बापू घोक्षे, बलभीम तरकसे, उत्तम अंभोरे, बाबूराव कांबळे इत्यादी नाटक-एकांकिकाकारांनी मराठवाड्यातील दलित नाटक व रंगभूमी समृद्ध केली आहे. दलित रंगभूमीवरील प्रमुख नाटककारांच्या नाट्यलेखनाचे स्वरूप पुढील प्रमाणे आहे.

३.२.२.१ दत्ता भगत :

दत्ता भगत हे एकूण मराठी रंगभूमीवरील एक प्रयोगशील नाटककार आहेत. नाट्यलेखनातील यशामुळेच त्यांना अखिल भारतीय नाट्य संमेलनाच्या अध्यक्षपदाचा बहुमान मिळलेला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार शिरोधार्य मानून दत्ता भगत यांनी आपले नाट्यलेखन केले आहे. १९८० नंतरच्या काळात दत्ता भगत यांनी नाट्यलेखन केले आहे. वैचारिकता, चिंतनशीलता, विषयाची विविधता, अशयाभिव्यक्तीचे अद्वैत, प्रगल्भता, अन्यायाविरूद्ध चीड व पुरोगामी वृत्ती त्यांच्या व्यक्तिमत्वात आणि लेखनात जाणवते. स्वतःच्या नाट्यलेखनाबरोबर इतर नाट्यलेखकांनाही त्यांनी सातत्याने प्रोत्साहन दिले आहे.

दत्ता भगत यांनी नाटक, एकांकिका, बालनाट्य व समीक्षालेखन अशा वेगवेगळ्या क्षेत्रात स्वतःचे अस्तित्व सिद्ध केले आहे. आवर्त, अश्मक, खेळिया, वाटा-पळवाटा, पुस्तकी वांझ चर्चा इत्यादी नाटके दत्ता भगत यांनी लिहिली आहेत. आवर्त आणि इतर एकांकिका, चक्रव्यूह आणि इतर एकांकिका, जहाज फुटलं आहे आणि इतर एकांकिका हे दत्ता भगत यांचे एकांकिका संग्रह आहेत. याशिवाय गोष्ट गोधराजाची ही बालनाटिका त्यांनी लिहिली आहे. नाट्यलेखनाशिवाय नाट्यसमीक्षात्मक लेखनही त्यांचे विपूल प्रमाणात आहे. नाटक : एक वाङ्मयप्रकार, निळी वाटचाल, दलित साहित्य : दिशा आणि दिशांतर, दलित साहित्य : वाङ्मयीन प्रवाह इत्यादी ग्रंथामधून दत्ता भगत यांचा समीक्षाविचार व्यक्त होतो.

वाटा-पळवाटा हे दत्ता भगत यांचे बहुचर्चित नाटक १९८७ मध्ये प्रकाशीत झाले आहे. या नाटकाचे मूळ नाव 'सखेद सादर करीत आहे' असे होते परंतु व्यावहारिक गरज म्हणून नाटकाचे नाव 'वाटा-पळवाटा' असे ठेवले, असे लेखक स्वतःच वाटा-पळवाटा या नाटकाविषयीच्या मनोगतामध्ये सांगतात. वाटा-पळवाटा या नाटकाविषयी दत्ता भगत म्हणतात, "डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या व्यक्तिमत्वाने भारावलेल्या तीन पिढ्या माझ्या डोळ्यांसमोर आहेत. ह्या तीन पिढ्यांतील अंतर फार गुंतागुंतीचे आहे. पहिली पिढी ब्रिटिश राजवटीतील अशिक्षित एखाद्या प्रश्नाची सखोल चर्चा करावी एवढी उसंत नसणारी, एवढा बौद्धिक आवाकाही नसणारी पण प्रामाणिक आणि निष्ठावान कार्यकर्त्यांची. दुसरी पिढी सुशिक्षित. थोडे आर्थिक स्थैर्य लाभलेली. स्वातंत्र्याच्या आगमनामुळे लोकशाही जीवन पद्धतीचे आश्वासन मिळालेली. ह्या पिढीच्या सभोवतीचे वास्तव ध्येयवादी वातावरणाच्या धुक्यामुळे काहीसे उबदार व धूसर झालेले. ह्या पार्श्वभूमीवर आपल्या प्रश्नांचा गंभीरपणे विचार करणारी. तर तिसरी पिढी स्वातंत्र्योत्तर काळातली. परिवर्तनाची गती आणि अपेक्षा ह्यातील व्यस्त प्रमाणामुळे संतापलेली. धाडसी पण लोकशाहीवरचा विश्वास गमावून बसलेली. ह्या तीन पिढ्यांचे चित्रण करावे हा हेतू मनात बाळगून मी हे नाटक लिहिले."[३०] वाटा-पळवाटा या नाटकाचे स्वरूप व निर्मितीप्रक्रियाच दत्ता भगत यांनी इथे सांगितली आहे.

वाटा-पळवाटामधील मांडणी ही अत्यंत संयमी स्वरूपाची आहे. कुठेही आक्रस्ताळेपणा जाणवत नाही. त्यामुळेच व्यावसायिक रंगभूमीवरही या नाटकाने यश मिळविले. महत्त्वाचे म्हणजे

दलित नाटकामध्ये अनेक प्रवाह निर्माण करत दलितेतर प्रेक्षकवर्ग मिळविण्याचे कामही या नाटकाने केले. वाटा-पळवाटा या नाटकाबद्दल गो. पु. देशपांडे म्हणतात, "दत्ता भगतांनी दलित नाटक नेटकेपणाने आणि भक्कमपणाने मराठी नाटकाच्या परंपरेत मानाच्या आणि उज्ज्वल भविष्य दाखविणाऱ्या ठिकाणी आणून ठेवले आहे. ही त्यांची कामगिरी मराठी भाषेला आणि मराठी नाटकाला फार मोठा दिलासा आणि आश्वासन देणारी आहे. दलित नाटकात 'वाटा-पळवाटा'सारखे नाटक नाही. एकूणच मराठी नाटकाला पुनःपुन्हा नाटकाच्या सामाजिकतेची जाणीव करून देणारी जी थोडी नाटके आहेत त्यात 'वाटा-पळवाटा'चा समावेश करायला हवा."[३१] दत्ता भगत यांचे नाटक सामाजिकतेची जाणिव करून देणारे आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिप्रेत असणारा समाज निर्माण झाला नाही याची खंतही व्यक्त करणारे आहे. एकूणच दलित समाजाच्या तीन पिढ्यांमधील अंतर्विरोधाचे नाट्य म्हणजे वाटा-पळवाटा होय.

खेळिया हे दत्ता भगत यांचे १९८१ साली रंगभूमीवर आलेले नाटक आहे. राजकीय आणि सामाजिक वास्तवाचे चित्रण या नाटकामध्ये दत्ता भगत यांनी केले आहे. खेळिया या नाटकाबद्दल मकरंद साठे म्हणतात, "समकालीन वास्तवामुळे दलित समाजाची जी कोंडी होत होती तिचं चित्रण करण्याचा प्रयत्न भगत करतात. भास्कर हा एक पिढीजात श्रीमंत वकील आहे. तो राजकीय-सामाजिकदृष्ट्या जागृत असलेल्या माणूस... त्याचे वडील अण्णासाहेब हे गावाकडचं मोठे प्रस्थ... सरंजामदार जसा असू शकतो आणि जेवढा असू शकतो तसं. नारायण हा अण्णाच्या पदरी नोकर असणाऱ्या दलितांचा मुलगा. तो नोकर म्हणूनच भास्करच्या घरी येतो. पण भास्कर त्याला निव्वळ नोकर म्हणून न वागवता शिकवतो, सामाजिक भान देतो. स्वतःच्या पायावर उभा करणे, आणि अर्थातच स्वतःला मानवेल असं राजकारण करण्यासाठी वापरूनही घेतो. नारायण मोठा दलित नेता बनतो... भास्करच्या व्यक्तिगत राजकारणापोटी नारायण पहिल्यांदा सामाजिक अवकाशात पाय ठेवतो. पण तो दलित असतो. विद्रोहाचा अंगार त्याच्या ठायी असतोच. स्वाभाविकपणे आता तो स्वतःची स्वतः वाटचालही करू लागतो... हे होऊ लागताच संघर्षाच्या ठिणग्या पडू लागतात."[३२] स्वार्थासाठी भास्कर नारायण चा कसा वापर करून घेतो आणि शेवटी नारायणचा कसा बळी जातो याचे चित्रण दत्ता भगत यांनी खेळिया या नाटकामध्ये केले आहे.

अश्मक हे दत्ता भगत यांचे आणखी एक यशस्वी नाटक आहे. १९८६ मध्ये अश्मक हे नाटक मराठी रंगभूमीवर आले. खेळिया, वाटा पळवाटा या नाटकांप्रमाणेच अश्मक हे नाटकही वैचारिक नाटक आहे. विचारा-विचारांमधील संघर्ष किंवा द्वंद्व हा दत्ता भगत यांच्या नाट्यलेखनाचा स्थायिभाव आहे. तो अश्मकमध्येही व्यक्त होतो. "अश्मक' म्हणजे पाषाणखंड, मर्तिकाच्या विधितही अश्मक वापरला जातो... त्यामागे एक प्रतिकात्मक अर्थ असतो... अश्मकाची कथा... ही केवळ एक काल्पनिक कथा आहे... सत्तेचा जबरदस्त मोह आणि मानवी कल्याणासाठी अथक परिश्रम घेणारी करूणामय प्रज्ञा ह्यातील संघर्ष हा मानवी इतिहासातील एक चिरंतन संघर्ष आहे. हाच संघर्ष हे नाटक लिहिताना माझ्या डोळ्यांसमोर होता. एका मर्यादित अर्थाने हाच संघर्ष दलित नाटकात व्यक्त होत आला आहे. ह्या अर्थानं माझं हे नाटक दलित नाटक ठरू शकेल."[३३] मोह आणि प्रज्ञा यांच्यातील संघर्षाचे स्वरूप अश्मकमध्ये पाहण्यास मिळते.

दत्ता भगत यांच्या नाटकांप्रमाणेच त्यांच्या एकांकिकादेखील सामाजिक द्वंद्वावर भाष्य करणाऱ्या आहे. दत्ता भगत भोवतालच्या घटनांवर चिंतनशील भाष्य आपल्या एकांकिकेद्वारे करतात. दलित रंगभूमीला वेगळे वळण देण्याचे काम दत्ता भगत यांनी आपल्या नाटकातून केले. आपले पुरोगामित्व सिद्ध करण्यासाठी प्रतिगाम्यांना शिव्या देण्याची गरज दत्ता भगत यांना भासली नाही. व्यक्तिच्या जाती-धर्मापेक्षा माणसातील वृत्ती-प्रवृत्तीवर त्याचे नाटक भाष्य करते. कोणत्याही भडकपणापेक्षा, ऊरबडवेपणापेक्षा चिंतनशीलपणे भोवतालच्या जीवनातील असमतोलाला ते नाट्यरूप देतात. आपल्या वेगळ्या शैलीमुळेच ते दलित रंगभूमीचे सर्वात यशस्वी नाटककार ठरतात.

३.२.२.२ प्रकाश त्रिभुवन :

औरंगाबादमधील दलित थिएटरच्या नाटककारांपैकी प्रकाश त्रिभुवन हे एक वैचारिक नाटककार आहेत. त्यांच्या नाट्यलेखनामुळे एकूण दलित थिएटरची मान उंचावली गेली. नाटक, बालनाट्य, एकांकिका, नाट्यरुपांतरे इत्यादी प्रकारचे लेखन त्यांनी केले आहे. थांबा! रामराज्य येतंय एक होता राजा, जातककथा, सत्यमेव जयते, बाळकडू, गणनायिका आम्रपाली, दिग्विजय आणि इतर एकांकिका इत्यादी नाटक-एकांकिका त्यांनी लिहिल्या आहेत. धन नको मज वन हवे, अडीच फुटाचा राक्षस आणि पांगुळगाडा ही बालनाट्ये त्यांनी लिहिली आहेत. याशिवाय थांबा!

रामराज्य येतंय या नाटकाचे 'रूको रूको, रामराज्य आ रहा है' या नावाने आणि गणनायिका आम्रपाली या नाटकाचे 'गणनायिका अम्बपाली' असे हिंदी नाट्यरूपांतर त्यांनी केले आहे.

थांबा! रामराज्य येतंय! हे प्रकाश त्रिभुवन यांचे बहुचर्चित नाटक आहे. या नाटकातील वैचारिकता, प्रयोगशीलता, आकृतिबंधातील वेगळेपणामुळे हे नाटक भारतभर गाजले. दिल्ली या ठिकाणी विख्यात पाश्चात्य दिग्दर्शक पिटर ब्रूक यांच्या उपस्थितीत थांबा! रामराज्य येतंय! चा प्रयोग झाला आहे. "त्रिभुवन यांची नाटके केवळ स्थितीवर्णन करून सामाजिक स्थितीचे दर्शन घडवणारी नाहीत. तर ती संस्कृतीच्या उदात्तीकरणाच्या पायाखाली भरडल्या जाणाऱ्या बहिष्कृत समाजाच्या इतिहासाची व्यवच्छेदक मांडणीही करतात. धर्म आणि धर्माची प्रतिकं, त्याची मिथकं ही इतिहासाच्या सर्वकाळात दीन दलितांच्या अस्तित्वाला आणि त्यांच्या असण्याला सुरूंग लावण्यासाठी शस्त्र म्हणून कशी वापरली जातात याची मांडणी त्रिभुवन करतात. थांबा! रामराज्य येतंय! हे त्यांचं उत्कृष्ट उदाहरण आहे. दैववाद विरूद्ध विचारवाद हा अनादी काळापासूनचा संघर्ष. विचाराला उत्तर देणं कठीण झालं की दैववादाचा जन्म होतो... थांबा! रामराज्य येतंय! मध्ये प्रकाश त्रिभुवन या दैववादाला दशावताराच्या मिथकात घालून समोर आणतात... आनंदा हा आपल्या गावात शाळा काढतो मग सवर्ण मंडळी त्याची शाळा जाळण्याची योजना आखतात मग सुरू होतो दशावतारी खेळ"[३४] प्रतिमा, प्रतिके, मिथक लोकरंगभूमीवरील दशावतारी खेळ, पोतराज अशा विविध बाबींतून थांबा! रामराज्य येतंय!चा रूपबंध साकार झाला आहे.

थांबा! रामराज्य येतंय! ने केवळ दलित नव्हे तर एकूण मराठी रंगभूमीवर स्थान निर्माण केले आहे. मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतरासंदर्भातील घटनेवरून हे नाटक लेखकाने लिहिले असले तर ते केवळ प्रासंगिक नाटक वाटत नाही. एक वैश्विक विचार या नाटकातून लेखकाने दिला आहे. थांबा! रामराज्य येतंय! बद्दल समीक्षक प्रल्हाद लुलेकर म्हणतात, "थांबा! रामराज्य येतंय! हे नाटक आशय-अभिव्यक्ती, प्रायोगिक सामर्थ्य याबाबतीत कमालीचे यशस्वी ठरले आहे. विद्यापीठ नामांतरातून प्रस्थापित जातीवाद्यांचे दांभिक वर्तन, ग्रामीण भागातील दलित नेतृत्वाची मुस्कटदाबी, दलितांवरील अन्याय-अत्याचार, दलित चळवळीची अपरिहार्यता आदींचे आविष्करण या नाटकातून यशस्वीपणे आले आहे. हे सारे प्रतीकात्मकतेने येते म्हणून नाटक यशस्वी ठरते."[३५]

या नाटकाच्या निमित्ताने एकूण दलित रंगभूमीच्या व पर्यायाने मराठी रंगभूमीच्या कक्षा विस्तारल्या आहेत.

अशयाभिव्यक्तीचे अद्वैत, पारंपरिक संकेतांना छेद, तंत्राची मोडतोड, आकृतीबंधाचे वेगळेपण यामुळे थांबा! रामराज्य येतंय! हे नाटक यशस्वी झाले आहे. दिल्लीच्या श्रीराम सेंटरला थांबा! रामराज्य येतंय! चा प्रयोग एवढा यशस्वी झाला की, पीटर ब्रूक हा आंतरराष्ट्रीय किर्तीच्या दिग्दर्शक या नाटकाचा गौरव करताना म्हणतो, "When I swa 'Thamba Ramrajya yetay' I was very excited by the skill and vitality of the performance." एकूणच मराठवाड्यापासून जागतिक स्तरावर चर्चिले गेलेले थांबा! रामराज्य येतंय! हे एक यशस्वी नाटक आहे.

३.२.२.३ रा. द. अरगडे :

रामकृष्ण दत्तात्रय अरगडे हे मराठवाड्यातील नाटककारांच्या पहिल्या फळीतील महत्त्वाचे नाटककार होते. ते 'मराठवाड्यातील पहिले वगनाट्य लेखक तसेच बीड जिल्ह्यातील पहिले नाटककार आहेत.' असे सतीश साळुंके म्हणतात. रा. द. अरगडे यांनी एकूण सात नाटके लिहिली असून ती गंभीर, विनोदी, भाषांतरीत अशा संमिश्र स्वरूपाची आहेत. घट डोईवर घट कमरेवर, राया मला दिल्लीला घेऊन चला ही रा. द. अरगडे यांची वगनाट्ये आहेत.

बंगालच्या फाळणीवर आधारीत 'अमृतेर दिन' हे नाटक अरगडे यांनी लिहिले असून माणुसकी जोपासण्याचा संदेश या नाटकातून ते देतात. बायको पीएच.डी होते हे विनोदी प्रवृत्तीचे नाटक असून अग्निकन्या या नाटकातून अरगडे यांनी स्त्री-पुरूष समानतेचा पुरस्कार करत स्त्रियांनाही स्वातंत्र्य उपभोगण्याचा अधिकार मिळावा असा संदेश या नाटकातून दिला आहे. १९६१ मध्ये अरगडे यांनी प्रेम आंधळं नसतं हे नाटक लिहिले. प्रेम आंधळं नसतं हे बीड रंगभूमीवरील पहिले नाटक आहे. मणि मधूकर यांच्या दुलारीबाई या हिंदी नाटकाचे अरगडे यांनी लाडलीबाई नवाने भाषांतर करून प्रयोगही केले.

रा. द. अरगडे यांनी वैविध्यपूर्ण जाणिवा आविष्कृत करणारे नाट्यलेखन केले हे खरे असले तरी त्यांचा मूळ पिंड हा सामाजिक नाटककाराचा आहे. स्वातंत्र्य, समता, बंधुता व सामाजिक न्याय हा त्यांच्या लेखनाचा स्थायिभाव आहे. घट डोईवर घट कमरेवर हे वगनाट्य त्यांच्या मूळ प्रवृत्तीला

शोभून दिसणारे आहे. तसेच त्यांच्या यशस्वी नाटकांपैकी हे एक नाटक आहे. घट डोईवर घट कमरेवर या नाटकाविषयी सतीश साळुंके म्हणतात, "ते दलित मुक्ततेच्या विचारांशी पक्के बांधिल असल्यानेच ते प्रस्तुत नाटकाची मांडणी आडेवेडे न घेता रोखठोक करतात. त्यांच्या भूमिकेचा हा रोखठोकपणा 'घर डोईवर घट कमरेवर' च्या भाषेतूनही प्रकटतो. गावपातळीवर सवर्णाकडून दलितांवर होणारा अन्याय व त्यामुळे दलितांच्या वाट्याला येणारे बहिष्कृत जीवन आणि अशा तुच्छ जीवनाविरूद्ध संघर्ष करणारा दलित नायक अशी या नाटकाची कथारचना आहे. नाटकाचा आशय पोहचविण्यासाठी अरगडे हे वगनाट्याची शैली स्वीकारतात. वगनाट्याची सर्व वैशिष्ट्ये नाटकात विद्यमान आहेत. एकूण नाटकाची मांडणी, शैली व भाषा पहता हे वगनाट्य आहे यात वाद नाही व दलित रंगभूमीवरील हे पहिले वगनाट्य आहे यातही वाद नाही. त्यामुळे प्रा. अरगडे यांना मराठवाड्याच्या दलित रंगभूमीवरील पहिल्या वगनाट्य लेखकाचा सन्मान मिळतो."[३६] एक सामाजिक वगनाट्य म्हणून मराठी रंगभूमीवर घट डोईवर घट कमरेवर या वगनाट्याचे स्थान महत्त्वाचे आहे.

घट डोईवर घट कमरेवर हे ग्रामीण भागातील दलित समाजावर होणाऱ्या अन्याय-अत्याचाराबरोबर पाण्याचा प्रश्नही मांडते. या वगनाट्यलेखनाला बाबा आढाव यांच्या 'एक गाव, एक पणवठा' या चळवळीची प्रेरणा आहे. गुंडेवाडी नावाच्या गावामध्ये प्रचंड दुष्काळ पडतो. प्रस्थापिताकडून गावच्या सार्वजनिक विहिरीवर दलितांना पाणी भरण्यास विरोध केला जातो. त्यासाठी संघर्ष पेटतो. गावचा सरपंच प्रतापराव व त्याचा मुलगा दलित समाजातील सुमतीवर अन्याय करण्याची धमकी देतात त्यामुळे हतबल होऊन नाटकाचे नायक हरिबा व त्यांचा मुलगा सुरेश तात्पुरती माघार घेतात. केवळ पाणी भरण्यासाठीच नव्हे तर प्रत्येक क्षणी दलित समाजाला दुय्यम वागणूक प्रस्थापितांकडून मिळते.

ब्राह्मण समाजातील रत्ना व दलित समाजातील सुमती या दोघी वर्ग मैत्रिणी पण पाणी भरताना हंड्याला हंडा लागला म्हणून रत्नाने सुमतीला वापरलेले अपशब्द, दलित आहेत स्वतःच्या पायरीने वागावे असे सुरेशला सांगून सरपंच निवडणुकीतून त्याला फॉर्म परत घेण्यासाठी प्रतापराव सरपंचाने आणलेला दबाव, सुरेश फॉर्ममध्ये घेत नाही म्हणून त्याच्या बहीणीला सुमतीला हाणी पोहचवण्याची दिलेली धमकी, गावात दुष्काळ पडला असता तमाशा आणणे परवडणार नाही

म्हणून दलित समाजातील सुमतीस नाचण्याची केलेली बळजबरी, गावच्या विहिरीवर दलित समाजाचा मोर्चा येणार आहे हे माहीत झाल्यानंतर विहिरीचे पाणी अमंगळ होईल म्हणून मोर्चा येण्याच्या अगोदरच घरातील छोटे छोटे भांडे भरून ठेवण्यासाठीची दिगंबर भटाची लगबग, दलित समाजाला कोणत्याही स्थितीत विहिरीपर्यंत पोहचू द्यायचे नाही. यासाठी विहिरीवर एकवटलेले प्रतिगामी गावकरी, हरिजन समाजातील असल्याचे कळताच इटबाच्या झोपडीतील पाणी पिणसाठी नकार देणारा रामेश्वर भट अशा सर्वच घटना प्रसंगातून गुंडेवाडी या गावातील संघर्षाचे स्वरूप लक्षात येते. पदोपदी दलित समाजाला कशी अमानुष वागणूक दिली जाते हे रा. द. अरगडे यांनी मांडले आहे.

घट डोईवर घट कमरेवर या वगनाट्यातील गुंडेवाडी या गावातील दलित समाजावर अन्याय-अत्याचार होतात हे खरे असले तरी नाटकातील संघर्ष हा दोन टोकावरील म्हणजे दलित विरूद्ध सवर्ण संघर्ष नाही. तर हा संघर्ष पुरोगामी विरूद्ध प्रतिगामी अशा स्वरूपाचा आहे. कारण नाटकातील सखाराम हे पात्र मराठा समाजातील असूनही नाटकाचा नायक इटबाच्या बाजूने व मराठा सरपंच प्रतापरावच्या विरोधी भूमिका घेते. सत्यशोधकी विचारधारेचा प्रभाव असणारा सखाराम या ठिकाणी दलित समाजाच्या न्याय्य हक्काचा पुरस्कार करतो व दलित समाजावर अन्याय करणाऱ्या स्वकीयांविरोधात-स्वजातीयांविरोधात उभा ठाकतो. त्यामुळे काळे विरूद्ध पांढरे, दलित विरूद्ध सवर्ण असा संघर्ष नाटकात राहत नाही तर पुरोगामी विरूद्ध प्रतिगामी असा संघर्ष उभा राहतो. नाटकाच्या शेवटी न्यायनिवाडा होऊन दलित समाजाच्या बाजूने निकाल लागतो. गावची विहीर सर्वांसाठी खुली करण्यात येते. सरपंच-प्रतापरावांना दोन वर्षांची शिक्षा होते तर सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यता पाळल्याबद्दल दिंगबर भट्टाला १ वर्ष कारावास व एक हजार रूपये दंड ठोठावण्यात येतो.

घट डोईवर घट कमेरवर या नाटकाचे शीर्षकही अत्यंत समर्पक असे आहे. नाटकाच्या शेवटी जरी दलित समाजाला न्याय मिळाला असला तरी, अस्पृश्यता, जातियता समूळ नष्ट झाली आहे असे नाही. सरपंचाचा मुलगा संभाजी प्रतिगाम्यांचा प्रतिनिधी म्हणून गावात आहेच शिवाय एक-दोन वर्षात शिक्षा झालेले लोकही बाहेर येतील आणि पुन्हा बदला घेण्यासाठी नवनव्या योजणा आखतील. त्यामुळे कायमस्वरूपी न्याय दलित समाजाला तेव्हाच मिळेल जेव्हा मनामनातून

जातियता-अस्पृश्यता नष्ट होईल. तोवर दलित समाजाच्या उरावर असणारे ओझे कायमचे आहे. फक्त हा घट कधी डोईवर तर कधी कमरेवर आहे. जातियता, अस्पृश्यता, अमानुष वागणुकीचा घडा कायमचा उतरला पाहिजे आणि दलित समाज या सर्व वेदनांमधून मुक्त झाला पाहिजे. असा विचार नाटककार रा.द. अरगडे यांनी या नाटकामध्ये मांडला आहे.

पुरोगामी वृत्ती, विज्ञानवादी दृष्टिकोन, स्वातंत्र्य-समता-बंधुता-सामाजिक न्यायाचा पुरस्कार, फुले, शाहू, आंबेडकरवादी विचारांचा प्रभाव, काव्यात्मकता अर्थपूर्ण शीर्षक, वैशिष्ट्यपूर्ण नामाभिधाने, गावखेड्यातील भयावह वास्तवाचे चित्रण, टोकदार संवाद, संघर्षप्रवण भाषा, ग्रामीण बोलीचा प्रभाव, पारंपरिक स्त्री-प्रतिमा, उपहास-उपरोध, सत्य-शिव-सुंदराची आराधना ही घट डोईवर घट कमरेवर या वगनाट्याची वैशिष्ट्ये आहेत. एकूणच घट डोईवर घट कमरेवर हे मराठी रंगभूमीवरील वैशिष्ट्यपूर्ण वगनाट्य आहे. केवळ दलित विरूद्ध सवर्ण संघर्ष ही पारंपरिक साचेबद्ध व कृत्रिम पात्रयोजना नावावरून प्रतिगामी विरूद्ध पुरोगामी असे नैसर्गिक संघर्ष आपल्या वगनाट्यात अरगडे यांनी उभा केला आहे. त्यामुळे घट डोईवर घट कमरेवर हे नाटक मराठी नाटकाच्या परंपरेत आपल्या वेगळेपणामुळे उठून दिसतो.

३.२.२.४ ऋषिकेश कांबळे :

ऋषिकेश कांबळे हे दलित साहित्य चळवळ व एकूणच वाङ्मयीन व्यवहाराकडे तटस्थपणे पाहणारे कवी-नाटककार आहेत. कोणत्याही गोष्टीच्या आहारी न जाता तिच्याकडे तटस्थपणे पाहिल्यामुळे आपण तिचे योग्य मूल्यमापन करू शकतो हा त्यांचा दृष्टिकोन आहे. हाच दृष्टिकोन त्यांच्या वैचारिक व समीक्षात्मक लेखनामध्ये अवतरला आहे. अस्तित्व आणि अस्मिता, कालवाह, दलित कविता: संदर्भ आणि संदर्भ हे त्यांचे समीक्षात्मक लेखन आहे. दलित कविता आणि ब्लॅक पोयट्री यांचा अनुबंध जोडणारे संशोधनही ऋषिकेश कांबळे यांनी केले आहे. २०१६ मध्ये कांबळे यांनी नाट्यलेखनाच्या क्षेत्रात पाऊल टाकले. आपल्या पहिल्याच नाटकाद्वारे त्यांनी नाट्यसमीक्षकांचे लक्ष वेधून घेतले. भाई तुम्ही कुठे आहात! हे ऋषिकेश कांबळे यांचे वैचारिक उंची प्राप्त केलेले नाटक आहे. दलित चळवळीतील अंतर्विरोध अत्यंत तटस्थपणे व अंतर्मूख होऊन कांबळे यांनी या नाटकाद्वारे मांडला आहे.

दलित राजकीय पुढारीच स्वार्थ साध्य झाल्यानंतर सर्व सामान्य कार्यकर्त्यांना कसे दुय्यम स्थान देतात, दलित चळवळीसाठी आयुष्य पणाला लावलेल्या कार्यकर्त्यांच्या भविष्यास कसे घातक ठरतात याचे चित्रण कांबळे यांनी या नाटकात केले आहे. भाई, भाई म्हणत ज्या राज्यकर्त्यांची थुंकी झेलण्यात तारुण्य पणाला लावले त्याच नेत्याने स्वार्थसिद्धीसाठी चळवळीची तत्त्वे पणाला लाऊन स्वतः च्या पदरात राजकीय भिक पाडून घ्यावी आणि वरून चळवळीतील प्रामाणिक, निष्ठावंतांना फाट्यावर मारावे अशावेळी जी अस्वस्थता वाट्याला येते तिच अस्वस्थता भाई तुम्ही कुठे आहात! या नाटकातील मिलिंदच्या वाट्याला आली आहे. या अस्वस्थतेतूनच स्वार्थासाठी चळवळीची तत्त्वे विकायला काढलेल्या भाईंना मिलिंद प्रश्न विचारतो- भाई तुम्ही कुठे आहात! तुम्ही कुठे आहात म्हणजे तुमचा दरारा, तुमची तत्त्वे, तुमचा रुबाब, तुमची निष्ठा आणि एकूणच तुमच्यातील माणूसपण कुठे आहे? असे प्रश्न मिलिंद निर्माण करतो.

भाई तुम्ही कुठे आहात! ही केवळ मिलिंदची अस्वस्थता नसून स्वार्थी राजकारणातील भाईंसाठी प्राणपणाने झटणाऱ्या असंख्य मिलिंदची ही प्रातिनिधिक अस्वस्थता आहे. एकूणच दलित रंगभूमीवरील नाटकांपेक्षा वेगळ्या धाटणीचे हे नाटक आहे. या संदर्भात दलीप घारे म्हणतात, "भाई तुम्ही कुठे आहात! या नाटकाचं वेगळेपण असं आहे की, हे नाटक सत्ताधाऱ्यांमधील किंवा विशिष्ट उच्चभ्रू जातींमधील दोषांवर प्रखर भाष्य करतं, पण त्याचबरोबर दलित चळवळीसंदर्भात आपल्याला अंतर्मुख करून माणूस म्हणून मूलभूत विचार करायला भाग पाडतं........ नैतिक ऱ्हास किंवा नैतिक अध:पतन झालेल्या नेत्यांचे "भाई" हे व्यंगात्मक नामकरण आहे. हे नाटक आपल्या Social system वर, सामाजिक व्यवस्थेवर तर भाष्य करतंच, पण आजच्या काळात सशक्त दलित चळवळ का उभी राहू शकत नाही, असा प्रश्न हे नाटक उभं करतं. "भाई" हे अशा दुर्मिळ नाटकांपैकी एक नाटक आहे, ज्यात सांगण्यासाठी पात्रं बोलतात, पण त्यांना म्हणायचं वेगळंच असतं... कुठल्याही एका पक्षाची बाजू न घेता संतूलितपणे दलित समस्येवर नाटक लिहिणं हे खूप अवघड काम आहे. हे अवघड असलेलं शिवधनूष्य नाटककार डॉ. ऋषिकेश कांबळे यांनी समर्थपणे पेललेलं आहे."[३७] एकंदरीत, भाई तुम्ही कुठे आहात! हे एका कर्तव्यनिष्ठ कार्यकर्त्याचे स्वगत आहे.

आशय, विषय, अभिव्यक्ती, संवाद अशा सर्व आघाड्यांवर नाटककाराने मेहनत घेतली आहे. अंतर्मुख होऊन दलित चळवळीची मीमांसाच केली आहे. स्वार्थासाठी बाबासाहेबांच्या विचारांशीच बेईमानी करणारे भाई जेव्हा मिलिंदला सांगतात की, मी बाबासाहेबांच्या विचारांशी कसलीही बेईमानी केली नसून अस्तित्वासाठीची लढाई लढत आहे. तेव्हा मिलिंद म्हणतो, "थू, असल्या छिनाल लढाईवर. किती बामणी बोलला तुम्ही. तो जोष कुठे गेला भाई आमचं रक्त सळसळून टाकणारा. अन्यायाला चिरडून टाकणारे शब्द कुठल्या भात्यात टाकले भाई. आज विचारवंत भाई बोलले शामळू-शामळू"[३८] स्वार्थासाठी स्वत्व गमावून बसलेले भाई आणि चळवळीची, बाबासाहेबांच्या विचारांची होणारी हार सहन न करू शकणारा अस्वस्थ मिलिंद येथे नाटककाराने समर्थपणे उभा केला आहे.

चळवळीचा वापर करून कार्यकर्त्यांचा राजकारणात गेल्यानंतर होणारा नेता, अंगात नेतेपण आल्यानंतर हवी असणारी सत्ता, या सत्तेसाठी चळवळीचा दिलेला बळी, गहाण टाकलेले सत्व आणि स्वत्व, हताश झालेले तरुण कार्यकर्ते, स्वार्थसिद्धीसाठी चळवळ फोडणारे प्रतिगामी आणि फुटणारे ढोंगी पुरोगामी या सर्व बाबींचा उहापोह भाई तुम्ही कुठे आहात! या नाटकात ऋषिकेश कांबळे यांनी केला आहे. या नाटकामुळे केवळ दलित रंगभूमीच्याच नव्हे तर एकूण रंगभूमीच्या कक्षा विस्तारल्या गेल्या आहेत. ऋषिकेश कांबळे यांनी भाई तुम्ही कुठे आहात!च्या निमित्ताने स्वार्थी राजकारणावर व्यंगात्म भाष्य केले आहे.

दत्ता भगत, प्रकाश त्रिभुवन, रा. द. अरगडे, ऋषिकेश कांबळे यांच्याशिवाय अनेक दलित नाटककारांनी मराठवाडी रंगभूमी समृद्ध केली आहे. गंगाधर पानतावणे हे एकूणच दलित साहित्य चळवळीचे प्रेरणास्त्रोत आहेत. साहित्य-रंगभूमीला प्रोत्साहन देण्याबरोबर महत्त्वपूर्ण लेखनही त्यांनी केले आहे. माणुसकीचे बंड, मुखवटा या नाटकांबरोबर मृत्यूशाळा हे नभोनाट्य पानतावणे यांनी लिहिले आहे. याबरोबर द स्लेव्ह या इंग्रजी नाटकाचे गुलाम नावाने भाषांतर व प्रयोग देखील पानतावणे यांनी केला आहे. आर. के. क्षीरसागर (भगवानपर मुकादमा, प्रतिबिंब) अविनाश डोळस (गाव नसलेले गाव), भगवान सवाई (मरण वरात), रुस्तुम अचलखांब (कैफियत, संगीत मनमोहना, कपिलायणी, कात्यायणी, गांधी-आंबेडकर आणि पाच बुद्ध एकांकिका), योगीराज वाघमारे (अगा जे घडलेची नाही), किशोर घोरपडे (मालक, आता फसायचं नाही, नवे कीर्तन),

विजयकुमार गवई (व्हय हे माजंबी गाव हाय, महामानव व युगप्रवर्तक, वाणी गाडगेबाबाची, महामानव, आठवणींचे पक्षी), अ. को. सुरडकर (शरण), खंडू गायकवाड (बप्पा, म्या गाडगेबाबा बोलतोय), बलभिम तरकसे (हीसाब, कथा घुंगराची, स्वातंत्र्य मिळालंय म्हणं) या नाटककारांनीही स्वतःच्या नाट्यलेखनाने मराठवाडी रंगभूमीसाठी योगदान दिले आहे.

अनिलकुमार साळवे हे मराठवाड्याच्या दलित रंगभूमीवरील प्रगल्भ नाटककार आहेत. कथा खैरलांजी, ग्लोबल आडगाव, शापित, हमे आजादी चाहिएँ, मुक्या बाहुल्या, जोकरांचे राज्य, अशीफा-तू जिंदा हैं, मृत्यूछाया, आम्ही बंदिस्त पाखरे, शांतता दंगल चालू आहे, शेख मुहंम्मद मराठी माध्यम, तिच्यासाठी वाट्टेल ते... इत्यादी नाटके-एकांकिका त्यांनी लिहिल्या आहेत. जागतिकीकरणानंतर उद्ध्वस्त झालेला गावगाडा आणि वर्तमान जीवनातील दलित-मुस्लिम व शोषितांचे प्रश्न साळवे यांनी आपल्या नाटकातून मांडले आहे. त्याचबरोबर उत्तम अंभोरे (दिंडी पुढे गेली), बाबूराव कांबळे (न्याय), अंबादास कांबळे (स्वप्न पुराण), राम दोतोंडे (हा माझा देश), प्रकाश शिरसाट (स्वातंत्र्य कंच्या गाढवीचं नाव), अशोक बुरबुरे (मयती म्होरलं आंग्टं), विलासराज भद्रे (आमचाबी पंधरा आगस्ट व इतर एकांकिका, आता बुद्ध हसणार नाही, आतड्यांचा लिलाव, दवबिंदू पेटताना), राहूल जोंधळे (निळी टोपी, जयभिम निळा सलाम, बाजार, नाच्या कंपनी, आरक्षण, नाती), दिनेश कवडे (लेबल), सिद्धार्थ तायडे (मुक्तीपर्व अँड डानामाईट डॉट कॉम, अंतहीन), माधव जाधव (अभेद्य चक्रव्यूह, पराभूत मी, अनावरण) इत्यादी नाटक-एकाकिंकाकारांनी दलित रंगभूमी सशक्त केली आहे.

रावबा गजमल या तरुण लेखक-दिग्दर्शकाने अण्णा भाऊ साठे यांच्या कथा-कादंबऱ्यांची नाट्यरूपांतरे करून ती विविध स्पर्धांसाठी मराठवाड्याबरोबर महाराष्ट्रात सर्वत्र सादर केली. आपल्या रूपांतरातून रावबा गजमल यांनी अण्णा भाऊ साठे यांचा काळ रंगमंचावर जीवंत केला. बरबाद्या हे नाटक आणि मसनातलं सोनं ही एकांकिका महाराष्ट्रभर गाजली. त्यांच्या या नाट्य रूपांतरामुळे दलित रंगभूमीबरोबर एकूण मराठवाडी रंगभूमी समृद्ध झाली आहे.

एकंदरीत मराठवाड्यातील दलित रंगभूमीने मराठवाडी रंगभूमीबरोबर एकूण मराठी रंगभूमी समृद्ध केली आहे. आजवरच्या दलित रंगभूमीने स्वतःचे अस्तित्व निर्माण केले असले तरी अनेक आव्हाने या चळवळीबरोबर आहेत. या बबात अनिल सपकाळ म्हणतात, "दलित नाटक

जातिअंताच्या लढ्यातील एक महत्त्वाचे माध्यम आहे. ते दलित राजकीय चळवळीबरोबर विकास पावत गेले आहे. दलित राजकीय चळवळीला ज्याप्रमाणे गती मिळेल, त्याप्रमाणे दलित रंगभूमीचा प्रवास गतिमान झालेला दिसतो. परंतु दलित रंगभूमीने स्वतःचा प्रेक्षकवर्ग तयार करत सांस्कृतिक आंदोलनातून राजकीय आंदोलन निर्माण करणे आवश्यक आहे. 'दलित' संकल्पनेच्या अनुषंगाने कार्यकर्त्यांमध्ये अंतर्विरोध आहेत... या अंतर्द्वद्वातून नाटकाची आशय आणि रंगभाषा विकसित होत असली तरी समग्र परिवर्तनासाठी समताधिष्ठित विचार प्रस्तुत करणाऱ्या भारतीय रंगभाषेचा प्रभावी वापर करणे, लोकरंगभूमीची भाषा स्वीकारणे, नाट्यशास्त्राची पुनर्मांडणी करणे... हे या रंगभूमीसमोरील मोठे आव्हान आहे."[३९] दलित रंगभूमीसमोरील सर्व आव्हाने भविष्यातील नाटककार नक्कीच स्वीकारतील. ऋषिकेश कांबळे यांच्या भाई तुम्ही कुठे आहात! या धरतीवरील नाटकाची परंपरा विकसित झाली तर दलित रंगभूमीला पुन्हा एकदा उभारी मिळेल असे वाटते.

३.२.३ मराठवाड्यातील व्यावसायिक नाटक :

मराठवाड्याला फार मोठी नाट्य चळवळीची परंपरा आहे. मराठवाड्यात प्रत्यक्ष नाट्यलेखन सुरू होऊनही शंभर वर्षे पूर्ण झाले आहेत. नाट्यकलावंत किंवा नाटककारांची कोणतीही वानवा मराठवाड्यामध्ये नाही. नाट्य सादरिकरणाचे तंत्र आणि नाट्यलेखनाचा आशय-विषय यादृष्टीनेही मराठवाड्यातील रंगभूमी सक्षम आहे. एवढे सगळे असूनदेखील मराठवाड्यामध्ये व्यावसायिक रंगभूमी मोठ्या प्रमाणात रूजली नाही हे निर्विवाद सत्य आहे. रंगभूमीसंबंधीच्या सर्व बाजूने मराठवाडा सशक्त असतानाही पुणे, मुंबई, ठाणे, नाशिकमधील नाटककार-रंगकर्मीसारखे रंगभूमीचा व्यवसाय मराठवाडा का करू शकत नाही? हाच मोठा प्रश्न आहे. आजपर्यंत मराठवाड्यातील लक्ष्मणराव देशपांडे, अजित दळवी, प्रशांत दळवी, दत्ता भगत, किरण पोत्रेकर, राजकुमार तांगडे, रा. रं. बोराडे इत्यादी नाटककारांच्या नाटकांचे व्यावसायिक प्रयोग झाले. परंतु व्यावसायिक रंगभूमीची मूळं आणखीनही मराठवाड्यामध्ये रूजली नाहीत.

मराठवाड्यातील अनेक नाटककारांनी आपल्या नाटकांचे व्यावसायिक प्रयोग करण्यासाठी प्रचंड वेळ आणि पैसा खर्च केला, परंतु दहा-विस प्रयोगानंतर नाटकाचे प्रयोग बंद पडले. त्यामुळे नाट्यक्षेत्रामध्ये मराठवाडी रंगभूमीवर व्यावसायिक यश मिळविणे हे एक आव्हानच आहे. आजवर

ज्या नाटककारांना हे यश मिळाले आहे त्यापैकी अनेक नाटकांनी पुण्या-मुंबईच्या रंगभूमीवरच अधिक यश मिळविले आहे, हे सर्वज्ञात आहे

मराठवाड्यात व्यावसायिक रंगभूमी का रूजत नाही? याबाबत ज्येष्ठ साहित्यिक रा. रं. बोराडे म्हणतात, "मुंबईच्या नाट्यक्षेत्रात स्वतःची नाममुद्रा उमटविणाऱ्या कमलाकर सोनटक्के, चंद्रकांत कुलकर्णी, प्रशांत दळवी, अरविंद जगताप या कलावंतांनी मराठवाड्यात व्यावसायिक रंगभूमी रूजविण्याचा आपल्यापरीने प्रयत्न केला आहे. मराठवाड्यात वास्तव्य करून मराठवाड्याच्या नाट्य चळवळीला जोरात पुढे घेऊन जाणाऱ्या स्व. लक्ष्मणराव देशपांडे, स्व. कुमार देशमुख, सर्वश्री त्र्यंबक महाजन, अजित दळवी... यासारख्या अन्य नाट्यकलावंतांनीही मराठवाड्यात व्यावसायिक रंगभूमी रूजवण्याचा आपल्यापरीने प्रयत्न केला आहे. माझीही नाटकं व्यावसायिक रंगभूमीवर आली पण फारशी यशस्वी झाली नाहीत... याचाच अर्थ असा की, मराठवाड्यातल्या कलावंतांनी सादर केलेल्या नाटकालाच मराठवाड्यातील रसिक-प्रेक्षक प्रतिसाद देत नसतील तर मराठवाड्यात व्यावसायिक रंगभूमी रूजणार कशी? मराठवाड्यातल्या नाटकाच्या प्रेक्षकांबाबत माझे एक निरीक्षण आहे आणि ते हे की, मराठवाड्याबाहेर प्रेक्षकांनी मराठवाड्याच्या कलावंतांनी सादर केलेल्या नाटकाला पसंती दिली तरच मराठवाड्यातल्या प्रेक्षकांचे पाय त्या प्रयोगाकडे वळतात... मराठवाड्यात व्यावसायिक रंगभूमी रूजविण्यासाठी प्रथम मराठवाड्यातील मानसिकता बदलणे गरजेचे आहे... मराठवाड्यातल्या कलावंतांनी व्यावसायिक रंगभूमीवर आणलेले नाटक त्यांनी बघितलेच नाही तर मराठवाड्यात रंगभूमी रूजणार कशी?"[४०] सर्व बाबींची अनुकूलता असतानाही मराठवाड्यामध्ये व्यावसायिक रंगभूमी न रूजण्याला मराठवाड्यातील नाट्य रसिकांची मानसिकता जबाबदार आहे असे रा.रं. बोराडे म्हणतात.

मराठवाड्यामध्ये व्यावसायिक रंगभूमी यशस्वी झाली नाही हे खरे असले तरी वर म्हटल्याप्रमाणे लक्ष्मणराव देशपांडे, अजित दळवी, प्रशांत दळवी, रा.रं. बोराडे, किरण पोत्रेकर, राजकुमार तांगडे इत्यादी नाटककारांच्या नाटकांना व्यावसायिक रंगभीवर यश मिळाले आहे. वऱ्हाड निघालय लंडनला, डॉक्टर! तुम्ही सुद्धा..., गाधीं विरूद्ध गांधी, चारचौघी, चाहूल, सेलिब्रेशन, आमदार सौभाग्यवती, वाटा-पळवाटा, शिवाजी अंडरग्राऊंड इन भिमनगर मोहल्ला, प्रासंगिक करार, कळा या लागल्या जिवा इत्यादी नाटकांनी व्यावसायिक यश मिळविले आहे. या

सर्व नाटकांचे लेखक हे मराठवाड्यातील आहेत. आज रावबा गजमल, प्रवीण पाटेकर, गणेश मुंडे लिखित-दिग्दर्शित नाटक-एकांकिकांनाही बऱ्यापैकी व्यावसायिक यश मिळत आहे. मराठवाड्यातील व्यावसायिक रंगभूमीवरील एकूणच महत्त्वाच्या नाट्यलेखकांचा विस्तृत विचार करणे आवश्यक आहे.

३.२.३.१ लक्ष्मणराव देशपांडे :

लक्ष्मणराव देशपांडे हे व्यावसायिक रंगभूमीवर प्रचंड यश मिळविणारे मराठवाड्यातील पहिले नाटककार-रंगकर्मी आहेत. वऱ्हाड निघालय लंडनला हे त्यांचे एकपात्री नाटक एकूण मराठी रंगभूमीवरील एकपात्री नाटकात अव्वल दर्जाचे आहे. अस्सल मराठवाडी बोलीतील या नाट्यात ५२ पात्रे आणि २१ वेगवेगळे आवाज एकटे देशपांडे काढत असत. मराठवाडा विद्यापीठातील नाट्यशास्त्र विभागप्रमुख असताना देशपांडे यांनी वऱ्हाडला जागतिक रंगभूमीवर मोठे नाव मिळवून दिले. १९७९ मध्ये या नाटकाचा पहिला प्रयोग झाला. औरंगाबाद ते मुंबई आणि नंतर थेट अमेरिका, इंग्लड, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, कतार, कुवेत, सिंगापूर, थायलंड, नायजेरिया इत्यादी देशात वऱ्हाडचे प्रयोग झाले. २००४ मध्ये २००० प्रयोगांचा विक्रम करत वऱ्हाडने गिनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये स्थान मिळवले.

नाट्यसंवाद, अभिनय, लकब यांचा सुंदर मिलाफ वऱ्हाडमध्ये साधला आहे. मराठवाडी बोलीमुळे नाटकाचा गोडवा अधिकच वाढवला आहे. एकाच नाटकाचे सातत्याने पंचवीस वर्ष जगभर प्रयोग केल्यामुळे एकूण मराठवाडी रंगभूमीच्या वैभावात भर पडली. वऱ्हाड निघालय लंडनला या नाटकाबद्दल सतीश साळुंके म्हणतात, "देशपांडे पात्रे ठसठशीत न करता व्यक्तिरेखांच्या सीमारेषा पुसटपणे रंगमंचावर आणतात आणि दुसऱ्याक्षणी त्यांना लुप्त करतात... अभिनयाशी कुठलिही तडजोड करीत नाहीत. सादरिकरणासाठी ते कमालीची श्रद्धा, निष्ठा व प्रामाणिकता ठेवतात. एकपात्र प्रकारात नाट्य उभे करताना नटाला त्या-त्या पात्राच्या वयाचा, विचारांचा, भाव-भावनांचा आणि मानसशास्त्राचा एकाचवेळी विचार करावा लागतो. ही जादू प्रा. देशपांडे सहजगत्या करून दाखवतात."[४१] वऱ्हाड निघालय लंडनला मुळे लक्ष्मणराव देशपांडे यांच्याबरोबरच मराठवाडी रंगभूमीही समृद्ध झाली. या कार्यासाठी त्यांना विष्णुदास भावे पुरस्कार,

आचार्य अत्रे पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले. त्याचबरोबर परभणी येथे २००० मध्ये झालेल्या अ.भा. मराठी नाट्यसंमेलनाचे अध्यक्ष होण्याचा बहुमानही त्यांना मिळाला आहे.

३.२.३.२ अजित दळवी :

अजित दळवी हे मूळात प्रायोगिक रंगभूमीसाठी लेखन करणारे नाटककार असले तरी त्यांच्या नाटकांनी मोठ्या प्रमाणात व्यावसायिक यश मिळविले आहे. अजित दळवी यांनी अधांतर या एकांकिकेपासून नाट्यलेखनाला सुरूवात केली. १९७४ मध्ये त्यांची ही एकांकिका अस्मितादर्श या नियतकालिकात प्रकाशित झाली होती. अधांतर नंतर अजित दळवी यांच्या नाट्यलेखनाचा आलेख उंचावत गेला. मुक्तिधाम (१९७८), लढा (१९८०), आपल्या बापाचं काय जातं (१९८०), शतखंड (१९८७), देहधून (१९८९), डॉक्टर! तुम्हीसुद्धा... (१९९१), गांधी विरूद्ध गांधी (१९९५) आणि समाजस्वास्थ्य (१९९७) इत्यादी नाटके अजित दळवी यांनी लिहिली आहेत.

अजित दळवी यांचे देहधून हे पहिले व्यावसायिक नाटक असले तरी १९९१ साली रंगभूमीवर आलेले डॉक्टर! तुम्हीसुद्धा... हे त्यांचे नाटक प्रचंड गाजले. डॉक्टर! तुम्ही सुद्धा... हे "सामाजिक जाणिवांमधून वैद्यकीय व्यवसायातील गैरव्यवहार यावर बेतलेले नाटक. अशा आदरणीय व्यवसायात चालणाऱ्या अनिष्ट बाबींना उजेडात आणून एक वेगळा विषय मांडण्याचा प्रयत्न झाल्याचे दिसते."[४२] मराठी रंगभूमीच्या इतिहासामध्ये डॉक्टर किंवा वैद्यकीय व्यवसायातील भ्रष्ट बाबींकडे कोणत्याही नाटककाराने आजवर पाहिले नव्हते. त्यामुळे एकूणच या नाटकातील आशय-विषय मराठी रसिकांसाठी वेगळा होता. त्यामुळेच या नाटकाने प्रचंड यश मिळविले.

१९९० ते २००० या दशकामध्ये एकूण मराठी रंगभूमीवर सशक्त नाटके सादर झाली. त्यामध्ये डॉक्टर! तुम्हीसुद्धा... या नाटकाबद्दल या नाटकाचे दिग्दर्शक चंद्रकांत कुलकर्णी म्हणतात, "डॉक्टर! तुम्हीसुद्धा... हे नाटक कला रचनेच्या दृष्टीने खूप महत्त्वाचं वाटतं. भाषा, संवाद, प्रवेश, आशयाचा प्रवाह एकमेकांत मिसळून अत्यंत तीव्र असा नाट्यानुभव हे नाटक देतं. त्यातला एकही शब्द अवाजवी, अनाठायी वापरला गेलेला नाही. स्वच्छ आणि स्पष्ट चरित्रचित्रण, नाटकाच्या प्रवासातले संघर्षाचे नेमके टप्पे, छोट्या छोट्या पात्रांच्या सूचक संवादातून समाजाचं उभं केलेलं रेखीव ठसठसीत चित्र, 'काय' म्हणायचंय? आणि 'कसं' सांगायचंय? या दोन्ही प्रश्नांची उत्तरं आतून माहीत असल्यामुळे 'नाटक' या माध्यमातूनच हा अनुभव मांडला जाणं ही 'डॉक्टर'ची बलस्थानं

आहेत."[४३] अर्थात, शिक्षण, राजकारण याप्रमाणेच वैद्यकीय व्यवसायदेखील कसा भ्रष्टाचाराने पोखरला आहे यासंबंधीचा तीव्र नाट्यानुभव म्हणजेच डॉक्टर! तुम्हीसुद्धा... हे नाटक आहे. मराठी रंगभूमीवरील डॉक्टर! तुम्हीसुद्धा... या नाटकाच्या यशानंतर त्याची अनेक भाषेत भाषांतरे झाली. मराठीबरोबर हिंदी आणि गुजराती रंगमंचावरही या नाटकाचे अनेक प्रयोग झाले.

१९९५ मध्ये रंगभूमीवर आलेले गांधी विरूद्ध गांधी या अजित दळवी यांच्या नाटकाने केवळ मराठी किंवा भारतीय नव्हे तर आंतरराष्ट्रीय स्तरावरही यश मिळविले आहे. अत्यंत गंभीर व वैचारिक प्रवृत्ती असणाऱ्या या नाटकाला प्रेक्षकांसह नाट्य समीक्षकांनीही डोक्यावर घेतले. ज्येष्ठ रंगकर्मी त्र्यंबक महाजन आपल्या नाट्यधर्मी मराठवाडा या ग्रंथामध्ये नटी व सूत्रधारांच्या माध्यमातून गांधी विरूद्ध गांधी या नाटकाविषयी म्हणतात, "गांधी विरूद्ध गांधी हे नाटक देशातील अन्य भाषेतून राष्ट्रीय स्तरावरील प्रेक्षक रसिकांपुढे जेव्हा सादर झालं किंवा देश ओलांडून अमेरिका, केनिया, दक्षिण अफ्रिका, इंग्लड यासारख्या परदेशात प्रयोगरूपानं उभं राहिलं, त्यावेळी तिथल्या रंगकर्मींनी जे अनुभव नोंदवले ते या नाटकाच्या रंगभाषेच्या क्षमता सिद्ध करणारे ठरावेत... हिंदी, गुजराती, इंग्रजी ही रूपांतरं आणि 'महात्मा व्हर्सेस गांधी' मधील देशातील आणि परदेशातील नामवंत कलाकारांनी त्यात केलेल्या भूमिका या नाटकाचं मोठेपण सांगून जाणाऱ्या आहेत. उदाहरणार्थ... नसिरूद्दीन शहा, के. के. जयंति भाटला आणि बोमन इराणी!... हे देशातील कदाचित पहिलं आणि एकमेव नाटक असावं की ज्याचा प्रयोग राष्ट्रपती भवनात करण्यात आला."[४४] एकंदरीत देश-विदेशातील रंगभूमीवर गांधी विरूद्ध गांधी या नाटकाने यश मिळविले. त्यामुळे एकूणच मराठी रंगभूमीची मान उंचावली गेली.

महात्मा गांधी यांचे जीवन, त्यांचा सामाजिक-राजकीय-धार्मिक-आर्थिक जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन आणि एवढ्यामोठ्या महात्म्याच्या दृष्टिकोनातील त्यांच्याच मुलाने काढलेले दोष यातून निर्माण होणारा नाट्यात्म ताण या नाटकामध्ये लेखकाने मांडला आहे. महात्मा गांधी यांचा दृष्टिकोन आणि त्यांच्या मुलाचा दृष्टिकोन या वेगवेगळ्या दष्टिकोनातील जीवनविषयक विचारातून गांधी विरुद्ध गांधी हे नाटक उभे राहते. डॉक्टर! तुम्हीसुद्धा..., गांधी विरूद्ध गांधी या दोन्ही नाटकांमधून वैचारिक व गंभीर विषयांना मुखर करण्याचे काम नाटककाराने केले आहे.

याशिवाय लढा या नाटकातून कामगार विरूद्ध मालक यांच्यातील संघर्ष, शतखंड नाटकामध्ये वैचारिक खोटारडेपणा उघड करण्याचे काम नाटककार अजित दळवी करतात.

अजित दळवी यांच्या एकूण नाटकाचे विषय त्यांचा आशय हा वैचारिक व गंभीर आहे. वेगवेगळया सेवामध्ये हळूवारपणे शिरकाव करून त्या त्या क्षेत्रातील मुखवट्या आडचा मुखवटा उघडे करण्याचे काम लेखक आपल्या नाटकांमधून करतो. अजित दळवी यांच्या एकूण व्यक्तिमत्वाच्या संदर्भात चंद्रकांत कुलकर्णी म्हणतात, "पुरोगामी विचारवंत कुटुंब, चळवळीची अत्यंत भक्कम पार्श्वभूमी, राज्यशास्त्राचा प्राध्यापक असणं, नाट्यलेखनाला संशोधनाची शिस्त असणे आणि महत्त्वाचं म्हणजे स्वतः रंगकर्मी नाटककार असल्यामुळे अजित दळवीची नाटकं स्वतःची वेगळी ओळख निर्माण करतात. सामाजिक आशय आणि 'नाटक'पण यांचं बेमालूम मिश्रण त्यांच्या संहितेत असतं. वैचारिक स्पष्टता असल्यामुळे आशय कधी नाट्यमयतेत वाहून जात नाही. आणि रंगकर्मी असल्यामुळे फक्त आशय 'ठळकपणे' अधोरेखित करता करता त्यांचे नाटक अशी प्रचारकी होत नाही. तटस्थता, वस्तुनिष्ठता आणि प्रमाणभाषा ही अजित दळवींच्या नाट्यलेखनाची काही ठळक वैशिष्ट्ये जाणवतात. बिनचूक, गोळीबंद, आडाखेबाज असं लिहीत नसल्यामुळे त्यांच्या नाट्यलेखनाच्या प्रक्रियेला खूप महत्त्व असतं."[४५] अजित दळवी हे मराठवाडीच नव्हे तर एकूण मराठी रंगभूमीवरील एक प्रयोगशील व्यावसायिक नाटककार आहेत.

प्रायोगिक नाटककाराने व्यावसायिक रंगभूमीवर यश मिळविणे फार क्वचित घडते. ते यश अजित दळवी यांना मिळाले आहे. सूक्ष्म निरीक्षण, अनुभवसंपन्नता, पुरोगामी वृत्ती, नाट्यविषयाशी एकात्मता, प्रखर सामाजिक भान ही त्यांच्या नाटकाची काही प्रधान वैशिष्ट्ये आहेत. एकंदरीत, अजित दळवी हे सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, वैचारिक क्षेत्रातील अधःपतनाचे वाङ्मयीन भाष्यकार आहेत.

३.२.३.३ प्रशांत दळवी :

प्रशांत दळवी हे प्रायोगिक आणि व्यावसायिक अशा दोन्ही रंगभूमीवर यश मिळविणारे मराठवाड्यातील एक प्रयोगशील नाटककार आहेत. दगड का माती, पौगंड, मदर्स हाऊस, चारचौघी (१९९१), ध्यानिमनी (१९९३), चाहूल (१९९८), सेलिब्रेशन (२००४), गेट वेल सून, दे दणादण, स्त्री, गल्ली, भुयार इत्यादी नाटक-एकांकिका लेखन प्रशांत दळवी यांनी केले आहे. १९९० नंतरच्या

काळातील समाजमन त्यांच्या नाट्यलेखनात प्रतिबिंबित झाले आहे. जागतिकीकरणोत्तर काळात एकूण मराठी समाजाबरोबर नाटकही बदलले होते. मानसाचे झालेले वस्तुकरण, वाढत जाणारी असंवेदनशीलता, मूल्यांचा होणारा ऱ्हास, नव्वदोत्तरी मराठी नाटकातून व्यक्त झाला. दळवी यांचे नाट्यलेखन म्हणजे नव्वदोत्तर काळाचा प्रातिनिधिक हुंकार आहे.

नव्वदोत्तर काळामध्ये म्हणजेच १९९१ मध्ये प्रकाशित झालेले चारचौघी हे नाटक म्हणजे प्रशांत दळवी यांच्या एकूण नाट्य लेखनाला वळण देणारा महत्त्वाचा टप्पा होय. या नाटकाने प्रखरपणे स्त्रियांची बाजू मांडली आहे. नव्वदोत्तर नाटकाची एकूणच प्रवृत्ती आणि प्रशांत दळवी यांच्या चारचौघीचा अनुबंध जोडताना नाटकाचे अभ्यासक अनंत कान्हो म्हणतात, "विशेषतः १९९० ते १९९३ या काळात या नवीन नाटककारांनी 'सामाजिक जाणिवा' हा विषय सातत्याने हाताळलेला दिसतो. शोषित-पीडित अशा स्त्रियांच्या समस्या घेऊन लिहिलेली नाटके त्यामध्ये जास्त होती. 'चारचौघी' या धक्कादायक नाटकाने 'स्त्री' ही पराभूत होणारी नसून धैर्याने परिस्थितीला सामोरी जाऊन मात करणारी आहे याची जाणीव करून दिली."[४६] एकूण मराठी रंगभूमीवरील स्त्री प्रतिभेला या नाटकाने छेद दिला.

चारचौघी या नाटकाने एकूण मराठी रंगभूमीवरील रसिक, समीक्षक व नाटककारांचे लक्ष वेधून घेतले होते. कारण स्त्रियांबद्दल एवढ्या उदार भावनेने आणि आत्मियतेने मराठी साहित्यामध्ये क्वचितच लिहिलेले आढळते. चारचौघीमुळे स्त्रियांचीही एक बाजू असू शकते हे समाजाला कळाले. प्रसिद्ध अभिनेते श्रीराम लागू म्हणतात, "प्रशांत दळवी यांचे 'चारचौघी' हे मराठीतले एक मोठे नाटक आहे. नाटकाचा विषय अगदी चाकोरी बाहेरचा, वास्तवाच्या गाभ्याला हात घालणारा आणि म्हणूनच धक्कादायक आहे... विवाहसंस्था ही केवळ समाजधारणा करणारी सामाजिक संस्था नाही, तर दोन स्वतंत्र व्यक्तिमधला तो अत्यंत व्यक्तिगत स्वरूपाचा, नाजूक करार आहे याचे भान नाटककार विसरलेला नाही; त्यामुळे सखोल वैवाहिक समस्यांनी घेरलेल्या जिवंत, रसरशीत व्यक्तिरेखा असे मोठे मनोरम रूप नाटकाने धारण केले आहे. मला तर या नाटकाचे पहिले दोन अंक युजीन ओनिलच्या लिखाणाची आठवण करून देतात."[४७] बदलत्या व्यापक स्वरूपाचा भोवतालच दळवी यांनी चारचौघीमध्ये आविष्कृत केला आहे.

चाहूल या नाटकाद्वारे दळवी यांनी जागतिकीकरणोत्तर काळातील मानवी मनाची गुंतागुंत व बदलत्या काळाबरोबर बदलत जाणाऱ्या संवेदनांचे चित्रण केले आहे. ढासळत जाणाऱ्या नितिमूल्यांबरोबर एकूणच नव्वदोत्तर समाजाच्या अधोगतीचे, असंवेदनशीलतेचे भेदक नाट्य लेखकाने उभे केले आहे. या बाबत शांता गोखले म्हणतात, "Chahul is an adult play that forces the audience into self-questioning by the end, they are left with no alternative but to accept their responsibility in the ills that rabid consumerism breeds in our society. Chahul is a step ahead of 'charchaughi' & 'Dhyanimani'."[४८] शांता गोखले म्हणतात त्याप्रमाणे खरोखर आशयाभिव्यक्तिच्या दृष्टीने चाहूल या नाटकाने पुढचा टप्पा गाठला आहे. "एका रात्रीत श्रीमंत होण्याची स्वप्ने बघणाऱ्या तरुण पिढीला अंतर्मुख होऊन नीती-अनीतीच्या योग्य दिशा तसेच चैन आणि गरज यांच्या सीमारेक्षा तपासून बघायला लावणारे नाटक म्हणून चाहूल या नाटकाची नोंद करता येते. कलाकृती म्हणून हे नाटक लक्षणीय आहे."[४९] तर नाटककार म्हणून प्रशांत दळवी हे विलक्षण आहेत.

सेलिब्रेशन हे आजच्या काळाची स्पंदने टिपणारे महत्त्वाचे नाटक प्रशांत दळवी यांनी लिहिले आहे. संवाद हरवलेल्या आणि तुटत चाललेल्या नातेसंबंधांवर नाटककाराने या नाटकात भाष्य केले आहे. एकूणच प्रशांत दळवी हे मराठवाड्यातीलच नव्हे त मराठी रंगभूमीवरील एक यशस्वी नाटककार आहेत. मूल्यऱ्हासाचे प्रत्ययकारी चित्रण, कणखर स्त्री प्रतिमा, स्त्रीप्रधानता, समाजसन्मुखता, प्रखर सामाजिक भान ही त्यांच्या नाट्यलेखनाची ठळक वैशिष्ट्ये आहेत. नाट्यलेखनासाठी बालगंधर्व पुरस्कार, जयवंत दळवी पुरस्कार, नाट्यदर्पण पुरस्कार अशा विविध पुरस्कारांनी त्यांना सन्मानीत केले आहे. खिडक्या या कथासंग्रहासह अनेक मालिका-चित्रपटांसाठी पटकथालेखनही प्रशांत दळवी यांनी केले आहे.

३.२.३.४ राजकुमार तांगडे :

राजकुमार तांगडे हे मूलतः ग्रामीण प्रवृत्तीचे नाटककार आहेत. परंतु त्यांनी प्रायोगिक रंगभूमीसाठी लिहिलेल्या शिवाजी अंडरग्राऊंड इन भिमनगर मोहल्ला या नाटकाचे जगभर प्रयोग झाल्यामुळे ते आजच्या घडीचे मराठवाड्यातील व्यावसायिक रंगभूमीवरील महत्त्वाचे नाटककार

ठरतात. एकविसाव्या शतकाच्या दुसऱ्या दशकामध्ये शिवाजी अंडरग्राऊंड इन भिमनगर मोहल्लाचे जगभर मिळून जवळपास एक हजार प्रयोग झाले आहेत. प्रायोगिक आणि व्यावसायिक या अर्थाने हे नाटक दशकातील महत्त्वाचे मराठी नाटक ठरते. एक हजार प्रयोग होणे हे नाटकाचे फार मोठे यश नाही, परंतु कोणतेही शास्त्रीय नाट्य प्रशिक्षण नसताना जालना जिल्ह्यातील जांब समर्थ सारख्या खेड्याच्या परिसरातील कलावंतांना सोबत घेऊन जागतिक पातळीवर हजारो प्रयोग करणे हे नक्कीच मोठे यश आहे.

शिवाजी अंडरग्राऊंड इन भिमनगर मोहल्ला या नाटकाच्या यशामुळे राजकुमार तांगडे हे नाव थेट व्यावसायिक रंगभूमीवरील यशस्वी नाटककार लक्ष्मणराव देशपांडे, अजित दळवी, प्रशांत दळवी यांच्या यादीमध्ये पोहचले आहे. या नाटकाच्या व्यावसायिक यशाबद्दल एकूण नाटकाच्या स्वरूपाबद्दल रा.रं. बोराडे म्हणतात, "मराठवाड्याच्या नाट्यक्षेत्रात काहीशी मरगळ आलेली असताना एक नाटक मराठवाड्याच्या व्यावसायिक रंगभूमीवर आले आणि भल्या भल्यांना चकित व्हावे लागले. या नाटकाचं नाव आहे 'शिवाजी अंडरग्राऊंड इन भिमनगर मोहल्ला' या नाटकाने मराठी नाट्यक्षेत्रात इतिहास घडविला हे मान्यच करावे लागले. राजकुमार तांगडे हे जालना जिल्ह्याच्या एका खेड्याचे. त्यांना ना नाट्यलेखनाचा वारसा आहे, ना अभिनयाचा. कोणत्याही विद्यापीठाची नाट्यशास्त्र विभागाची पदवी त्यांच्याकडे नाही... हे नाटक सादर करणारी 'रंगमळा'ही नाट्यसंस्था ग्रामीण भागातील आहे... या नाटकात भूमिका साकारणाऱ्या एकाही मुलाने नाटकाचे प्रशिक्षण घेतलेले नाही. तरीही आपल्या भूमिका ते इतक्या बेमालूमपणे साकारतात की, भल्या-भल्या रंगकर्मींनीही चकित व्हावे."[५०] नाटककार, नाट्यसंस्था, कलावंत हे सगळे ग्रामीण असताना या नाटकाने मिळविलेले व्यावसायिक यश मराठवाडी रंगभूमीला श्रीमंत करणारे आहे.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावर मराठी रंगभूमीवर आजवर अनेक नाटके आली. परंतु अशयाभिव्यक्तीच्या दृष्टीने शिवाजी अंडरग्राऊंड इन भिमनगर मोहल्ला हे नाटक वेगळे ठरते. आजपर्यंत तलवारीपूरते शिवाजी महाराज उभे करण्याचा प्रयत्न अधिकाधिक झालेला आहे. तांगडे यांनी भिमनगर मोहल्ल्यामध्ये अंडरग्राऊंड झालेले छत्रपती शिवराय मांडण्याचा प्रयत्न केला आहे. त्याचबरोबर केवळ स्वार्थसिद्धीसाठी शिवाजी महाराजांच्या नावाचा वापर करणाऱ्यांच्या डोक्यात झणझणित अंजन घातले आहे. उपहासगर्भ शैली, पुरोगामी वृत्ती, अशयाभिव्यक्तीचे अद्वैत,

प्रयोगशीलता, तीक्ष्ण व तीरकस संवाद, अस्सल ग्रामीण बोलीचा वापर ही या नाटकाची महत्त्वाची वैशिष्ट्ये आहेत. शिवाजी अंडरग्राऊंड इन भिमनगर मोहल्ला या एकाच नाटकामुळे राजकुमार तांगडे हे एकाच वेळी प्रायोगिक, व्यावसायिक व ग्रामीण रंगभूमीवरील महत्त्वाचे नाटककार ठरले आहेत.

लक्ष्मणराव देशपांडे, अजित दळवी, प्रशांत दळवी, राजकुमार तांगडे यांच्याबरोबर कुमार देशमुख, दत्ता भगत, प्रकाश त्रिभुवन, किरण पोत्रेकर, रा. रं. बोराडे, धनंजय सरदेशपांडे, अरविंद जगताप, संदीप पाठक, रावबा गजमल, प्रविण पाटेकर इत्यादी नाटककारांनी व्यावसायिक रंगभूमीवर यश मिळविले आहे. वरील जवळपास सर्वच नाटककारांनी प्रायोगिक रंगभूमीसाठी नाट्यलेखन केले आहे. नाटकातील आशय-विषय प्रेक्षकांना आवडल्यामुळे या नाटककारांच्या नाटकांचे व्यावसायिक प्रयोग झाले.

रा. रं. बोराडे यांचे आमदार सौभाग्यवती, दत्ता भगत यांचे वाटा-पळवाटा, प्रकाश त्रिभुवन यांचे थांबा! रामराज्य येतंय!, अरविंद जगताप यांचे स्टॅच्यू ऑफ लिबर्टी या नाटकांनी व्यावसायिक रंगभूमीवर यश मिळविले. मूळचे मराठवाड्यातील परंतु वास्तव्यास मराठवाड्याबाहेर असलेले श्रीपाद बेंडे व किरण पोत्रेकर यांचेही व्यावसायिक यश मोठे आहे. स्वातंत्र्यपूर्व कालखंडामध्ये बेंडे यांच्या बेबी या नाटकाचे शंभरपेक्षा अधिक प्रयोग पुणे-मुंबईच्या रंगभूमीवर झाले आहे. त्याचबरोबर किरण पोत्रेकर यांच्या प्रासंगिक करार, कळा या लागल्या जिवा, माधवी मकरंद मंडलिक आणि आपण सारे या नाटकांनिही व्यावसायिक यश संपादन केले आहे. एकूणच मराठवाडी रंगभूमीवरील नाटके आणि व्यावसायिक रंगभूमीवरील नाटके पाहिल्यानंतर मराठवाडी रंगभूमीने व्यावसायिक स्तरावर फारच अल्पशे यश मिळविले आहे, हा निष्कर्ष निघतो. त्यातही ज्या नाटकांना यश मिळाले आहे त्या नाटकांचे अधिकाधिक प्रयोग पुणे-मुंबईच्या रंगभूमीवर झाले आहेत. दहा-पंधरा वर्षाच्या अंतराने एखाद-दुसरे नाटक मराठवाड्यातील व्यावसायिक रंगभूमीवर यश मिळविते. सबब, मराठवाड्याचे व्यावसायिक रंगभूमी रूजली आहे असे आज ठामपणे म्हणता येत नाही.

३.२.४ मराठवाड्यातील ग्रामीण नाटक :

मराठी साहित्यामध्ये ग्रामीण कथा, ग्रामीण कविता, ग्रामीण कादंबरी या वाङ्मयप्रकारांचा जो विकास झाला तसा विकास नाटक या वाङ्मयप्रकाराचा झाला नाही. परिणामी ग्रामीण नाटक किंवा

ग्रामीण रंगभूमी ही संज्ञा रूळलेली दिसत नाही. एकूण मराठी रंगभूमीप्रमाणेच मराठवाड्यामध्येही ग्रामीण नाटकाचा विकास झाला नाही. हौस म्हणून ग्रामीण भागामध्ये नाटकांचे सादरिकरण होत असले तरी त्यामुळे नाटक या वाङ्‌मयप्रकारामध्ये मौलिक भर पडली असे दिसत नाही. यामागे नाटक हा खर्चिक वाङ्‌मयप्रकार आहे, सादरिकरणासाठी साधणे नसतात, ग्रामीण लेखकांची मूळ प्रवृत्ती ही कथात्म लेखनाची आहे, शहरी लोकांना ग्रामीणांचे रडगाणे ऐकण्यात स्वारस्य नाही अशी वेगवेगळी कारणे सांगितली जातात. कारण काहीही असो काही अपवाद वगळता व्यावसायिक, प्रायोगिक, दलित रंगभूमीच्या तुलनेत मराठी आणि मराठवाडी रंगभूमीवर ग्रामीण रंगभूमी रूजली नाही हे मान्य करावे लागते.

मराठवाड्यामध्ये ग्रामीण स्वरूपाचे नाट्यलेखन करणाऱ्या नाटककारांमध्ये रा.रं. बोराडे हे महत्त्वाचे नाटककार आहेत. बोराडे यांनी आपल्या नाटक व वगनाट्यातून ग्रामीण जीवनाचे चित्रण समर्थपणे केले आहे. त्यांच्या आमदार सौभाग्यवती या कादंबरीचे श्रीनिवास जोशी यांनी त्याच नावाने नाट्यरूपांतर करून यशस्वी व्यावसायिक प्रयोग केले आहेत. राजकीय आशय-विषयावरील आमदार सौभाग्यवती हे मराठीतील एक महत्त्वाचे नाटक आहे. बोराडे यांनी विहिर व पाचोळा या नाटकामधून सामाजिक प्रश्न मांडले आहेत तर पिकलं पान हिरवं रान यामध्ये विनोदी पद्धतीने ग्रामीण जनजीवन येते. रिंगण, भोवरा, बंधमुक्त ही बोराडे यांची गंभीर नाटके आहेत. याशिवाय हसले ग बाई फसले, कशात काय अन फाटक्यात पाय, आम्ही लेकी कष्टकऱ्यांच्या, चोरीचा मामला, बिनपाण्याचा गाव, पाणी! पाणी! पाणी! इत्यादी वगनाट्ये एकांकिकांचे लेखन रा. रं. बोराडे यांनी केले आहे.

ना. धों. महानोर, कुमार देशमुख, जगदीश कदम, बब्रूवान रूद्रकंठावार या नाटककारांच्या नाटकांमध्येही ग्रामजीवनाचे सशक्तपणे चित्रण आलेले आहे. गावगारूड या नाटकामध्ये महानोर यांनी लोकगीतांच्या साहाय्याने खेड्याच्या दूर्दशेवर भाष्य केले आहे. आडगावचे चौधरी हे नाटक म्हणजे कुमार देशमुख यांनी बी. रघुनाथ यांच्या आडगावचे चौधरी या कादंबरीचे केलेले नाट्यरूपांतर आहे. निजामी राजवटीतील आडगावच्या चौधरींची अनीती, अत्याचार व एकूणच सरंजामी वृत्तीचे चित्रण या नाटकात येते. चौथ्या इस्टेटच्या बैलाला या बब्रूवान रूद्रकंठावार यांच्या नाटकामध्ये ग्रामसदृश्य वातावरण, संवाद व पात्रे आणि भाषेचा प्रयोग आढळतो. तर वडगाव

लाइव्ह, बुडत्याचे पाय खोलात या नाटकामध्ये जगदीश कदम यांनी ग्रामीण जीवनाचा गांभीर्याने वेध घेतला आहे. त्याचबरोबर अनिलकुमार साळवे यांनी ग्लोबल आडगाव या नाटकामध्ये ग्लोबल व्हिलेजमधील शेतकऱ्यांचे दारूण दु:ख अभिव्यक्त केले आहे.

राजकुमार तांगडे हे ग्रामीण जीवनाचे सशक्त वाङ्मयीन भाष्यकार आहेत. नाटकाच्या माध्यमातून पोटतिडकीने शेतकऱ्यांचे प्रश्न मांडणारे राजकुमार तांगडे हे मराठीतील पहिले नाटककार असावेत. ते स्वतः शेतकरी-कष्टकरी असल्यामुळे शेतकऱ्यांचे जीवन जगल्यामुळे त्यांच्या नाटकामध्ये शेतकऱ्यांचे खरेखुरे जीवन अभिव्यक्त होते. तांगडे यांनी स्वानुभवाचे नाट्यचित्रण केल्यामुळे त्यांच्या नाटकामध्ये कुठेही कृत्रिमता जाणवत नाही. काय दिलं स्वातंत्र्यानं?, स्वर्गारोहन, बहीण माझी प्रीतीची, तिसरं पाऊल, आकड आणि इतर एकांकिका, श्वेत अंगार, आणि शिवाजी अंडरग्राऊंड इन भिमनगर मोहल्ला इत्यादी नाटके-एकांकिका तांगडे यांनी लिहिली आहेत.

गावगाडा आणि गावगाड्यातील शेतकरी-शेतमजूर, गुरं-ढोरं, शेत-शिवार, राजकारण-समाजकारण, गावगाड्यातील बेरकी व साधीभोळी माणसे अस्सल ग्रामीण भाषेत तांगडे यांच्या नाटकांमध्ये येतात. "राजकुमार तांगडे यांच्या लिखाणात लोकसाहित्याचा रसरशीतपणा आहे. ग्रामीण भागातल्या समस्यांची नेमकी जाण त्यांना असल्यामुळे या प्रश्नांचे दर्शन अतिशय साध्या शब्दांतून उत्कटपणे होते... राजकुमार तांगडे यांच्या रूपाने एक मोठी उर्जा ग्रामीण रंगभूमीला मिळाली आहे."[५१] एकंदरीत, ग्रामीण समस्यांचे प्रभावी चित्रण राजकुमार तांगडे यांच्या नाटकामध्ये येते. अनुभवाचा सच्चेपणा, चिंतनशीलता, उपहासगर्भ शैली, अस्सल ग्रामीण भाषेतील संवाद, गंभीर वृत्ती ही राजकुमार तांगडे यांच्या नाट्यलेखनाची वैशिष्ट्ये आहेत.

३.२.५ मराठवाड्यातील स्त्रियांचे नाटक :

एकूण मराठी रंगभूमीप्रमाणेच मराठवाडी रंगभूमीवरही स्त्रियांचे नाट्यलेखन अत्यल्प आहे. १९८० पर्यंत मराठवाड्यामध्ये प्रभावी स्त्री नाटककार आढळत नाही. १९२० ते २०२० पर्यंतही स्त्री नाककारांचे प्रमाण नगन्य आहे. मराठवाड्यामध्ये ज्या स्त्री नाटककारांनी नाट्यलेखन केले आहे त्यामध्ये अनुराधा वैद्य, रेखा बैजल, लीला शिंदे, जयश्री गोडसे, सुनंदा गोरे यांचे नाट्यलेखन महत्त्वाचे आहे. प्रामुख्याने स्त्री प्रश्नांची मांडणी या नाटाकांमधून झालेली आहे.

अनुराधा वैद्य यांनी १९७१ मध्ये पारिजात या नाट्यसंख्येची स्थापना करून देशभरातील महत्वाच्या नाटकांचा अनुवाद केले. अनुराधा वैद्य यांच्या पारिजात या नाट्यसंस्थेने एवम इंद्रजित, जुलूस, आधे अधूरे, आषाढ का एक दिन ही महत्त्वाची नाटके मराठवाडी रंगभूमीवर सादर केली. काळी माया हे अनुराधा वैद्य यांचे स्वतंत्र नाटक असून स्त्री मनाची गुंतागुंत या नाटकात त्यांनी चित्रित केली आहे.

आकाश ओढ आणि भिंत काचेची या दोन नाटकांबरोबर आदिम आणि माम्मी रोबो या एकांकिका रेखा बैजल यांनी लिहिल्या आहेत. विज्ञानवादी दृष्टिकोन हा रेखा बैजल यांच्या नाट्यलेखनाचा स्थायीभाव आहे. याशिवाय लिला शिंदे (सती मणिबा), सुनंदा गोरे (नवी प्रतिज्ञा, मंतरलेले लिंबू), जयश्री गोडसे (न परतीच्या वाटेवर, यशाची गुरूकिल्ली, वृक्षवल्ली आम्हा सोयरी, विक्रमपूरचा राजा, चल रे भोपळ्या टुणुक टुणुक), शोभना व्यास (सासू करते कन्यादान, कल्पिले जीवन ऐसे, यमाची बलामत सावित्रीची करामत), कांचन संगीत (मी अशी मी तशी), वंदना देशमुख (कोंडमारा, नाण्याची तिसरी बाजू) इत्यादी स्त्रियांनी मराठवाडी रंगभूमीवर नाट्यलेखन केले आहे.

३.२.६ मराठवाड्यातील बालनाट्य :

ग्रामीण नाटक, स्त्रियांचे नाटक या तुलनेत मराठवाड्यामध्ये बालनाट्यलेखन मोठ्या प्रमाणात झाले आहे. नवीन नाट्यलेखकांबरोबर प्रस्थापित नाटककारांनीही बालनाट्यलेखनाला महत्त्व दिले आहे. दत्ता भगत (गोष्ट गोध्राजाची), प्रकाश त्रिभुवन (धन नको मज वन हवे, आडीच फुटाचा राक्षस, पांगुळगाडा), कुमार देशमुख (सोनेरी डोक्याचा मासा, आघात, विदुषकाची करामत), सर्यकांत सराफ (मिशी हरवली आहे, पळापळा, स्कायलॅब पडतंय, बोलीचीच कढी, आम्ही सारे चोर आहोत), धनंजय सरदेशपांडे (गणपती बप्पा हाजिर हो, हॅलो रोबो, भूताचा बाप, झिपऱ्या वेताळ, गांधी व्हायचंय आम्हाला, बुद्धाची गोष्ट, मदर्स डे), सय्यद अल्लाउद्दीन (झिंदाबाद-मुर्दाबाद), सतीश साळुंके (ब्लॅक कॉमेडी, श्यामला हवाय कृष्ण, अनूची आई, रमाची गोष्ट), शरद देऊळगावकर (गवळणी निघाल्या मुंबैला, रूपाली जाते वनी), नाथा चितळे (एक अंकूर जपाचंय मला, मलाबी शिकायचंय शाळेत जायचंय, प्रिय बाईंना, कोवळी उन्हे), गिरीधर पांडे (येगं येगं सरी), महावीर जोंधळे (आसवं गाळणारी कासवं), जयश्री गोडसे (चल रे भोपळ्या

टुणुक टुणुक, भुत बंगला), अक्षय पेडगावकर (लिंबू म्हणे टिंबू, सूर्याला आले पडसे), मधुकर उमरीकर (श्यामची आई), कमलाकर देशमुख (जादूची कांडी) इत्यादी नाटककारांनी बालनाट्यांच्या क्षेत्रात उल्लेखनीय योगदान दिले आहे.

पशु-पक्षी-प्राणी, जादुगर, चमत्कार, राजा-राणी अशा बालमनाला आकर्षित करून घेणाऱ्या बावी बालनाटककारांच्या नाट्यलेखनामध्ये अभिव्यक्त होतात. अभ्यासापेक्षा मौजमजा मुलांना आवडते त्यामुळे मौजमजेतून मुलांना ज्ञान कसे देता येईल यावर बाल नाटककारांचा भर दिसतो. वरील नाटककारांशिवाय सुनंदा गोरे (नवी प्रतिज्ञा, मंतरलेले लिंबू), प्रशांत दळवी (दे दणादण), संजय टिकारिया (भूताचा पंजा), दासू वैद्य (पक्ष्यांना हवे घरटे, वाड वाड पुस्तकराव), नितीन देशपांडे (शेतकऱ्याला मिळाला न्याय), इंदूमती जोंधळे (फुलझडी), आसेफ अन्सारी (कस्तुरी, उस्मानची आई, विल यू प्ले, छत्रपती शिवाजी कोणाचे?) इत्यादी नाटककारांनी बालनाट्याचे दालन समृद्ध केले आहे.

३.२.७ मराठवाड्यातील प्रायोगिक नाटक :

मराठवाडा रंगभूमीवर लिहिले गेलेले जवळपास प्रत्येक नाटक हे प्रायोगिकच आहे. कारण मराठवाड्यामध्ये व्यावसायिक रंगभूमी ही रुजलेलीच नाही. हौस म्हणून नाटक सादर करणे हा मराठवाडी रंगभूमीचा स्थायीभाव आहे. त्याबरोबर प्रबोधन करणे, भावनांचा आविष्कार, समस्यांची मांडणी अशी वेगवेगळी प्रयोजने मराठवाड्यातील नाट्यलेखनामागे आहेत. पण केवळ आणि केवळ व्यवसाय करण्याकरिताच नाट्यलेखन मराठवाड्यामध्ये क्वचितच आढळले. मराठवाड्यातील अजित दळवी, प्रशांत दळवी, दत्ता भगत, राजकुमार तांगडे या नाटककारांच्या नाटकांना व्यावसायिक यश मिळाले परंतु या नाटककारांनी मूळात प्रायोगिक रंगभूमीसाठी लेखन केले होते, हे नाकारता येत नाही.

मराठवाड्यामध्ये प्रायोगिक रंगभूमीसाठी लेखन करणाऱ्या नाटककारांची संख्या लक्षणीय आहे. या नाटककारांमध्ये कुमार देशमुख (घेतले तुका झाले माका, इस्किलार, सावली, आघात, स्मारक, आडगावचे चौधरी), प्रभाकर बागले (चेहरे आणि मुखवटे), गजमल माळी (मल्पद्रूमची डहाळी), शशिकांत बऱ्हाणपूरकर (स्वमानव, व्यसनमुक्ती), विश्वास साळुंके (पैशाला अनेक वाटा, सगळं धाब्यावर बसवलं), भारत सासणे (नैनं दहति पावक, दुच्छिन्ह, आतंक, मरणरंग),

लक्ष्मीकांत देशमुख (अखेरची रात, दीपाशिखा), चंद्रकांत पाटील (रसगंधर्व), फ. मुं. शिंदे (बुद्ध एकांकिका), सुधीर गव्हाणे (धर्मांतर), दासू वैद्य (वेटिंग फॉर विठोबा, रिअल इस्टेट, आपण प्रयोग करून पाहू या, काळेकभिन्न, देता आधार की करू अंधार, आम्हाला बांधायचंय मंदीर), मुरलीधर गोल्हार (प्रश्नांकित, उद्ध्वस्त), मुस्तजिब खान (पैलतीर, जो हुआ सो हुआ, स्पीचलेस, बेबी शॉप, ६२७१९९), हनुमानदास वर्मा (उद्ध्वस्त, अभिषाप, बाहुली), यशपाल भिंगे (बोंबलनामा), उमाकांत उबाळे (घेरलं बाटलीनं, कलंक), वसंत कुंभोजकर (असाही एक औरंगजेब), गंगाधर गीते (भ्रष्ट केली लोकशाही), वासुदेव मुलाटे (हार्ट क्रॅकर), बापू घोक्षे (जागर, प्रेमपंच्छी, यातना उत्सव), एकनाथ आबूज (वेड्यांचा बाजार, झगडा, एक गाव एक मसणवटा), रंगनाथ तिवारी (काया परकाया, शुन नलिनी) इत्यादी नाटककारांचे नाट्य, एकांकिका व दीर्घांकलेखन मराठवाडी रंगभूमी समृद्ध करणारे आहे. मराठवाड्यातील प्रायोगिक रंगभूमीच्या वृद्धीसाठी या सर्वच नाटककारांचे लेखन महत्त्वाचे आहे.

१९८० च्या नंतर मराठवाड्यामध्ये नाट्यलेखनास गती मिळाली आहे. शैक्षणिक रंगभूमीच्या उदयानंतर महाविद्यालयाच्या मंचावर प्राध्यापक व विद्यार्थ्यांच्या सहयोगातून नाट्यलेखन व सादरिकरण झालेले आहे. वरील नाटककारांशिवाय श्रीराम गोजमगुंडे (पुन्हा पुन्हा मोहोंजोदडो, निष्पर्ण वृक्षावर भर दुपारी), शंकर परचूरे (अर्गळ), देवदत्ता म्हात्रे (झुंज, अंधारयात्रा, मी गारूडी), कमलाकर देशमुख (भग्नमूर्ती), विभाकर मिरजकर (गेंडा, आपण सारे घोडेगावकर, हे राम), श्रीकांत सराफ (गब्बर का अड्डा, लाईव्ह शो), रविशंकर झिंगरे (चक्रव्यूह, उद्रेक, एका तळ्यात होती, हिम्मत, खंडहर, भयरात्र), शैलेश गोजमगुंडे (मुक्ती, उंच माझा झोका गं), अमृत महाजन (स्वप्नभूमी डॉट कॉम), किशोर सिरसाट (परंतु, फाईव्ह गार्डन), दिलिप महालिंगे (कोणाही जीवाचा न घडो मत्सर), सुधीर निकम (कोयता, उचल, वायदा, धुम्मस), अशोक बंडगर (तंट्या भिल, धर्म एक अफुची गोळी, ओसामा, अस्वत्थामा, स्वार्थ पारायण), रावबा गजमल (मसनातलं सोनं, भक्षक, भोंगे, माणसं), प्रवीण पाटेकर (अखंड, मॅट्रिक, पाझर) या नाटककारांनीही मराठवाडी रंगभूमीसाठी योगदान दिले आहे.

मराठवाड्यातील अनुवादीत नाटकांमध्ये त्र्यंबक महाजन (कॅक्टसची सावली, प्रकाशाच्या प्रदेशात, म्यूलॅटो, लहरीचे राजहंस, गर्दभविवाह, रास्ते चोर रास्ते), प्रकाश त्रिभुवन (रूको रूको,

रामराज्य आ रहा है, गणनायिका अम्बपाली), शशिकांत बऱ्हाणपूरकर (भोर हुई पर सूरज कहाँ?) यांचे महत्त्वाचे योगदान आहे.

मराठवाड्यातील लिखित संगीत नाटककारांमध्ये भगवंत तोडेवाले (संगीत चुडाला), दिवाकर कृष्ण केळकर (संगीत तोड ही माळ अर्थात गंगालहरी) यांचे नाट्यलेखन महत्त्वाचे आहे. औरंगाबादमध्ये कामगारांसाठी स्वतंत्र नाट्यस्पर्धांच्या आयोजनामुळे अण्णासाहेब गुंजकर, नाथराव नेरळकर असे कलावंत पुढे आले. भुजंग मेश्राम यांच्या औतान, मातामाय, सवारी, सोंग या चार एकांकिकांमधून आदिवासी जीवनातील समस्यांचे चित्रण झाले आहे. एकूणच मराठवाडी रंगभूमीवरील काही प्रवाहांमध्ये मोठ्याप्रमानात नाट्यलेखन झाले नसले तरी या प्रवाहातील नाट्यलेखनामुळे मराठवाडी रंगभूमीच्या कक्षा विस्तारल्या गेल्या हे सत्य आहे.

मराठवाड्यातील एकूण शंभर वर्षातील नाट्यलेखनाचे स्वरूप हे विविधांगी आहे. शैक्षणिक चळवळीचे नाटक, व्यावसायिक नाटक, दलित नाटक, प्रायोगिक नाटक, ग्रामीण नाटक, बालनाट्य, स्त्रीलिखित नाटक अशा विविध प्रवाहांमधून मराठवाड्यामध्ये नाट्यलेखन झाले असले तरी, मराठवाडी नाटकाची मूळ प्रवृत्ती ही गंभीर आहे. मराठवाड्यातील एकूण नाट्यलेखनाबद्दल प्रल्हाद लुलेकर म्हणतात, "मराठवाड्यातील नाटकांचे एक विशेष नोंदवावे लागते. ते हे की, हे नाटक कौटुंबिक-पारंपरिक नाटकाच्या चळवळीत अडकून पडले नाही. त्यामुळे नव्या युगातील सामाजिक भान घेऊन ही नाटके लिहिली गेली. परिणामी मराठवाड्याची नाटके अधिक वास्तवसन्मुख झाली. मानवी जीवनातील ताणतणाव, सातत्याने होत गेलेला मूल्यऱ्हास, स्त्री-पुरूष संबंधातील वर्तमान स्थिती, माणसाच्या अनेकविध वृत्ती-प्रवृत्ती, राजकीय-सामाजिक-सांस्कृतिक सत्तेची रूपे-स्वरूपे, नीती-अनीतीचे सांस्कृतिक संबंध, माणसाच्या वर्तनातून निर्मण होणारी, जीवनातील गुंतागुंत, परिवर्तनाशी असलेल्या अनुबंध, मानवी मूल्यांशी आणि संस्कृतीशी निगडीत असणारी अनुभूती हे या नाटकांतून आविष्कृत केले आहे. मराठी नाटक आणि मराठी रंगभूमी अधिक आशयसंपन्न करण्यात मराठवाड्यातील नाटकांनी आपले योगदान दिले आहे. नाटक ही आनंद देणारी बाब असण्यापेक्षा अस्वस्थ बैचेन करणारी आणि आपल्या भोवतीच्या संपूर्ण वास्तवाचे भान देणारी, चिंतनाला भाग पाडणारी असते हे सूत्र नव्या नाटकांनी गंभीरपणे अभिव्यक्त केले."[५२] वैविध्यपूर्ण जाणिवांचा आविष्कार मराठवाड्यातील नाटकातून होतो.

समारोप :

एकंदरीत, मराठवाडी रंगभूमीवरील नाट्यलेखनाचे स्वरूप हे वैविध्यपूर्ण असून मराठवाड्यातील नाट्यलेखनामुळे मराठी रंगभूमी अधिक समृद्ध झाली आहे. प्रायोगिक नाटकाची समृद्ध परंपरा मराठवाड्यामध्ये असली तरी व्यावसायिक आणि ग्रामीण नाटकांची वानवा आहे. व्यावसायिक आणि ग्रामीण रंगभूमी वाढविण्याचे मोठे आव्हान भविष्यातील नाटककार-रंगकर्मींसमोर आहे. स्त्रियांच्या नाट्यलेखनात वाढ होण्याबरोबर दलित रंगभूमी, बालरंगभूमीची वाढ होणे रंगभूमीच्या समतोल विकासासाठी महत्त्वाचे आहे.

संदर्भसूची

१. महाजन त्र्यंबक, नाट्यधर्मी मराठवाडा, प्रतिमा प्रकाशन, पुणे, प. आ. फेब्रू. २००५, पृ. १८.

२. कुरुंदकर नरहर, अर्पणपत्रिका, रंगशाळा, देशमुख आणि कंपनी, पुणे, दु. आ. २००७.

३. देशपांडे द. ग., नाट्यवेडा मराठवाडा, मल्हार प्रकाशन, जालना, प. आ. मार्च १९९२, पृ. २४.

४. धांडे चंद्रकांत, नाट्यमंथन, कीर्ती प्रकाशन, औरंगाबाद, प. आ. ऑगस्ट २००३. पृ. १६०.

५. साळुंके सतीश, मराठवाड्याची नाट्यपरंपरा, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, प. आ. नोव्हें. २०२१, पृ. ५१०.

६. लुलेकर प्रल्हाद, मराठवाड्यातील मराठी वाङ्मयाचा इतिहास, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद, प. आ. एप्रिल २०२१, पृ. २५३-२५४.

७. तत्रैव, पृ. २५७.

८. साळुंके सतीश, उनि., पृ. ५०६.

९. धांडे चंद्रकांत, उनि., पृ. १६१-१६२.

१०. महाजन त्र्यंबक, उनि., पृ. २०.

११. सारोळकर द. ग., उद्‌धृत, बेबी, संपा. शर्मिला भगत-शेंडे, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, प. आ. २००६, पृ. ०२.

१२. भगत-शेंडे शर्मिला, प्रस्तावना, बेबी, संपा. शर्मिला भगत-शेंडे, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, पृ. २५.

१३. महाजन त्र्यंबक, उनि., पृ. ४०.

१४. साळुंके सतीश, उनि., पृ. ५१६.

१५. दळवी अजित, चौकटीत न बसणारा रंगकर्मी, दादामुनी, संपा. सर्वेषा महाजन, ओम अभिनव बहुउद्देशीय संस्था, औरंगाबाद, प. आ. २०११, पृ. ७१.

१६. बागले प्रभाकर, मलपृष्ठ, झुलते मनोरे, त्र्यंबक महाजन, शांभवी प्रकाशन, औरंगाबाद, दु. आ. २००२.

१७. महाजन त्र्यंबक, मराठवाडा रंगभूमी : स्वरूप आणि स्व-रूप, मराठवाडा : सृजन आणि साहित्य, संपा. मिलिंद कांबळे, इसाप प्रकाशन, नांदेड, प.आ. मार्च २०११, पृ. २२८-२९.

१८. साठे मकरंद, मराठी रंगभूमीच्या तीस रात्री-खंड तिसरा, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प. आ. २०११, पृ. ३३६-३३७.

१९. ठाकूर भगवान, आंबेडकरी साहित्य : स्थिती आणि स्थित्यंतरे, आकांक्षा प्रकाशन, नागपूर, प. आ. एप्रिल २००९, पृ. १३६.

२०. जवळगेकर शिवाजी, दत्ता भगत यांचे नाट्यलेखन, मैत्री प्रकाशन, लातूर, प. आ. डिसें. २०११, पृ. ९.

२१. तत्रैव, पृ. ७.

२२. साठे मकरंद, मराठी रंगभूमीच्या तीस रात्री- खंड पहिला, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प. आ. २०११, पृ. ५०९.

२३. कांबळे सर्जेराव, आंबेडकरी चळवळीचे ऊर्जास्त्रोत-जलसे, दक्षिण महाराष्ट्र साहित्य पत्रिका, संपा. चंद्रकुमार नलगे, जुऑस २०१२, पृ. २०.

२४. जाधव रा. ग., निळी पहाट, विजय प्रकाशन, नागपूर, दु. आ. सप्टेंबर २०१५, पृ. ४६-४७.

२५. वानखडे म. ना., दलितांचे विद्रोही वाङ्मय, संपा. वामन निंबाळकर/यशवंत मनोहर, प्रबोधन प्रकाशन, नागपूर, दु. आ. ऑक्टो. २०१३, पृ. ११०.

२६. घोक्षे बापू, यातना उत्सव, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, प. आ. जुलै २०१२, पृ. २५.

२७. सपकाळ अनिल, दलित नाटक आणि रंगभूमी, अतिरिक्त, मे. २०१२, संपा. दा. गो. काळे/दिनकर मनवर, पृ. ४६-४७.

२८. साठे मकरंद, मराठी रंगभूमीच्या तीस रात्री-खंड तिसरा, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प. आ. २०११, पृ. १३२१.

२९. साळुंके सतीश, मराठवाड्याची नाट्यपरंपरा, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद, नोव्हें. २०२१, पृ. ६०९.

३०. भगत दत्ता, वाटा-पळवाटा विषयी थोडेसे, वाटा-पळवाटा, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, पाचवी आवृत्ती २००५.

३१. देशपांडे गो. पु., नाटकी निबंध-रहिमतपुरकरांची निबंधमाला-१, लोकवाङ्मय गृह, मुंबई, दु. आ. १९९९, पृ. २५.

३२. साठे मकरंद, मराठी रंगभूमीच्या तीस रात्री-खंड तिसरा, उनि., पृ. १३७८.

३३. भगत दत्ता, अश्मकचे जातक, अश्मक, अभय प्रकाशन, नांदेड, ऑक्टो. २०००, प्रस्तावना.

३४. साळुंके सतीश, उनि., पृ. ६२४.

३५. लुलेकर प्रल्हाद, मराठवाड्यातील मराठी वाङ्मयाचा इतिहास, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद, प. आ. एप्रिल २०२१, पृ. ३१६.

३६. साळुंके सतीश, मराठवाड्याची नाट्यपरंपरा, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद, प. आ. नोव्हें. २०२१, पृ. ६१४-६१५.

३७. घारे दिलीप, मलपृष्ठ, भाई तुम्ही कुठे आहात!, ऋषिकेश कांबळे, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, प. आ. मार्च २०१६.

३८. कांबळे ऋषिकेश, भाई तुम्ही कुठे आहात!, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, प. आ. मार्च २०१६, पृ. १७.

३९. सपकाळ अनिल, भारतीय दलित रंगभूमी, भारतीय दलित साहित्य, संपा. शरणकुमार लिंबाळे, साहित्य अकादेमी, नवी दिल्ली, प. आ. २०१३, पृ. १७०.

४०. बोराडे रा.रं., मराठवाड्यात व्यावसायिक रंगभूमी का रूजत नाही?, आशय, ऑक्टो. ते डिसें. २०१६, संपा. संजिवनी तडेगावकर, पृ. ४६-४८.

४१. साळुंके सतीश, मराठवाड्याची नाट्यपरंपरा, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद, प. आ. नोव्हें. २०२१, पृ. ८७६.

४२. कान्हो अनंत, मराठी नाटक १९७५-१९९५, प्रदक्षिणा खंड दुसरा, संपा. अनिरूद्ध कुलकर्णी, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, प. आ. १९९१, पु. मु. २००८, पृ. ९७.

४३. कुलकर्णी चंद्रकांत, दिग्दर्शकीय नोंद, डॉक्टर! तुम्ही सुद्धा, अजित दळवी, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, ति. आ. २००४, पृ. ८.

४४. महाजन त्र्यंबक, नाट्यधर्मी मराठवाडा, प्रतिमा प्रकाशन, पुणे, प. आ. फेब्रु. २००५, पृ. १६१-१६२.

४५. कुलकर्णी चंद्रकांत, उनि., पृ. ८.

४६. कान्हो अनंत, मराठी नाटक १९७५ ते १९९५, प्रदक्षिणा खंड दुसरा, संपा. अनंत कुलकर्णी, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, प. आ. १९९१, पु. मु. २००८, पृ. ९६.

४७. लागू श्रीराम, मलपृष्ठ, चारचौघी, प्रशांत दळवी, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प. आ. १९९१, पु. मु. २००७.

४८. गोखले शांता, मलपृष्ठ, चाहूल, प्रशांत दळवी, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प. आ. १९९९.

४९. कोरान्ने मधूरा, नाट्याक्षरे, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, प. आ. २००६, पृ. ६९.

५०. बोराडे रा. रं., मराठवाड्यात व्यावसायिक रंगभूमी का रूजत नाही, आशय, ऑक्टो. ते डिसें. २०१६, संपा. संजीवनी तडेगावकर, पृ. ४६-४७.

५१. मलपृष्ठ, आकडा आणि इतर एकांकिका, राजकुमार तांगडे, जनशक्ती वाचक चळवळ, औरंगाबाद, प. आ. २०१३.

५२. लुलेकर प्रल्हाद, मराठवाड्यातील मराठी वाङ्मयाचा इतिहास, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद, प. आ. एप्रिल २०२१, पृ. २५७.

प्रकरण चौथे

मराठवाड्यातील रंगभूमीची वैशिष्ट्ये व वेगळेपण

- प्रस्तावना

४.१ मराठवाड्यातील रंगभूमीची वैशिष्ट्ये

४.१.१ एकनाथी भारूड हीच आद्य नाट्यसंहिता

४.१.२ कंट्री नाटकांचे प्राबल्य

४.१.३ अंतर्मुखता

४.१.४ व्यावसायिक वृत्तीचा अभाव

४.१.५ कौटुंबिक नाट्यलेखनाच्या पारंपरिक चौकटीला नकार

४.१.६ ग्रामीण नाटकांची वानवा

४.१.७ शैक्षणिक रंगभूमीचे वर्चस्व

४.१.८ विषयांची विविधता

४.१.९ अस्तंगत होणाऱ्या मूल्यव्यवस्थेवर हल्ला

४.१.१० सरंजामी वृत्तीला प्रखर विरोध

४.१.११ भ्रष्ट व्यवस्थेवरील परखड भाष्य

४.१.१२ लोकाविष्काराचा प्रभाव

४.१.१३ प्रखर सामाजिक भान

४.१.१४ वास्तववादी समाजचित्रण

४.१.१५ स्त्री नाटककारांचा अभाव

४.१.१६ संमिश्र भाषा

४.२ मराठवाड्यातील रंगभूमीचे वेगळेपण

- समारोप

प्रस्तावना :

मराठवाडा ही जशी संतांची भूमी आहे तशीच ती नाटककार आणि नाट्यकलावंताचीही भूमी आहे. मध्ययुगीन काळात विविध संत मंडळांच्या वाङ्मयनिर्मितीमुळे मराठवाडा साहित्यिक सांस्कृतिकदृष्ट्या जेवढा अग्रेसर होता तेवढाच मराठवाड्यातील नाटककार आणि नाट्यकलवंतांच्या कामगिरीमुळे आज मराठवाडा नाट्यक्षेत्रात अग्रेसर आहे. निजामी राजवटीतील गळचेपीमुळे मराठवाड्यामध्ये रंगभूमीसाठी आणि एकूणच साहित्यलेखनासाठी पोषक वातावरण नव्हते. स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये मात्र नाट्यलेखनातील आपला अनुशेष भरुन काढत मराठवाडी रंगभूमीने आपले वेगळेपण सिद्ध केले आहे.

मराठवाडी रंगभूमीने एकूण मराठी रंगभूमीवर स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. दलित रंगभूमीची चळवळ रूजली आणि वाढली ती मराठवाड्यामध्ये, जगभर दोन हजार प्रयोग करून गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये स्थान मिळविण्याचा सन्मान लाभलेले प्रा. लक्ष्मणराव देशपांडे हे मराठवाड्याचेच, नाटकाचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण देणारा नाट्यशास्त्र विभाग प्रथम सुरू झाला तोही मराठवाड्यातच, एकूण मराठी रंगभूमीवर आपल्या नाट्यलेखनाने स्वतंत्र स्थान निर्माण करणारे अजित दळवी, प्रशांत दळवी, दत्ता भगत, किरण पोत्रेकर, अरविंद जगताप हे नाटककारही मराठवाड्याचेच आहेत. किंबहुना जांब समर्थ सारख्या खेड्यात राहून, तिथेच रंगमळा सारखी नाट्यसंस्था स्थापन करून, शिवाजी अंडरग्राऊंड इन भिमनगर मोहल्ला हे नाटक लिहून, अभिनयाचे कोणतेही प्रशिक्षण नसणाऱ्या ग्रामीण कलावंताच्या साहाय्याने मराठवाडी-मराठी-भारतीय आणि जागतिक रंगभूमी गाजवणारे राजकुमार तांगडे हेही मराठवाड्यातीलच आहेत.

स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये मराठवाड्याने मराठी रंगभूमीला भरीव योगदान दिले आहे. आज राजकुमार तांगडे, अरविंद जगताप, योगेश सिरसाट आपल्या आशयघन लेखनाने महाराष्ट्र गाजवीत आहेत. रावबा गजमल, प्रवीण पाटेकर यांनी विविध स्पर्धाच्या निमित्ताने नाट्यलेखन व सादरिकरणात मिळवलेल्या यशामुळे अवघ्या मराठी रंगभूमीचे लक्ष मराठवाड्याकडे केंद्रित झाले आहे. अजित दळवी, प्रशांत दळवी, दत्ता भगत यांच्या आशयसंपन्न नाट्यलेखनाची परपंरा आज राजकुमार तांगडे, अरविंद जगताप, रावबा गजमल, प्रवीण पाटेकर पुढे घेऊन जात आहेत. या सर्वच नाटककारांच्या नाट्यलेखनातील गुणवैशिष्ट्यांमुळेच 'आजचे सशक्त व आशयसंपन्न

नाट्यलेखन मराठवाड्यामध्ये लिहिले जात आहे', असे दिग्दर्शक अमोल पालेकर यांनी म्हटले आहे.

नाट्यलेखनाबरोबर नाट्य सादरिकरण करणाऱ्या रंगकर्मींनीही आज मराठी रंगभूमीवर वैशिष्ट्यपूर्ण कामगिरी केली आहे. कमलाकर सोनटक्के, वामन केंद्रे, चंद्रकांत कुलकर्णी, नंदू माधव इत्यादी नाट्य-चित्रपट दिग्दर्शकांनी मराठी रंगभूमीसाठी वैशिष्ट्यपूर्ण कार्य केले आहे. आज मराठी चित्रपटाचा चेहरा असलेले मकरंद अनासपूरे, अजित दळवी, प्रशांत दळवी, चंद्रकांत कुलकर्णी, दासू वैद्य, नंदू माधव, प्रतीक्षा लोणकर, धनंजय सरदेशपांडे, मंगेश देसाई, संदीप पाठक, योगेश सिरसाट, संकर्षण कऱ्हाडे, रोहित देशमुख, मिलिंद शिंदे, अरविंद जगताप हे सर्व रंगकर्मी-दिग्दर्शक-लेखक-पटकथाकार-गीतकार मराठवाड्यातीलच आहेत. एकूणच नाट्यलेखन व नाट्य सादरिकरण या दोन्ही अंगाने मराठवाडी रंगभूमीने वैशिष्ट्यपूर्ण कामगिरी केली आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये मराठवाड्यातील नाट्यलेखनाची वैशिष्ट्ये व मराठवाडी रंगभूमीच्या वेगळेपणाचा अभ्यास करावयाचा आहे.

४.१ मराठवाड्यातील रंगभूमीची वैशिष्ट्ये :

कथा, कविता, कादंबरी या वाङ्मयप्रकारांपेक्षा नाटक हा वेगळा आणि वैशिष्ट्यपूर्ण वाङ्मयप्रकार आहे. इतर वाङ्मयप्रकारांपेक्षा नाट्य वाङ्मयप्रकाराच्या घटकांमध्येही फरक आहे. नाट्यलेखन आणि नाट्य सादरिकरण या दोन्हींच्या एकत्रिकरणातून नाटक हे रंगभूमीवर सादर होते. त्यामुळे रंगभूमीच्या वैशिष्ट्याचा विचार करत असताना नाट्यलेखन व नाट्य सादरिकरण या दोन्हींच्या वैशिष्ट्यांचा अभ्यास करणे महत्त्वाचे ठरते. प्रस्तुत ठिकाणी नाट्यलेखन व नाट्य सादरिकरणासंदर्भात वैशिष्ट्यांचा अभ्यास केला आहे. नाट्यलेखन व सादरिकरण या बाजूबरोबरच लिखित नाटक मंचावर सादर करण्यासाठी विविध नाट्यसंस्था मराठवाड्यामध्ये उदयास आलेल्या आहेत. या नाट्यसंस्थांनी चालवलेल्या नाट्य चळवळीच्या वैशिष्ट्यांचाही विचार प्रस्तुत ठिकाणी केला आहे.

४.१.१ एकनाथी भारूड हीच आद्य नाट्यसंहिता :

नाटक या वाङ्मयप्रकारातील घटक संत एकनाथ महाराज यांच्या भारुडांमध्ये आढळतात. संगीत, नृत्य, अभिनय, नेपथ्य, वेशभुषा, रंगभुषा, विविध भावमुद्रा हे सर्वच घटक एकनाथी

भारुडामध्ये आहेत. लोक भाषेमध्ये भारुडांची रचना करून वेगवेगळ्या समाजातील पात्रे उभी करून ही भारूडे त्यांनी वाळवंटी रंगमंचावर सादर केली. मराठी रंगभूमीवरील आद्य नाटक ठरलेले विष्णुदास भावे यांच्या सीता स्वयंवरपेक्षा नाथांची भारुडे सरस आहेत. १९ व्या शतकात ब्रिटिश राजवटीशी संपर्क झाल्यानंतरही सीता स्वयंवर या नाटकाचे स्वरूप व आशय आध्यात्मिक आहे. याउलट सोळाव्या शतकातील संत एकनाथांची भारूडे ही समाजसन्मुख व लोकजीवनाचा आविष्कार करणारी आहेत. मराठवाडा हा निजामी राजवटीमध्ये बौद्धिकदृष्ट्या पिचलेला असताना एकनाथी भारूडांचा विचार न करताच मराठी रंगभूमीच्या अभ्यासकांनी विष्णुदास भावे यांना मराठी रंगभूमीचे जनकत्व बहाल केले.

निजामी राजवटीतून मराठवाडा मुक्त झाल्यानंतर मराठवाड्यातील अनेक अभ्यासकांनी नाट्य घटकांच्या आधारावर संत एकनाथ महाराज हेच मराठी रंगभूमीचे आद्य नाटककार व प्रवर्तक आहेत हे सिद्ध केले आहे. कुमुद गोसावी, नरहर कुरुंदकर, त्र्यंबक महाजन, द.ग. देशपांडे, प्रभाकर बागले, सतीश साळुंके इत्यादी अभ्यासकांनी संत एकनाथ हेच मराठी रंगभूमीवरील आद्य नाटककार आहेत आणि एकनाथी भारूड हीच आद्य नाट्यसंहिता आहे, हे सिद्ध केले आहे.

४.१.२ कंट्री नाटकांचे प्राबल्य :

एकोणिसाव्या शतकामध्येही मराठवाड्याच्या ग्रामीण भागात रंगभूमीची चळवळ व नाट्यविषयक कार्यक्रम होत असत असे उल्लेख आढळतात. दळणवळणाच्या साधनांचा अभाव आणि मराठवाड्यातील जुलमी निजामी व्यवस्था यामुळे मराठवाड्याबाहेरून नाट्यसंहिता सहज उपलब्ध होत नसत. या परिस्थितीवर मात करण्यासाठी आणि आपली नाटकाची आवड जोपासण्यासाठी नाटकाची थोडीफार जाण असणारे लोक एकत्र येऊन धार्मिक कथा, पौराणिक कथा किंवा आख्यानाच्या आधारे नाट्यसदृश्य लेखन करून ते विविध धार्मिक उत्सवाच्या वेळी सादर करत असत. अप्रकाशित असणाऱ्या आणि गावापुरत्याच मर्यादित असणाऱ्या या नाट्यसंहितानाच कंट्री नाटक किंवा देशी नाटक म्हटले जाते. मराठवाड्याची भविष्यातील आधुनिक रंगभूमीचा पायाच या कंट्री नाटकांनी घातला आहे. संत, ऐतिहासिक महापुरूष, रामायण-महाभारतातील विरपुरूषांचे चित्रण या नाटकांमध्ये केले गेले. समाजाला उपदेश देणे, मानवतावादी

दृष्टिकोन निर्माण करणे, संस्कारक्षम मन घडविण्याबरोबर मनोरंजनाचेही काम या कंट्री नाटकांनी केले आहे.

कंट्री नाटकाचे नाटककार कोण आहेत हे नेमके माहित होत नाही कारण अनेकदा ती सामूहिक संहिता असते. असे असले तरी मराठवाड्यातील स्वतंत्र नाटक लिहिलेल्या अनेक कंट्री नाटककारांची नोंद आढळते. या संदर्भात सतीश साळुंके म्हणतात. "विठ्ठल बीडकर यांनी अनेक आख्यान कंट्री नाटके लिहिली त्यात सीतास्वयंवर या नावाने एक कंट्री नाटक आहे. नांदेड जिल्ह्यातील लोहा येथील मारोतीबुवा यांनी ब्रह्मचारी, सं. राधाविलास, वत्सलाहरण, परकायाप्रवेश या सारखी नाटके लिहून सादर केली... तीर्थपुरी येथील नाट्यप्रेमी गणपतराव नामदेवराव उर्फ बन्सिधर काका जोशी यांनी तंट्या भील हे नाटक सादर केले... सामाजिक आशय असलेली कंट्री नाटके अपवादानेच होत. त्यात तंट्या भील हे उल्लेखनीय नाटक ठरते."[१] एकूणच कंट्री नाटक हे मराठवाडी रंगभूमीचे अविभाज्य अंग असून आधुनिक मराठी नाटकाचे पूर्वरंग म्हणून ते महत्त्वाचे ठरतात. आधुनिक नाटकाच्या सादरिकरणाला आरंभ होण्यापूर्वी कंट्री नाटकाचेच प्राबल्य मराठवाडी रंगभूमीवर होते.

४.१.३ अंतर्मुखता :

अंतर्मुखता म्हणजेच आत्मचिंतनपरता हे मराठवाड्यातील नाट्यलेखनाचे महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य आहे. कधी नाटककाराने अंतर्मुख होऊन समाजचित्रण नाटकातून मांडलेले आहे. कधी नाटक पाहून अंतर्मुख होण्याचे किंवा आत्मचिंतन करण्याचा संदेश लेखकाने दिलेला आहे. तर अनेक नाटककाराच्या नाटकातील पात्रेही अंतर्मुख होऊन स्वत:विषयी विचार करायला लागतात. दत्ता भगत यांचे वाटा-पळवाटा, म. भि. चिटणीस यांचे युगयात्रा, ऋषिकेश कांबळे यांचे भाई तुम्ही कुठे आहात!, राजकुमार तांगडे यांचे शिवाजी अंडरग्राऊंड इन भिमनगर मोहल्ला, दासू वैद्य यांचे रिअल इस्टेट इत्यादी नाटके आणि अजित दळवी, प्रशांत दळवी यांची सर्वच नाटके अंतर्मुख व्हायला लावतात. कोणात्या ना कोणत्या प्रकारची अंतर्मुखता या नाटकात आविष्कृत झाली आहे हे सत्य आहे. अजित दळवी यांच्या शतखंड, डॉक्टर! तुम्ही सुद्धा... या नाटकातील आणि प्रशांत दळवी यांच्या चारचौघी, चाहूल इत्यादी नाटकातील पात्रे आत्मचिंतन करतात. या पात्राच्या माध्यमातून लेखक समाजालाच आत्मचिंतन करण्याचा अप्रत्यक्षपणे सल्ला देत असतो.

शतखंड या नाटकातील अंतर्मुखतेबाबत पु. भा. भावे म्हणतात, "शतखंड या नाटकात व्यक्त होणारा अनुभव, गेल्या पंचविस वर्षातील मराठवाड्याच्या सामाजिक-राजकीय जीवनाकडे लक्ष पुरविणाऱ्या कोणालाही परिचित असा आहे. पण तो नाट्यरूपात व्यक्त होताना प्रेक्षकांना परिचिताचा अनुभव देऊन अपेक्षित प्रतिसाद मागणारा नाही. कारण शतखंडित असलेल्या प्राध्यापक धांदेफळकरांच्या व्यक्तिमत्वातून नाटककार वाचक प्रेक्षकाला अभिजन वर्गाच्या शोकात्मिकतेविषयी अंतर्मुख व्हायला लावतो. आण ते करीत असतानाच बुद्धिजीव माणसाची स्वत:ला वाजवीपेक्षा गांभीर्याने सादर करण्याची जी प्रवृत्ती आहे त्यावर नाटककाराने विनोदाचा अंकुश वापरला आहे."[२] प्रा. धांदेफळकरांच्या अंतर्मुखतेतून अभिजन वर्गाची शोकात्मिकाच नाटककाराने इथे मांडली आहे.

ऋषिकेश कांबळे हे अंतर्मुख होऊन भाई तुम्ही कुठे आहात! या नाटकातून दलित चळवळीचा आलेख मांडतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाचा वापर करून त्यांच्या विचारांना तिलाजंली देत स्वार्थी वृत्ती जोपासणाऱ्या स्वयंघोषित आंबेडकरवादी नेत्याचे चरित्रकथन या नाटकात ऋषिकेश कांबळे यांनी केले आहे. भाई तुम्ही कुठे आहात! या शिर्षकातील भाई हा शब्दच व्यंगात्म असून स्वार्थसिद्धीसाठी भाईंनी आंबेडकरी विचारांना जी तिलांजली दिली आहे त्यातून संतप्त कार्यकर्त्यांनी वृत्ती बदललेल्या भाईंना विचारले आहे भाई तुम्ही कुठे आहात!

भाई तुम्ही कुठे आहात! या नाटकातील भाईमध्ये स्वार्थ एवढा जागा झाला आहे की, चारचौघात जयभिम म्हणण्यासाठी तो मागे पुढे पाहतो. आत्म, पूनर्जन्म या आंबेडकरवादात नसणाऱ्या गोष्टी भाषणातून बोलू लागतो. भाईंच्या या बदललेल्या वृत्तीबद्दल नाटकातील भाईचा जुना कार्यकर्ता मिलिंद म्हणतो, "तुम्हीच सांगितलं पुनर्जन्म झूट आहे. आत्मा झूट आहे. पण बाबासाहेब पाहत असतील तर त्यांच्या डोळ्यात आसवं असतील की, हातात जोडा घेतला असेल बाबासाहेबांनी. आपलं हे ढोंग पाहून."[३] समाजामध्ये घडणाऱ्या घटनांचे अंतर्मुख होऊन ऋषिकेश कांबळे यांनी चित्रण केले आहे. स्वार्थी, संधिसाधू आंबेडकरवादी नेत्यांनी स्वार्थासाठी दलित चळवळ कशी दावनिला बांधली आहे हेच नाटककार सांगतो. एकूणच रसिंकाना व वाचकांना आत्मचिंतन करण्यास भाग पडणारे हे नाटक आहे.

४.१.४ व्यावसायिक वृत्तीचा अभाव :

मराठवाडी रंगभूमीवर नाट्य सादरिकरणाची दिडशे वर्षाची आणि नाट्यलेखनाची शंभर वर्षांची परंपरा आहे. या एकूण दिडशे वर्षांच्या काळामध्ये मराठवाड्यामध्ये व्यावसायिक वृत्ती वाढली नाही. अगदी सुरूवातीपासूनच केवळ हौस म्हणून मराठवाड्यात नाट्यलेखन व सादरिकरण झाले आहे. मराठवाड्यातील सर्वात यशस्वी रंगभूमीचे शिल्पकार लोटू पाटील 'आपण व्यवसायासाठी नव्हे तर नाटकासाठी नाटक' करतो असे म्हणत. याउलट मराठी रंगभूमी सुरूवातीपासूनच व्यावसायिक होती. अण्णासाहेब किर्लोस्कर, गो. ब. देवल, राम गणेश गडकरी, कृ. प्र. खाडिलकर या सुरूवातीच्या काळातील नाटककारांच्या नाटकांपासून आजवर मराठी रंगभूमीने व्यावसायिक वृत्ती जोपासली आहे.

चारचौघी, डॉक्टर! तुम्ही सुद्धा..., चाहूल, गांधी विरूद्ध गांधी, वाटा-पळवाटा, शिवाजी अंडरगाऊंड इन भिमनगर मोहल्ला इत्यादी नाटकांनी व्यावसायिक रंगभूमीवर यश मिळवले आहे. परंतु ही नाटके प्रायोगिक रंगभूमीसाठी लिहिलेली होती. या नाटकातील कंटेन्टमुळे या नाटकांनी व्यावसायिक यश मिळवले आहे.

मराठवाड्यात व्यावसायिक रंगभूमीच्या अपयशसाठी रा. रं. बोराडे यांनी नाट्यरसिंकांना जबाबदार धरले आहे. मराठवाड्यातील रसिक मराठवाड्याबाहेरील नाटकांना जसा प्रतिसाद देतात तसा मराठवाड्यातील नाटकांना देत नाहीत. मराठवाड्यातील एखाद्या नाटकाने मराठवाड्याबाहेर यश मिळवल्यास मराठवाड्यातील रसिक त्या नाटकास प्रतिसाद देतात. मराठवाड्यातील रसिकांची ही मानसिकता बदलत नाही तोपर्यंत मराठवाड्यामध्ये व्यावसायिक रंगभूमी यशस्वी होणार नाही असे रा. रं. बोराडे म्हणतात. कारणे काहीही असोत प्रा. लक्ष्मणराव देशपांडे यांच्या वऱ्हाड निघालय लंडनला या एकपात्री नाटकाचा अपवाद वगळता मराठवाड्यामध्ये निव्वळ व्यावसायिक रंगभूमीसाठी नाट्यलेखन झाले आहे. असे ठामपणे म्हणता येत नाही.

४.१.५ कौटुंबिक नाट्यलेखनाच्या पारंपरिक चौकटीला नकार :

मराठी रंगभूमीवर कौटुंबिक नाट्यलेखनाची मोठी परंपरा आहे. व्यावसायिक रंगभूमीवर कौटुंबिक नाटकांनी प्रचंड यश मिळविले आहे. मराठवाड्याने मात्र कौटुंबिक नाटकाच्या परंपरेला छेद दिला आहे. मराठवाड्याचा इतिहास अभ्यासल्यास साडेसहाशे वर्ष परकीय सत्तेशी

मराठवाड्याने संघर्ष केला आहे. स्वातंत्र्योत्तर काळातही संयुक्त महाराष्ट्रामध्ये सहभागी झाल्यानंतर मराठवाड्याच्या वाट्याला फार काही आले नाही. मराठवाड्याच्या विकासाचा दर इतर प्रांताच्या तुलनेत अत्यल्प आहे. अशा संघर्षमय वातावरणातील नाटककाराला हलकेफुलके कौटुंबिक नाटक लिहिण्याऐवजी संघर्षमय जीवनावरील नाटक लिहिनेच आवडेल. त्यामुळे हलक्या फुलक्या कौटुंबिक नाटकाऐवजी मराठवाड्यामध्ये प्रखर सामाजिक वास्तव मांडणाऱ्या नाटकांनी मोठ्या प्रमाणावर यश मिळविले आहे. दलित, ग्रामीण, प्रायोगिक अशा सर्वच प्रवाहांनी कौटुंबिक नाटकांची परंपरा नाकारली आहे.

४.१.६ ग्रामीण नाटकांची वानवा :

शंभर वर्षांच्या नाट्यपरंपरेत मराठवाड्यामध्ये विपूल प्रमाणात नाट्यलेखन झाले आहे. परंतु त्यामध्ये ग्रामीण नाटकांचे प्रमाण अत्यल्प आहे. १९८० पर्यंत मराठवाडी रंगभूमीवर निखळ ग्रामीण नाटक आढळत नाही. १९८० नंतरही हाताच्या बोटावर मोजवण्याएवढे ग्रामीण नाट्यलेखन झाले आहे. १९६० नंतरच्या काळात कथा, कादंबरी व कवितेच्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात लेखन झाले आहे. परंतु ग्रामीण नाटके त्या तुलनेत अत्यल्प आहेत. ग्रामीण नाटकाच्या वानवेसंदर्भात अनेक कारणे सांगितली जातात. त्यामध्ये मूळात ग्रामीण लेखकांची प्रवृत्तीच कथात्म साहित्य लेखनाची आहे. असे म्हटले जाते.

नाटक हा सादरिकरणाचा प्रकार असल्यामुळे आपल्या भावनांचा मंचीय आविष्कार होण्याबद्दल सार्थकता लेखकांच्या मनात राहते. सादरिकरण करणे म्हणजे नाटकाचा व्यवसाय करणे पुणे-मुंबई हेच नाट्य व्यवसायाचे प्रमुख केंद्र आहेत. पुणे-मुंबईची अभिरूची आणि ग्रामीण नाटके या परस्परविरोधी गोष्टी असल्यामुळे ग्रामीण नाटकांचा व्यवसाय होणे ही अवघड बाब आहे. त्यामुळे अनेक नाट्यविषयाला ग्रामीण साहित्यिकांनी कथा-कादंबरीत रूपांतरित केले आहे असे जाणवते.

ग्रामीण नाटकांच्या वानवेबाबत अनेकदा ग्रामीण साहित्यिकांना प्रश्न विचारण्यात येतो. ग्रामीण भावविश्व असणारी नाटके व्यावसायिक रंगभूमीवर बहिष्कृत का ठरतात? या प्रश्नाला उत्तर देताना रा.रं. बोराडे म्हणतात, "निर्माते अशी नाटके करण्याचे धाडस करीत नाहीत असा माझा अनुभव आहे. निर्मात्याला आपला पैसा परत मिळवायचा असतो. त्यात गैर नाही. यासाठी

प्रेक्षकांच्या एकूण मानसिकतेत बदल घडायला हवा आणि पुण्या-मुंबईच्या प्रेक्षकांना तुम्ही म्हणता तशा विषयात रसही नसतो असा माझा समज आहे."[४] प्रेक्षकांची मानसिकता आणि अभिरूचीतील भिन्नतेमुळे ग्रामीण रंगभूमी यशस्वी झाली नाही असे रा. रं. बोराडे यांना वाटते.

मराठवाड्यामध्ये पिकलं पान हिरवं रान, बंधमुक्ता, रिंगण, विहीर, आडगावचे चौधरी, गावगारूड, चौथ्या इस्टेटच्या बैलाला, वडगाव लाइव्ह, ग्लोबल आडगाव, आकडा, शिवाजी अंडरग्राऊंड इन भिमनगर मोहल्ला अशी काही ग्रामीण नाटके लिहिली गेली. यापैकी काही नाटके ही ग्रामीणसदृश्य नाटके आहेत. काही कादंबऱ्यांवरून रूपांतरीत नाटके आहेत. काही नाटकांना ग्रामीण पार्श्वभूमी लाभलेली आहे. मराठवाड्यामध्ये निखळ ग्रामीण नाटकांची वानवा आहे.

४.१.७ शैक्षणिक रंगभूमीचे वर्चस्व :

स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये झपाट्याने शिक्षणाचा प्रसार झाला. तालुक्याच्या ठिकाणिही चांगली महाविद्यालये स्थापन झाली. सांस्कृतिक कार्यक्रम हा प्रत्येक महाविद्यालयातील कार्यक्रमांचा अविभाज्य भाग बनला. सांस्कृतिक कार्यक्रम किंवा वार्षिकोत्सवाच्या निमित्ताने नाटके लिहून सादर केली जात असत. सुरूवातीला महाविद्यालयाच्या मंचावर सादर होणारी नाटके नंतर विद्यापीठाचा युवक महोत्सव, विविध राज्यनाट्य स्पर्धांमध्ये सादर केली जात असत. काही अतिचर्चित नाटकांचे व्यावसायिक प्रयोगही होत असत. नाटककार, नट-नटी, नाट्य सादरिकरण करणारे इतर सर्व रंगकर्मी आणि महाविद्यालयीन मंच या नाटकांसाठी वापरला जात असे. नाट्यलेखन व सादरिकरणाशी निगडित प्रत्येक गोष्ट ही महाविद्यालयातीलच असे. त्यातूनच महाविद्यालीयन किंवा शैक्षणिक रंगभूमीचा उदय झाला आहे. मराठवाड्यामधील शेकडो महाविद्यालयामध्ये अशी शैक्षणिक रंगभूमी अस्तित्वात आहे.

स्वातंत्र्योत्तर कालखंडातील मराठवाडी रंगभूमीवर शैक्षणिक रंगभूमीचे वर्चस्व दिसून येते. मराठवाड्यातील महत्त्वाची नाटके शैक्षणिक रंगभूमीशी निगडीत आहेत. त्र्यंबक महाजन यांचे झुलते मनोरे, म. भि. चिटणीस यांचे युगयात्रा, प्रा. लक्ष्मणराव देशपांडे यांचे वऱ्हाड निघालय लंडनला अलिकडच्या काळातील ऋषिकेश कांबळे यांचे भाई तुम्ही कुठे आहात! कुमार देशमुख यांचे स्मारक अशी अनेक महत्त्वाची नाटके महाविद्यालयीन रंगभूमीशी निगडीत आहेत. औरंगाबादच्या नागसेनवनातील मिलिंद महाविद्यालय, सरस्वती भुवन शिक्षण संस्थेचा परिसर,

नांदेडचे प्रतिभानिकेतन व पिपल्स महाविद्यालय, अंबेजोगाईचे योगेश्वरी महाविद्यालय, औरंगाबादचेच देवगिरी व विवेकानंद महाविद्यालय आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील नाट्यशास्त्र विभाग या सर्वच शैक्षणिक परिसरामध्ये मराठवाड्यातील शैक्षणिक रंगभूमी फुलली आहे. शैक्षणिक परिसरात कार्यरत प्राध्यापक व विद्यार्थींनी यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

मराठवाड्यातील शैक्षणिक रंगभूमीशी निगडीत महत्त्वाच्या प्राध्यापक व विद्यार्थी नाटककार-रंगभूमीमध्ये स. रा. गाडगीळ, मामा दातार, त्र्यंबक महाजन, म. भि. चिटणीस, विभाकर मिरजकर, रा. द. अरगडे, रंगनाथ तिवारी इत्यादी शैक्षणिक रंगभूमीशी संबंधित प्राध्यापकांनी मराठवाड्यातील शैक्षणिक रंगभूमीची पायाभरणी केली. नंतरच्या काळामध्ये रा. रं. बोराडे, दत्ता भगत, अजित दळवी, कुमार देशमुख अशा नाटककारांनी मराठवाडी रंगभूमी समृद्ध केली. गंगाधर पानतावणे, अरूण प्रभुणे, योगिराज वाघमारे, अलोक चौधरी, शशिकांत बऱ्हाणपूरकर अशा मंडळींनी मराठवाडी रंगभूमीला चिंतनशीलतेची बैठक दिली. तर लक्ष्मणराव देशपांडे, दिलीप घारे, यशवंत देशमुख या अभिनेत्यांनी मराठवाडी नाटक सर्वदूर पोहचवले.

नव्वदोत्तरी कालखंडामध्ये विविध स्पर्धा आणि विशेषतः महाविद्यालयीन युवक महोत्सवातून अनेक नाटककार-रंगकर्मींचा उदय झाला. त्यामध्ये प्रशांत दळवी, चंद्रकांत कुलकर्णी, दासू वैद्य, योगेश देसाई, मकरंद अनासपूरे, शिव कदम इत्यादी नाटककार-रंगकर्मींनी केवळ मराठवाडीच नव्हे तर मराठी रंगभूमीसही महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. एकविसाव्या शतकाच्या दूसऱ्या दशकात अरविंद जगताप, योगेश सिरसाट, नंदू भूरे, रमाकांत भालेराव, शैलेश कोरडे, योगेश चिकटगावकर, रोहीत देशमुख, मनिराज पवार, स्मिता साबळे, अशोक बंडगर, राम झिंजुर्डे, निरज बोरसे, अनिलकुमार साळवे, रावबा गजमल, प्रवीण पाटेकर अशा नाटककार-रंगकर्मींनी शैक्षणिक रंगभूमी समृद्ध करत असतानाच महाराष्ट्राभर नाटकाचे प्रयोग करून एकूण मराठी रंगभूमीला महत्त्वाचे योगदान दिले आहे.

महाविद्यालयीन किंवा शैक्षणिक रंगभूमीने एकूण मराठवाडी रंगभूमी समृद्ध केली आहे. या संदर्भात त्र्यंबक महाजन म्हणतात, "मराठवाडाभर स्वातंत्र्योत्तर काळात ज्या शैक्षणिक संस्था महाविद्यालयीन पातळीवर कार्यरत झाल्या त्यांनी गॅदरिंग वा तत्सम निमित्त साधून रंगभूमीला फार

मोलाचं सक्रिय योगदान दिलं. पण ही बाब कुणी फारशी लक्षात घेत नाही... स्वातंत्र्योत्तर काळातील पहिले प्रयोगरूप म्हणजे १९५२ साली इंटरमिजिएट कॉलेजने गॅदरिंगच्या निमित्ताने सादर केलेले नाटक झुलते मनोरे. नाटककार त्याच महाविद्यालयाचा विद्यार्थी त्र्यंबक महाजन, नाट्यनिर्माते संस्था प्रमुख म्हणून प्राचार्य ग.ना. थत्ते, दिग्दर्शक भूतपूर्व कुलगुरू प्राचार्य गो. रा. म्हैसेकर, नाटकात काम करणारे कलावंत महाविद्यालयाचे विद्यार्थी-विद्यार्थीनी प्रयोगस्थळ जनाना मर्दाना महलचा खुला रंगमंच, प्रेक्षक महाविद्यालयाचे विद्यार्थी... यानंतरचा दुसरा रंगमंचीय आविष्कारही महाविद्यालयीन रंगभूमीवर घडणारा आणि एक अभूतपूर्व इतिहास निर्माण करणारा रंगमंच, मिलिंद महाविद्यालयाचा युला रंगमंच, नाटककार मिलिंदचे प्राचार्य म. भि. चिटणीस, नाटक भारतरत्न बोधीसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनकार्याचा आढावा घेणारे आणि त्या निमित्ताने युगानुयुगे चालत आलेल्या मूळ वेदनेची कथा सांगणारे युगयात्रा... पुढे हाच प्रवाह मराठवाडाभर विस्तारत गेला. नांदेड, उदगीर, बीड, अंबाजोगाई, लातूर, जालना याठिकाणी महाविद्यालयीन रंगभूमी उभी करण्यात येथील शिक्षक वृंदांचा मोठा वाटा राहिला."[५] एकूणच शैक्षणिक रंगभूमीने मराठवाडी रंगभूमीच्या विकासामध्ये मोलाची भर घातली आहे.

४.१.८ विषयांची विविधता :

एकूण मराठी रंगभूमीचा विचार केल्यास पौराणिक, सामाजिक, कौटुंबिक अशा स्वरूपाचे नाट्यलेखन प्रामुख्याने झाले आहे. मराठवाड्यातील शंभर वर्षांच्या नाट्यलेखनामध्ये मात्र विषयाचे वैविध्य आढळते. मराठी रंगभूमीच्या तुलनेत आशय-विषयाच्या संदर्भात मराठवाडी रंगभूमी अधिक समृद्ध आहे. 'आशय-विषयाच्या दृष्टीने सशक्त नाट्यलेखन आज मराठवाड्यामध्ये होत आहे'. अशा शब्दात ज्येष्ठ दिग्दर्शक अमोल पालेकर यांनीदेखील मराठवाडी नाटकांची भलावणा केली आहे. युगानुयुगाचा अन्याय चित्रित करणारे युगयात्रा, निजामशाहीचा प्रतिकार करणारे तोड ही माळ अर्थात गंगालहरी, लोकाविष्काराच्या प्रभावातून साकारलेले थांबा! रामराज्य येतय! दलित चळवळीतील अंतर्विरोध दर्शविणारे वाटा-पळवाटा, वैद्यकीय व्यवसायातील भ्रष्ट मानसिकतेचा पर्दाफाश करणारे डॉक्टर! तुम्हीसुद्धा..., बाप-मुलातील संघर्ष मांडणारे गांधी विरुद्ध गांधी, स्त्रीची बाजू कणखरपणे मांडणारे चारचौघी, मूल्यऱ्हासाचे प्रत्ययकारी दर्शन घडविणारे चाहूल, दलित चळवळीतील स्वार्थी वृत्तीचा बुरखा फाडणारे भाई तुम्ही कुठे आहात!, राजकीय स्वार्थासाठी

महापुरूषांचा वापर करणारांवर उपहासात्मक भाष्य करणारे शिवाजी अंडरग्राऊंड इन भिमनगर मोहल्ला, आपल्या लिबर्टीचाच कसा स्टॅच्यू झाला आहे हे सांगणारे स्टॅच्यू ऑफ लिबर्टी, ग्रामीण भागातील राजकरणावर ब्लॅक कॉमेडी स्वरूपातील भाष्य करणारे अखंड, भौतिक वस्तूपेक्षा नातेसंबंध हेच आपली खरी संपत्ती आहे हे सांगणारे रिअल इस्टेट अशा अनेक विषयांवर मराठवाडी रंगभूमीवर चर्चा झाली आहे. एकूणच मराठवाडी रंगभूमीवर विषयाचे वैविध्य प्रकर्षाने जाणवते.

४.१.९ अस्तंगत होणाऱ्या मूल्यव्यवस्थेवर हल्ला :

अस्तंगत होत जाणाऱ्या मूल्यव्यवस्थेवर हल्ला हे मराठवाड्यातील नाटकांचे प्रधान वैशिष्ट्ये आहे. समाजातील सामान्य व्यक्तिपासून जबाबदार पदावर बसलेल्या व्यक्तिने, नेत्याने व्यावसायिकाने पदोपदी मूल्याची केलेली अवहेलना-विटंबना मराठवाड्यातील नाटककाराने लक्षणीय पद्धतीने टिपली आहे. कधी सरळ भाषेत तर कधी उपहास, उपरोध, विडंबनात्मक पद्धतीने ढासळणाऱ्या नितिमत्तेवर नाटककारांनी भाष्य केले आहे. मराठवाड्यातील तोड ही माळ, झुलते मनोरे, वाटा-पळवाटा, थांबा! रामराज्य येतंय!, डॉक्टर! तुम्हीसुद्धा..., शतखंड, चाहूल, आमदार सौभाग्यवती, स्मारक, शिवाजी अंडरग्राऊंड इन भिमनगर मोहल्ला, भाई तुम्ही कुठे आहात! या नाटकांच्या शीर्षकातून नाटकामध्ये मूल्यव्यवस्थेवर काहीतरी भाष्य केले आहे असा बोध होतो.

अगदी स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये निजामी राजवटीने घातलेला हैदोस आणि मूल्यांची केलेली विटंबना दिवाकर कृष्ण केळकर यांनी तोड ही माळ अर्थात गंगालहरी या नाटकात चित्रित केली आहे. थांबा! रामराज्य येतंयमध्ये समाजात कोणती मूल्यच शिल्लक राहिली नाहीत असे चित्रण येते. वैद्यकीय व्यवसायाचे भ्रष्ट स्वरूप आणि मूल्यविहीनता डॉक्टर! तुम्ही सुद्धामध्ये अजित दळवी यांनी मांडली आहे. तर शतखंडमध्ये अजित दळवी यांनीच प्रा. धांदेफळकरांच्या रूपाने शतखंडीत झालेला त्यांचा अनुभव मांडला आहे. वाटा-पळवाटा, भाई तुम्ही कुठे आहात! या नाटकांमध्ये दत्ता भगत व ऋषिकेश कांबळे यांनी दलित चळवळीमधील स्वार्थी-संधीसाधू व्यक्तिंचा पर्दाफाश करत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घालून दिलेल्या मूल्यांची आठवण करून दिली आहे. रा. रं. बोराडे यांचे आमदार सौभाग्यवती हे नाटक राजकीय क्षेत्रातील मूल्यव्यवस्थेवर भाष्य करते.

प्रशांत दळवी यांनी आपल्या एकूण नाट्यलेखनामध्ये अस्तंगत होणाऱ्या मूल्यव्यवस्थेवर भाष्य केले आहे. मूल्यव्यवस्थेवर भाष्य करणारे चाहूल हे त्यांचे महत्त्वपूर्ण नाटक आहे. "चाहूल सारखे नाटक वास्तव सोलून ठेवतं. मध्यमवर्गीय नीतीमूल्यांचा भेदक पंचनामा करणारं आणि समाजाच्या अधोगतीचा प्रवास अचूक टिपणारं हे नाटक आहे. पेजरपासून मोबाईलकडे धाव घेणाऱ्या आजच्या पिढचं हे नाटक आहे. ते कसलाही उपदेश करत नाही. वा समर्थनही करत नाही. पण जाणिवेची पातळी उंचावतं."[६] नव्वदोत्तर कालखंडातील बदलत जाणाऱ्या समाजाची व एकूणच मूल्यांची दिशा प्रशांत दळवी यांनी या नाटकात सूचीत केली आहे.

प्रशांत दळवी यांच्या चाहूल या नाटकाचे शीर्षकच सूचक व अर्थपूर्ण आहे. ज्या बाबींना मूल्य म्हणून मान्यता मिळालेली आहे ती मूल्य खरोखर मूल्य आहेत का? त्यांना मूल्य मानायचे का? असे प्रश्न निर्माण करत एकूण मूल्यव्यवस्थेवरच हे नाटक घाला घालते आणि नैतिक जीवन समृद्ध करणाऱ्या मूल्यांना नकार देत भौतिक जीवन समृद्ध करणाऱ्या मूल्यांच्या दिशेने या नाटकातील माधवी व मकरंद वाटचाल करतात. अनैतिकतेलाच नैतिक मूल्ये म्हणून मान्यता देऊ पाहणाऱ्या नव्वदोत्तर भारतीय समाजाची चाहूल नाटककाराने या नाटकात चिन्हांकित केली आहे. 'तुझ्यासोबत माझ्या बॉसला एक रात्र घालवायची इच्छा आहे आणि तसे झाले तरच आपल्या जीवनातील भौतिक गरजा पूर्ण होऊ शकतात' असे मकरंद स्वत:च्या पत्नील कोणताही आडपडदा न ठेवता सांगतो. या विषयावर दोघांमध्ये मत-मतांतरे होऊन शेवटी दोघांनाही हा विचार मान्य होतो. माधवी मेकअप करून मकरंदच्या बॉसकडे जाण्यास निघते तेव्हा मकरंद म्हणतो "खूप भांडलो आपण. तू नि:शंक मनानं जा. प्रामाणिकपणाची चैन परवडणारी नाहीये आता आपल्याला."[७] नैतिक मूल्यांपेक्षा भौतिक गोष्टी महत्त्वाच्या वाटू लागलेल्या आणि मनाचे वस्तूकरण झालेल्या आणि होऊ घातलेल्या नव्वदोत्तर पिढीचे प्रातिनिधिक रूप म्हणजे चाहूल हे नाटक आहे. तर माधवी आणि मकरंद हे या मूल्यविहिन समाजातील प्रातिनिधिक चेहरे आहेत. एकूणच अस्तंगत होणाऱ्या मूल्यव्यवस्थेवर घाला घालण्याचे कार्य मराठवाड्यातील नाटककारांनी केले आहे.

४.१.१० सरंजामी वृत्तीला प्रखर विरोध :

मराठवाड्यातील नाटककारांनी आपल्या नाटकातून सरंजामी वृत्तीला प्रखर विरोध केला आहे. दलित-ग्रामीण नाटकांतून हा विरोध प्रकर्षाने आला आहे. किंबहुना सरंजामी वृत्तीविरूद्ध लढा

हाच दलित नाटकाचा स्थायिभाव आहे. दिवाकर कृष्ण केळकर यांच्या तोड ही माळ अर्थात गंगालहरी या नाटकामध्ये निजामशाहीविरूद्ध प्रखर संघर्ष पहायला मिळतो. तर बी. रघुनाथ यांच्या आडगावचे चौधरी या कादंबरीतही सरंजामशाहीविरूद्धचा लढा चित्रित झालेला आहे. कुमार देशमुख यांनी आडगावचे चौधरी या कादंबरीचे त्याच नावाने नाट्यरूपांतर केले आहे. कादंबरीतील संघर्ष प्रत्यक्ष मंचावर आल्यामुळे अधिकच धारदार झाला आहे. सरंजामी वृत्तीचे मुर्तिमंत नाट्य आडगावचे चौधरी या नाटकातून कुमार देशमुख यांनी उभे केले आहे. आडगावचे चौधरी या नाटकासंदर्भात चित्ररेखा देशमुख म्हणतात, "रझाकाराच्या जमान्यात पैसा आणि वर्चस्व यासाठी घडलेले हे नाट्य स्वकियांकडूनच घडलेली ही दुर्दैवी बाब होय. नीती, अनीतीच्या कल्पनांना हरताळ फासणारे व अनाचार, अत्याचार आणि क्रौर्याची परिसीमा गाठणारे आडगावचे चौधरी, जहागिरदार यांच्यावर लिहिलेली ही कादंबरी. या गद्य कादंबरीला लोकनाट्य संगीताची जोड देऊन एका वेगळ्याच ढंगात कुमारने नाट्यरूप दिले."[८] जुलमी निजामी राजवटीतील स्वकीय आडगावच्या चौधरींच्या सरंजामी वृत्तीवर लेखकाने येथे भाष्य केले आहे.

सरंजामी वृत्तीविरोधीचा संघर्ष दलित नाटकांमध्ये अधिक तीव्र होतो. युगयात्रा (म. भि. चिटणीस), खेळीया (दत्ता भगत), थांबा! रामराज्य येतंय! (प्रकाश त्रिभुवन), घट डोईवर घट कमरेवर (रा. द. अरगडे), भाई तुम्ही कुठे आहात! (ऋषिकेश कांबळे), कथा खैरलांजी व ग्लोबल आडगाव (अनिलकुमार साळवे) या नाटकांतून सरंजामशाही वृत्तीवर प्रखर भाष्य आले आहे.

रा. द. अरगडे यांच्या घट डोईवर घट कमरेवर या नाटकामध्ये गुंडेवाडी या गावातील संरजामी वृत्तीच्या प्रतापराव सरपंचांनी दलित समाजावर केलेल्या अन्यायाचे चित्रण आले आहे. दलित समाजाने 'दुष्काळातही सार्वजनिक विहिरीवर पाणी भरायचे नाही, डोळ्यात डोळे घालून बोलायचे नाही, सार्वजनिक निवडणुकीत उभे राहायचे नाही, स्वतःच्या लेकी तमाशामध्ये नाचवायच्या, निमूटपणे सगळे सहन करायचे अशा प्रकारची सरंजामी व्यवस्था गुंडेवाडी या गावामध्ये होती.' या सरंजामी वृत्तीला प्रखर विरोध करत ही व्यवस्थाच उलथून टाकण्याचे काम या नाटकातील सुरेश व सखाराम करतात.

थांबा! रामराज्य येतंय! या नाटकाला मराठवाडा विद्यापीठ नामांतराची पार्श्वभूमी लाभली आहे. या नाटकामध्ये लेखकाने आनंद या नायकाचा सरंजामी वृत्तीविरुद्धचा संघर्ष चित्रित केला

आहे. पोलिस पाटलाच्या जागेसाठी अर्ज भरण्यावरून पाटील आणि आनंद यांच्यामध्ये या नाटकात संघर्ष निर्माण झाला आहे. पाटलांनी वेगवेगळे डाव टाकत आनंदवर मात करण्याचा प्रयत्न केला आहे. आनंदची आईदेखील आनंदला सांगते 'माघार घे' त्यांच्याशी मुकाबला आपण करू शकत नाहीत, तुझ्या बापजाद्यांनी नाही केलं ते तू करणार का? असा प्रश्न विचारताच आनंद म्हणतो, "होय. बाबासाहेबांनी आम्हाला अन्यायाविरूद्ध लढायला सांगितलंय. 'मोडेन पण वाकणार नाही' असा बाणा होता त्यांचा. मीही पाटलापुढं झुकणार नाही."[९] आंबेडकरी विचारांच्या आनंदने सरंजामी वृत्तीच्या पाटालांशी केलेला संघर्ष थांबा! रामराज्य येतंय! या नाटकात प्रकाश त्रिभुवन यांनी चित्रित केला आहे.

४.१.११ भ्रष्ट व्यवस्थेवरील परखड भाष्य :

भ्रष्टाचार ही समाजाला लागलेली कीड असून मराठवाड्यातील अनेक नाटककारांनी आपल्या नाट्यलेखनातून भ्रष्ट व्यवस्थेवर परखड भाष्य केले आहे. थांबा! रामराज्य येतंय!, घट डोईवर घट कमरेवर, ग्लोबल आडगाव, वडगाव लाईव्ह, शतखंड, डॉक्टर! तुम्हीसुद्धा... इत्यादी नाटकांमधून भ्रस्ट व्यवस्थेवर प्रहार केले आहेत. थांबा! रामराज्य येतंय!, घट डोईवर घट कमरेवर या नाटकात ग्रामीण भागातील सरपंच, पोलीस पाटील आणि एकूणच सरंजामी व भ्रष्ट प्रतिगामी व्यवस्थेवर लेखकाने भाष्य केले आहे. वाटा-पळवाटा, भाई तुम्ही कुठे आहात!, शिवाजी अंडरग्राऊंड इन भिमनगर मोहल्ला या नाटकांमध्ये स्वार्थी राजकारणासाठी, भ्रष्टपणे मालमत्ता कमविण्यासाठी महापुरुषांच्या नावांचा कसा गैरवापर केला जातो याचे चित्रण येते. मुखवट्याआडच्या भ्रष्ट चेहऱ्यांना समोर आणण्याचे, त्यांना उघडे पाडण्याचे काम नाटककारांनी या नाटकांतून केले आहे.

डॉक्टर! तुम्हीसुद्धा... हे वैद्यकीय व्यावसायासारख्या पवित्र क्षेत्रातील भ्रष्ट वर्तनुकीवर परखडपणे भाष्य करणारे नाटक आहे. लवकरात लवकर श्रीमंत होण्यासाठी रूग्नाच्या भावनेशी व एकूण माणुसकीशी प्रतारणा करणारे डॉक्टर या नाटकात अजित दळवी यांनी चित्रित केले आहेत. गर्भाशयाचा काळा बाजार या नाटकात लेखकाने उघडकीस आणला आहे. या नाटकामध्ये वैद्यकीय व्यवसायातील भ्रष्टाचाराची झळ सर्वसामान्य कुटुंबातील रत्नाला बसली आहे. या नाटकात जीचे गर्भाशय पळवले आहे ती रत्ना वैद्यकीय व्यावसायातील भ्रष्ट व्यवस्थेवर भाष्य करताना म्हणते,

"वा रे डाक्टर, वा रे तुमच्या डिग्र्या, वा रे तुमचा अनुभव, चुलीत घाला त्या पदव्या न ते शिक्षण. मानसानं मानसाशी वागावं तसं वागता येत नसेल तर करायचं काय तुमचं शिक्षन! तुमच्यावर विश्वास ठेवून एक बाई तिला मूल का होत नाही ते विचारायला येते तर तुम्ही तिला मूल कधीच होणार नाय याची वेवस्थाच करून टाकता?"[१०] रत्नाच्या या आर्त संवादातून वैद्यकीय व्यावसायातील भ्रष्ट व अनैतिक वर्तनावर अजित दळवी यांनी प्रकाश टाकला आहे.

४.१.१२ लोकाविष्काराचा प्रभाव :

एकूण मराठी रंगभूमीवर लोकाविष्काराचा प्रभाव आहे. कारण लोकाविष्काराच्या प्रभावातूनच मराठी रंगभूमीचा उदय झाला आहे. आधुनिक रंगभूमीवरील अनेक नाटककारांनी आपल्या नाटकातील आशय प्रभावीरित्या पोहचवण्यासाठी लोककलांमधील वेगवेगळ्या लोककलांचा वापर केला आहे. घाशीराम कोतवाल, लोककथा-७८, महानिर्वाण, झुलवा अशा अनेक नाटकांतील लोकाविष्काराच्या प्रभावामुळे नाट्याशय तीव्र झाला आहे. मराठवाडी रंगभूमीवरही लोकाविष्काराचा पगड आहे. थांबा! रामराज्य येतंय!, आडगावचे चौधरी, घट डोईवर घट कमरेवर, युगयात्रा, शिवाजी अंडरग्राऊंड इन भिमनगर मोहल्ला अशा नाटकांतून लोककलांचा यशस्वीपणे वापर केला आहे. आडगावचे चौधरी या नाटकात लोकनाट्याच्या आधारे लेखकाने आविष्कार केला आहे. तर थांबा! रामराज्य येतंय! या नाटकात प्रकाश त्रिभुवन यांनी पोतराज व दशावतारी खेळातून नाटकाला अधिक गंभीर वळण दिले आहे.

४.१.१३ प्रखर सामाजिक भान :

प्रखर सामाजिक भान हे मराठवाडी रंगभूमीचे मूलभूत वैशिष्ट्य आहे. साडेसहाशे वर्ष मुस्लिम राजवटीच्या झोत भट्टीत शेकून निघालेली मराठवाडी माणसे 'मनोरंजन' हा शब्दच विसरले होते. गांभीर्य हाच त्यांच्या जगण्याचा स्थायिभाव झाला होता. मराठी नाटककारही याला अपवाद नाहीत. भोवतालच भयानक गंभीर असल्यामुळे अपोआपच नाटककारांच्या नाटकातही प्रखर सामाजिक भान अभिव्यक्त झाले. मराठी रंगभूमीवर कौटुंबिक व रंजनप्रधान नाटकांची रेलचेल असताना मराठवाडी रंगभूमीने मराठी रंगभूमीचा अनुनय न करता आपले सत्व आणि स्वत्व जपले त्यामुळेच सामाजिक समस्यांचा आविष्कार मराठवाडी रंगभूमीवर अधिक जाणवतो.

मराठवाड्यामध्ये स्वातंत्र्यपूर्व कालखंडात जेव्हा प्रत्यक्ष नाट्यलेखनाला सुरूवात झाली नव्हती परंतु नाट्य सादरिकरणाला मात्र महत्त्व आले होते. त्या काळात बाहेरून जी नाटके मराठवाड्यातील सोयगावसारख्या रंगभूमीवर सादर होत असत तीही सामाजिक भान असणारीच नाटके होती. स्वातंत्र्यपूर्व कालखंडात मराठवाड्यातील लेखकांनी लिहिलेली बेबी, संगीत तोड ही माळ अर्थात गंगालहरी ही नाटकेही प्रखर सामाजिक भान असणारीच होती. स्वातंत्र्योत्तर काळातील युगयात्रा, वाटा-पळवाटा, खेळीया, डॉक्टर! तुम्हीसुद्धा..., चारचौघी, चाहूल, शतखंड, समाजस्वास्थ्य, भाई तुम्ही कुठे आहात!, स्मारक, आडगावचे चौधरी, गावगारूड, थांबा! रामराज्य येतंय!, गणनायिका आम्रपाली, आकडा, आकाश ओढ, काळी माया, रिअल इस्टेट, शिवाजी अंडरग्राऊंड इन भिमनगर मोहल्ला, स्टॅच्यू ऑफ लिबर्टी, ग्लोबल आडगाव अशा सर्वच नाटकातून प्रखर सामाजिक भान किंवा सामाजिक प्रश्न लेखकाने हाताळले आहेत.

सामाजिक भान असणाऱ्या नाटकांमधून युगानुयुगे दलित समाजाचे होणारे शोषण, शेतकऱ्यांचे दैन्य, स्त्रियांची होणारी अवहेलना व तिला दिलेले दुय्यमत्व, महापुरूषांच्या नावाने होणारी स्वार्थसिद्धी, बदलत्या समाजाबरोबर बदलत जाणारे प्रश्न आणि निर्माण होणारी नवनवीन आव्हाने मराठवाड्यातील नाटककारांनी अचूकपणे टिपली आहेत. मराठवाड्याच्या रंगभूमीवर आलेल्या जवळपास प्रत्येक नाटकांतून कोणती तरी समस्या चित्रित केली आहे. त्यामुळे समस्येच्या निमित्ताने सामाजिक भान मराठवाडी नाटकातून व्यक्त झाले आहे.

४.१.१४ वास्तववादी समाजचित्रण :

मराठी रंगभूमीवर संगीत नाटके, कौटुंबिक नाटके, विनोदी नाटके, वास्तववादी नाटके अशा अनेक प्रवाहातील नाट्यलेखन झाले आहे. मराठवाड्यातील रंगभूमीची प्रवृत्ती मात्र वास्तववादी आहे. आपला भोवताल व भोवतालातील विविध प्रश्न मांडण्याचा प्रकर्षाने प्रयत्न मराठवाड्यातील नाटककारांनी केला आहे. रंजनपरता मराठवाडी नाट्यात अभावानेच आढळते. शेतकरी, दलित समाज व स्त्रियांचे दु:ख मराठवाडी रंगभूमीने प्रकर्षाने आविष्कृत केले आहे. आपल्या लिबर्टीचाच कसा स्टॅच्यू झाला आहे हे स्टॅच्यू ऑफ लिबर्टी या नाटकातून दिसून येतो. तर आकडा, ग्लोबल आडगाव, वडगाव लाईव्ह या नाटकांनी ग्रामीण वास्तवाला कवेत घेतले आहे. आमदार सौभाग्यवती, चारचौघीमधून स्त्रीचा कोंडमारा व तिला आलेले भान व्यक्त केले आहे. तर चाहूल,

रिअल इस्टेअ सारखी नाटके नव्वदोत्तरी काळातील समस्यांना नाट्यात्म रूप देतात. एकूणच मराठवाडी रंगभूमीची मूळ प्रवृत्ती ही वास्तववादी नाटकाची आहे.

४.१.१५ स्त्री नाटककारांचा अभाव :

मराठी रंगभूमीवरच स्त्री नाटककारांचा अभाव जाणवतो. मोजक्याच स्त्री नाटककारांनी मराठी रंगभूमीसाठी योगदान दिले आहे. मराठवाडी रंगभूमीवरील स्त्री नाटककारांचे प्रमाण तर आणखीनच अत्यल्प आहे. रेखा बैजल, अनुराधा वैद्य, सुनंदा गोरे, लीला शिंदे, जयश्री गोडसे अशा मोजक्याच स्त्री नाटककारांनी मराठवाडी रंगभूमीला योगदान दिले आहे. कांचन संगीत, शोभना व्यास अशा काही नाटककारही मराठवाडी रंगभूमीवर योगदान देत असल्या तरी हे प्रमाण नगन्य आहे. या नाटककार स्त्रियांशिवाय अनुया दळवी यांनी नाटकाच्या अनुवादाच्या क्षेत्रात मोलाचे योगदान दिले आहे. असे असले तरी पुरूष लेखकांच्या तुलनेत मराठी आणि मराडवाडी रंगभूमीवर स्त्री नाटककारांचा अभाव आहे, हे निश्‍चित.

४.१.१६ संमिश्र भाषा :

मराठवाडा हा प्रदेश साडेसहाशे वर्ष मुस्लिमांच्या अधिपत्याखाली होता. १९ व्या शतकात इंग्रजांच्या अधिपत्याखाली महाराष्ट्राशी मराठवाड्यातील जनतेचा संपर्क झाला. राज्यकारभार व व्यापाराच्या निमित्ताने मराठवाड्यातील जनतेचा इतरत्र संपर्क आल्यामुळे, मराठवाड्यामध्ये संस्कृत, हिंदी, मराठी, इंग्रजी, आरबी, फार्सी, ऊर्दू इत्यादी भाषेतील शब्द संभाषणादरम्यान वापरले जातात. नाटककार हाही समाजशील व्यक्ती असल्यामुळे त्याच्या नाट्यलेखनात असे वेगळेगळ्या भाषेतील शब्द येणे स्वाभाविक आहे.

मराठवाड्यातील नाटकांच्या नावावरून हा प्रभाव किती गाढा आहे हे लक्षात येते. भाई तुम्ही कुठे आहात!, सेलिब्रेशन, स्टॅच्यू ऑफ लिबर्टी, शिवाजी अंडरग्राऊंड इन भिमनगर मोहल्ला, रिअल इस्टेट, फैसला, वऱ्हाड निघालय लंडनला, नैनंदहति पावक:, इस्किलार, ग्लोबल आडगाव, वडगाव लाइव्ह, आर यू व्हर्जिन या सर्व नाटकांच्या शीर्षकात वेगवेगळ्या भाषेतील शब्दांचा प्रयोग झालेला आहे. संस्कृत, मराठी, हिंदी, उर्दु, आरबी, फार्सी, इंग्रजी भाषेतील शब्दांबरोबर ग्रामीण मराठवाड्यातील शब्दही मराठवाड्यातील नाटकामध्ये मोठ्या प्रमाणात आढळतात. वेगवेगळ्या भाषेतील शब्दांमुळे मराठवाड्यातील नाटकांची भाषाही संमिश्र स्वरूपाची झाली आहे.

उपरोक्त वैशिष्ट्यांशिवाय मराठवाड्यातील रंगभूमीची इतर अनेक वैशिष्ट्ये आहेत. त्यामध्ये वैचारिकता, चिंतनशीलता, काव्यात्म भाषेचा अवलंब, उपहासगर्भ शैली, अर्थवाही प्रतिकांचे उपयोजन, रूढ संकेतांचे विडंबन, तीक्ष्ण व तीरकस नाट्यसंवाद, संमिश्र स्त्री प्रतिमा, कर्मकांडातील फोलपणावर भाष्य, प्रतिमा-प्रतिके-मिथकांचा प्रभाव, उपरोधिकता, स्वातंत्र्य-समता-बंधुतेचा पुरस्कार, आशयाभिव्यक्तीचे अद्वैत, नाट्यसंहितांच्या मूद्रणाकडे दूर्लक्ष, संगीत नाट्यलेखनाचा अभाव, हौशी नाटकांचे प्राबल्य, आशय-विषयातील नाविन्याची ओढ, बालरंगभूमीकडे दूर्लक्ष, स्पर्धाकेंद्री दृष्टिकोन, समर्पण दृष्टीचे रंगकर्मी, नाट्यसंस्थांची रेलचेल, समकालीन प्रश्नांचे भान, राष्ट्रवादी भावनेचा आविष्कार, रंग भाषेचा प्रभावी वापर, मराठी नाट्यपरंपरेतील रूढ नाट्यसंकेतांचे उल्लंघन इत्यादी वैशिष्ट्यांचा अंतर्भाव होतो. मराठवाडी रंगभूमी ही या वैशिष्ट्यांमुळेच आपले वेगळे अस्तित्व सिद्ध करते.

४.२ मराठवाड्यातील रंगभूमीचे वेगळेपण :

आधुनिक स्वरूपाच्या नाट्यलेखनाला मराठवाड्यामध्ये १९१९ मध्ये सुरूवात झाली असली तरी त्यापूर्वीपासूनच मराठवाड्यामध्ये नाट्य चळवळ अस्तित्वात होती. लोटू पाटील यांचे वडील रामजी पाटील यांनी एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धामध्ये सोयगाव रंगभूमीवर विविध लोककलांबरोबर नाटके सादर केली आहेत. त्यामुळे मराठवाड्यातील नाट्यलेखनापेक्षा नाट्य चळवळीचा मोठा इतिहास आहे. एकूण मराठी रंगभूमीचा आधुनिक दृष्टिकोनातून विचार केल्यास मराठवाड्यातील रंगभूमी ही मराठी रंगभूमीपेक्षा जवळपास ऐंशी वर्ष मागे आहे. मराठी रंगभूमीच्या अभ्यासकांनी लिहिलेल्या नाटकाच्या इतिहासानुसार आज मराठी रंगभूमीला १८० वर्षांची तर मराठवाडी रंगभूमीला १०० वर्षांची परंपरा आहे. या शंभर वर्षाच्या परंपरेमध्ये मराठवाडी रंगभूमीने मराठी रंगभूमीवर स्वतंत्र अस्तित्व निर्माण करत आपले वेगळेपण टिकवून ठेवले आहे. मराठवाड्यातील रंगभूमीचे हे वेगळेपण पुढील मुद्यांच्या आधारे सिद्ध होते.

१) संत एकनाथ महाराज यांचे प्रत्येक भारूड ही एक नाट्यसंहिताच आहे हे अनेक अभ्यासकांनी सिद्ध केले आहे. मराठी रंगभूमीच्या अभ्यासकांनी विष्णुदास भावे यांना मराठी रंगभूमीचे जनकत्व बहाल केले आहे. वास्तविक पाहता भावे यांचे १८४३ साली रंगभूमीवर

सादर झालेले सीता स्वयंवर हे नाटक आध्यात्मिक प्रवृत्तीचे आहे. भावे यांच्या जवळपास दोनशे वर्ष अगोदर संत एकनाथ महाराजांनी भारूड रचना केली आहे. भावे यांच्या नाटकात असणारे संगीत, नृत्य, अभिनय, रंगभूषा, वेषभूषा विविध भावमुद्रा हे सर्वच घटक एकनाथी भारूडामध्ये आढळतात. भावे यांचे नाटक आध्यात्मिक प्रवृत्तीचे आहे या उलट संत एकनाथी भारूड हे वास्तववादी व अधिक समाजसन्मुख आहे. म्हणजे वास्तव जीवनचित्रण व समाजसन्मुखता या वेगळेपणाच्या आधारे संत एकनाथ महाराज हेच मराठी रंगभूमीचे प्रवर्तक, आद्य नाटककार ठरतात. एकनाथी भारूड आणि सीता स्वयंवर या नाटकातील आशय, विषय, सादरिकरणातील हे वगळेपण अधोरेखित करत अनेक अभ्यासकांनी संत एकनाथ महाराजांना आद्य नाटककाराचा मान दिला आहे.

२) मराठवाडा हा नाट्यवेडा आहे. हे नाट्यवेड जोपासण्यासाठी मराठवाड्यातील अनेक गावांमध्ये नाट्यसंस्थाच्या मार्फत नाट्य चळवळ राबविण्यात आली. पैठण येथील साळीवाडा रंगभूमी, सोयगाव रंगभूमी, चिकठणा रंगभूमी, सेवली रंगभूमी, जाफ्राबाद रंगभूमी अशा अनेक रंगभूमींना शंभर वर्षापेक्षा अधिकचा इतिहास आहे. मराठी रंगभूमीसाठी इंग्रजांच्या राजवटीत पोषक वातावरण असताना रंगभूमीची होणारी वाढ ही स्वाभाविक आहे. परंतु मराठवाड्यामध्ये निजामी राजवटीच्या भाषिक-साहित्यिक-सांस्कृतिक गळचेपीच्या काळातही मराठवाड्यातील रंगकर्मींनी रंगभूमीची चळवळ टिकवून ठेवली. प्रतिकूल परिस्थितीतही समर्पण दृष्टीने नाट्यसेवा करत रंगभूमीची वाढ करणे यातून मराठवाड्यातील रंगभूमीचे वेगळेपण सिद्ध होते.

३) व्यवसायासाठी नव्हे तर नाटकासाठी नाटक करणे हे मराठवाड्यातील रंगभूमीचे महत्त्वाचे निराळेपण आहे. समर्पण दृष्टीने मराठवाड्यात नाट्य चळवळ रूजवणारे रंगकर्मी लोटू पाटील सातत्याने म्हणत 'आम्ही नाटकासाठी नाटक' करतो. स्वातंत्र्योत्तर कालखंडातही मराठवाड्यामध्ये हौशी रंगभूमीची झपाट्याने वाढ झालेली आहे. वाटा-पळवाटा, डॉक्टर! तुम्हीसुद्धा..., चारचौघी, शिवाजी अंडरग्राऊंड इन भिमनगर मोहल्ला अशा अनेक नाटकांनी व्यावसायिक रंगभूमीवर यश मिळविले हे सत्य आहे. परंतु सुरूवातीला ही सर्वच नाटके

प्रायोगिक रंगभूमीसाठीच लिहिलेली होती परंतु व्यापक नाट्याशयामुळे या नाटकांना व्यावसायिक यश मिळाले. परंतु मराठवाडी रंगभूमीची मूळ प्रवृत्ती ही हौशी किंवा प्रायोगिक स्वरूपाचीच आहे. व्यवसाय म्हणून नाटक करण्यापेक्षा नाटकासाठी नाटक करणे मराठवाडी रंगभूमीचा स्वभाव व वेगळेपण आहे.

४) १९५५ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सांगण्यावरून व त्यांच्या वैचारिक प्रेरणेतून म. भि. चिटणीस यांनी युगयात्रा हे नाटक लिहिले. युगानुयुगे दलित समाजावर होणाऱ्या अन्याय अत्याचाराची मीमांसा चिटणीस यांनी या नाटकात केली आहे. १९५६ मध्ये या नाटकाचा पहिला प्रयोग डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या धर्मांतरावेळी नागपूरच्या दीक्षाभूमीवर झाला. या प्रयोगासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासह जवळपास सहा लक्ष जनसमुदाय होता. एकाच वेळी सहा लक्ष लोकांनी नाटकाचा आस्वाद घेणे ही जागतिक रंगभूमीच्या दृष्टीने वेगळीच घटना होती. ही घटना मराठवाड्यातील रंगभूमीचे वेगळेपण सिद्ध करणारी आहे.

५) आपल्या आशयाभिव्यक्तीच्या भिन्नतेमुळे जागतिक रंगभूमीवर नावाजलेली दलित रंगभूमी ही महत्त्वाची नाट्य चळवळ आहे. या दलित रंगभूमीचे बिजारोपण झाले ते मराठवाड्यामध्ये. औरंगाबादच्या नागसेन परिसरातील मिलिंद महाविद्यालयाचे प्राचार्य म. भि. चिटणीस यांचे युगयात्रा हे दलित रंगभूमीवरील पहिले नाटक होय. या नाटकानंतर मराठी रंगभीवर दलित जीवनावरील नाटके येऊ लागली. त्यामुळे मराठी रंगभूमी अधिकच आशयसंपन्न झाली. १९६८ नंतर अस्मितादर्श या नियतकालिकांच्या रूपाने गंगाधर पानतावणे यांनी दलित नाटककारांना वाङ्मयीन व्यासपीठ मिळवून दिले. त्यामुळे केवळ मराठवाड्यातील नव्हे तर एकूण मराठीतील साहित्यिक-नाटककारांना अस्मितादर्शचा फायदा झाला. युगयात्रा या नाटकाच्या प्रभावातून १९७० ते ९० या कालखंडात अनेक नाटके दलित रंगभूमीवर आली. एकूणच दलित रंगभूमी ही मराठवाडी रंगभूमीची देण आहे.

६) महाविद्यालयीन रंगभूमी किंवा कॉलेज थिएटर यातून मराठवाड्यातील रंगभूमीचे वेगळेपण सिद्ध होते. मराठी रंगभूमीची वाढ ही वेगवेगळ्या व्यावसायिक नाट्यसंस्थांनी सादर केलेल्या

नाटकांमधून झाली आहे. तर स्वातंत्र्योत्तर मराठवाड्यातील नाट्यलेखन, सादरिकरणाचे केंद्र हे महाविद्यालय आहे. विशिष्ट महाविद्यालयाशी संबंधित नाटककार नाट्यलेखन करतो, त्याच महाविद्यालयातील दिग्दर्शक, नट, प्रेक्षक ते नाटक महाविद्यालयाच्या रंगमंचावर सादर करतात. प्रसंगी ही नाटके नाट्यस्पर्धामध्येही सादर होतात. मराठवाड्यातील झुलते मनोरे, युगयात्रा, वऱ्हाड निघालंय लंडनला, भाई तुम्ही कुठे आहात! अशी नाटके ही महाविद्यालयीन रंगभूमीवरच उदयास आलेली आहेत. महाविद्यालयीन लेखक, दिग्दर्शक, नट-नटी, प्रेक्षक, रंगमंच यांच्या साहाय्याने मोठी होणारी महाविद्यालयीन रंगभूमी ही मराठवाडी नाटकाचे वेगळेपण आहे.

७) प्रा. लक्ष्मणराव देशपांडे यांचे वऱ्हाड निघालंय लंडनला हे एकपात्री नाटक मराठवाड्यातील रंगभूमीचे वेगळेपण सिद्ध करणारे आहे. १९७९ ते २००४ या काळात जवळपास पंचवीस वर्षे हे नाटक जागतिक रंगभूमी गाजवत होते. अस्सल मराठवाडी बोलीतील या नाट्यात ५२ पात्रे आणि २१ वेगवेगळे आवाज एकटे लक्ष्मणराव देशपांडे काढत असत. अभिनयाशी कुठलिही तडजोड न करता देशपांडे यांनी प्रत्येक व्यक्तिरेखा ठसठशीतपणे साकारली आहे. नाट्यसंवाद, अभिनय व विशिष्ट लकबीच्या बळावर हे नाटक औरंगाबादमधून मुंबई व मुंबईहून थेट अमेरिका, इंग्लड, कॅनडा, ऑस्ट्रेलिया आदी देशात पोहचले. २००४ मध्ये २००० प्रयोगांचा विक्रम करत या नाटकाने गिनिज बुक ऑफ वल्ड रेकॉर्डमध्ये स्थान मिळविले.

८) नाटकांच्या विषयाची विविधता हे मराठवाड्यातील नाट्यलेखनाचे महत्त्वाचे वेगळेपण आहे. मराठी रंगभूमीवर विषयांचे साचलेपण आलेले असताना मराठवाड्यामध्ये मात्र नाटकामधून वेगवेगळे विषय मांडले जात आहेत. आशयाभिव्यक्तीने सशक्त असणारे दलित नाटक, दलित चळवळीतील आंतर्विरोध दर्शवणारे वाटा-पळवाटा व भाई तुम्ही कुठे आहात! ही नाटके, वैद्यकीय क्षेत्रातील भ्रष्ट प्रवृत्तीवर भाष्य करणारे डॉक्टर! तुम्हीसुद्धा!, खंबीर स्त्री प्रतिमा साकारणारे चारचौघी, राजकारणातील स्त्रियांचे स्थान दर्शविणारे आमदार सौभाग्यवती, शिवरायांची वेगळी प्रतिमा उभी करणारे शिवाजी अंडरग्राऊंड इन भिमनगर

मोहल्ला, माणसाच्या लिबर्टीचाच कसा स्टॅच्यू झाला आहे हे दर्शविणारे स्टॅच्यू ऑफ लिबर्टी अश विविध विषयावरील नाटकांनी मराठवाडी रंगभूमीचे वेगळेपण अधोरेखित केले आहे.

९) मराठी रंगभूमीवरील कौटुंबिक व समस्याप्रधान नाटकांच्या परंपरेला छेद देत मराठवाड्यातील नाटककारांनी अधिक अंतर्मुख, चिंतनशील व समाजसन्मुख नाट्यलेखन केले आहे. 'मराठी रंगभूमीवरील सशक्त व आशयपूर्ण नाट्यसंहिता आज मराठवाड्यात लिहिल्या जातात' हे ज्येष्ठ दिग्दर्शक अमोल पालेकर यांचे विधान मराठवाड्यातील नाट्यसंहितांचे वेगळेपण सिद्ध करणारे आहे.

१०) नाट्यधर्मी मराठवाडा हा त्र्यंबक महाजन यांचे नाटक या विषयावरील अगळावेगळा ग्रंथ आहे. नटी व सूत्रधार यांच्या करवी मराठवाड्यातील रंगभूमीचा इतिहास नाट्यमय पद्धतीने या ग्रंथामध्ये लेखकाने मांडला आहे. मराठवाड्यातील नाट्यपंरपरेवरील हे नाटकच आहे. नाटकाच्या परंपरेचा नाट्यात्म इतिहास लिहिण्याचा प्रयत्न २०११ मध्ये मराठी रंगभूमीच्या तीस रात्री या ग्रंथात मकरंद साठे यांनी केला आहे. परंतु त्र्यंबक महाजन यांचा 'नाट्यधर्मी मराठवाडा' हा ग्रंथ २००५ मधील असून आपले वेगळेपण सिद्ध करणारा आहे.

११) मराठवाड्यातील नाटकाच्या भाषेमध्ये वेगळेपण आढळते. मराठवाडा हा प्रदेश साडेसहाशे वर्ष मुस्लिम राजवटीमध्ये असल्यामुळे अरबी, फार्सी, उर्दू या भाषांतील शब्दांचा प्रभाव मराठी भाषेवर जाणवतो. याशिवाय संस्कृत, हिंदी, इंग्रजी अशा विविध भाषेतील शब्द मराठवाड्यातील नाटकांमध्ये आढळतात. वेगवेगळ्या भाषेतील शब्द मराठवाड्यामध्ये आता एवढे रूळले आहेत की, ते परभाषिक शब्द आहेत हेही अनेकदा लेखकांना माहीत नसल्यामुळे सहज नाट्यलेखनामध्ये येतात.

समारोप :

एकंदरीत, मराठवाड्यातील रंगभूमीची वैशिट्ये व वेगळेपण उपरोक्त मुद्यांच्या आधारे सिद्ध करता येते. आज मराठवाड्यातील रंगभूमी ही आपल्या वेगळेपणामुळेच मराठी रंगभूमीवर वैशिष्ट्यपूर्ण ठरली आहे. मराठवाड्यातील रंगभूमीने स्वतःचा विकास करत असतानाच मराठी रंगभूमीही आशय, विषय, आकृतिबंध, नाट्यतंत्र व एकूणच अभिव्यक्तीच्या दृष्टीने समृद्ध केली आहे. आज सशक्त नट, नाटककार, दिग्दर्शक मराठवाड्यामध्ये आहेत. सर्वांगीण विचार करता मराठवाड्यातील रंगभूमीचे भवितव्य उज्ज्वल आहे, असे म्हणता येईल.

संदर्भसूची

१. साळुंके सतीश, मराठवाड्याची नाट्यपरंपरा, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद, प. आ. नोव्हे २०२१, पृ. ५०७.

२. भावे पु. भा., प्रस्तावना, शतखंड, अजित दळवी, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प. आ. १९८७, पृ. ७.

३. कांबळे ऋषिकेश, भाई तुम्ही कुठे आहात!, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, प. आ. मार्च २०१६, पृ. १७.

४. बोराडे रा. रं., मुलाखत, मराठवाड्याची नाट्यपरंपरा, सतीश साळुंके, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, प. आ. नोव्हें. २०२१, पृ. ८१२.

५. महाजन त्र्यंबक, मराठवाडा रंगभूमी : स्वरूप आणि स्व-रूप, मराठवाडा : सृजन आणि साहित्य, संपा. मिलिंद कांबळे, इसाप प्रकाशन, नांदेड, प. आ. मार्च २०११, पृ. २२८-२२९.

६. कलंदर (कानोकानी महाराष्ट्र टाइम्स), चाहूल, प्रशांत दळवी, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प. आ. १९९९, मलपृष्ठ.

७. दळवी प्रशांत, चाहूल, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प. आ. १९९९, पृ. ४७-४८.

८. देशमुख चित्ररेखा, मनोगत, आडगावचे चौधरी, कुमार देशमुख, जनशक्ती वाचक चळवळ, औरंगाबाद, प. आ. जाने. २०१२, पृ. ०३.

९. त्रिभुवन प्रकाश, थांबा! रामराज्य येतंय!, आनंद प्रकाशन, औरंगाबाद, प. आ. जाने. १९९४, पृ. २३.

१०. दळवी अजित, डॉक्टर! तुम्हीसुद्धा..., पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, ति. आ. २००४, पृ. १४.

प्रकरण पाचवे
समारोप व निष्कर्ष

'मराठवाड्यातील मराठी नाट्यलेखन आणि नाट्य चळवळीचा अभ्यास' या बृहत शोध प्रकल्पामध्ये एकूण पाच प्रकरणांचा समावेश आहे. मागील चार प्रकरणांमध्ये मराठवाड्यातील नाट्यलेखन आणि नाट्य चळवळीविषयी विविध अंगाने चर्चा करण्यात आली आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये मागील चारही प्रकरणांचे साररूपाने विवेचन करून अभ्यासाअंती निघालेले निष्कर्ष नोंदवणे अभिप्रेत आहे.

मराठवाड्यातील मध्ययुगीन व आधुनिक मराठी साहित्य हे प्रकल्पातील पहिले प्रकरण आहे. या प्रकरणाच्या सुरूवातीस मराठवाडा प्रदेशाविषयी मांडणी केली आहे. त्यानंतर मराठवाड्यातील मध्ययुगीन साहित्याच्या अनुशंगाने नाथ संप्रदाय, वारकरी संप्रदाय, महानुभाव संप्रदाय, पंडिती साहित्य या घटकांचे विवेचन केले आहे. त्याचबरोबर महाकवी नरेंद्र, भास्करभट्ट बोरिकर, आद्य कवयित्री महदंबा, संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ, संत बहिणाबाई, संत जनाबाई, आद्यकवी मुकुंदराज, दासोपंत, समर्थ रामदास, कलाकवी मुक्तेश्वर, वामन पंडीत, हरी वामन या ग्रंथकारांच्या-साहित्याचा आढावा घेतला आहे.

आधुनिक साहित्यासंदर्भात मराठवाड्यातील कथालेखन, मराठवाड्यातील कादंबरीलेखन, मराठवाड्यातील काव्यलेखन यावर विस्तृत विवेचन केले आहे. हे विवेचन करत असताना मराठवाड्यातील प्रमुख कथाकार, कादंबरीकार व कवींच्या लेखनाचा विस्तृत आढावा घेतला आहे. त्यासोबतच मराठवाड्यातील आत्मचरित्रे, मराठवाड्यातील दलित व भटक्या-विमुक्तांची स्वकथने, मराठवाड्यातील ललित गद्य, मराठवाड्यातील अनुवादीत साहित्य, मराठवाड्यातील वैचारिक साहित्य व मराठवाड्यातील साहित्य समीक्षा आणि संशोधनाचा परामर्श घेतला आहे. एकूणच प्रस्तुत प्रकरणामध्ये मराठवाड्यातील मध्ययुगीन व आधुनिक साहित्यिकांचा व त्यांनी लिहिलेल्या साहित्याचा ससंदर्भ अभ्यास केला आहे.

मराठवाड्यातील नाट्य चळवळ हे शोध प्रकल्पातील दुसरे प्रकरण आहे. या प्रकरणामध्ये मराठवाड्यातील औरंगाबाद, उस्मानाबाद, परभणी, नांदेड, बीड, जालना, लातूर व हिंगोली

जिल्ह्यातील नाट्य चळवळीची अभ्यासपूर्ण मांडणी केली आहे. प्रत्येक जिल्ह्यातील नाट्यसंस्था, रंगकर्मी त्या त्या नाट्यसंस्थेने सादर केलेली नाटके, स्पर्धेत घेतलेला सहभाग, मिळवलेले यश या बाबींचाही ऊहापोह केला आहे. विशेषतः साळीवाडा रंगभूमी, सोयगाव रंगभूमी, चिकलठाणा रंगभूमी, बारूळ रंगभूमी, चकलांबा रंगभूमी, सिरसाळा रंगभूमी संदर्भात सविस्तर विवेचन केले आहे. त्याचबरोबर मराठी रंगभूमी आणि मराठवाड्यातील नाट्यपरंपरा या घटकाअंतर्गत एकूण मराठी रंगभूमीचा उदय, मराठी रंगभूमीवरील पहिले नाटक व नाटककार, रंगभूमीवर झालेले बदल व एकूणच मराठवाड्यातील रंगभूमी, मराठवाड्यातील रंगकर्मी आणि मराठी रंगभूमीच्या वाटचालीवर संदर्भासह विवेचन केले आहे.

मराठवाड्यातील मराठी नाट्यलेखनाचे स्वरूप हे या शोध प्रकल्पातील तिसरे प्रकरण आहे. प्रकरणाच्या सुरूवातीस मराठवाड्याची नाट्यपरंपरा मांडण्याबरोबर संत एकनाथ महाराजांचे नाट्यात्म योगदान विशद केले आहे. त्यानंतर मराठवाड्यातील १९६० पुर्वीचे नाटक, मराठवाड्यातील दलित नाटक, मराठवाड्यातील व्यावसायिक नाटक, मराठवाड्यातील ग्रामीण नाटक, मराठवाड्यातील प्रायोगिक नाटक, मराठवाड्यातील बालनाट्य, मराठवाड्यातील स्त्रियांचे नाटक, मराठवाड्यातील अनुवादीत नाटक या घटकांच्या आधारे मराठवाड्यातील शंभर वर्षांच्या नाट्यपरंपरेचे स्वरूप शब्दबद्ध केले आहे. तसेच भगवंत तोडेवाले, श्रीपाद बेंडे, शंकरलाल पुरवार, दिवाकर कृष्ण केळकर, त्र्यंबक महाजन, म. भि. चिटणीस, लक्ष्मणराव देशपांडे, अजित दळवी, प्रशांत दळवी, दत्ता भगत, प्रकाश त्रिभुवन, रा. रं. बोराडे, रा. द. अरगडे, ऋषिकेश कांबळे, राजकुमार तांगडे, ना. धों. महानोर, कुमार देशमुख, जगदीश कदम, बब्रूवान रूद्रकंठावार, धनंजय सरदेशपांडे, किरण पोत्रेकर इत्यादी नाटककारांनी मराठवाड्याच्या रंगभूमीसाठी दिलेल्या नाट्यात्म योगदानाचे स्वरूप विशद केले आहे. उपरोक्त घटक व नाटककारांच्या लेखनाआधारे मराठवाड्यातील नाट्यलेखनासंदर्भात ससंदर्भ साधक-बाधक मांडणी केली आहे.

मराठवाड्यातील रंगभूमीची वैशिष्ट्ये व वेगळेपण हे प्रस्तुत शोध प्रकल्पातील चौथे प्रकरण आहे. या प्रकारणामध्ये एकनाथी भारूड हीच आद्यनाट्यसंहीता, कंट्री नाटकांचे प्राबल्य, अंतर्मुखता, व्यावसायिक वृत्तीचा अभाव, ग्रामीण नाटकांची वानवा, शैक्षणिक रंगभूमीचे वर्चस्व, विषयांची विविधता, अस्तंगत होणाऱ्या मूल्यवस्थेवर हल्ला, सरंजामी वृत्तीला प्रखर विरोध, भ्रष्ट

व्यवस्थेवर परखड भाष्य, प्रखर सामाजिक भान, वास्तववादी समाजचित्रण, स्त्री नाटककारांचा अभाव, समर्पण दृष्टीचे रंगकर्मी, वैचारिकता, चिंतनशीलता, काव्यात्मकता, उपहासगर्भ शैली, रूढ संकेतांचे विडंबन, प्रतिमा-प्रतिके-मिथकांचा वापर, आशयाभिव्यक्तीचे अद्वैत, आशय-विषयातील नाविन्याची ओढ, राष्ट्रवादी भावनेचा आविष्कार, रंगभाषेचा प्रभाव, संमिश्र भाषा इत्यादी वैशिष्ट्यांचा अंतर्भाव केला आहे. मराठवाडी रंगभूमीच्या या वैशिष्ट्यांची ससंदर्भ मांडणी करत असताना प्रकरणाच्या शेवटच्या भागामध्ये मराठवाड्यातील रंगभूमीचे वेगळेपण अधोरेखित केले आहे.

वरील चार प्रकरणांची सविस्तर व ससंदर्भ मांडणी केल्यानंतर अभ्यासातून समोर आलेले निष्कर्ष पुढील प्रमाणे नोंदवण्यात आलेले आहे.

- सातवाहन राजवटीपूर्वी भारतीय नकाशावर मराठवाड्याचे स्थान असल्याचे पुरावे आढळत नाहीत. सातवाहनांनी विविध जानपदात विखुरलेल्या प्रदेशांना संघटित केल्यानंतर मराठवाडा म्हणून आज अस्तित्वात असलेला प्रदेश भारताच्या नकाशावर दिसू लागला.
- देवगिरीच्या यादव घराण्याची राजवट ही मराठवाड्यामध्ये भाषा, साहित्य व संस्कृती संवर्धनाच्या दृष्टीने सर्वाधिक आदर्श राजवट होती. सर्वच क्षेत्रामध्ये सहिष्णु वातावरण या काळामध्ये होते. यादवांच्याच काळामध्ये नाथ, महानुभाव, वारकरी, विरशैव संप्रदायांचा उदय झाला. संत नामदेव, संत ज्ञानेश्वर, संत मुक्ताबाई, संत गोरोबा कुंभार, संत विसोबा खेचर इत्यादी संत मंडळींनी यादवांच्याच काळामध्ये साहित्यनिर्मिती केली.
- सोळाव्या शतकापर्यंत मराठवाड्यामध्ये लक्षणीय साहित्य निर्मिती झाली. किंबहुना मध्ययुगीन मराठी साहित्याचा इतिहास म्हणजेच मध्ययुगीन मराठवाड्यातील साहित्याचा ठरावा एवढी साहित्यनिर्मिती केवळ मराठवाड्यामध्येच झाली. वारकरी संप्रदायातील संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ हे मराठवाड्याचेच आहेत. मराठीतील आद्यकवी मुकुंदराज, आद्य कवयित्री महदंबा हेही मराठवाड्यातीलच आहेत. रूक्मिणी स्वयंवर हे काव्य लिहिणारे दासोपंत, दासबोधकार समर्थ रामदास महाराज, श्रेष्ठ दर्जाचे पंडिती काव्य रचणारे मुक्तेश्वर, कृष्णदयार्णव, वामन पंडीत हे सर्वजण मराठवाड्यातील आहेत. वारकरी संप्रदायातील

स्त्रियांच्या लेखनाचे दालन समृद्ध करणाऱ्या संत मुक्ताबाई, संत जनाबाई आणि वारकरी संप्रदायावरील फडकणारी ध्वजा म्हणजेच संत बहिणाबाई या सर्व कवयित्री मराठवाड्यातीलच आहे. मध्ययुगीन काळातील सर्वच महत्त्वाची वाङ्मयनिर्मिती मराठवाड्यामध्ये झाली आहे. त्यामुळे एका अर्थाने मध्ययुगीन साहित्याचा इतिहास म्हणजेच मराठवाड्यातील साहित्याचाच इतिहास आहे.

- १३१२ मध्ये यादवांची राजवट संपुष्टात आल्यानंतर मराठवाड्यावर परकीय मुस्लिमांचे वर्चस्व निर्माण झाले. परकीयांच्या मराठी साहित्य-संस्कृती व भाषे संदर्भातील उदासीन धोरणांमुळे १३१२ नंतर मराठवाड्यातील भाषिक व वाङ्मयीन चळवळ क्षीण झाली. सोळाव्या शतकामध्ये संत एकनाथ हे मोडकळीस आलेल्या वारकरी संप्रदायाच्या इमारतीचे खांब झाले. संत एकनाथ महाराजांच्या काळानंतर म्हणजेच सोळाव्या शतकानंतर मराठवाड्यातील वाङ्मयनिर्मिती ही पूर्णतः थंडावली. परिणामी मराठी साहित्याच्या उदयापासून मराठवाड्याकडे असणारे मराठी भाषा, साहित्य व संस्कृतीचे केंद्र पुण्याकडे गेले.

- वेगवेगळ्या मुस्लिम राजवटींनी मिळून मराठवाड्यावर जवळपास साडेसहाशे वर्षे राज्य केले. खिलजी, तुघलक, बहामनी, आदिलशाही, कुतुबशाही, निजामशाही अशा विविध राजवटींनी मराठवाड्यावर सत्ता गाजवली. या सर्व राजवटींपैकी निजामी राजवट ही अत्यंत क्रूर राजवट होती. १७२४ ते १९४८ अशी सव्वादोनशे वर्षे जुलमी निजामी राजवटीचा अंमल मराठवाड्यावर होता. मराठी भाषेची गळचेपी करत जाणीवपूर्वक केलेली उर्दू भाशेची सक्ती, मराठी भाषिक वाङ्मयीन कार्यक्रमांवर बंदी, हिंदूची जबरदस्ती केली जाणारी धर्मांतरे, हिंदू स्त्रियांवर होणारे लैंगिक अत्याचार, अन्यायकारक करवसुली अशा प्रकारच्या बेबंदशाहीला कंटाळून हैद्राबाद संस्थानातील जनतेने निजामाविरुद्ध आंदोलन छेडले. यालाच हैद्राबाद मुक्तिसंग्राम असे म्हणतात. भारतीय स्वातंत्र्याच्या एक वर्ष एक महिना व दोन दिवसानंतर म्हणजेच १७ सप्टेंबर १९४८ रोजी मराठवाडा व एकूणच हैद्राबाद संस्थान निजामाच्या जुलमी राजवटीतून स्वंतत्र झाला.

- मराठी भाषिक वाङ्मयीन कार्यक्रमांबाबतच्या परकीय राजवटींच्या उदासीन धोरणांमुळे संत एकनाथ महाराजापासून क्षीण झालेल्या मराठवाड्यातील वाङ्मयीन परंपरेने मराठवाडा मुक्तिसंग्रामानंतरच मोकळा श्वास घेतला. परकीय राजवटींच्या उदासीन धोरणांमुळे एकूण साहित्यनिर्मितीमध्ये मराठवाडा हा प्रदेश उर्वरित महाराष्ट्राच्या मागे गेला. १८१८ साली इंग्रजाच्या आगमनानंतर उर्वरित महाराष्ट्रातील वाङ्मयीन चळवळ गतिमान झालेली असताना मध्ययुगात वाङ्मयीन चळवळीचे केंद्र असणाऱ्या मराठवाड्यामध्ये वाङ्मयनिर्मितीचा मागमूसही नव्हता. आधुनिक मराठी वाङ्मच्या परंपरेला शंभर वर्षे झाली. तेव्हा कुठे निजामाच्या दडपणाखाली मराठवाड्यामध्ये आधुनिक साहित्यिनिर्मितीला आरंभ झाला होता. निजामी राजवटीच्या भाषिक व वाङ्मयीन दडपशाहीमुळे साहित्यनिर्मितीच्या क्षेत्रात मराठवाडा हा प्रदेश उर्वरित महाराष्ट्राच्या शंभर वर्ष मागे राहिला.

- विसाव्या शतकाच्या दुसऱ्या दशकामध्ये जुलमी निजामी राजवटीविरूद्ध मराठवाड्यामध्ये स्वातंत्र्य चळवळींना सुरूवात झाली. या स्वातंत्र्य चळवळीतूनच वाङ्मयीन चळवळही गतिमान झाली. बी. रघुनाथ, वा. रा. कांत, दिवाकर कृष्ण केळकर, ना. गो. नांदापूरकर, दे. ल. महाजन, पार्थिव, कृष्णकुमार इत्यादी साहित्यिकांनी मराठवाड्यामध्ये आधुनिक साहित्यलेखनाला आरंभ केला. बी. रघुनाथ, वा. रा. कांत, दिवाकर कृष्ण केळकर यांनी साहित्यलेखनातून निजामाविरूद्ध भूमिका घेतल्यामुळे त्यांच्या साहित्यनिर्मितीवर बंदी घातली गेली. दिवाकर कृष्ण केळकर यांचे संगीत तोड ही माळ अर्थात गंगालहरी हे सेन्सॉरशिपच्या नावाने बंदी घातलेले मराठवाड्यातील पहिले नाटक आहे.

- दुसऱ्या महायुद्धानंतर साहित्यामध्ये नवकथा, नव कविता, न-नाट्य या संकल्पना उदयास आल्या. मराठी कथा वाङ्मयाच्या इतिहासकारांनी गंगाधर गाडगीळ, अरविंद गोखले, पु. भा. भावे, व्यंगटेश माडगुळकर यांना नवकथेचे जनकत्व बहाल केले. वास्तविक पाहता या चारही कथाकारांच्या अगोदर बी. रघुनाथ यांच्या कथालेखनाला आरंभ झाला होता. नवकथेची सर्व वैशिष्ट्ये बी. रघुनाथांच्या कथेत आढळतात. नवकथेचे महत्त्वाचे वैशिष्ट्ये असणारे

मनोविश्लेषणपरता हे वैशिष्ट्ये तर बी. रघुनाथ यांच्या कथांचा स्थायिभाव आहे. त्यामुळे बी. रघुनाथ हेच नव कथेचे जनक ठरतात.

- १९६० नंतर उदयास आलेल्या दलित साहित्य प्रवाहाने एकूण मराठी साहित्याचे अनुभवविश्व समृद्ध केले. कथा, कविता, कादंबरी, नाटक आणि विशेषतः आत्मकथन या वाङ्मयप्रकारांमुळे मराठी साहित्य भारतीय स्तरावर महत्त्वाचे समजले जावू लागले. मराठी साहित्याला उंची प्राप्त करून देणाऱ्या दलित साहित्य प्रवाहाची बिजभूमी ही मराठवाडा आहे. १९६८ नंतर अस्मितादर्श या नियतकालिकाच्या रूपाने गंगाधर पानतावणे यांनी दलित व समविचारी लेखकासाठी एक वाङ्मयीन मंच उपलब्ध करून दिला. त्यामुळे दत्ता भगत, प्रकाश त्रिभुवन, रूस्तुम अचलखांब, प्र. ई. सोनकांबळे, फ. मुं. शिंदे यांच्यासारख्या महत्त्वाच्या लेखकांना प्रेरणा मिळाली. त्यामुळे दलित साहित्य प्रवाहाची बिजभूमी आणि चळवळीचे केंद्र हे औरंगाबाद मधील नागसेनवन परिसर म्हणजेच मराठवाडा हेच आहे.

- साठोत्तर कालखंडामध्ये उदयास आलेल्या ग्रामीण साहित्य चळवळीचे मुख्य प्रवर्तक आनंद यादव हे जरी पश्चिम महाराष्ट्रातील असले तरी ग्रामीण साहित्य चळवळीतील महत्त्वाचे लेखक रा. रं. बोराडे, भास्कर चंदनशिव, नागनाथ कोत्तापल्ले, वासुदेव मुलाटे हे सर्व मराठवाड्यातील आहेत. त्यामुळे ग्रामीण साहित्य चळवळीची जन्मभूमी जरी पश्चिम महाराष्ट्र असली तरी ग्रामीण साहित्य लेखनाची भूमी मराठवाडा हीच आहे.

- दलित आत्मकथन लेखनाचा आरंभ हा मराठवाड्यातूनच झाला आहे. १९७८ मध्ये बलुतं हे आत्मकथन तर १९७९ मध्ये आठवणींचे पक्षी हे आत्मकथन प्रकाशित झाले. अभ्यासकांनी बलुतं या आत्मकथनाला एक वर्ष अगोदर प्रकाशित झाले म्हणून पहिले आत्मकथन ठरवले आहे. वास्तविक पाहता प्र. ई. सोनकांबळे यांचा आठवणीचे पक्षी संबंधीचा पहिला लेख 'वाटाड्या' या नावाने मिलिंद महाविद्यालयाच्या १९६३-१९६४ च्या वार्षिकांकात प्रकाशित झाला आहे. त्याचबरोबर १९६८ मधील अस्मितादर्शच्या ग्रीष्म अंकात ३६-४० पानांचे 'आठवणीचे पक्षी' हे लेखन ललित लेखन म्हणून प्रसिद्ध झाले आहे. आठवणींचे पक्षीचे लेखन

१९६३ पासून प्रकाशित झाले म्हणजेच बलुतं प्रकाशित होण्याच्या पंधरा वर्षापूर्वी आठवणींचे पक्षी ला प्रसिद्धी मिळालेली आहे. त्यामुळे आठवणींचे पक्षी हेच पहिले दलित आत्मकथन आहे.

- निजामी रावटीतील भाषिक व सांस्कृतिक गळचेपीमुळे मराठवाड्यामध्ये साहित्यनिर्मितीला मर्यादा आल्या होत्या. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आणि विशेषतः साठोत्तर कालखंडामध्ये दलित व ग्रामीण प्रवाहामध्ये सकस साहित्यनिर्मितीला प्रारंभ झाला. पारंपरिक लेखनातील साचेबद्धपणाला नकार देत या दोन्ही प्रवाहातील लेखकांनी स्वानुभूतीचा आविष्कार साहित्यामध्ये केला. त्यामुळे मराठी साहित्य वास्तवसन्मुख झाले व मराठी साहित्याच्या कक्षा विस्तारल्या गेल्या.

- मराठी नाटकाचा उदय हा लोकाविष्कारातून झाला आहे. गोंधळ दशावतारी, खेळ, ललीत, कीर्तन, संपादण्या, पंचम्या, भराडी, दिंडार, पांगूळ, तमाश अशा लोकरंगधारा हजारो वर्षापासून प्रवाहीत असून या लोकरंगधारांनी मराठवाड्याला आध्यात्मिक व सांस्कृतिक दृष्ट्या संस्कारित केले आहे. या लोककला व लोकरंगधारांमधूनच मराठी नाटकाचा उदय झाला आहे.

- संत एकनाथ महाराजांनी गंगेच्या वाळवंटात भारूडाच्या रूपाने एक रंगमंचच उभा केला. नाटकामध्ये असणारे संगीत, नृत्य, नेपथ्य, अभिनय, संवाद, वेगवेगळया समाजचं प्रतिनिधित्व कारणारी पात्रे त्याच्या भारूडामध्ये आहेत. वेषभूषा, रंगभूषा, भावमुद्रा हे घटकही भारूडामध्ये ओतप्रोत भरलेले आहेत. संत एकनाथ महाराजांपूर्वी आद्यकवी मुकुंदराज, संत नामदेव महाराज, संत ज्ञानेश्वर महाराजांनीही भारूड रचना केली आहे. असे असले तरी संत एकनाथ महाराजांनी भारूडाच्या अशयाभिव्यक्तीमध्ये अमूलाग्र बदल केल्यामुळे नाटक या वाङ्मयप्रकाराला अभिप्रेत असणारे सर्वच घटक भारूडामध्ये स्थीत झाले आहेत. त्यामुळे १८४३ साली वाङ्मयेतिहासकारांनी ज्या निकषांच्या आधारे विष्णुदास भावे यांना मराठी रंगभूमीचे जनक ठरविले ते सर्वच निकष संत एकनाथांच्या भारूडांनी तीनशे वर्षापूर्वीचे पूर्ण केलेले आहेत. त्या न्यायाने संत एकनाथ महाराज हेच मराठी रंगभूमीचे जनक, आद्य नाटककार, प्रवर्तक आहेत.

- मराठवाडा हा नाट्यवेडा आहे. या नाट्यवेडामधूनच स्वातंत्र्यपूर्व काळात ग्रामीण भागामध्ये अनेक नाट्यसंस्था उदयास आल्या. साळीवाडा रंगभूमी, सोयगाव रंगभूमी, चिकलठाणा रंगभूमी, जांब समर्थ रंगभूमी अशा विविध गावांमध्ये नाट्यसंस्थांमुळे ग्रामीण भागामध्ये नाट्य चळवळ रूजली आहे.

- मराठवाड्यातील रंगभूमीवर शेकडो नाट्यसंस्थांनी रंगभूमीसाठी योगदान दिले आहे. या नाट्यसंस्थापैकी श्रीराम संगीत मंडळी (सोयगाव), अरूणोदय नाटक मंडळी (सेवली), ललित कला विकास मंडळ (औरंगाबाद), नागझिरा नाट्यसंपदा (तूळजापूर), दासोपंत नाट्यमंडळ (अंबाजोगाई), दलित थिएटर (औरंगाबाद), जिगीषा (औरंगाबाद), नाट्यदर्शन, पारिजात (औरंगाबाद), रंगमळा (जांब समर्थ), कलोपासक (लातूर), प्रतीभा नाट्यमंदीर (नांदेड) या नाट्यसंस्थांनी व नाट्यसंस्थेतील नाटककार कलावंतांनी मराठवाड्यातील नाट्य चळवळीसाठी महत्त्वाचे योगदान दिले आहे.

- औरंगाबाद जिल्ह्यातील सोयगाव या ग्रामीण भागातील रंगभूमी ही मराठवाड्यामधील समृद्ध असणारी रंगभूमी आहे. रामजी पाटील, लोटू पाटील व नारायणराव पाटील अशा तीन पिढ्यांनी जवळपास पावणेदोनशे वर्ष सोयगाव रंगभूमी रूजवली, वाढवली व यशाच्या उंच टोकावर नेली. सोयगाव रंगभूमीवरील श्रीराम संगीत मंडळी या नाट्यसंस्थेने १९०५ ते १९८० या काळातील एकूण मराठी रंगभूमीवरील सर्वश्रेष्ठ नाटकांचे प्रयोग सोयगाव रंगभूमी सोबतच इतर गावांमध्येही केले. त्याचबरोबर १९०५ ते १९८० या काळातील मराठी रंगभूमीवरील विविध नाट्यसंस्थानांही सोयगाव रंगभूमीवर मानधन देऊन नाटक सादर करण्यासाठी आमंत्रित करण्यात आले. मराठवाड्याच्या ग्रामीण भागामध्ये नाट्य चळवळ रूजविण्याचे सर्वाधिक श्रेय सोयगाव रंगभूमीस जाते.

- स्वातंत्र्यपूर्व काळातील लोटू पाटील यांचे मराठवाड्यातील रंगभूमीसाठीचे योगदान वाखणण्याजोगे आहे. तत्कालीन मराठी रंगभूमी नाट्य व्यवसायामध्ये उलाढाल करत असताना लोटू पाटील यांनी अर्थार्जनासाठी नव्हे तर नाटकासाठी नाटके सादर केली. त्याचबरोबर तत्कालीन यशस्वी नट-नाटककारांचा सोयगावकरांना नाट्यात्म परिचय करून दिला. लोटू

पाटलांचे रंगभूमीसाठीचे योगदान एवढे मोठे होते म्हणूनच त्यांना बालगंधर्वाची उपमा दिली जाते. नाट्यक्षेत्रातील त्यांच्या अतुलनीय कामगिरीमुळेच मराठवाडा साहित्य परिषदेतर्फे नाट्य क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्यास लोटू पाटील नाट्य पुरस्कार दिला जातो. मराठवाड्यात ग्रामीण रंगभूमीची पाया भरणीच लोटू पाटील यांनी केली.

- स्वातंत्र्यपूर्व काळामध्ये मराठवाड्यातील शहरांपेक्षा ग्रामीण भागातील रंगभूमीची चळवळ अधिक सक्रिय होती. स्वातंत्र्योत्तर काळामध्ये मात्र शहरी भागातील नाट्यसंस्था अधिक सक्रिय झाल्या. लहानमोठ्या शहरांमध्ये महाविद्यालये सुरू झाली. महाविद्यालयीन एकांकिका स्पर्धा, राज्यनाट्य स्पर्धांमुळे स्वातंत्र्योत्तर काळामध्ये शहरी रंगभूमीवर नाट्य चळवळ अधिक गतिमान झाली.

- बदलत्या काळानूसार मराठवाड्यामधील नाट्यलेखन व नाट्याभिरूचीत बदल झाला आहे. मराठवाड्यातील रंगभूमीवर सादर होणाऱ्या नाटकांच्या शीर्षकावरूनही हे लक्षात येते. लोककलांमधून उदय झालेल्या मराठवाडी रंगभूमीवर १९०० च्या आसपास आध्यात्मिक स्वरूपाची नाटके सादर होत असत. १९०० ते १९५० या कालावधीमध्ये सामाजिक व रंजनप्रधान नाटके सादर झाली. साठोत्तरी कालखंडामध्ये मराठवाडी रंगभूमी ही प्रयोगशील झाली तर आजच्या मराठवाडी रंगभूमीची भाषा ही आजच्या पिढीची झाली आहे. एकेकाळी नाटकामध्ये स्त्री पात्र करण्यासाठी स्त्री अभिनेत्री न मिळणाऱ्या मराठवाडी रंगभूमीवर आज टेक अ चान्स, आर यू व्हर्जिन?, लिव्ह इन रिलेशनशिप अशा शीर्षकांची नाटके होत आहेत. त्यामुळे कीर्तन, गोंधळ, भारूडातून विकसित झालेल्या मराठवाडी रंगभूमीचे परिप्रेक्ष्य आज व्हर्जिनिटीपर्यंत पोहचले आहे. त्यामुळे मराठी रंगभूमीप्रमाणेच मराठवाडी रंगभूमीही प्रवाही आहे.

- मराठवाड्यामध्ये नाट्यलेखनापेक्षा नाट्य सादरिकरणाची परंपरा दीर्घ आहे. ग्रामीण भागातील अनेक नाट्यसंस्थांनी आपल्या शतसावत्सरिक महोत्सव साजरा केला आहे. पैठणची साळीवाडा रंगभूमी, सोयगाव रंगभूमी, सिल्लोड येथिल रहिमाबाद रंगभूमी तुळजापूर येथील बारूळ रंगभूमी, गेवराई येथील चकलांबा रंगभूमी, जालना जिल्ह्यातील सेवली रंगभूमी, सेलू येथील

सेलू रंगभूमी, औरंगाबाद जिल्ह्यातील चिकलठाण रंगभूमी, परभणी जिल्ह्यातील देऊळगाव गात रंगभूमी या सर्व रंगभूमीला शतकी परंपरा लाभली आहे.

- गणेशोत्सव, नवरात्रोत्सव, विविध देवी-देवतांच्या यात्रा, गावातील वार्षिक यात्रा, अखंड हरिनाम सप्ताह अशा विविध सांस्कृतिक-धार्मिक कार्यक्रमांच्या निमित्ताने मराठवाड्यामधील खेड्यामध्ये नाटकाचे किंवा नाट्यात्म घटक असणाऱ्या लोककलांचे सादरिकरण होत असे. त्यातूनच खेड्यापाड्यामध्ये नाट्य चळवळ रूजली. विविध गावांमध्ये सादर झालेल्या नाटकांच्या नंतर नाट्यस्पर्धा होत असत. प्रत्येक गाव प्रत्येक वर्षी एकेक नाटक अशा स्पर्धेत उतरवत असे. विशेषतः परभणी, जालना आणि बीड जिल्ह्याच्या गोदावरी नदी परिसरातील गावांमध्ये अशा नाट्यस्पर्धा होत असत. विदर्भातील झाडीपट्टी रंगभूमी प्रमाणेच या परिसरातील गंगथडी रंगभूमीने कार्य केले आहे.
- प्रत्यक्ष नाट्यलेखनाला सुरूवात होण्यापूर्वी मराठवाड्यामध्ये कंट्री नाटके सादर होत असत. कीर्तनकार, प्रवचनकार किंवा नाट्यात्म लेखनाचे अंग असणारी मंडळी एकत्र येऊन पौराणिक कथांच्या किंवा आख्यानाच्या साहाय्याने नाटक लिहित असत. तेवढ्या गावापूरतेच हे नाटक मर्यादित राहत असे. हस्तलिखित स्वरूपातील अप्रकाशित नाटकाला कंट्री नाटक किंवा देशी नाटक म्हटले जाते. कंट्री नाटके ही मराठवाडा रंगभूमीतील आधुनिक स्वरूपाची आद्य नाट्यसंहिताच आहे. मराठवाड्यातील हजारो गावांमध्ये अशाप्रकारचे कंट्री नाटके झाली आहेत.
- मराठवाड्यातील शेकडो गावांमध्ये धार्मिकोत्सव किंवा यात्रेच्या निमित्ताने नाटके सादर करण्याची शेकडो वर्षाची परंपरा होती. एकविसाव्या शतकामध्ये ही परंपरा क्षीण झाली आहे. गावा गावामध्ये शिरलेल्या राजकारणामुळे अगोदरच गावकऱ्यांचे मन कलुषित झाले होते त्यामध्ये एकविसाव्या शतकात मनोरंजानाचे नव नवे पर्याय उपलब्ध झाले. एकविसाव्या शतकात विविध वाहिण्याचा झालेला सुळसुळाट, सोशल मिडिआचा अतिरेक आणि फोर जी स्पिडचा दिड जी. बी. डेटा यामुळे गावकऱ्यांमधील सुसंवाद हरवला आहे. हरवलेल्या सुसंवादाचा थेट नाट्य चळवळीवर परिणाम झाला आहे. आज मराठवाड्यातील जालना जिल्ह्यातील जांब समर्थ सारख्या काहीच गावांमध्ये नाट्य चळवळ शिल्लक आहे.

- वाङ्मयेतिहासकारांनी मराठवाड्यावर सातत्याने अन्यायच केला आहे. मराठी कवितेचे प्रवर्तक आद्यकवी मुकुंदराज हेच आहेत हे पुराव्यासह सिद्ध झालेले असताना मुकुंदराज हेच विदर्भातील आहेत असा शोध काही अभ्यासक लावतात. मराठी नाटकाच्या जनकत्वाच्या संदर्भातही असाच मराठवाड्यासोबत बुद्धीभेद झाला आहे. सोळाव्या शतकातील संत एकनाथ महाराजांच्या भारुडामध्ये नाटाकाचे सर्व घटक असताना एकोविसाव्या शतकातील विष्णुदास भावे यांना रंगभूमीच्या इतिहासकारांनी मराठी नाटकाच्या जनकत्वाचा मान दिला आहे. वास्तविक पाहाता विष्णुदास भावे यांनी सीता स्वयंवर हे एक नाटक लिहिले तर संत एकनाथ महाराजांनी ३०० भारूडे लिहिली आहेत. सीता स्वयंवर आणि भारूड या दोन्हींचेही स्वरूप आध्यात्मिक होते. दोन्हींमध्ये नाट्य घटक होते. उलटपक्षी भारूड हे लोकजीवनाच्या अधिक जवळ जाणारे होते. किंबहुना संत एकनाथ महाराजांचे एक भारूड म्हणजे एक परिपूर्ण नाट्यसंहिताच होती. परंतु संत एकनाथांचे हे योगदान लक्षात न घेता मराठवाडा निजामी राजवटीच्या जोखडाखाली पिचलेला असतानाच विष्णुदास भावे यांना मराठी रंगभूमीचे जनकत्व बहाल केले. मराठवाडा स्वतंत्र झाल्यानंतर मराठवाड्यातील अभ्यासकांनी संत एकनाथ महाराज हेच आद्य नाटककार आहेत हे पुरव्यासह सिद्ध केले आहे. त्यातूनच मराठी रंगभूमीची मुहूर्तमेढ सांगलीमध्ये नव्हे तर मराठवाड्यामधील पैठणमध्ये रोवली गेली हा निष्कर्ष पुढे आला आहे.
- १९८० नंतर मराठवाड्यातील नाटक अधिक प्रगल्भ झाले. समाजाच्या सर्वच स्तरात या काळात प्रचंड बदल झाले. त्यांचे परिणाम नाटकावरही झाले. समाजात भयान अस्वस्थता या काळात पसरलेली होती. समाजातील बदलांबरोबर नाटकातही बदल झाले. विजय तेंडूलकर, महेश एलकुंचवार, सतीश आळेकर, श्याम मनोहर अशा नाटककारांच्या नाट्याच्या केंद्रस्थानी समाज आला होता. मराठवाड्यातील नाट्यलेखनही यापेक्षा वेगळं नव्हते. समकालीन प्रश्नांना महत्त्व देणारे, समाजसन्मुख, वास्तववादी नाटककार या कालखंडात उदयास आले.
- भगवंत तोडेवाले, श्रीपाद बेंडे, दिवाकर कृष्ण केळकर, शंकरलाल पुरवार, त्र्यंबक महाजन व म. भि. चिटणीस या नाटककारांनी मराठवाड्यातील आधुनिक मराठी रंगभूमीचा पाया रचला.

या सर्वच नाटककारांचे नाट्यलेखन हे समाजसन्मुख, वास्तववादी व बांधिलकी जोपासणारे आहे. या सर्वच नाटककारांच्या नाट्यलेखनाचा प्रभाव मराठवाड्यातील साठोत्तरी नाट्यलेखनावर कमी-अधिक प्रमाणात जाणवतो. आजही वास्तववादी नाट्यलेखनाची मराठवाड्याची प्रवृत्ती टिकून आहे.

- दलित नाट्यलेखन ही मराठी रंगभूमीच्या इतिहासातील एक क्रांतिकारी घटना आहे. इतर वाङ्मयप्रकारामध्ये शब्दबद्ध असणारी दलित समाजाची वेदना जेव्हा नाटकाच्या निमित्ताने मंचावर सादर झाली तेव्हा तिच्यातील दाहकता अधिकच तीव्र झाली. स्वातंत्र्यात्तर काळामध्ये दलित रंगभूमीचा उदय झाला हे जरी खरे असले तरी आंबेडकरी जलसे, सत्यशोधकी जलसे, महात्म फुले यांचे तृतीयरत्न हे नाटक व त्याही अगोदरच्या लोककलांपर्यंत दलित रंगभूमीची बीजे सापडतात.

- म. भि. चिटणीस यांचे युगयात्रा हे एकूण दलित रंगभूमीवरील पहिले नाटक आह. पौराणिक कालखंडापासून ते आधुनिक काळापर्यंतची दलित जीवनाची वेदना चिटणीस यांनी या नाटकात मुखर केली आहे. युगयात्रा नंतरच्या काळात जवळपास चाळीस वर्ष दलित रंगभूमीवर म. भि. चिटणीस यांचा प्रभाव जाणवतो.

- दत्ता भगत हे आपल्या नाटकाद्वारे भोवतालच्या घटनांवर चिंतनशील भाष्य करतात. दलित रंगभूमीला त्यांनी वेगळे वळण दिले. आपले पुरोगामित्व सिद्ध करण्यासाठी प्रतिगाम्यांना शिव्या देण्यापेक्षा जात-धर्म न मानता माणसाच्या वृत्ती-प्रवृत्तीवर ते भाष्य करतात. कोणत्याही भडकपणापेक्षा, ऊरबडवेपणापेक्षा, चिंतनशीलपणे भोवतालच्या जीवनातील असमतोलाला ते नाट्यरूप देतात. आपल्या वेगळ्या नाट्यशैलीमुळे दत्ता भगत हे दलित रंगभूमीवरील सशक्त नाटककार ठरतात.

- मराठवाड्याला फार मोठी नाट्य चळवळीची परंपरा आहे. नाट्यकलावंत किंवा नाटककारांची कोणतिही वानवा मराठवाड्यामध्ये नाही. नाट्य सादरिकरणाचे तंत्र आणि नाट्यलेखनाचा आशय-विषय यादृष्टीनेही मराठवाड्यातील रंगभूमी सक्षम आहे. एवढे सगळे असूनदेखील मराठवाड्यामध्ये व्यावसायिक रंगभूमी मोठ्या प्रमाणात रूजली नाही. रंगभूमीसंबंधीच्या सर्व

बाजूने मराठवाडा सशक्त असतानाही पुणे, मुंबई, ठाणे, नाशिकमधील नाटककार रंगकर्मीसारखे रंगभूमीचा व्यवसाय मराठवाडा का करू शकत नाही? हाच मोठा प्रश्न आहे. आजपर्यंत मराठवाड्यातील लक्ष्मणराव देशपांडे, अजित दळवी, प्रशांत दळवी, दत्ता भगत, किरण पोत्रेकर, राजकुमार तांगडे, रा. रं. बोरोडे इत्यादी नाटककारांच्या नाटकांचे व्यावसायिक प्रयोग झाले. परंतु व्यावसायिक रंगभूमीची मूळं आणखीनही मराठवाड्यामध्ये रूजली नाहीत.

- अजित दळवी व प्रशांत दळवी हे नव्वदोत्तर काळातील महत्त्वाचे नाटककार आहेत. मराठवाड्यातील नाटककारांपैकी मराठी रंगभूमीवर सर्वाधिक यश मिळणारे हे लेखक आहे. समाजातील समस्यांना नाट्यरूप देण्यात त्यांची नाटके यशस्वी झाली आहेत. एकाचवेळी प्रायोगिक आणि व्यावसायिक रंगभूमीवर यश मिळवणे फार क्वचित नाटककारांना जमते. ते यश अजित दळवी व प्रशांत दळवी यांना मिळाले आहे.
- मराठी साहित्यामध्ये ग्रामीण कथा, ग्रामीण कादंबरी, ग्रामीण कविता या वाङ्मयप्रकारांचा जसा विकास झाला तसा नाटक या वाङ्मयप्रकाराचा झाला नाही. परिणामी ग्रामीण नाटक किंवा ग्रामीण रंगभूमी ही संज्ञा रुळलेली नाही. एकूण मराठी रंगभूमीप्रमाणेच मराठवाड्यामध्येही ग्रामीण नाटकाचा विकास झाला नाही. हौस म्हणून ग्रामीण भागामध्ये नाटकांचे सादरिकरण होत असले तरी त्यामुळे नाटक या वाङ्मयप्रकारामध्ये मौलिक भर पडली नाही.
- एकूण मराठी रंगभूमीप्रमाणेच मराठवाडी रंगभूमीवरही स्त्रियांचे नाट्यलेखन अत्यल्प आहे. १०० वर्षांच्या नाट्यपरंपरेमध्ये मराठवाड्यात प्रभावी स्त्री नाटककार आढळत नाही.
- मराठवाड्यातील नाटककार समकालीन वास्तवाला व समकालीन प्रश्नांना थेट भिडतात. समाजात खदखदणाऱ्या एखाद्या प्रश्नाला ते नाट्यरूप देतात. त्यामुळे मराठवाड्यातील नाट्यसंहिता या अधिक वास्तववादी, समाजसन्मुख व समकालाचे सजग भान असणाऱ्या आहेत.

परिशिष्ट-अ (१)

प्रा. डॉ. दासू वैद्य यांना विद्यापीठ अनुदान आयोगाने मंजूर केलेल्या 'मराठवाड्यातील मराठी नाट्यलेखन आणि नाट्य चळवळीचा अभ्यास' या बृहत शोध-प्रकल्पासाठी प्रख्यात नाट्यलेखक, दिग्दर्शक व रंगकर्मी श्री राजकुमार तांगडे यांची प्रकल्प सहाय्यक श्री. रामेश्वर वाकणकर यांनी घेतलेली मुलाखत :

प्रश्न : मागील वीस वर्षांपासून तुम्ही सशक्तपणे नाट्यलेखन, दिग्दर्शन व अभिनयाच्या क्षेत्रात आहात. आकडा, दलपतसिंग येती गावा, शिवाजी अंडरग्राउंड इन भिमनगर मोहल्ला अशा नाटक-एकांकिकामधून तुम्ही अवघी जागतिक रंगभूमी गाजवली आहे. या लेखनामागील नेमकी प्रेरणा कोणती?

उत्तर : नाटक हे जसे मनोरंजनाचे माध्यम आहे तसेच ते प्रबोधनाचेही प्रभावी माध्यम आहे. आज मराठवाड्याच्या ग्रामीण भागात असंख्य अडचणी आहेत. गावामध्ये, आदिवासी पाड्यावर, तांड्यावर, दलित वस्तीतील सर्वच लोक वेगवेगळ्या समस्यांनी ग्रस्त आहेत. पाण्याचा प्रश्न, विजेचा प्रश्न, रस्त्याचा प्रश्न, बि-बियाण्यांचा प्रश्न, वाहतुकीचा प्रश्न, अतिरिक्त उत्पादनाचा प्रश्न, ओल्या दुष्काळाचा प्रश्न, कोरड्या दुष्काळाचा प्रश्न, अवकाळी पावसाचा प्रश्न, गारपीटीचा प्रश्न अशा असंख्य प्रश्नांनी ग्रामीण माणूस घेरलेला आहे. ग्रामीण माणसाचे हे प्रश्न वर्षानुवर्ष सडत पडलेले आहेत आणि कोणिही याकडे गांभीर्याने पाहात नाही. शासकीय स्तरावरही सोयिस्करपणे अशा प्रश्नांकडे डोळेझाक केली जाते. ज्यांच्या प्रश्नांकडे कोणी गांभीर्याने पाहात नाही अशा शेतकऱ्यांच्या, शेतमजूरांच्या, दीन-दलितांच्या, गोरगरिबांच्या समस्यांना लेखनीच्या माध्यमातून वाचा फोडणे हीच माझ्या नाट्यलेखनाची प्रमुख प्रेरणा आहे.

प्रश्न : तुम्ही मराठवाड्यातील एक यशस्वी नाटककार आहातच. एक नाटककार, रंगकर्मीच्या दृष्टिकोनातून मराठवाड्यातील एकूण नाट्य चळवळ आणि नाट्यलेखनाच्या स्थितीगतीविषयी नेमके काय वाटते?

उत्तर : मराठवाडा हा आजही ग्रामीण परिसर आहे असे वाटते. फार पुर्वी निजामकालीन अनेक खेड्यात नाट्य चळवळी, रंगकर्मी, नाट्यसंध्या व प्रेक्षकवर्गही होता. नाटकाचा हाच वसा आणि वारसा स्वातंत्र्योत्तर काळातही चालूच होता. मी माझ्या मागच्या पिढीकडून नाट्यपरंपरेचा हा वारसा स्वीकारला आणि पंधरा-वीस वर्ष नाट्यसेवा केली करत आहे. आपली ताकद कमी होण्याच्या आत हा वारसा पुढच्या पिढीकडे देण्याचा विचार करत असताना मनामध्ये साशंकता होती. कारण मोबाईलच्या अतिरेकामुळे मागील पाच वर्षापूर्वीची तरूण पिढी नाट्यलेखन व एकूणच रंगभूमीपासून दुरावली होती. काही काळ मराठवाड्यातील रंगभूमीला सूप्तावस्था प्राप्त झाली होती. परंतु आज मात्र तरूण पिढीचा नाटकाकडे पाहण्याचा दृष्टिकोन पुन्हा बदलला आहे. मराठवाड्यातील नवी पिढी त्यांच्या जगण्यातील प्रश्न ताकदीनिशी नाटकात मांडत आहे. यंत्रयुगाने तरूणाईच्या जीवनात आणलेले स्थित्यंतर नाटकातही पाहायला मिळत आहे. त्यामुळे मराठवाड्यातील नाटकाचे भविष्य निश्चितच उज्ज्वल आहे, असे मला वाटते.

प्रश्न : आकडा सारख्या दीर्घांकातून तुम्ही ग्रामीण जीवनाचे प्रश्न समर्थपणे मांडले आहेत. तुमच्यासारखे काही अपवाद वगळता मराठवाड्यासह एकूण मराठी रंगभूमीवर ग्रामीण नाट्यलेखन अल्प प्रमाणात आहे, यामागे नेमकी कोणती कारणे असावीत?

उत्तर : माझे स्पष्ट मत आहे की, ज्यांचे पोट दुखते त्यानेच ववा खायला पाहिजे. प्रश्न ग्रामीण माणसाचे असतील तर त्यानेच त्या प्रश्नांवर बोलले पाहिजे. ग्रामीण माणसानेच स्वतःचे प्रश्न स्वतः मांडले तरच ते संपूर्ण ताकदीनिशी लेखनात उतरतील. शहरी माणूस फारतर ग्रामीण माणसाच्या प्रश्नांवर-जीवनावर रिसर्च करू शकतो. अशा वरवरच्या संशोधनातून प्रश्नांना पूर्ण ताकदीसह भिडता येत नाही. ग्रामीण नाटक मुख्य पटलावर आणायचे असेल तर हाडाचा ग्रामीण नाटककारच न्याय देऊ शकतो. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे आजवर जे ग्रामीण नाटककार झाले आहेत त्यातील बहुसंख्य नाटककार हे शालेय जीवनापर्यंतच खेड्यामध्ये राहिलेले आहेत. प्रत्यक्ष नाट्यलेखन करत असताना मात्र ते महाविद्यालयीन जीवनापासूनच शिक्षणाच्या निमित्ताने व नंतर नोकरीच्या निमित्ताने शहरात स्थिरावलेले

आहेत. म्हणजे बहुसंख्य ग्रामीण नाटककारांचे ग्रामीण जीवनातील अनुभवविश्व हे केवळ शालेय जीवनापूरतेच मर्यादीत आहे. त्यामुळे असे नाटककार गावगाड्याचे संपूर्ण ताकदीनिशी चित्रण करू शकत नाहीत. आज बहुसंख्य ग्रामीण नाटककारांनी शेतकऱ्यांच्या, शेतमजूरांच्या जीवनातील वरवरचे व ऐकीव माहितीच्या आधारे प्रश्न मांडले आहेत, असे दिसून येते. गंभीर प्रश्नांना न भिडता खेड्याचे काल्पनिक चित्र रंगवल्यामुळे ग्रामीण नाटक फारसे यशस्वी झाले नाही. आमच्या रंगमळाची टीम ही ग्रामीण भागात राहणारी तर आहेच पण शेती-मातीशी निगडीत काम करणारी आहे. त्यामुळेच शेतकरी-शेतमजूरांचे व एकूणच गावगाड्यातील प्रश्न थोड्याबहुत ताकदीने आम्ही मांडू शकलो.

प्रश्न : मराठवाड्यातील रंगभूमीएवढाच पुणे-मुंबईतील रंगभूमीवरही तुमचा वावर आहे. नाट्यलेखन आणि सादरिकरण या दोन्ही दृष्टीने दोन्ही रंगभूमीत कोणता फरक आहे, असे तुम्हाला वाटते?

उत्तर : मूळात मराठवाड्यातील रंगभूमीची चळवळ ही फावल्या वेळात सुरू असते. याऊलट पुण्या-मुंबईची रंगभूमीची चळवळ ही पूर्णवेळ चालते. पैशे देऊन नाटक पाहण्याची संस्कृती पुण्या-मुंबईत रूजलेली आहे. मराठवाड्यामध्ये मात्र अशी परिस्थिती अजून निर्माण झाली नाही. तीकडे आविष्कार, सुदर्शन सारख्या नाट्यसंस्था नाटकासाठी पूर्णवेळ काम करतात. आपल्याकडे केवळ आणि केवळ नाटकासाठी काम करणाऱ्या संस्थांचा दुष्काळ आहे. महत्त्वाचे म्हणजे या दोन्ही जीवनपद्धतीत एक मूलभूत फरक आहे. पुण्या-मुंबईच्या रसिकांची सांस्कृतिक भूक ही नाटकामार्फत भागवली जाते. मराठवाड्यात मात्र अनेक पर्याय उपलब्ध आहेत. अखंड हरिनाम सप्ताह, नंदीवाला, वासुदेव, पोतराज, जत्रा व वेगवेगळ्या धार्मिक उत्सवातून मराठवाड्यातील जनतेची सांस्कृतिक भूक भागवली जाते. पुण्या-मुंबईकडील लोक नाट्यगृहात जाऊन जसे नाटक एन्जॉय करतात तसे आपल्याकडे लोक अखंड हरिनाम सप्ताह, उत्सव, सण-समारंभ एन्जॉय करत असतात. एकूणच दोन्ही जीवनपद्धतीतील या मूलभूत फरकाचा नाट्यलेखन व सादरिकरणावर

परिणाम होणे साहजिकच आहे. याशिवाय आर्थिक चणचण आणि आर्थिक सुबत्ता हा विरोधाभासही दोन्ही रंगभूमीमध्ये आहेच.

प्रश्न : काही सन्माननीय अपवाद वगळता पुणे-मुंबईच्या तुलनेत मराठवाड्यामध्ये व्यावसायिक रंगभूमी यशस्वी होत नाही यामागे कोणती कारणे असावीत?

उत्तर : मी व्यावसायिक आणि प्रायोगिक असा भेद मानतच नाही. नाट्यलेखन व सादरीकरण जर ताकदीचे असेल तर अपोआपच लोक गर्दी करायला लागतात. माऊथ पब्लिसिटीने आणखी गर्दी वाढते. खूप गर्दी व्हायला लागली की, प्रयोगसंख्या वाढते आणि प्रयोगसंख्या वाढण्यालाच आपण व्यावसायिक म्हणायला लागतो. त्यामुळे तुमचे नाटक कोणतेही असो संहिता जर ताकदीची असेल आणि सादरिकरणात दर्जा असेल तर लोक हमखास पैसे देऊन नाटक पाहतात. संहिता आणि सादरिकरणाचा दर्जा उत्तम होता म्हणूनच मराठवाड्यामध्ये अजित दळवी, प्रशांत दळवी या नाटककारांच्या नाटकांचे तसेच शिवाजी अंडरग्राउंड इन भिमनगर मोहल्ला सारख्या नाटकाचे यशस्वीरित्या व्यावसायिक प्रयोग झाले आहेत.

प्रश्न : एक नाट्यलेखक, दिग्दर्शक व रंगकर्मी घडण्याच्या दृष्टीने मराठवाड्यातील वातावरण पोषक आहे का?

उत्तर : मूळातच मराठवाडा हा सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध आहे आणि नवीन नाटककार घडण्यासाठी इथले वातावरणही पोषक आहे. कारण मराठवाडा हा आडचणींचा प्रदेश आहे. आडचणीतली झाडं जास्त उंच वाढतात. जेवढी जास्त आडचण तेवढी झाडं सूर्यप्रकाशाच्या शोधात वाढत जातात. अशा आडचणीतून माणसेही घडतात. अभावग्रस्त जगण्यातूनच अस्सल व सकस साहित्यनिर्मिती होत असते. जास्त पोट भरलेली माणसं सुस्तावतात. अर्धे पोट भरलेल्या माणसाला झोपच येत नाही. परिणामी त्यांचा मेंदूही कार्यरत राहतो. क्रियाशीलतेमुळे असा माणूस प्रत्येक आडचणीवर मात करत मार्ग काढण्यात यशस्वी होतो.

त्यामुळे केवळ नाटकच नव्हे तर कोणत्याही नवनिर्माणासाठी मराठवाड्यातील वातावरण पोषक आहे.

प्रश्न : मराठी रंगभूमीविषयी ज्येष्ठ अभिनेते अमोल पालेकर म्हणतात की, तांत्रिकदृष्ट्या पुणे-मुंबईची रंगभूमी सरस आहे, परंतु संहितेच्या दृष्टीने सकस नाट्यलेखन मराठवाड्यात होते. याविषयी तुम्हाला काय वाटते?

उत्तर : अगदी बरोबर आहे. कारण नाट्यलेखन हे जगण्याशी संबंधित असते. लेखक हा आपला भोवताल मांडत असतो. अगोदरच म्हटल्याप्रमाणे मराठवाड्यातील माणसाचे किंवा लेखकाचे जीवनच अभावग्रस्ततेत जाते. या अभावग्रस्ततेतून, आडीआडचणीतून माणूस अनुभवसंपन्न होतो आणि अनुभव संपन्नताच लेखकाला प्रतिभासंपन्न बनवते. मराठवाड्यातील माणसाला साधे जिल्ह्याला जायचे असेल तर चार प्रकारची वाहणं बदलावी लागतात. यात त्रास आहेच परंतु यामुळे अनुभवविश्व समृद्ध होते. परिणामी लेखकही समृद्ध होतो. मुळात संघर्ष असल्याशिवाय कलाकृतीत मजा येत नाही. मराठवाड्यामध्ये हा संघर्ष पदोपदी आहे.

प्रश्न : आज ग्रामीण भागतील नाट्य चळवळीला मरगळ आली आहे. नगरातील नाट्य चळवळ ही मुख्यतः नाट्यमहोत्सव आणि शासकीय नाट्य स्पर्धांपूरतीच मर्यादित होत आहे. अशा परिस्थितीमध्ये मराठवाड्यातील नाट्य चळवळ अधिक गतिमान होण्यासाठी वैयक्तिक व शासकीय स्तरावर कोणते प्रयत्न व्हायला हवेत?

उत्तर : मराठवाड्यातील नाट्य चळवळ ही आज जीवंत तर आहेच परंतु तिला अधिक गतिमान करण्यासाठी शासकीय प्रयत्नाबरोबर लोकसहभागही महत्त्वाचा आहे. त्यातही शासकीय धोरण हे वेळखाऊ असते आणि घोषणांचा पाऊसच त्यात अधिक असतो. त्यामुळे लोक सहभागामुळेच नाट्य चळवळ अधिक गतिमान होऊ शकेल. अखंड हरिनाम सप्ताहात जेवढ्या उत्स्फुर्तपणे लोक सहभागी होतात तेवढ्याच उत्स्फुर्तपणे मोठमोठ्या खेड्यात-तालुक्यात फेस्टिव्हल झाले पाहिजेत. महाविद्यालयांनीदेखील एनएसएस कॅम्पप्रमाणे

महाविद्यालय परिसरातील गावांमध्ये नाट्यविषयक कार्यक्रम राबविले पाहिजेत. शासनानेदेखील नाट्यगृहांची संख्या वाढविण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे. नेते मंडळींनी तालुका, जिल्ह्याला जी नाट्यगृहे होती त्यांचे राजकीय सभागृहात होणारे रूपांतर थांबवले पाहिजे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे विधिमंडळात कलावंतासाठी राखीव असलेल्या जागेवर जेव्हा रंगकर्मी जाईल तेव्हा खऱ्या अर्थाने नाट्य चळवळ अधिक गतिमान होईल.

नाटककार-रंगकर्मी राजकुमार तांगडे यांची मुलाखत घेताना प्रकल्प सहाय्यक रामेश्वर वाकणकर

परिशिष्ट-अ (२)

प्रा. डॉ. दासू वैद्य यांना विद्यापीठ अनुदान आयोगाने मंजूर केलेल्या 'मराठवाड्यातील मराठी नाट्यलेखन आणि नाट्य चळवळीचा अभ्यास' या बृहत शोध-प्रकल्पासाठी मराठवाड्यातील उदयोन्मुख लेखक, दिग्दर्शक व रंगकर्मी श्री रावबा गजमल यांची प्रकल्प सहाय्यक श्री रामेश्वर वाकणकर यांनी घेतलेली मुलाखत :

प्रश्न : प्रत्येक लेखकाच्या लेखनाला एक इतिहास असतो, की ज्यातून त्या लेखकाच्या मनात लिखाणाचे बीजारोपण होते. तुमच्या नाट्यलेखन-दिग्दर्शनाची नेमकी पार्श्वभूमी सांगाल का?

उत्तर : मराठवाड्यातल्या बीड जिल्ह्यातील किनगाव हे माझं गाव. गावात असतानाच लहाणपणी गणेशोत्सव, नवरात्रोत्सव, जत्रांच्या निमित्ताने होणारी नाटके पाहिली होती. विलास लवांडे सरांमुळे शालेय जीवनातच नाटकाची आवड निर्माण झाली. ७ वी मध्ये असताना 'एकच प्याला' या नाटकाची स्टोरी ऐकली होती. ते नाटक मिळवण्याच्या खूप प्रयत्न केला परंतु पुस्तक मिळाले नाही. शेवटी स्वतः देशभक्तीपर असणारे 'एकच प्याला' हे नाटक लिहिले. त्याचे दिग्दर्शन केले आणि स्त्रिचा रोलही स्वतःच केला. ग्रॅज्यूएशनच्या लास्ट ईयर मध्ये असताना माईम, स्किटमध्ये भाग घेतला. याच काळात डॉ. सुधीर निकम सर, डॉ. संदीप बनसोडे सरांकडून नाट्यविषयक मार्गदर्शन मिळत गेले. त्यानंतर 'उपोषण' नावाचे नाटक लिहून आंबेजोगाई येथे त्याचे सादरिकरण केले. आंबेजोगाई येथील प्रयोगानंतर नाटक या विषयाकडे पाहण्याचा माझा दृष्टिकोन अधिकच प्रगल्भ झाला. 'नाटक' या विषयालाच आयुष्य समर्पित करण्याच्या विचारावर मी ठाम झालो. पोस्ट ग्रॅज्यूएशनसाठी औरंगाबाद येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या नाट्यशास्त्र विभागात प्रवेश घेतला आणि नाटक ही केवळ कला नसून ते शास्त्रदेखील आहे हे मला समजले. विभागात आल्यानंतर डॉ. शशिकांत बऱ्हाणपूरकर, डॉ. अशोक बंडगर सरांच्या मार्गदर्शनामुळे नाट्यविषयक जाणिवा अधिक विकसीत होत गेल्या. जे कलाकार मालिका-चित्रपटात पहायचो त्यांची विभागात प्रत्यक्षात भेट होत होती. मोठमोठ्या

नाटककार, रंगकर्मीशी संवाद साधता येऊ लागला. त्यामुळे नाटक हा विषय अधिकच जिव्हाळ्याचा होत गेला.

प्रश्न : एक लेखक, दिग्दर्शक, रंगकर्मी घडण्याच्या दृष्टीने मराठवाड्यातील नाट्यविषयक वातावरण पोषक आहे असे आपणास वाटते का? एकूणच मराठवाड्यातील नाट्य चळवळीविषयी काय वाटते?

उत्तर : मराठी रंगभूमीविषयी प्रश्न विचारला असता "आजचं वैचारिक आणि सशक्त नाटक हे मुंबई-पुण्यामध्ये नव्हे तर मराठवाड्यात लिहिले जाते." हे ज्येष्ठ अभिनेते अमोल पालेकर सरांचं विधान आहे. यावरूनच मराठवाड्यातील आजची रंगभूमी कशी आहे याची कल्पना येते. मराठवाड्यासारख्या ग्रामीण भागातून आलेली सामान्य मुलं मराठवाड्यात नाटक सादर करू शकतात ती केवळ आणि केवळ इथल्या पोषक वातावरणामुळेच. त्यामुळे नाट्यलेखन आणि सादरिकरण या दोन्ही अंगाने मराठवाड्यातील वातावरण पोषक आहे, असे मला वाटते.

प्रश्न : मराठवाड्यातील कोणते नाटककार तुम्हाला अधिक प्रभावित करतात? का?

उत्तर : असे अनेक नाटककार मराठवाड्यात आहेत जे की, केवळ मलाच नव्हे तर अवघ्या महाराष्ट्राला प्रभावित करतात. त्यातही नावाच घ्यायचे झाले तर अजित दळवी सरांचं डॉक्टर! तुम्हीसुद्धा..., समाजस्वास्थ्य, प्रशांत दळवी सरांचं चारचौघी, दासू वैद्य सरांचं देता आधार का करू अंधार, आम्हाला बांधायचंय मंदीर, राजकुमार तांगडे यांचं शिवाजी अंडरग्राऊंड इन भिमनगर मोहल्ला अलिकडे आलेले अरविंद जगताप यांचं स्टॅच्यू ऑफ लिबर्टी इत्यादी नाटके मला आवडली. या सर्वच नाटकांचे विषय आणि नाटककारांची वैचारिक बैठक ही अत्यंत प्रगल्भ आहे असे मला वाटते.

प्रश्न : २०१२-१३ पासून तुम्ही सशक्तपणे नाट्यलेखन, दिग्दर्शन व अभिनय करत आहात. मसनातलं सोनं, भोंगे, भक्षक, माणसं, रावणायन, बरबाद्या अशा नाटक-एकांकिकातून तुम्ही अवघी महाराष्ट्रीयन रंगभूमी गाजवली आहे. या यशामागचं नेमकं गमक काय आहे?

उत्तर : मागील आठ-दहा वर्षांपासून मी रंगभूमीवर सक्रिय असलो तरी मी रंगभूमी गाजवली आहे असे माझे मत नाही. मी केवळ माझ्या आवडीचे काम करत आहे. आणि त्यातून रंगभूमीची

सेवा करण्याचा प्रयत्न करत आहे, हे मी अत्यंत नम्रपणे सांगतो. शालेय जीवनात लागलेली नाटकाची ओढ, त्यासाठी मिळत गेलेले आई-वडिलांचं पाठबळ, शिक्षकांनी केलेलं कौतुक, महाविद्यालयीन जीवनात डॉ. शशिकांत बऱ्हाणपूरकर सर, डॉ. अशोक बंडगर सरांसोबत केलेले नाट्यप्रयोग व त्याला मिळत गेलेले पुरस्कार यातून प्रेरणा मिळत गेली. आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखिची असतानाही नकरात्मकता कधी येऊ दिली नाही. उलट आर्थिकदृष्ट्या कमकुवत असल्यामुळेच थोडेबहूत सशक्त लिखाण मी करू शकलो. लहाखिची आर्थिक परिस्थितीच माणसाला वास्तवाचे भाण करून देते आणि हे वास्तवच मी नाटकातून मांडत गेलो.

प्रश्न : मराठवाड्यातील रंगभूमीएवढाच पुणे-मुंबई येथील रंगभूमीवरही तुमचा वावर आहे. दोन्हीतील नेमका फरक काय सांगता येईल?

उत्तर : मराठवाडा आणि मुंबई-पुण्यामध्ये नाटकाकडे प्रेक्षकांचा पाहण्याचा दृष्टिकोनच भिन्न आहे. नाट्य प्रयोगाचा विचार केल्यास पैसे देऊन नाटक पाहण्याची संस्कृती मुंबई-पुण्यामध्ये फार पुर्वीपासून रुजलेली आहे. त्या तुलनेत मराठवाड्यात एखाद-दुसऱ्या शहराचा अपवाद सोडला तर पैसे देऊन नाटक पाहण्याची संस्कृती रूजलेली नाही. परिणामी वाङ्मयीनदृष्ट्या ताकदीची असतानाही मराठवाड्यातील अनेक नाटकं स्पर्धांपूरतीच मर्यादित राहतात. त्याचे व्यावसायिक प्रयोग फारसे होताना दिसत नाही.

नाट्यतंत्राच्या दृष्टीने विचार केल्यास मुंबई-पुण्यातील नाटके तांत्रिकदृष्ट्या प्रबळ आहेत. चित्रपट-मालिकाचा प्रभाव या नाटकांवर जाणवतो. सतत प्रयोग हाऊसफूल असल्यामुळे मुंबई-पुण्याची रंगभूमी आर्थिकदृष्ट्या संपन्न आहे. परंतु कंटेन्टच्या दृष्टीने किंवा लेखनाच्या दृष्टीने अमोल पालेकर सर म्हणतात त्याप्रमाणे मराठवाड्यातील रंगभूमी ही अधिक संपन्न आहे.

प्रश्न : मुंबई-पुण्यासारखं तांत्रिकदृष्ट्या संपन्न होण्यासाठी मराठवाड्यातील रंगकर्मींनी, महाविद्यालयीन नाट्यशास्त्र विभागांनी किंवा नाट्यसंस्थांनी काय केले पाहिजे असे आपणास वाटते?

उत्तर : तांत्रिकदृष्ट्या संपन्न होण्यासाठी मराठवाडा हा मुंबई-पुण्याच्या तुलनेत मागास आहे हा न्यूनगंड आपण अगोदर दूर केला पाहिजे. मराठवाडा हा मुंबई-पुण्याच्या तुलनेत कुठेही कमी नाही, हे रंगकर्मींच्या मनावर बिंबवले गेले पाहिजे. प्रशांत दळवी, चंद्रकांत कुलकर्णी, प्रतीक्षा लोणकर, मंगेश देसाई, संदीप पाठक, अरविंद जगताप, राजकुमार तांगडे हे देखील मराठवाड्यातीलच असून त्यांनीदेखील यश संपादन केले आहे. नाट्यशास्त्र विभागांनी हे वास्तव विद्यार्थ्यांपर्यंत पोहचवायला पाहिजे. त्याचबरोबर बदलत्या काळानुसार, तंत्रज्ञानानुसार महाविद्यालयांनी आणि विद्यार्थ्यांनी स्वतःला अपडेट करावे लागेल तेव्हाच तांत्रिकदृष्ट्या आपण अधिक सशक्त होऊ शकू.

प्रश्न : तुमच्या समकालीन अनेक नाट्य कलावंत चित्रपट-मालिकांमध्ये यश संपादन करत आहेत. तरीदेखील या झगमगाटापासून दूर राहत आपण वृतस्थपणे नाट्यसेवा करत आहात. याबद्दल काय सांगाल?

उत्तर : मूळात इतरांच्या यशासोबत मी स्वतःची कधी तुलना केली नाही. करणारही नाही. नाटक हाच माझा श्वास आहे आणि श्वासाशिवाय मी जगू शकत नाही. दररोज नाट्यविषयक काहीतरी वाचल्याशिवाय लिहिल्याशिवाय मला झोप लागत नाही, हे मी प्रांजळपणे सांगतो. आर्थिक चणचण निर्माण झाल्यास कधीकधी मालिका-चित्रपटाकडे वळावे वाटते पण नाट्यसेवेतून जे मानसिक समाधान मिळते ते या झगमगाटात नाही, असे मला वाटते.

प्रश्न : लेखक, दिग्दर्शक आणि अभिनेता म्हणून आपण यश संपादन केले आहेच तरिदेखील या तीनपैकी कोणत्या क्षेत्रात तुम्हाला अधिक मोठं व्हायला आवडेल?

उत्तर : या तीन्ही क्षेत्रात योगदान देण्याचा मी प्रयत्न करत आहे. प्रामाणिकपणे मेहनत करून तीन्ही क्षेत्रात चांगलं काम करण्याचा माझा प्रयत्न असतो. क्षेत्र कोणतेही असो आव्हानात्मक काहीतरी करायला मला जास्त आवडते.

प्रश्न : सुरूवातीच्या काळात मराठवाड्यातील नाट्य चळवळ ही शहरांएवढीच ग्रामीण भागातही सक्रिय होती परंतु आज शहर हेच रंगभूमीचे केंद्र झालेले आहे. ग्रामीण भागात पुन्हा नाट्य चळवळ सुरू करण्यासाठी काय करावे लागेल?

उत्तर : मी स्वतः लहानपणी खेड्यात गणेशोत्सव, जत्रा, नवरात्रोत्सवात नाटके पाहिली आहेत. आजही अनेक खेड्यात अशी नाटके सादर होतात; परंतु हे प्रमाण कमी झाले आहे. हे प्रमाण पूर्ववत होण्यासाठी शासकीय स्तरावर काही प्रयत्न झाले पाहिजेत असे मला वाटते. प्रौढ शिक्षण अभियानासारखे ग्रामीण भागात नाट्य चळवळ रूजवण्यासाठी शासनाने प्रयत्न केले पाहिजेत. खेड्या-पाड्यातील, वस्ती-तांड्यावरील शालेय विद्यार्थ्यांना शाळेतच शास्त्रीय नाट्यशिक्षण शासनामार्फत दिले गेले पाहिजे. सांस्कृतिक मंत्रालया अंतर्गत होणाऱ्या नाट्यस्पर्धा गाव पातळीपर्यंत पोहचल्यास मराठवाड्यातील ग्रामीण रंगभूमी नक्कीच पुनरूज्जीवीत होईल!

नाटककार-रंगकर्मी रावबा गजमल यांची मुलाखत घेताना प्रकल्प सहाय्यक रामेश्वर वाकणकर

परिशिष्ट-ब

संदर्भग्रंथ सूची

१. आघाव दत्तात्रय/क्षीरसागर मधुकर/वाढे रामनाथ (संपा.), मराठवाड्यातील मराठी कादंबरीची स्वरूप-वैशिष्ट्ये, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद.

२. आडगावकर सुरेखा, संत एकनाथांचा धर्मविचार, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे.

३. इंगळे कैलास, वाङ्मयीन मराठवाडा, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद.

४. कानेड माणिक, जागतिक रंगभूमी-१, (पूर्वरंग), रोहन प्रकाशन, पुणे.

५. कानेड माणिक, जागतिक रंगभूमी-१, (पश्चिमरंग), रोहन प्रकाशन, पुणे.

६. कांबळे ऋषिकेश, भाई तुम्ही कुठे आहात!, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद.

७. कांबळे मिलिंद (संपा.), मराठवाडा : सृजन आणि साहित्य, इसाप प्रकाशन, नांदेड.

८. काळुंखे रामचंद्र (संपा.), ग्रामीण वाङ्मयाचा इतिहास, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद.

९. कुरुंदकर नरहर, रंगशाळा, देशमुख आणि कंपनी, पुणे.

१०. कुलकर्णी अनिरुद्ध (संपा.), प्रदक्षिणा खंड पहिला, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे.

११. कुलकर्णी अनिरुद्ध (संपा.), प्रदक्षिणा खंड दुसरा, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे.

१२. कोत्तापल्ले नागनाथ (संपा.), निवडक बी. रघुनाथ, साहित्य अकादमी, नवी दिल्ली.

१३. कोरान्ने मधूरा, नाट्याक्षरे, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे.

१४. घोगे पराग, नाट्यदर्शन, विजय प्रकाशन, नागपूर.

१५. घोक्षे बापू, यातना उत्सव, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद.

१६. जवळगेकर शिवाजी, दत्ता भगत यांचे नाट्यलेखन, मैत्री प्रकाशन, लातूर.

१७. जहागिरदार चंद्रशेखर (संपा.), तौलनिक साहित्याभ्यास : तत्त्वे आणि दिशा, सौरभ प्रकाशन, कोल्हापूर.

१८. जाधव रा. ग., निळी पहाट, विजय प्रकाशन, नागपूर.

१९. जाधव रा. ग., निवडक समीक्षा, पद्मगंधा प्रकाशन, पुणे.

२०. जोशी वि. कृ., लोकनाट्याची परंपरा, ठोकळ प्रकाशन, पुणे.

२१. त्रिभुवन प्रकाश, थांबा! रामराज्य येतंय!, आनंद बुक डेपो, औरंगाबाद.

२२. त्रिभुवन प्रकाश, गणनायिका आम्रपाली, सुमेध बोधीसत्त्व प्रकाशन, औरंगाबाद.

२३. ठाकूर भगवान, आंबेडकरी साहित्य : स्थिती आणि स्थित्यंतरे, आकांक्षा प्रकाशन, नागपूर.

२४. ढेरे रा. चिं., लोकरंगभूमीचे उपासक, पद्मगंध प्रकाशन, पुणे.

२५. तांगडे राजकुमार, आकडा आणि इतर एकांकिका, जनशक्ती वाचक चळवळ, औरंगाबाद.

२६. तुळपुळे शं. गो., पाच संतकवी, व्हीनस प्रकाशन, पुणे.

२७. दहिफळे बाळासाहेब, सोयगावची शतकी नाट्यपरंपरा, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद.

२८. दळवी अजित, डॉक्टर! तुम्हीसुद्धा..., पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.

२९. दळवी अजित, शतखंड, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.

३०. दळवी प्रशांत, चारचौघी, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.

३१. दळवी प्रशांत, सेलिब्रेशन, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.

३२. दातार मामा, नाटकाचा संसार, साकेत प्रकाशन, औरंगाबाद.

३३. देशमुख कुमार, आडगावचे चौधरी, जनशक्ती वाचक चळवळ, औरंगाबाद.

३४. देशमुख संजय, पारंपरिक नाट्यरूप लोकोत्सव, गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद.

३५. देशपांडे गो. पु., नाटकी निबंध-रहिमतपुरकरांची निबंधमाला-१, लोकवाङ्मय गृह, मुंबई.

३६. देशपांडे द. ग., नाट्यवेडा मराठवाडा, मल्हार प्रकाशन, जालना.

३७. देशपांडे वि. भा. मराठी नाट्यकोश, निशांत प्रकाशन, पुणे.

३८. देशपांडे वि. भा, मराठी नाटक-नाटककार : काळ आणि कर्तृत्व-खंड ३, दिलिपराज प्रकाशन, पुणे.

३९. धामणकर ज्योती (संपा.), अजिंठा, स्मरणिका (३८ वे मराठवाडा साहित्य संमेलन, सोयगाव), कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद.

४०. धांडे चंद्रकांत, नाट्यमंथन, किर्ती प्रकाशन, औरंगाबाद.

४१. नसिराबादकर ल.रा., प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

४२. नाईकवाडे राजेंद्र/जयस्वाल राजन (संपा.), समकालीन मराठी रंगभूमी, विजय प्रकाशन, नागपूर.

४३. निंबाळकर वामन/मनोहर यशवंत (संपा.), दलितांचे विद्रोही वाङ्मय, प्रबोधन प्रकाशन,

४४. नेमाडे भालचंद्र, टीकास्वयंवर, साकेत प्रकाशन, औरंगाबाद.
४५. पाटील श्रीराम (संपा.), मायबोलीचा मराठवाडा-खंड-१, योगेश प्रकाशन, औरंगाबाद
४६. भगत दत्ता, वाटा-पळवाटा, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे.
४७. भगत दत्ता, अश्मक, अभय प्रकाशन, नांदेड.
४८. भगत दत्ता, मराठी नाटक आणि रंगभूमीचा इतिहास (आरंभापासून १९९० पर्यंत),म.रा.सा.सं. मंडळ, मुंबई.
४९. भगत-शेंडे शर्मिला (संपा.), बेबी, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.
५०. भालेराव इंद्रजित (संपा.), लाल चिखल (निवडक भास्कर चंदनशिव), लोकवाङ्मय गृह, मुंबई.
५१. भालेराव इंद्रिजित/उमरीकर श्रीकांत (संपा.), समग्र बी. रघुनाथ-खंड दुसरा, गणेश वाचनालय व बी. रघुनाथ विश्वस्त समिती, परभणी.
५२. भावे पु. भा., रंग नाटकाचे, राजहंस प्रकाशन, पुणे.
५३. भावे वि. ल., महाराष्ट्र सारस्वत, खंड १, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.
५४. मदन देवकर्ण, मराठवाड्यातील साहित्यसमीक्षा आणि संशोधन, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद.
५५. मर्ढेकर बा. सी., सौंदर्य आणि साहित्य, मौज प्रकाशन, मुंबईराजाध्यक्ष विजया (संपा.), मराठी वाङ्मयकोश, खंड चौथा, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई.
५६. महाजन त्र्यंबक, नाट्यधर्मी मराठवाडा, प्रतिमा प्रकाशन, पुणे.
५७. महाजन त्र्यंबक, झुलते मनोरे, शांभवी प्रकाशन, औरंगाबाद.
५८. महाजन सर्वेषा (संपा.), दादामुनी (त्र्यंबक महाजन गौरवग्रंथ), ओम अभिनय बहुउद्देशीय संस्था, औरंगाबाद.
५९. महानोर ना. धों., गावगारूड, साक्षात प्रकाशन, औरंगाबाद.
६०. मांडे प्रभाकर, लोकरंगभूमी, गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद.
६१. मांडे प्रभाकर, लोकरंगभूमी व अभिजात रंगभूमी, गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद.
६२. मांडे प्रभाकर, लोकरंगधारा, गोदावरी प्रकाशन, औरंगाबाद.

६३. राजाध्यक्ष विजया (संपा.), मराठी वाङ्मयकोश-खंड चौथा, म.रा.सा.सं. मंडळ, मुंबई.
६४. राजापुरे-तापस पुष्पलता, नाटक कालचं आणि आजचं, सायन प्रकाशन, पुणे.
६५. रूद्रकंठावार बब्रूवान, चौथ्या इस्टेटच्या बैलाला, जनशक्ती वाचक चळवळ, औरंगाबाद.
६६. लिंबाळे शरणकुमार (संपा.), भारतीय दलित साहित्य, साहित्य अकादेमी, नवी दिल्ली.
६७. लुलेकर प्रल्हाद जी./बडवे सतीश (संपा.), मराठवाड्यातील साहित्य, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद.
६८. लुलेकर प्रल्हाद, मराठवाड्यातील मराठी वाङ्मयाचा इतिहास, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद.
६९. लुलेकर प्रल्हाद, मराठवाडा : इतिहास, साहित्य आणि संस्कृती, विद्यापीठ अनुदान आयोगाला सादर केलेला अप्रकाशित बृहत संशोधन प्रकल्प, मार्च २०१५.
७०. लोमटे आसाराम, आलोक, शब्द पब्लिकेशन, मुंबई.
७१. वझे माधव, रंगमुद्रा, राजहंस प्रकाशन, पुणे.
७२. शिंदे संजय, नागनाथ कोत्तापल्ले : व्यक्ती आणि वाङ्मय, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद.
७३. सरदार गं. बा., संत वाङ्मयाची सामाजिक फलश्रुती, लोकवाङ्मय गृह, मुंबई.
७४. साठे मकरंद, मराठी रंगभूमीच्या तीस रात्री-खंड पहिला, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.
७५. साठे मकरंद, मराठी रंगभूमीच्या तीस रात्री-खंड तिसरा, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.
७६. साळुंके सतीश, मराठवाड्याची नाट्यपरंपरा, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद.
७७. क्षीरसागर दीपा, रंगवेध (बीड जिल्ह्यातील नाट्यपरंपरा), उन्मेष प्रकाशन, पुणे.

नियतकालिके

१. अतिरिक्त, संपा. काळे दा. गो./मनवर दिनकर, मे. २०१२.

२. आशय, संपा. तडेगावकर संजिवनी, ऑक्टो. ते डिसें. २०१६.

३. दक्षिण महाराष्ट्र साहित्य पत्रिका, संपा. नलगे चंद्रकुमार, जु.ऑ.स. २०१२.

४. प्रतिष्ठान, संपा. लोमटे आसाराम, स.ऑ.नो.डि. २०२०.

५. भाषाभान, संपा. काळुंखे रामचंद्र, ऑक्टो. २०१२ ते मार्च २०१३.

६. विश्वसंकेत, दिवाळी विशेषांक, २००९.

परिशिष्ट-क (१)

मराठवाडा रंगभूमीचे मानदंड-नाटक





































परिशिष्ट-क (२)
मराठवाडा रंगभूमीचे मानदंड-नाटककार

श्रीपाद बेंडे

दिवाकर कृष्ण केळकर

त्र्यंबक महाजन

म. भि. चिटणीस

रा. रं. बोराडे

दत्ता भगत

अजित दळवी

प्रशांत दळवी

प्रकाश त्रिभुवन

अनुराधा वैद्य

भारत सासणे

रेखा बैजल

किरण पोत्रेकर

धनंजय सरदेशपांडे


बब्रूवान रूद्रकंठावार

राजकुमार तांगडे

परिशिष्ट-क (३)

नटवर्य लोटू पाटील



पुरुषोत्तम हौजवाला



मामा दातार



कमलाकर सोनटक्के



लक्ष्मणराव देशपांडे



श्रीराम गोजमगुंडे

विजय दिवाण

रुस्तुम अचलखांब

वामन केंद्रे

दिलीप घारे

यशवंत देशमुख

मकरंद अनासपुरे

चंद्रकांत कुलकर्णी

प्रतीक्षा लोणकर



अरविंद जगताप



संदीप पाठक